

मला (न) कळलेले बाबा । विलास मनोहर



'नेगल' भाग 1 व भाग 2, 'एका नक्षलवाद्याचा जन्म' ह्या माझ्या पुस्तकांचं कौतुक झालं. लोक मला लेखक समजू लागले. पुढे कधी तरी पुण्यात गेल्यावर पुस्तक भिशी, गप्पा-गोष्टी अशा कार्यक्रमाला बोलावू लागले. एकदा तर चक्क भाषण देण्यासाठी बोलावणे आल्यावर मी हादरलो. म्हटलं, हे काही खरं नाही. चार लोकांत मिसळावं, नवीन कोणाशी ओळख करून घ्यावी हे मला आवडत नाही. मी तोंडाने फटकळ आहे. संसारी असून त्यात गुंतायचं नाही असा माझा प्रयत्न असतो. खरं तर, माझं माझ्या स्वत:वरच प्रेम आहे. कदाचित त्यामुळे तरुणपणी पुणे, घरदार, मित्रमंडळी सोडून गडचिरोलीच्या जंगलात येऊन राहणं पसंत केलं असेल. घनदाट जंगलात, आदिवासींत येऊन राहण्यात कोणता त्याग वगैरे नाही, तर स्वार्थ होता. 'नेगल' या पुस्तकाला, मा. गो. नी. दांडेकरांनी 'मृण्मयी' पुरस्कार दिला. तो घेण्यास मी पुण्यास जाऊ शकलो नाही. माझ्या आईनं तो स्वीकारला, त्यावेळी माझी आई म्हणाली होती, "माझा मुलगा जंगली प्राण्यांच्या सहवासात माणसाळला.''

मुलाबद्दल आईनं असं जाहीरपणे बोलणं ह्यावरून माझ्या स्वभावाची कल्पना यावी.

खरं तर सुरुवातीला लेखक म्हटलेलं मला बरं वाटत होतं. त्या वेळी सावध झालो नाही, त्याची फळं आता भोगत आहे. कुणाशी ओळख करून देताना, "ह्यांना भेटा. हे 'नेगलकार' विलास मनोहर, लेखक आहेत,'' अशी करून देतात. नवीन माणूस 'नेगल' वाचलेला असला तरी काहीशा संशयानं माझ्याकडं पाहातो. मग त्याची नजर पिंजऱ्यातल्या माकडाकडं पाहिल्यासारखी होते. ही वेळ माझ्यासाठी खूप अवघड असते. माझा डाव्या हाताचा पंजा छाती खाजवण्यासाठी वर येऊ लागतो, दात विचकावे असं वाटू लागतं. कसाबसा स्वत:ला सावरत मी हसतो. इतके दिवस पिंजऱ्यातले सिंह, बिबटे पाहात आहे, पण अशी चमक कुणाच्या डोळ्यांत पाहिली नाही. दोन-तीन पुस्तकं लिहिण्याचा मूर्खपणा मी का केला? हा प्रश्न मला नेहमी सतावत असतो. भेटणारा 'आता काय नवीन लिहीत आहात?' असं विचारतो. मागे एका प्रकाशकानं, 'तुम्ही ह्याच्यावर लिहा, काहीही लिहा, कसंही लिहा, मी छापतो,' असं म्हटलं. थोडक्यात, सुपारी दिली. मी सुपारीलेखक नाही. काही लिहिलं नाही तरी दोन वेळा पोटभर खाऊ शकेन अशी माझी परिस्थिती आहे. मी बाबा आमटे ह्यांच्या संस्थेत राहातो. इथं कुणी, कधीच उपाशी राहणं शक्य नाही.

1975 साली मी बाबा आमटे ह्यांच्याकडे आलो. सुरुवातीपासून हेमलकसा इथं लोक-बिरादरी प्रकल्पात राहू लागलो. त्यावेळी हेमलकसा वर्षातील सहा-आठ महिने इतर जगापासून तुटलेलं राहात असे. डिसेंबरनंतर रस्ते वाहतुकीस योग्य होत. मग जूनच्या मध्यापर्यंत हेमलकसा इथं वाहनं येत. खरं तर त्यावेळी बाबांना हेमलकसाला राहावं असं वाटे. आनंदवन, इतर प्रकल्प व प्रकृतीमुळे ते सहा महिने हेमलकसा इथं राहू शकत नव्हते. अर्थात, मनानं ते इथंच असत. त्या वेळी हेमलकसा इथं 20 ते 30 वयोगटातील आम्ही सर्व कार्यकर्ते होतो. वयस्कर कुणी नव्हतं म्हणूनही बाबांना काळजी वाटत असावी. पत्र पोहोचण्यास 20 ते 25 दिवस लागत. काही अडचणीच्या वेळी कुणी पायी आल्यास पत्रं/चिठ्ठ्या येत. त्यावेळी मोबाईल काय, पण साध्या फोनचा विचार कुणाच्या मनात आला नव्हता. प्रकाश व इतर कार्यकर्ते बाबांना आठवणीनं पत्रं/चिठ्ठ्या पाठवत. मी पुण्याला घरी कधी पत्र पाठवत नव्हतो, तर चिठ्ठी कुठून पाठवणार. मधून मधून बाबा स्वत: एकत्र चिठ्ठी पाठवत, त्यातून काळजी व्यक्त होत असे. काही महत्त्वाच्या सूचना असत. बाहेरील जगाबद्दल, घडामोडींबद्दल, राजकारणाबद्दल सूचक बातम्या असत. काहीशा अलंकारिक मराठी भाषेत चिठ्ठी असे. एकदा सामूहिक वाचन झाल्यावर, पुढे काही दिवस ती चिठ्ठी फिरत राही. वाचन होत राही. चर्चाही. काही कार्यकर्ते, बाबांनी त्यांचा वेगळा उल्लेख केला आहे की नाही हे पहात. तसा असेल तर तो चार-पाच दिवस छाती काढून चालत असे. बाबा आठवणीने सर्वांना आशीर्वाद देत. कोणत्याही रुग्णाचं नाव कधी विसरत नसत. तसं प्रत्येकाकडे कोणतं ना कोणतं काम दिलेलं होतं. मी प्रकाशबरोबर पडेल ते काम करत असल्यानं, प्रकाशची चिठ्ठी ती माझी, अशी माझी समजूत होती. अशाच एका पत्रात बाबांनी पत्राच्या शेवटी लिहिलं होतं, "विलासच्या मौनाला लेखणीचा अंकुर केव्हा फुटणार?'' नंतरही मी चिठ्ठी पाठवली नाही. चार-पाच वर्षांनंतर प्रथम मी बाबांना चिठ्ठी नाही, तर

हेमलकसाजवळील पाच उपकेंद्रांवरील परिस्थितीबाबत तपशील लिहून कळवला. कारण त्यावेळी उपकेंद्रं नव्याने सुरु केली होती. उपकेंद्रांवरील रेशन, इतर वस्तू, औषधं पाठवण्याचं काम मी करत होतो. चार-पाच वर्षांत बाबा नेहमी कशाबद्दल जागरूक असतात ते निरीक्षणानं समजलं होतं त्याप्रमाणे चिठ्ठी लिहिली. त्यात मला तरी काही विशेष केल्यासारखं वाटलं नाही. माझं कर्तव्य मी केलं. बाबा नेहमी साध्या साध्या गोष्टीचं कौतुक करून कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देत असत. त्यातूनच बाबांनी ती चिठ्ठी यदुनाथजींना दिली. यदुनाथजींनी ती चिठ्ठी साधना मासिकात 'हेमलकसातील घटना' म्हणून छापून प्रसिद्धी दिली. तर हा असा मौनाला लेखणीचा अंकुर फुटला तो एकदम समाजवादी! कुणाकुणाला काटे बोचले ते जाऊ द्या. त्यावेळीही सावध झालो नाही. अंकुर खुडला नाही, रोपटंही उपटून फेकलं नाही. आता नाहक लेखक म्हणून भोगतो आहे.

सध्या हातात काम नसल्यानं काहीसा विरक्तपणा येत आहे. माझी स्थिती काहीशी 'संदीप खरे'च्या कवितेसारखी झाली आहे-

'ताप नको मज कुठलाही अन् व्याप नको आहे
उत्तर कुठले? मुळात मजला प्रश्न नको आहे!'

प्रकल्पावरील सर्व जबाबदारी डॉ. दिगंत, डॉ. सौ. अनघा व अनिकेत, सौ. समिक्षा ह्यांनी समर्थपणे पेलली आहे. त्यामुळे तर-

'आताशा मी फक्त रकाने दिवसाचे भरतो...
चाकोरीचे खरडून कागद सहीस पाठवितो!'

अशा स्थितीत काही दिवस काढल्यावर मी काहीसा अंतर्मुख झालो-

'राखण करीत बसतो सदैव कंटाळा
कंटाळ्याचादेखील आता कंटाळा येतो!'

असं तर माझं होणार नाही ना? बरेच दिवसांत काही लिहिलं नाही. लिहावं का? काय लिहावं, कशावर लिहावं हे ठरत नव्हतं. काल्पनिक लिहावं तर मनाला पटेना. आजपर्यंत फक्त स्वत:वर प्रेम करणारा मी, प्रेमकथा लिहू शकणार नाही. 'नेगल' व 'एका नक्षलवाद्याचा जन्म' ह्या दोन्ही पुस्तकातील घटनांशी माझा स्वत:चा संबंध होता. ती दोन्ही पुस्तकं वाचकांना आवडली, त्यांचं कौतुक झालं. लेखक म्हणून ठपकाही लागला. 'लोकबिरादरी'वर लिहावं का? पण आपण स्वत:चं कौतुक केल्यासारखं होईल. त्यात नवीन पिढी. जुनं काही सांगण्यास जावं तर 'हं! हं!! माहीत आहे' असा काहीसा चेहरा करतात. 'अरे, आता म्हातारा तीच जुनी झालेली रेकॉर्ड लावणार रे! पळा रे पळा,' असं त्याच्या मनात आहे हे ओळखू येतं. जीवनातील बारीकसारीक गोष्टी हेरुन बाबा त्याचं कवितेत वर्णन करतात-

'मरत नाही ही लाचारी आणि आत्महत्या हे पाप
वाढत्या गर्दीने त्याला बाजूला सारलेले असते
आणि तावडीत सापडलेल्या कोपऱ्यात गाठून तो
उपदेशाचे मचूळ पाणी
चमच्याने पाजू पाहातो'
- ज्वाला आणि फुले

नकोच, 'लोक-बिरादरी'वर लिहिणं नको. मग 'भारत जोडो' यात्रेवर लिहावं का? पण 'भारत जोडो' यात्रेत मी नक्की कोण होतो? बाबांचा वैयक्तिक सेवक. मी कधी तरुणासारखी सायकल चालवली नाही, की कुठं कधी भाषण केलं नाही. बाबांच्या वैयक्तिक सेवेशिवाय इतर 'भारत जोडो' यात्रेत मी केलं काय? फक्त डोळे उघडे ठेवून पाहात होतो सामान्य माणसाचं मोठेपण आणि मोठमोठ्या व्यक्तींतील खुजेपण. असो.

बाबा आमटे ह्या व्यक्तीवर अनेकांनी, अनेक भाषांत पुस्तकं लिहिली आहेत. काही परदेशी व्यक्तींनी परदेशी भाषेत पुस्तकं लिहिली आहेत. एका-दोघांनी पीएच.डी. केली आहे. स्वत: बाबांची पाच-सहा पुस्तकं आहेत. बाबांसारख्या महान व्यक्तीवर लिहिणारी व्यक्ती स्वत: कर्तबगार, उच्चशिक्षित असावी, नाही का? मोठ्या व्यक्तीबद्दल छापल्या जाणाऱ्या मजकुराबद्दल समाजमन, समाजातील गट जागरूक असतात. पण मग माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्यानं, त्याला बाबा कसे दिसले ते लिहूच नये का? बाबांवर लिहिणारे सर्व चार-पाच वेळा संस्थेत येऊन गेले आहेत. कारण मी अनेक वर्षांपासून संस्थेत आहे. मी पाहात आलो आहे, सर्वसाधारण सर्वांची पद्धत एकच असते. बाबांची संस्था, आनंदवन, इतर प्रकल्प चार दिवस राहून पाहायचे; प्रकल्पातील कार्यकर्ते, रुग्णांशी बोलत. बाबांची पुस्तकं अभ्यासत. बाबांच्या सहवासात काही तास घालवत. माझ्या-सारख्या जुन्या खोडांना बाबांबद्दल अनुभव विचारत. जुन्या कार्यकर्त्यांना 'जुनं खोड' हा शब्दप्रयोग का बरं करतात? काही तरी खोड असते म्हणून, की आता पालवी झडली - नुसतं खोड आहे म्हणून म्हणत असतील. मनाला पडणाऱ्या अशा विचित्र शंकांना उत्तरं देण्यास बाबाही नाहीत. असो. अशी ही जुनी खोडं, कार्यकर्ते संस्थेत होते त्यावेळी त्यांना वाटत असे की, मी बाबांचा खास विश्वासातला आहे. माझ्यावर बाबांनी महत्त्वाची जबाबदारी टाकलेली आहे. मी होतो म्हणून हा प्रकल्प मोठा झाला. खरं तर प्रत्येक कार्यकर्त्याला असं वाटणं ह्यात बाबांचा मोठेपणा आहे. चलाखी आहे. 'सामाजिक संस्थेचं संचालन' ह्या स्वत:च्या पुस्तकात मात्र ह्या युक्तीचा उल्लेख टाळला आहे. इतक्या वर्षांच्या अनुभवानं बाबांनी कित्येक व्यक्तींच्या मनाचा वेध घेतला असेल. तरुणांना नक्की काय हवं हे त्यांच्याइतकं समजणारा कुणी नव्हता हे खरं!

हे असे आहे. बाबांचा विषय असेल तर वाहत जाणं आलं. वयाच्या 94 व्या वर्षी बाबा आपल्याला देहानं सोडून गेले. शेवटची दोन-तीन वर्षं तर ते अंथरुणावर होते, तरी नवीन व्यक्ती त्यांना भेटल्यावर अक्षरश: त्यांच्या प्रवाहात खेचली जात असे. कुणी व्यक्ती ह्या महान अनाकलनीय व्यक्तिमत्त्वाच्या खळखळत्या प्रवाहातून बाहेर न पडता जर का भोवऱ्यात सापडली, तर त्याचे जे काय हाल होत, ते मी पाहिले व अनुभवले आहेत. सर्व जगच काही क्षण मिथ्या वाटून सर्व सोडून इथंच राहावं असं अनेकांना वाटे. अर्थात, अशा वेळी बाबाच त्यांना समजावून, तुम्ही करता ते कसं योग्य आहे किंवा त्याशिवाय हेसुद्धा करा, असा सल्ला देत. पुस्तक-लेखक कार्यकर्त्यांशी, रुग्णांशी बोलत. विचारणारे भारावलेले असत. बाकीच्यांचं माहीत नाही, पण मला हसू येत असे. लिहिणारा भक्तीनं, प्रेमानं आंधळा झालेला, बाबांच्या व्यक्तिमत्त्वानं डोळे दिपलेला. पाच आंधळे हत्ती पाहण्यास जातात, अशी जी गोष्ट, तसा काहीसा प्रकार. मला माहीत आहे, मी लहान तोंडी मोठा घास घेत असेनही. मला कुणाला दुखवायचं नाही. हे माझं सामान्याचं मत आहे. बाबांच्या संस्थेत येऊन मला पस्तीस वर्षं झाली. तेहतीस वर्षं बाबा हयात होते.

मी व बाबा चोवीस तास सहवासात होतो. निदान हजार दिवस तरी असतील. दोन्ही भारत जोडो यात्रा, कसरावदचे दोन महिन्यांचे दोन-तीन मुक्काम, दिल्ली-बेळगाव-कलकत्त्याचा प्रवास, मुंबई इथली बाबांची शस्त्रक्रिया व शेवटी बाबा रक्ताच्या कर्करोगानं आजारी असतानाचे सहा महिने, मी बाबांचा निकट सहवास अनुभवला, तरीही मला बाबा दोन टक्केही समजले नाहीत. बाबा कसे होते, याचा प्रत्येक वेळी वेगळा भास होत असे.

पहाटेच्या उगवत्या सूर्यासारखे,
कन्याकुमारीच्या समुद्राच्या भव्यतेसारखे,
कोजागिरी पौर्णिमेला पडलेल्या चांदण्यासारखे,
आषाढातील धुंवाधार पावसासारखे,
संधिप्रकाशातील घनदाट अरण्यासारखे,
दुथडी भरून घोंघावत वाहणाऱ्या इंद्रावतीसारखे,
वासराच्या ओढीनं हंबरत येणाऱ्या गाईसारखे.

नक्की कसे ते ठरवता येत नाही. कदाचित माझ्या सामान्य बुद्धी-क्षमतेनं असेल, बाबांच्या जवळपास राहण्यासाठी येणारे पाहुणे, भक्तगण आम्हाला बाबांची माणसं म्हणून ओळखत. त्यात त्यांचा मोठेपणा होता. तरी बाबांच्या सोबतच्या शेकडो आठवणी आहेत, त्या लिहाव्या का? त्या लोक वाचतील का? माझ्या आयुष्यातली बत्तीस वर्षं मी ह्या मोठ्या, खऱ्या माणसासोबत घालवली आहेत. मी बाबांना प्रथम भेटलो तेव्हा ३१ वर्षांचा होतो. भारावून जाण्याचं वय नव्हतं. मी बाबांकडे कसा आलो? का आलो? ह्याला अनेक कारणं आहेत. ती पुढे कुठं तरी येतील. पण इतक्या वर्षांनंतर नक्की कोणतं कारण हे सांगता येणार नाही. माझ्यासमोर गेल्या तीस वर्षांत अनेक कार्यकर्ते गेले. मी का राहिलो हेही सांगता येणार नाही, कारण बाबांच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रचंड भोवऱ्यात मी अनेकसांसारखा गरगर फिरत राहिलो आहे.

आता बाबा नाहीत, तरी पण आपण अशा आठवणी लिहिलेल्या बाबांना आवडल्या असत्या का? असा विचार मनात आला. हसू आलं. मी लेखक एक वेळ ठीक आहे, पण मी बुद्धिजीवी विचार का करतो आहे?

बाबांना भेटण्यास अनेक जण येत असत. मोठे नाववाले साहित्यिक, संपादक, पत्रकार, कवी, न्यायाधीश, उद्योगपती, मंत्री, खासदार, आमदार फक्त महाराष्ट्राचेच नाही तर इतर राज्यातील; विद्यार्थी, निरनिराळ्या क्षेत्रातील मान्यवर, तर काही सामान्य संसारी आपल्या घरगुती अडचणी घेऊन फक्त दर्शनासाठी येत. बाबा सर्वांना भेटत, त्याच आपुलकीनं बोलत. तरी पण त्यातल्या उच्चशिक्षित तरुणांचं, आय.आय.टी.-आय.ए.एस. ह्यांचं बाबांना विशेष कौतुक असे. दुपारी जेवणानंतर बाबांची विश्रांतीची वेळ असे. सकाळ-संध्याकाळी बाबा, कुणालाही कधीही भेटत असत. 'अतिथी देवो भव' हा मंत्र खरा जपला तो ताई-बाबांनी. दुपारी येणाऱ्यांना मात्र थोडा वेळ थांबावं लागे. त्यावेळी बाबांच्या खोलीबाहेरील 'नंदी'ची भेट पडे. 'बाबा आजारी आहेत, ते फारसे कुणाला भेटत नाहीत, थांबा तुम्ही, मी बघतो, बाबांना विचारतो,' अशी उत्तरं मिळत. अर्थात, अनेक वेळा मी 'नंदी' म्हणून काम केलं आहे. त्यावेळी आम्हा 'नंदी' लोकांना भाव असे. ह्या खोलीबाहेरील व्यक्तींना 'नंदी' अशासाठी म्हणतोय, कारण अनेक जण बाबांना देवच मानत होते. बाबांचं काम चंद्रपूर, गडचिरोलीच्या जंगलात वाढलं. प्रत्येक नवीन प्रकल्प समाजापासून लांब जंगलात, मसणवटीत सुरु केला. पुढे नर्मदा किनारीही ते गावापासून लांबच होते. म्हणून बाबा हे शंकराचा अवतार. शंकराला भेटण्याआधी भेटणारे आम्ही 'नंदी'. कधीमधी भेटणाऱ्याला शंकराकडून गंगाजल मिळत असे. आम्हा जवळपास वावरणाऱ्यांना कोप व तांडव नृत्यही अनुभवायला मिळालं आहे.

अरे हो, विचारवंतांबाबत सांगत होतो, नाही का? सहा-सात वर्षांपूर्वी एकदा दुपारी मी 'नंदी' बनून बाहेर बसलो होतो. आठ-दहा जण होते. मी चौकशी केली. ते जेवून आले होते म्हणून चहापाण्याचं पाहू लागलो. तीन-चार जण बरेच वेळा येणारे असल्यानं ओळखीचे होते, बाकी त्यांच्या सोबत होते. राहणीमानावरून नामवंत मंडळी होती. पत्रकार, लेखक असावेत. कधी एकदा बाबा भेटतील असे भाव चेहऱ्यावर होते. त्यांचं आपसात काहीतरी बोलणं चाललं असावं. कसला तरी वाद असावा. अर्थात, खेळीमेळीचं बोलणं असावं. मी पाण्याचे ग्लास भरलेला ट्रे त्यांच्यासमोर घेऊन आलो. त्यातील पूर्वपरिचयातील गृहस्थ माझ्याकडे पाहून म्हणाले,

"वाद कशाला, आपण विलासला विचारु.''

मी बाबांसोबत असतो म्हणून ते मला हुशार, शहाणा समजत होते, की बाबांच्या धो धो वाहणाऱ्या ज्ञानगंगेत राहूनही हा गोटा राहिला आहे का, हे पाहात होते? मी चेहऱ्यावर शक्यतो कोणतेही भाव दिसणार नाहीत अशा तऱ्हेने त्यांच्याकडे पाहात उभा असताना त्यांनी विचारलं,

"अरे विलास, विचारवंत कसा ओळखावा?''

मी नजर टाळत म्हणालो,

"काका, विनोद झाल्यावर जो पटकन हसत नाही तो विचारवंत.''

क्षणभर शांतता झाली. काही विचार करू लागले.

"अरे, म्हणजे कसं?''

आता सर्वांकडे पाहात मी म्हणालो,

"सामान्य माणूस विनोदाला चटकन हसून दाद देतो; पण विचारवंत विचार करतो, की हा विनोद कुणी केला आहे. आपण हसावं की नाही? कुणाच्या भावना तर दुखावणार नाहीत ना? अशात इतका वेळ जातो, की तोपर्यंत दुसरा विनोद होऊन गेलेला असतो.''

नशिबानं समोर दोन विचारवंत होते.

"चहाचं बघतो...'' म्हणत मी तिथून निसटलो.

"पाहिलंत, बाबांची माणसं...'' कुणीतरी म्हणालं.

मी चपापलो. असं अनेक वेळा होत असे. बाबांची माणसं म्हणून मी सुटत असेन, पण काही जण बाबांबद्दल काय समज करून घेत असतील? की हे असे माझ्यासारखे अनेक साप गळ्यात अडकवून बाबा राहिल्यामुळं बाबांना लोक शंकर समजत असावेत?

महारोगी सेवा समिती, वरोरा ही बाबांनी महारोग्यांसाठी सुरु केलेली संस्था सर्वांसाठी आहे. आता तर अंध-अपंग-मूक-बधिर व आदिवासींसाठीही संस्था काम करते. अगदी सुरुवातीला एकंदर महारोग्यांविषयी भीती व घृणा ह्यामुळे इतर फारसे कुणी आलं नसावं. पण बाबांनी संस्थेत गरीब-श्रीमंत, धर्म, जात, वंश, पक्ष असा भेदभाव कधीच केला नाही. कुणी येण्याबाबत अगर जाण्याबाबत बाबांनी कधी हस्तक्षेप केल्याचं माझ्या पाहण्यात-ऐकण्यात नाही. त्यांनी सर्वांना आपलं मानलं. ते आवड-निवड करत असते, तर मला कसे ठेवून घेतले असते, सहन केले असते?

पुण्याला एका मध्यमवर्गीय कुटुंबात मी मोठा झालो. अकरावी पास होतो. अनेक उपद्व्याप करून शेवटी स्वत: स्वतंत्र उद्योग करत होतो. मी बाबांकडे आलो. श्रमिक संघटनेच्या कामामुळे माझा धाकटा भाऊ कॉम्रेड अशोक मनोहर आधीपासून बाबांच्या माहितीचा, संबंधातला होता. त्यामुळे संस्थेत माझी ओळख, अशोक मनोहरचा भाऊ अशी झाली. एक धार्मिक, मध्यमवर्गीय कुटुंब ते सामाजिक संस्थेतलं प्रचंड मोठं कुटुंब, अशी माझी वाटचाल झाली. अनेक अनुभवांतून, बाबांच्या आणि प्रकाशच्या वागण्यातून, संस्थेचे नियम म्हणून समजत-उमजत गेलो. संस्थेत मी 1975 साली आलो, त्यावेळी अनेक तरुण बाबांकडे काम करण्यासाठी येत असत. काही जण एक-दोन वर्षं राहून परतही जात असत. तो काळ समाजसेवेने भारावलेला होता. बाबांचे विचार, व्यक्तिमत्त्व व त्यांचे काम तरुणांना आकर्षित करत असे. दरवर्षी होणाऱ्या श्रमसंस्कार शिबिरातील अनेक तरुण काम करण्यास येत होते. काही तरुण इतके भारावून गेलेले असत, की त्यांना प्रत्यक्ष कामापेक्षा बाबांच्या जवळपास राहण्यात, त्यांचं बोलणं ऐकण्यात, चर्चा करण्यात जास्त रस असे. रात्री, पहाटे बाबांसोबत चर्चा करण्यात ते धन्यता मानत. हे तरुण बाबांच्या बोलण्याच्या नोट्स काढत व त्यावर त्यांच्याच चर्चा झडत. काही उच्चशिक्षित, बहुतेक जण पदवीधर होते. मी फक्त एस.एस.सी. होतो. कदाचित तो न्यूनगंडही असेल; पण चर्चांमध्ये मी कधीच नसे. प्रकाशबरोबर पडेल ते काम व कुवतीप्रमाणे मदत करत असे. सुरुवातीपासून ह्या भारावलेल्या तरुणांबद्दल मला गंमत वाटत आली आहे. तो काळ होता आणीबाणीचा. बाबा आणीबाणीचे कट्टर विरोधक. सतत त्यावर चर्चा होई. विनोबा भावे, जयप्रकाश नारायण अशी नावं कानांवर पडत. तरुण पेटलेले होते... फक्त बोलण्यात असं आता वाटतं. अनेक तरुण देशासाठी, समाजसेवेसाठी जीवनदान देण्यासाठी बाबांकडे आले होते. जन्मठेपेची शिक्षा जशी कधी आठ-दहा वर्षांनी संपू शकते, तसं त्यांच जीवनदान होतं. साधी काठी हातात धरण्याची हिंमत नसलेले डाव्या विचारांचे तरुणही होते.

असा एक तरुण, जो माझ्या आधी सहा महिने बाबांकडे आला होता. प्रत्यक्ष कामापेक्षा तो बाबांसोबत राहून चर्चा करण्यात धन्यता मानत असे. रात्री, पहाटे बाबांबरोबर राहून वहीवर नोंदी घेणारा होता. पदवीधर होता. घरी भांडून, पळून येऊन समाजसेवा करण्यासाठी बाबांकडे आला होता. मी सर्वांबरोबर जेवत असे. दवाखान्यात काम करत असे. कामाच्या ठिकाणी व जेवताना

बाबांशी जे काय बोलणं व्हायचं ते कमीच. बाबा काय बोलत तेच ऐकत असे. बाबांचं साधं, रोजच्या व्यवहारातलं बोलणं इतर सामान्यांसारखे असे. कधी गंभीर, बोजड नसे. उलट गमतीशीर, हलकी चेष्टामस्करी असे. तेव्हा इतर तरुणांचा माझ्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन महारोगी रुग्णांपेक्षा वरचा - हेल्पर, कंपाऊंडर - असा असावा. माझ्या पुणेरी बोलण्यानं ते जवळपास येतही नसत. एका रात्री बाबांशी त्यांचं काय बोलणं झालं माहीत नाही. सकाळची वेळ होती. प्रकाश पेशंट पाहात होता. मी केसपेपरवरुन औषधं देत होतो. त्यावेळी हेमलकसाचा दवाखाना एका झोपडीत होता. मी औषधं काढत होतो त्याच्या उजव्या बाजूला एक खिडकी होती. तिथं एकदम घोडा येऊन उभा राहिला. प्रकल्पावर त्यावेळी एक घोडा होता. घोड्यावर एक तरुण बसला होता. त्या तरुणानं खिडकीतून मला हाकारलं,

"विलास, काल रात्री बाबांना मी जीवनदान कबूल केलं. तुझं काय? म्हणजे मला बाबांना सांगता येईल.''

"बाबा विचारत होते का?'' मी विचारलं.

"हा निर्णय तरुणांनी स्वत: घेतला पाहिजे. तू काहीच विचार केला नाहीस का?''

त्या विचारण्यात काळजी होती.

"लगेच ठरवावं लागेल का?''

मी विचारताच तो तरुण घोड्यावरुन माझ्याकडे, माझी कीव आल्यासारखा बघत होता. त्याच्या कपाळावर आठ्या पडल्या. 'कसे हे बाबांकडे येतात. अगदी सामान्य आहे,' असा भाव चेहऱ्यावर दिसू लागला. माझं सामान्यपण माझं बळ आहे हे त्याला काय माहीत. मग मीही चेहऱ्यावर भोळेपणा आणत विचारलं,

"अरे! पण बाबाच म्हणतात, दान माणसाला नादान करतं. मग जीवनदान कसं द्यावं?''

मी चटकन तिथून वळलो आणि औषधाचं बघू लागलो. पुढे काय होईल हे माहीत होतं. हे उत्तर बाबांकडे पोहोचणार नक्की. रात्री सगळे एकत्र जेवत असताना मी कंदिलाच्या उजेडात बाबांकडे पाहिलं. ज्यावेळी बाबांशी माझी नजरानजर झाली तेव्हा बाबा माझ्याकडे पाहून हसत होते. त्या हसण्यात मिश्कीलपणा जास्त होता. त्या हसण्याचा पूर्ण अर्थ समजण्यास अनेक वर्षं लागली. पुढे अनेक दिवस बाबांजवळ राहण्याचा योग आला. चेहऱ्यावरील भाव, हातांच्या-बोटांच्या हालचाली व डोळ्यांची भाषा समजल्यावर त्या हसण्यात कौतुक होतं हे समजलं.

बाबा होते तोपर्यंत कधी बाबांची पुस्तकं, कविता वाचण्याची जरुरी वाटली नाही, कारण बाबांच्या सहवासात त्या कविता अनुभवत होतो. नंतर आता बाबांचा प्रत्यक्ष सहवास नाही तर वाचून पाहू म्हणून सर्व पुस्तकं, कवितासंग्रह मिळवले. बाबांची कविता फार कठीण आहे असं अनेकांकडून ऐकलं होतं. पु. ल. देशपांडे, नरहर कुरुंदकर, वि. स. खांडेकर अशा महान व्यक्तींनी त्या कवितांचं रसग्रहण केलेलं आहे. तरी पण बघू मला काय समजतं, निदान मी बाबांची पुस्तकं वाचली आहेत अशी शेखी तरी मिरवता येईल. जसा जसा मी कविता वाचू लागलो तसतसे बाबांच्या सहवासातील अनेक प्रसंग आठवू लागले, त्या घटनांशी साधर्म्य वाटू लागलं. मग एक चाळा सुरु झाला, सहवासातील एखादा प्रसंग कवितेशी कुठं जुळतो का हे पाहण्याचा. मला असं वाटतं, बाबांनी स्वत:ला पडलेले प्रश्न, त्याची सापडलेली उत्तरं, समाजाचं बदलतं स्वरुप ह्यावरच लिहिलं आहे. त्यांनी त्यांचं आत्मचरित्रच ह्या कवितांतून लिहिलं आहे असं वाटावं. कुणी त्या दृष्टीनं अभ्यास केला तर त्याला पीएच.डी. मिळेल. 'ज्वाला आणि फुले' वाचताना एका ठिकाणी मी घोटाळू लागलो.

'हृदयावरच्या जुन्या जखमा स्मृतीच्या गिधाडांना
खाऊ देण्यात काय अर्थ?
वर्तमानात जगलं पाहिजे
जीवित ही गतकालाची बाब आहे,
पण जीवन हा वर्तमानाचा विलास आहे.'

हेमलकसा प्रकल्प सुरु झाल्यावर चार-पाच वर्षांनी एक घटना घडली. एका कार्यकर्त्यानं आत्महत्या केली. समाजसेवेत अशा घटनेने आम्ही सारे हादरलो. आम्ही सर्व एकत्र, एका कुटुंबाप्रमाणे राहात होतो.

रस्ता सुरु झाल्यावर बाबा घाईगडबडीनं हेमलकसा मुक्कामी आले. ह्यावेळी त्यांचा मुक्काम थोडा जास्त होता. असं काही होईल असं बाबांनाही वाटलं नव्हतं. बाबा आल्यानं आम्हाला आधार वाटला; पण बोलण्यातून परत तो प्रसंग आल्यामुळे परत सर्व शांत शांत वाटू लागलं. अर्थात, चूक कुणाचीच नव्हती. एकटेपणा सर्वांनाच जाचत होता, तरी गेल्या चार-पाच वर्षांत काहीशी सवय झाली होती.

हेमलकसा इथं मुक्कामी असल्यावर बाबा रोज नदीवर फिरावयास जात. आम्ही काही जण सोबत जात असू. बाबा ताडताड चालत. खरं तर आम्हाला काहीसं पळावं लागे. बाबांचं शरीर पहिलवानासारखं कमावलेलं होतं. तरुणपणी त्यांनी कुस्त्या मारल्या होत्या. हातात काठी असे, त्यावेळी आधाराची जरुरी नव्हती. आनंदवन, सोमनाथ, नंतर हेमलकसा असं कायम जंगलातच वास्तव्य असल्यानं सोबत काठी असणं आवश्यक होतं. काही सुचलं अगर काही सांगायचं असलं की बाबा रस्त्यात उभे राहात. काठी समोर टेकवून, दोन्ही हातांचे पंजे त्यावर ठेवून ते बोलत असत. कधी कधी वाटे, आमच्यासारख्या सोबत पळणाऱ्यांना थोडा दम घेता यावा म्हणून असेल. त्यांच्या प्रत्येक बारीक हालचालीत दुसऱ्याचा विचार करण्याची प्रवृत्ती असे. कधी कधी एखादी गोष्ट मनाविरुद्ध झाली तर मात्र ते फार वेगानं चालत राहात. सोबतचे धावत मागे मागे जात राहात. त्या दिवशी असेच चाललो असताना बाबा काहीतरी खोल विचारात होते. गेले दोन दिवस बाबा, आदिवासी मेळावा घ्यावा असं सुचवत होते. आम्ही अजून घडून गेलेल्या घटनेतच अडकलेलो होतो. कुणी फारसा प्रतिसाद देत नव्हतं. बाबा रस्त्यात उभे राहिले. आम्ही त्यांच्या जवळ उभे राहिलो. समोर जंगलाकडे पाहात बाबा म्हणाले,

"अरे, वाघ म्हटलं तरी खातो, वाघोबा म्हटलं तरी खातो. अशानं कामं कशी कराल!''

काही क्षण बाबा काहीच बोलले नाहीत. नाराजी, राग, चीड ते गिळत असावेत. मग शांत स्वरात म्हणाले,

"एक झेन कथा आहे...'' आणि बोलता बोलता चालू लागले.

बाबा अनेक वेळा कथा किंवा आठवणी सांगत. त्यावेळी ऐकणारा हरवलेला असे, त्यांच्या भाषेत. त्यांचे शब्दही मी पूर्णपणे सांगू शकणार नाही. खूप रंगवून, आवाजात चढ-उतार करत ते सांगत. खरं तर, ऐकणाऱ्यास सांगताना तेच त्यात बुडून जात. कथा अशी होती-

'एक गुरु होता. त्याचा आश्रम होता. ब्रह्मचाऱ्याचा आश्रम. अनेक शिष्य येत. कडक नियम होते. मनानंही ब्रह्मचर्याचं उल्लंघन झालेलं चालत नसे. शेवटी दोनच शिष्य राहिले. जो कुणी सरस ठरेल तो पुढे गुरूची जागा घेणार हे नक्की होतं. शेवटची परीक्षा बाकी होती. एक दिवस गुरुने दोघांना जवळ बोलावलं व सांगितलं, 'दोघंही एकत्र जाऊन पलीकडच्या गावात निरोप देऊन या.' दोघे शिष्य शेजारच्या गावात जाऊन निरोप देऊन परत निघाले. मधल्या वेळात खूप पाऊस झाला. वाटेतील नाला वेगानं दुथडी भरून वाहत होता. ते तर पट्टीचे पोहणारे होते. नाल्याच्या मध्यभागी एक तरुणी आपलं वस्त्र वर उचलून भिजलेल्या अवस्थेत उभी होती. तिला नाला पार करणं शक्य नव्हतं. एक शिष्य पटकन पुढे झाला. त्यानं तिला खांद्यावर घेतलं आणि दुसऱ्या तीरावर नेऊन ठेवलं व तो आश्रमाकडे चालू पडला.

आश्रमात गेल्यावर गुरुने विचारलं, 'निरोप दिला का?' दोघांनी मानेनं 'हो' म्हटलं. ज्या शिष्यानं तरुणीला मदत केली नव्हती तो उत्साहानं बोलला.

'गुरुवर्य, ह्यानं स्वत:ची तपस्या भंग केली आहे. नाल्यात भिजलेली तरुणी ह्यानं खांद्यावर उचलून घेतली.'

गुरुने त्याच्याकडे पाहिलं. ते हसले व म्हणाले, 'बालका! अरे, त्याने कर्तव्य म्हणून फक्त काही क्षणासाठी त्या तरुणीला उचलून घेतलं. तू तर मनानं तिला अजूनही खांद्यावर वाहत आहेस.'

बाबा बोलायचे थांबले त्यावेळी आम्ही इंद्रावतीकाठी पोहोचलो होतो. किनाऱ्यावरील वाळूत काठी टेकवून बाबा सूर्यास्त पाहात उभे राहिले. इंद्रावतीचं निळंशार पाणी खडकांतून गंभीर आवाज करत वाहत होतं. बगळ्यांच्या रांगा, थवे मुक्कामाच्या झाडांकडे येत होते. माडीयाची गुरं घराकडे येत होती. माडीया, मासेमार झारीया दिवसभर मासेमारी करून नदीतून गावाकडे होडी वल्हवत येत होते. पलीकडच्या डोंगराआड जाणारा सूर्याचा तांबूस गोळा व त्याचं इंद्रावती नदीच्या पात्रात पडलेलं लांबलचक प्रतिबिंब बाबा एकटक शांतपणे पाहात उभे होते. कुणीच बोलत नव्हतं. आम्ही सोडून कुणीच थांबलं नव्हतं. दुसऱ्या दिवशी पहाटेच बाबा आंनदवनकडे निघून गेले. प्रकल्पावर आदिवासी मेळाव्याची तयारी सुरु झाली होती. बाबा 'करुणेचा कलाम'मध्ये म्हणतात-

'काळ ही संपत्ती
अन् कृतिशीलता हे जीवन मानले
साऱ्या व्यथांचा वापर केला अन्
कालापव्ययच तेवढा निरुपयोगी मानला.'

संस्था उभी करताना बाबांनी अनेक धक्के सोसले असतील. हेमलकसा इथं आम्ही एकमेकांना आधार देणारे सात-आठ जण होतो. सुरुवातीला बाबा एकटेच होते. कोण होते? एकट्या ताईच ना? एका धक्क्यानं आमच्या मनाला यातना झाल्या. त्यांनी कसं सहन केलं असेल. बाबा 'गर्भवतीचा मृत्यू' कवितेत म्हणतात-

'यातनाहीनांना स्वप्ने नसतात
आणि जो थोडे सहन करतो
तो फार थोडे करु शकतो
जो खूप सहन करील
त्याला पुष्कळ काही करुन दाखवता येईल.'

बाबांच्या बोलण्यातून नेहमी अनेक घटनांचा उल्लेख असे. एक विषय चालू असताना अचानक ते अगदी वेगळ्या विषयाकडे वळत. काही वेळा नवीन माणूस चक्रावून जात असे. त्यात इतक्या वर्षांच्या अनुभवाचे बोल असत. बाबांची स्मरणशक्ती अचाट होती. ती दैवी देणगी होती असं लोक मानतात. खरं तर ती त्यांनी सरावानं, प्रयत्नानं वाढवली होती. बाबा नर्मदा आंदोलनात दहा वर्षं नर्मदेकाठी कसरावद गावी राहात होते. आनंदवनातील कामासाठी साधनाताई मधून मधून एक-दोन महिने आनंदवन, वरोरा इथं येत. त्यावेळी मी बाबांजवळ कसरावद इथं राहात असे. सकाळचं फिरणं झाल्यावर काही वेळ बाबा अंगणातील खाटेवर पडून पेपर वाचत. मी नदीवर अंघोळ करून आल्यावर ते खोलीत पडत. काही वाचत अगर पडल्यापडल्या वहीत काही लिहीत असत. दारावर पडदा असे. मी बाहेर व्हरांड्यात 'नंदी' ड्युटीवर असे. एकदा बाबा खोलीत कुणाशी तरी बोलत आहेत असं वाटलं म्हणून मी पडदा बाजूला करून आत गेलो. खोलीत बाबा एकटेच होते. नजर फिरवून त्यांनी खुणेनं विचारलं, 'काय?' मी 'काही नाही' म्हणत बाहेर आलो. वाचनातील अडथळा त्यांना रुचला नसावा. मी आत गेलो म्हणजे बाहेर कुणी आलं असावं असा बाबांचा समज झाला असावा. मग बाबा स्वत:शीच मोठ्यानं बोलत होते की काय? त्यावेळी तिथं मोजून पाच जण होतो. इतर कुणी बाबांच्या खोलीत ह्यावेळी जाणं शक्य नव्हतं. मागचा दरवाजा स्वयंपाकघरातून येतो. तिकडून बाहेरचं कुणी कधी येत नाही. काही वेळ विचार करून मी गोष्ट विसरलो. दोन-चार दिवसांनंतर दुपारी डाकवाला येऊन गेल्यावर मी व्हरांड्यात होतो. काही इंग्रजी वृत्तपत्रं पोस्टानं आली होती. बाकीची डाक बाबांनी पाहून माझ्याकडं दिली. हिंदी वृत्तपत्रं मी चाळत होतो. आत खोलीत

बाबांच्या बोलण्याचा आवाज आला. ह्यावेळी मी पडदा बाजून करून आत गेलो नाही. घराला वळसा घालून मागच्या दारातून गेलो. मी दारात उभा राहून पाहू लागलो. बाबा नवीन शिकणाऱ्या मुलासारखे मोठ्यानं वाचत होते. बाबा कुणाशी तरी बोलत आहेत असं मला वाटलं. मी हसत परत फिरणार तोच बाबांनी विचारलं,

"काय रे विलास?''

समोरच्या भिंतीवर आरसा होता. त्यात मी त्यांना दिसत होतो. बाबांची नजर! मी आत गेलो. बाबांनी एक हात कपाळावर ठेवला. मी पुढे होऊन कपाळ चेपू लागलो. बाबा परत मोठ्यानं वाचू लागले. नर्मदा धरणाबद्दल कुणाचा तरी लेख होता. लेख संपल्यावर बाबांनी दोन्ही पानं वाचली, पण मोठ्यानं नाही. बाबांनी पेपर मिटल्यावर मी डोळ्यांवरचा चष्मा अलगद काढला आणि बाजूच्या टेबलावर केसमध्ये ठेवला. तांब्यातील पाणी पेल्यात घेऊन समोर करताच बाबांनी आ केला. दोन घोट घेतल्यावर बाबांनी छातीवर ठेवलेल्या हाताची फक्त बोटं वर उचलल्यावर उरलेलं पेल्यातलं पाणी मी वरून पिऊन टाकलं. पेला तांब्यावर झाकून ठेवला. बाजूला होऊन बाबांच्या पायावर असलेलं पांघरूण छातीपर्यंत घेऊन मी उशाकडं उभं राहून डोकं चेपू लागलो. बाबांनी डोळे मिटले. आम्हा दोघांमध्ये कधी फारसं बोलणं होत नसे. दोघांना एकमेकांच्या सवयी परिचयाच्या होत्या.

"बाबा...'' मी हलकेच हाक मारली.

"काय रे विलास...''

"बाबा, तुम्ही मोठ्यानं का वाचता? तुम्ही कुणाशी बोलत आहात असं मला वाटलं.'' मी सफाई दिली.

बाबांनी डोळे उघडले नाहीत, पण ते हसले. पुढे त्यांनी मला व्यवस्थित समजावून सांगितलं. "आपण जेव्हा वाचतो तेव्हा दोनच इंद्रियं काम करतात. एक डोळे, दुसरं मन (बुद्धी). तू आठव, आजपर्यंत तू किती वाचलं आहेत आणि त्यातलं जसंच्या तसं तुला किती आठवतं? आपल्या बुद्धीची ग्रहण करण्याची शक्ती वाचनगतीएवढी कधीच नसते. मोठ्यानं वाचलं की डोळे वाचतात, कान ऐकत असतात, मन ग्रहण करत असतं, तोंड शब्द उच्चारत असतं. जे महत्त्वाचं, लक्षात ठेवायचं असतं ते मी मोठ्यानं वाचतो.''

सांगता सांगता बाबांनी नाकाला हात लावला. मी बोटानं हलकेच चेपल्यासारखा नाकावर दाब देऊ लागलो. काही क्षणात बाबांचा श्वास मंद झाला. मी पाय न वाजवता तिथून निघालो. लहान मुलासारखे बाबा मोठ्यानं का वाचतात? त्यांची अचाट स्मरणशक्ती दैवी देणगी नाही, तर कमावलेली आहे. ह्या भल्या माणसाला दैवानं खरोखरोच सामान्य माणसापेक्षा काही जास्त दिलं नाही तर... त्याच वेळी मला 75 सालची आठवण झाली.

17 एप्रिल 1975. ट्रकच्या केबीनमध्ये बाबा पडलेले होते. ट्रकचालकाच्या मागे मी बसलो होतो. पलीकडे शंकरदादा अंग चोरून बसले होते. बाबांच्या पायापाशी समोरच्या काचेजवळ सौ. साधनाताई बसल्या होत्या. शांत एकाग्र होऊन गीताई म्हणत असाव्यात. मला संस्थेत येऊन फक्त एक दिवस झाला होता. आम्ही सोमनाथहून हेमलकसाला चाललो होतो. हेमलकसा इथल्या बांधकामासाठीचं सामान ट्रकमध्ये होतं. त्यावर काही रुग्ण बसले होते. त्या वेळेला कोणतेच रस्ते ठीक नव्हते. दोन्ही बाजूने जंगल होतं. बाबा शंकरदादांना बांधकामाबद्दल बोलत होते. त्यात लाकडाचा लिलाव घेण्यापासून वाळू, विटा, सिमेंट, आजारी पेशंट, हेमलकसासाठी रेशन असे सगळे विषय होते. शंकरदादा मधे बोलत. मधेच बाबांचा आवाज चढत असे. मी फक्त श्रोत्याचं काम करत होतो. शंकरदादा व बाबांच्या बोलण्यात काही अस्सल वऱ्हाडी शब्द येत होते. मी वाक्यावरून त्याचा माझ्या परीनं अर्थ लावण्याचा प्रयत्न करत होतो. एका खड्ड्यातून ट्रक उसळला. बाबांच्या चेहऱ्यावर वेदना दिसली. 'धीरे चलो' एवढंच ते चालकाकडे बघून बोलले. काही वेळानं बाबा म्हणाले,

"काय विलास, गप्प आहेस?''

खरोखर मी गप्प होतो. मला सगळंच नवीन होतं. गेल्या दीड दिवसापासून मी विचारच करत

होतो. बाबांबरोबर मी एकदम काय बोलणार ना!

"नाही बाबा, काही नाही."

"घरची आठवण आली का रे?" बाबांनी एकदम विचारलं. नंतर शांतपणे म्हणाले,

"हे बघ, हेमलकसाला जाऊ. दोन दिवसांनी मी परत येणार आहे. तुला परत येता येईल."

"नाही बाबा, आपलं बोलणं चालू होतं म्हणून मी काही बोललो नाही, एवढंच..."

बाबा परत समोरच्या काचेतून रस्त्याकडे बघू लागले. मी थोडा सावरत असतानाच त्यांनी विचारलं,

"विलास, गळ्यात जानवं आहे. संध्या करतोस की नाही?"

माझा हात नकळत छातीवर गेला. दीड दिवसात बाबांच्या नजरेतून माझं जानवं सुटलं नव्हतं.

"नाही, संध्या नाही करत मी."

"का रे! कधीच केली नाहीस का? अरे, माझा जानवं, संध्या, पूजाअर्चेला विरोध नाहीये. माझी मुंज झालीय."

"लहानपणी काही वर्षं केली होती संध्या." मी म्हणालो.

बाबा हसले. "म्हणजे घरच्यांनी सक्ती केली म्हणून?"

"नाही नाही, सक्ती म्हणून नाही..."

बाबा हसले. "सक्ती नव्हती तर पाठ असेल. म्हण पाहू."

मी गप्प राहिलो.

बाबांनी खड्या आवाजात संध्या म्हणायला सुरुवात केली. पुढची दहा मिनिटं स्वच्छ स्पष्ट उच्चारात ते संध्या म्हणत होते. मग म्हणाले,

"सक्तीनं केलेलं पाठांतर विसरता येतं. आठवणींनं, मनापासून केलेलं ते खरं पाठांतर."

"काय रे, गोत्र तरी माहीत आहे का?" बाबांनी विचारलं.

"हो. भारद्वाज गोत्र."

"अरे, भारद्वाज गोत्री का रे? म्हणजे आपण सगोत्री की रे! आमटे पण भारद्वाज गोत्री. चला, म्हणजे आपलं काही जमणार नाही रे विलास!" आता बाबा मोठ्यानं हसले.

आता बाबा आनंदी मूडमध्ये होते. त्यांचा चेहरा मिश्कील झाला. ते मला प्रथमच फार जवळचे वाटले.

"संध्येतील नावसुद्धा विसरलास का?" बाबांनी विचारलं.

"नाही बाबा, संध्येतील नाव कसा विसरेन."

"सांग काय नाव आहे ते."

मला नाव आठवत नव्हतंच. मी म्हणालो,

"बाबा, संध्येतील नाव कुणाला सांगायचं नसते."

बाबांनी मान वळवून माझ्याकडे पाहिलं. तर नजर काही वेगळीच होती.

"हुशार आहेस! नागपूरचे प्रसिद्ध मनोहर वकील तुझे आजोबा नाही का? मीसुद्धा वकील आहे. माझं संध्येतील नाव काय आहे माहीत आहे? 'रविशर्मा.' फक्त तुझ्याजवळ ठेव. कुणाला सांगू नकोस." बाबा मोठ्यानं हसले.

नंतर ते शंकरदादांशी बोलू लागले. त्यावेळी बाबांच्या स्मरणशक्तीने मी चाट झालो. आज समजलं, त्यामागे तपस्या होती. पुढे अनेक वेळा त्यांच्या स्मरणशक्तीची ताकद मी अनुभवली. अनेक जण काही वर्षांनी परत भेटले तरी बाबा त्यांना नावानं ओळखत. एवढंच नाही, तर मागील भेटीतील अचूक आठवण काढत. त्यांच्या मुलांची चौकशी करत. त्यामुळे अनेक जण कुटुंबातील होऊन जात. स्मरणशक्ती जबरदस्त असली तरी कुणी डिवचलं तर मात्र त्यांना राग येत असे. पुढे पुढे आजारपणात ते भेटायला येणाऱ्या अनेकांना हसून नमस्कार करत म्हणत,

"मी बाबा आमटे. आपण..."

समोरचा पटकन नाव सांगत असे.

पाठीच्या मणक्यावरील शस्त्रक्रियेसाठी बाबा मुंबईला डॉ. बावडेकरांकडे होते. शस्त्रक्रियेनंतरही बाबा महिनाभर दवाखान्यात होते. सकाळपासून भेटायला येणाऱ्यांची गर्दी असे. एका दुपारी एक तरुण त्याच्या बायको व मुलाला घेऊन भेटायला आला. बाजूच्या खोलीत त्यांना बसवून नाव-गाव विचारु लागलो. तो काही सांगण्यास तयार नव्हता. मराठी नव्हता. हिंदी बोलत होता, 'सिर्फ दर्शन होना.' बाबांना पूर्वी भेटला आहे असं सांगत होता. झाँशीकडील होता. बाबांना माझं नाव-गाव सांगू नका. ते ओळखतात का हे मला पाहायचं आहे असं म्हणाला. इतक्या वर्षांच्या अनुभवानं आता पुढे काय होणार ह्याची थोडीफार कल्पना मी करु शकत होतो. दिवसभराच्या दगदगीतून मलासुद्धा काही वेगळं घडावं असं वाटत होतं. त्याव वेळी डॉ. बावडेकरांनी, 'बाबांना फार त्रास होईल, इतक्या जणांना भेटू देऊ नका. बाबा जास्त बोलत नाहीत ना हे पहा. शांत राहतील तर बरं. बी.पी. थोडा हायर साईडला आहे.' हे सांगितलेलं आठवत होतं.

त्या तरुणाबरोबर मी बाबांच्या खोलीत गेलो. एक गृहस्थ बाबांना नमस्कार करून बाहेर पडले. कोपऱ्यात उभी असलेली नर्स वाकडा चेहरा करून नवीन पाहुण्याकडे पाहात होती. त्या तरुणानं, त्याच्या बायकोनं व मुलानं भक्तिभावानं बाबांच्या पायांवर डोकं ठेवलं. बाबांनी पडल्यापडल्या नमस्कार करत,

"मी बाबा आमटे... आप...?''

तो तरुण हात जोडून उभा राहिला. त्याने बाबांना विचारलं,

"बाबा, मुझे पहेचाना? आप दस साल पहिले मिले थे.''

खोलीत शांतता होती. माझं बाबांकडे लक्ष होतं. बाबांचा उजवा हात गादीवर होता. उजव्या हाताची मूठ मिटून परत सोडली. डावा हात उचलून बाबांनी केसांतून फिरवला. शांत आवाजात त्यांनी विचारलं,

"आपका शुभ नाम?''

"आपने मुझे पहेचना नहीं क्या?'' तरुणाने विचारलं मात्र, बाबांचे डोळे चमकले. बाबा राग न येऊ देण्याचा प्रयत्न करत होते. तरीसुद्धा आवाजात फरक पडलाच.

"बेटा! झाँसीके लाहिरीजी आपके ससूर है. आप उनके बडे दामाद हो. लाहिरीजी के साथ मिले थे. और क्या बताऊ? आप डाक्टर हो. मेरे जैसे मरीज जो सालों से बिस्तरपर है, आपसे ज्येष्ठ है, उनसे जिद करना ठीक नहीं यह आप जानते नहीं. मुझे बी.पी. की बिमारी है. आप डाक्टर हो या नहीं? बेटा, बडोंसे जिद कभी नहीं करनी चाहिए. और एक बात, आपने समाज के लिए क्या किया है की आपका नाम मैं याद रखू. लाहिरीजी ठीक है ना? मेरा नमस्कार कह देना.''

एका दमात एवढं बोलून बाबांनी त्या तरुण डॉक्टरला निरोपाचा नमस्कार केला आणि नजर दुसरीकडे केली.

तो तरुण डॉक्टर रडू लागला. त्याने परत बाबांच्या पायांवर डोकं ठेवलं. 'माफ करना, माफ करना' म्हणत राहिला. मी थक्क झालो. बाबांना नक्की ह्या तरुणाचं नावही आठवत असणार, कारण तो डॉक्टर आहे हे त्याने मला सांगितलं नव्हतं. त्याच्या सासऱ्याचं नाव सांगून बाबांनी त्याला गारद केलं. नंतर त्या तरुण डॉक्टरचा हात हातात घेऊन बाबांनी त्याच्या मुलाची, पत्नीची, घरच्या सर्वांची चौकशी केली. बाबांच्या अचाट स्मरणशक्तीचे अनेक अनुभव त्यांच्या सहवासात आले, त्या आठवणी आठवत राहातात.

बाबांना संस्थेसाठी अनेक जण, अनेक ठिकाणांवरुन मदत करत असत. बाबा आम्हाला नेहमी म्हणत, 'तुम्ही काम करत राहा, पैशाची चिंता करु नका. प्रभूचे हजार हात मदत करतील.' खरोखरी ते तसे होते. गेल्या पस्तीस वर्षांत संस्था दोन-तीनदा आर्थिक अडचणीत आली होती, पण त्यातून आम्ही निभावून गेलो. कधी अचानक एखादा मोठ्या रकमेचा पुरस्कार मिळत असे अगर कुणी दाता येत असे. पण मिळणाऱ्या मदतीतील पै न् पै योग्य प्रकारे खर्च होत आहे ह्याकडे ते स्वत: काटेकोरपणे

पाहात. संस्थेचा पैसा हा समाजाचा आहे. पैशाच्या हिशेबात 'बाप दाखव नाही तर श्राद्ध कर' असे धोरण असावे, असे ते म्हणत. पैशाच्या बाबतीत त्यांचं स्वत:चं वागणं स्वच्छ, पारदर्शी होतं. एवढंच नाही, तर इतरांना मार्गदर्शक होतं. त्यातून मी अनेक गोष्टी शिकलो.

1977 मधली गोष्ट आहे. हेमलकसा त्यावेळी पावसाळ्यानंतर सुरु होत असे. एकदा रस्ता सुरु झाला की आठवड्याला बाबा हेमलकसा इथं येत. चार-पाच दिवस मुक्काम असे. सहा-सात महिने कुणी येत नसे, त्यामुळे प्रत्येक जण गाडीची, कुणाची तरी वाट पाहात असे. बाबांबरोबर दर वेळेला साधनाताई असतच असं नाही. बाबा ट्रकच्या केबीनमध्ये झोपून प्रवास करत. सोबत चालक व एक क्लिनर असे. त्यावेळी संस्थेत एक जीप, एक ट्रक होता. ट्रक रेशन, इतर सामानाने खचाखच भरलेला असे. रस्ता चालू झाला तरी चांगला कधीच नसे. कोणत्याही नाल्यावर, नदीवर पूल नव्हता. आनंदवनहून पहाटे ट्रक निघाला की संध्याकाळी नागेपल्लीला मुक्काम करुन दुसऱ्या दिवशी बाबा हेमलकसा इथं दुपारनंतर पोहोचत. बाबा एकटे असले तर वेळेची बचत व्हावी म्हणून शक्यतो नागेपल्लीचा मुक्काम टाळत असत.

एक दिवस सकाळी सकाळी ट्रक हेमलकसा इथं आला. बाबांनी रात्रभर प्रवास का केला असा विचार करत आम्ही सर्व ट्रकजवळ जमलो. बाबा थकलेले जाणवत होते. घराच्या व्हरांड्यात बाबांनी पायजमा, बंगाली शर्ट काढून माझ्या हातात दिला व ते प्रकाशबरोबर हातपाय धुण्यासाठी बाथरुमकडे गेले. कुणी बाबांची बॅग आणत होतं, कुणी पिण्याचं पाणी आणत होतं, कुणी अंथरुण नीट करत होतं. बाबा कॉटवर आडवे झाले.

"काल जंगलात ट्रक पंक्चर झाला. स्टेपनीसुद्धा पंक्चर झाली. रात्रभर मिरकलच्या जंगलात होतो. वाघाचा आवाज ऐकला, पण त्यानं दर्शन नाही दिलं.'' बाबा सांगत होते.

पायजमा झटकून मी घडी घातली. बंगाली शर्टची घडी घालताना खिशात काहीतरी आहे म्हणून खिशात हात घातला. एक कागदाची घडी हाताला लागली. मी कागद नीट उघडला. बाबांचे हस्ताक्षर! चटकन खाली पाहिलं. खाली बाबांची सही. काय आहे? मी वाचू लागलो.

वरच्या बाजूला महारोगी सेवा समिती, वरोरा असं लिहून खाली तारीख टाकली होती. पुढे वेळ संध्याकाळी 5 वाजता, जागा आल्लापल्ली, भामरागड रस्ता. मिरकल पुढे 16-17 कि.मी. लिहिलं होतं. हा कसला पंचनामा, असं म्हणत मी पुढे वाचू लागलो. "मी मुरलीधर देविदास आमटे. सेक्रेटरी, महारोगी सेवा समिती वरोरा. आता चालक महादेव कोंद ह्यास ट्रक-टायर दुरुस्तीपोटी 500 रु. (पाचशे रुपये फक्त) देऊन परत आल्लापल्लीला पाठवत आहे. माझ्यासोबत संस्थेचे छापील व्हाउचर पॅड नसल्याने साध्या कागदावर लिहीत आहे.'' खाली सही होती. शिक्काही होता. त्याच वेळी बाबांचं माझ्याकडे लक्ष गेलं.

"अरे विलास, ती चिठ्ठी फाडून टाक. आता काही काम नाही. प्रथम ऑफिसमधून कोरी व्हाउचर्स आणून माझ्या काळ्या बॅगेत ठेव. परत असं होता कामा नये. आधी जा, व्हाउचर्स पॅड घेऊन ये.''

मी जाऊन आलो. बाबांसमोर काळ्या बॅगेत पॅड ठेवले. बाबांजवळ जाऊन बसलो. बाबा सांगू लागले - "संध्याकाळी रस्त्यात टायर पंक्चर झाला. नेमके पैसे देताना व्हाउचर करण्यास पॅड नाही. संस्थेचा पैसा. महादेव टायर घेऊन आल्लापल्लीला गेला. तो परत कधी येईल माहीत नाही. जंगलात रात्र काढायची. काय भरवसा, मला वाघांनी खालं, चोरांनी लुटलं, तर संस्थेच्या पाचशे रुपयांचं काय? म्हणून खिशात चिठ्ठी लिहून ठेवली. काही कमी-जास्त झालं तरी विलास कपडे तपासणार ही खात्री होती.''

बाबांबरोबर सगळे हसले.

पुढे अनेक वेळा हिशेबासंबंधी बाबांबरोबर चर्चा होत असे. काटकसर करुन बँकेत पैसा साठवण्याकडे त्यांचा कल होता. सर्व संस्था एक असली तरी प्रत्येक प्रकल्पाच्या गावी संस्थेची खाती काढून त्यात भविष्यासाठी ठेवी ठेवत होते. कधी दुष्काळ पडला अगर सरकारकडून लेप्रसी ग्रँट बंद झाली तरी संस्था पैशासाठी तुटली असं होता कामा नये, असं ते म्हणत. पुढे दोन्ही भारत

जोडो यात्रेत मी त्यांच्याबरोबर होतो. त्यावेळी मोठ्या विश्वासानं त्यांनी हिशेब माझ्याकडं दिले होते. तरीही पैशाबाबतीत कुणावर, अगदी माझ्यावरही अंधविश्वास टाकला नाही. पुढे अगदी बाबा होते तोपर्यंत कधी आनंदवनला गेलो की कुठे किती रक्कम आहे याबद्दल मी आणि बाबा बोलत असू. मग समाधानाने म्हणत, “मी मेल्यावर तुम्ही विकून खालं तरी पन्नास वर्षं संस्था तुटत नाही.''

दोन्ही भारत जोडो यात्रेच्या पैशाचा हिशेब माझ्याकडे होता. दोन दिवसांनी रात्री मी बाबांना हिशेब दाखवत असे. प्रत्येक खर्चाचे बिल-व्हाउचर नजरेखाली घालून बाबा सही करत असत. दहा-बारा वर्षं बाबांच्या नजरेत मी तयार झालो होतो. ‘भारत जोडो’ यात्रेसाठी वेगळा ट्रस्ट काढला होता. त्यातील सदस्य वेगळे होते. चार ट्रस्ट सदस्य यात्रेत सामील होते. मी बाबांचा फक्त वैयक्तिक सेवक म्हणून यात्रेत होतो. कायम बाबांबरोबर असे. आनंदवनमधील इतर आठ-दहा जण सोबत होते. बाबांच्या घरचं कुणी कायम बरोबर नव्हतं. हिशेबाच्या बाबतीत माझं धोरण ‘बाप दाखव नाही तर श्राद्ध कर’ असं होतं. साहजिक काही ट्रस्ट सदस्य माझा राग करत. एक ट्रस्टी विशेष नाराज असत, कारण ते एका बँकेत अधिकारी होते. ते मधूनमधून ‘हिशेब बरोबर लिहितोस का?’ म्हणून विचारत. एकदा यात्रेच्या पुढील मुक्कामी ते जाऊन आले. त्यांनी हॉटेलचं एक बिल माझ्याकडं आणलं. मी ते ठेवून घेतलं. रात्री बाबांना दाखवून मग रक्कम देतो असं म्हटलं. त्यांना राग आला. ‘मी भारत जोडो ट्रस्टमध्ये सदस्य आहे, मला बाबांशी बोलावं लागेल,’ असं म्हणत चालले गेले. रात्री मी बाबांची सही घेतली व ते काय बोलले हे त्यांच्या कानांवर घातलं. बाबांनी त्यांना बोलावून घेतलं. मला पैसे देण्यास सांगितलं. बाबांनी सहज बोलावं असं म्हटलं, “तुम्ही बँकेत असता ना? मधूनमधून वेळ काढून हिशेब चेक करत जा.''

ट्रस्टी माझ्याकडं पाहून हसले. रुबाबात चालले गेले. त्यांनी दिवसात कधी तरी बाबांकडे तक्रार केली असावी. माझं काही चुकलं नाही अशी माझी खात्री होती. मग ते ट्रस्टी मधूनमधून एकदम कॅश चेक करत असत. फरक कधीच नसे. त्या वेळी स्वत:च्या बँकेतील त्यांचा मोठेपणा सांगत असत. यात्रेत एका रात्री मी बाबांना हिशेब दाखवत असताना ते ट्रस्टी यात्रेतील एका तरुणाला घेऊन बाबांकडे आले. त्या तरुणाला वैयक्तिक कामासाठी पाचशे रुपये हवे होते. ते ‘भारत जोडो’ ट्रस्टमधून द्यावेत असं त्यांचं म्हणणं होतं. ट्रस्टमधून रक्कम देता येणार नाही असं बाबांनी त्यांना स्पष्ट शब्दांत सांगितलं. ‘भारत जोडो’ ट्रस्ट एक सार्वजनिक ट्रस्ट आहे. कुणाला वैयक्तिक मदत कशी करणार? आपल्यासोबत अनेक तरुण आहेत. तरीही ट्रस्टी म्हणून आपण त्याच्यासाठी काहीतरी केलं पाहिजे, असं म्हणू लागले. खरं तर त्या तरुणाला ते स्वत: मदत करु शकत होते. बाबांनी डाव्या हाताचा पंजा केसांवरुन फिरवला. उजव्या हाताची मूठ मिटली आणि उघडली. मी सावध झालो. नक्की काही तरी नवीन शिकायला मिळणार. बाबांची नाराजी स्पष्ट दिसत होती. ते माझ्याकडं पाहून म्हणाले,

“विलास, माझ्या खाजगी खर्चातून ह्याला रक्कम दे. माझ्या खाजगी खर्चासाठी रक्कम आनंदवनहून सोबत घेतली आहेस ना?''

“हो बाबा.''

दुसऱ्या दिवशी ते ट्रस्टी सकाळी पैशासाठी आले. सोबत तो तरुण होता. मी शांतपणे ‘महारोगी सेवा समिती’चं व्हाउचर पॅड काढलं. बाबांचं नाव लिहिलं. तपशिलात ‘खाजगी खर्चासाठी’ असं लिहिलं. व्हाउचरमागे त्या तरुणाचं नाव-पत्ता लिहिला व व्हाउचर ट्रस्टीकडे देऊन म्हटलं, “बाबांची सही घेऊन या.''

ट्रस्टींनी रागानं ते व्हाउचर उलट-सुलट करुन परत माझ्याकडं दिलं.

“काल तुला स्वत: बाबांनी रक्कम देण्यास सांगितलं ना?''

“हो, पण मला व्हाउचर लागेल ना.''

ते तिथून तडक निघून गेले. रात्री सर्व कार्यक्रम संपल्यावर मी बाबांना इतर हिशेबानंतर ते व्हाउचर दाखवलं. काय घडलं ते सविस्तर सांगितलं. बाबांनी काही वेळ माझ्याकडं रोखून पाहिलं.

पण नंतर हसत म्हणाले,

"विलास, पाचशे रुपये घेऊन ये, माझे खाजगी बरं का!''

मी रुपये घेऊन येईपर्यंत बाबांनी त्या ट्रस्टीला बोलावून घेतलं होतं. त्यांच्यासमोर माझ्याकडून व्हाउचर घेतलं, शांतपणे वाचलं आणि मग त्यावर सही केली. माझ्याकडून पाचशे रुपये स्वत:च्या हातात घेऊन त्यांना दिले. ट्रस्टी काही बोलण्याच्या आत शांत स्वरात बाबा म्हणाले,

"बँकेत चेक/स्लिप सहीशिवाय रक्कम देतात का? विलासचा राग आला का? त्याचं काय चुकलं? उद्या मी म्हटलं, मी सांगितलं नाही, तर तो काय पदरचे भरेल का? लोक कुणावर विश्वास ठेवतील? बाबा आमटेवर का त्याच्यावर? तो कोण आहे? आपण भारत जोडोचे ट्रस्टी, तो माझा सेवक. पैशाच्या व्यवहारात मान-अपमान ठेवू नये. या तुम्ही. तुम्हाला त्रास झाला. विनाकारण तुम्ही करुन घेतला.''

ट्रस्टींनी माझी पहिली तक्रार केली तेव्हा खरं तर बाबांनी त्यांच्यासमोर बिलावर सही केली होती आणि पैसे दिले होते. त्यावेळी त्यांना पद्धत समजली होती. बाबांनी 'हिशेब चेक करत जा' असं सांगून दुखावले जाऊ नयेत असं पाहिलं होतं. त्यांना हिशेब चेक करत जा म्हणून सांगितलं यात मला काहीच कमीपणा, वाईट वाटलं नव्हतं. मी बाबांच्या सहवासात गेली काही वर्षं होतो. हिशेबावर नेहमी दुसऱ्याची नजर हवी, सार्वजनिक पैसा एकहाती नको, हे बाबांकडून शिकलो होतो. संस्थेचा हिशेब, ट्रस्टचा पैसा याबाबत बाबा कडक होते.

बाबांनी 'सार्वजनिक संस्थांचे संचलन' ह्या त्यांच्या पुस्तकात (पान 12) म्हटलं आहे - "हिशेबात काही कमी-जास्त दिसल्याबरोबर 'माझ्या कार्यकर्त्यानं पैसा खाल्ला' हा माझ्या मनात आलेला पहिला विचार असू नये.'' खरं होतं. ते तसे नेहमीच वागले. अनेक वेळा काय झालं असेल अशा सर्व शक्यता ते पडताळून पाहात. एकदा चार आणे कमी आले म्हणून एक जण 12 मैल चालत जाऊन चार आणे घेऊन आला. अशी बाबांच्या वेळी हिशेबाची शिस्त होती. बाबा एखाद्या गोष्टीचे महत्त्व पटवून देण्यासाठी मार्मिक गोष्ट सांगत. समोर मोठे मान्यवर असतील तर त्यासाठी पद्धत, भाषा, उदाहरण वेगळे वापरत. समोरचा दुखावणार नाही याची ते काळजी घेत. कुणाचं मन दुखावणं म्हणजे एक प्रकारची हिंसा, असं गांधीजींचं तत्त्व होतं. बाबाही गांधीवादी होते.

बाबा खरंच गांधीवादी होते का?

हो की नाही? मला सतत पडलेला प्रश्न.

भारत जोडो यात्रा खरं तर बाबांच्या सहवासासाठी माझ्या फार चांगली आठवणीत आहे. मी खूप काही शिकलो. बाबांशी बोलणं फार कमी होई. पण त्यांचे डोळे खूप काही बोलून जात. त्यांच्या चेहऱ्यावरील भाव, हातांच्या हालचालीवरून आमच्या दोघांत एक भाषा निर्माण झाली होती. अनेक वेळा त्यांनी माझ्या योग्य गोष्टींचं कौतुक सर्वांसमोर केलं. चुकांसाठी काही तास अबोला पुरेसा असे, किंवा माझ्यासमोर ते मुद्दाम आत्मक्लेश करून घेत. त्यावेळी मी चुकलो आहे हे मी समजून जात असे. माझ्या विचित्र स्वभावामुळे मी त्यांना माझं कौतुक कधी करु दिलं नाही. अशी एक आठवण आहे, ज्यात मी त्यांना दुखावलं. मला त्याबद्दल वाईट वाटतं, पण करणार काय? माणूस सवयीचा गुलाम असतो.

भारत जोडो यात्रेत आम्ही रोज नवीन गावी मुक्काम करत होतो. दिवसभर प्रवास, वाटेत सभा. बाबा बसमध्ये गादीवर आडवे पडलेले असले तरी त्यांच्या वयाला दुखण्याच्या दृष्टीनं ते काही सुखकर नसे. बसमध्ये आंनदवनमधील पाच-सहा जण, चार-पाच मान्यवर, ज्या भागातून यात्रा चालली आहे तिथले मान्यवर, व्यवस्थापक असत. सतत बोलणं चालू असे. त्यात बाबांना प्रोस्टेटचा त्रास होता. तास-दीड तासाने लघवीसाठी बस थांबवून उतरावं लागे. वाटेतील गावांत लोकांना भेटण्यासाठी बसखाली उतरणं, परत बसमध्ये चढणं, चार-पाच दिवसांनी हवेतील बदल, ह्या सर्वांमुळे बाबा थकत. अक्षरश: कसरत काय, सर्कस होती! मुक्कामाच्या जागी सर्व संपून झोपण्यास दहा-अकरा वाजत. तोपर्यंत बाबा पार थकलेले असत. मी नेहमी बाबांसोबत त्यांच्या खोलीत एका

बाजूला माझं अंथरूण टाकून झोपत असे. झोपण्यापूर्वी औषधं देऊन, बाबांना लागणाऱ्या सर्व गोष्टी ठरावीक जागी आहेत ना याची खात्री करून मी खोलीतील मोठा लाईट बंद करत असे. मग काही वेळ डोकं दाबून देत असे. त्यावेळी उद्या कुठं मुक्काम आहे, कोण भेटणार आहे, असं बोलणं होत असे. अशा वेळी बाबा मला म्हणत,

"बेटा, किती करतोस रे माझं! माझ्या आईची आठवण होते रे...''

खरोखर मनापासून ते म्हणत. मी थकलेला असे. परत पहाटे साडेतीन-चार वाजता उठायचं असे. ऐकल्यावर बरं वाटे, पण त्याच वेळी उद्याची काळजीही असे. कौतुकानं आपल्या हातून काही चूक तर होणार नाही ना? असं वाटे.

नंतर एकदा बाबांनी परत म्हटलं, "बेटा, किती करतोस?''

मी पटकन म्हणालो, "बाबा, मी इकडे तुमच्याबरोबर असलो तरी संस्थेतलं मानधन रेणुका (माझी पत्नी) महिन्याच्या महिन्याला तिकडं घेत आहे. तिथं हे काम तर मी करत नाही, त्याबद्दल इथं काम करतो आहे.''

काही क्षण कुणीच बोललं नाही. मग मीच म्हणालो, "उद्या सकाळी फार प्रवास नाहीये. मुक्काम जवळच आहे.''

बाबांनी डोळे मिटलेले होते. त्यांचा चेहरा एकदम आक्रसला होता. मी बोललेलं त्यांना आवडलं नव्हतं. थकलेल्या आवाजात ते म्हणाले, "विलास, जा झोप जा!''

माझा डोक्यावरील हात त्यांनी स्वत: बाजूला केला. दुसऱ्या दिवशी ह्या नाराजीचा मागमूस त्यांच्या चेहऱ्यावर नव्हता.

सार्वजनिक पैशांसंबंधी आणखी एक आठवण आहे. त्यात अनेक मान्यवर मंडळी असल्यानं माझ्या कृतीचं समर्थन करताना बाबांनी मान्यवरांना एकदम बायबलमधील दाखला मोठ्या अलंकारिक भाषेत दिला. भारत जोडो यात्रेत दोन ट्रक, जीप, कार व बाबांची बस एवढी वाहने होती. बाबांच्या सांगण्यावरून वेळप्रसंगी म्हणून भास्कर भोयरकडे गाडी दुरुस्ती व किरकोळ खर्चासाठी पाचशे रुपये कायम असत. दिवसभरात खर्च होईल त्याची बिलं तो देऊन रक्कम परत घेत असे. त्या दिवशी आमचा मुक्काम डांबरी सडकेजवळ एका टेकडीवरील शाळेत होता. टेकडीवर जाण्याचा रस्ता कच्चा होता. शाळेच्या मागे दरी होती. फार निसर्गरम्य वातावरणात शाळा होती. संध्याकाळी सर्व वाहने आरामात टेकडीवर गेली. त्या रात्री नेमका पाऊस पडला. मेघालयात आल्यापासून मध्येच कधी पाऊस पडायचा, हे आम्ही अनुभवलं होतं. रात्रीच्या पावसाने टेकडीचा कच्चा रस्ता निसरडा झाला होता. सकाळी तरुणांना आपल्या सायकली खाली उतरवताना त्रास झाला. पहिला ट्रक घसरतच खाली गेला. आपटता आपटता वाचला. बाबांना कसं न्यावं असा प्रश्न आमच्यासमोर, तिथल्या अधिकाऱ्यांसमोर उभा राहिला. बाबा निघाले आणि तडक बसमध्ये चढून कॉटवर आडवे झाले. मान्यवर मंडळींचा नाइलाज झाला. ते पटापट बसमध्ये चढून आपापल्या जागेवर बसले. सगळ्यांच्या चेहऱ्यावर काळजी दिसत होती. बसचालक मियाँ काही न बोलता बसमध्ये चढला. बाबा बसमध्ये आहेत म्हटल्यावर तो काही बोलला नाही. काय करावं? मान्यवर मंडळी कधी नाही एवढी चूपचाप होती. बाबांनी मनगटावरील घड्याळाकडे पाहिलं. सहाला काही मिनिटं बाकी होती. आम्ही नॉर्थ-इस्ट भागात असल्यानं चक्क ऊन होतं. मी भास्कर व मियाँजवळ आलो. भास्कर स्वत: बस चालवणारा नव्हता. भास्करनं पुढे उतारावर उलटं चालत उतरावं, म्हणजे बसकडे तोंड करून तो समोरून खुणेनं मियाँला इशारा देत राहील. मियाँनं चुकूनही ब्रेक लावायचा नाही, फक्त गिअरवर गाडी कंट्रोल करायची, असं निघताना ठरलं. मी मियाँच्या मागे उभं राहून त्याला आधार देत होतो. भास्करनं बससमोरून पार डांबरी सडकेपर्यंत काही नाही ह्याची खात्री करून घेतली. बसपासून 30-40 फुटांवर तो उभा राहिला. मी मागे वळून बाबांकडे पाहिलं. ते आमच्या हालचाली पाहात होते. त्यांनी डोळ्यांनी खूण करताच मी मियाँच्या खांद्यावर हात ठेवला. बस हळूहळू खाली उतरु लागली. समोरून भास्कर हात वर करून मियाँला इशारा देत होता. टेकडीचा अर्धा उतार आम्ही पार केला. नंतर नेमकं

काय झालं माहीत नाही, बस तिरकी तिरकी उजवीकडे घसरू लागली. नेमकी त्या बाजूला दरी होती. समोरून भास्कर जोरानं हातवारे करत डावी डावी ओरडत होता. चालकानं नेहमीच्या सवयीनं ब्रेक दाबला. बस डावीकडं वळवली असावी. डावीकडच्या टेकडीच्या उंचवट्यावर बस घासली गेली. अचानक बसचा वेग वाढला. ती चालण्यापेक्षा घसरत पुढे जात होती. वेडेवाकडे हात करत भास्कर बसजवळ दिसला. नंतर बस एकदम रोडवर आली. चालकानं ब्रेक दाबल्यानं उभी राहिली. प्रथम बस उजवीकडे जात होती तिकडे खोल दरी होती. काल संध्याकाळी सर्वांनी तिथं निसर्गसौंदर्य पाहिलं होतं. सूर्यास्त पाहिला होता. आज आमचा अस्त तिथं झाला असता. कुणी काही बोलत नव्हतं. सगळ्यांचे चेहरे भीतीनं थंडगार झाले होते. काही वेळ तसाच शांततेत गेला. सर्व मान्यवर वयानं मोठे होते. मी मागं वळून पाहिलं, बाबा डोळे मिटून शांत पडले होते. मनात आलं, कुणाचं स्मरण करत असतील? आता हळूहळू सगळे धक्क्यातून सावरले होते. एक मान्यवर गाडीत खाली पडले होते, ते इतरांच्या मदतीनं उठत होते. त्याच क्षणी भास्कर दारातून आत डोकावत म्हणाला,

"बाबा कसे आहेत?''

बाबांचा चेहरा आनंदी झाला. त्यांनी विचारलं,

"भास्कर, कसा आहेस?''

मी भास्करकडे पाहात विचारलं,

"अरे, तू आहेस का? मला वाटलं गाडीखाली आलास!''

"भाऊ, उडी मारली. हे बघ, हाताला लागलं, पण वाचलो.''

भास्करनं हात दाखवला. त्यावर चांगलंच खरचटलं होतं. एव्हाना बसमध्ये हालचाल सुरु झाली होती. आपण जिवंत आहोत हे सर्वांना नीट समजलं होतं. भास्कर बसमध्ये आला. त्याने मियाँच्या खांद्यावर थोपटलं. मियाँ आता प्रथमच हसला. आमचे आपसात खेळीमेळीचे संबंध होते. बाबांसोबत त्यांच्यासाठी काम करताना एक शिस्त नक्की होती, पण तणाव कधी नसे. थट्टामस्करी नेहमी चाले. बाबाही त्यात सामील असल्यासारखे होते. मी भास्करला मोठ्यानं म्हणालो,

"भास्कर, तुला हजार वेळा सांगितलं, की कितीही रात्र झाली तरी हिशेब पूर्ण करत जा. मेला असतास तर व्हाउचरवर तुझा अंगठा घेतला असता का?''

भास्करनं हसून कोपरापासून नमस्कार करत उत्तर दिलं,

"ते राहिले म्हणून बाबांच्या कृपेनं वाचलो. सही करून मरीन...''

भयानक प्रसंगातून मानसिक स्थिती पूर्ववत होण्याचा खरं तर आम्ही दोघं प्रयत्न करत होतो. ह्यात गंमतही होती. शिस्तीची आठवण होती. माझं बाबांकडे लक्ष गेलं. ते स्मित करून आमच्या संवादास दाद देत होते.

नेमके त्याच वेळी एक मान्यवर रागानं म्हणाले,

"अरे विलास, काय हे? कसा बोलतोस तू...''

भास्कर हसत होता, मला हसू येत होतं. दुसरे मान्यवर म्हणाले,

"काही क्षणापूर्वी आपण मरणाच्या दारात होतो. विलास, तुला पैशासाठी बोलणं सुचतंच कसं?'' त्यांना खरा संताप आला होता.

मी एकदम गप्प झालो. सर्वच मोठे होते. मी काही बोलू शकत नव्हतो. समोर बाबा होते. सर्वांना माझा राग आला होता. त्यांच्या चेहऱ्यावर नाराजी, चीड स्पष्ट दिसत होती. भास्कर हुशार. तो पटकन खाली उतरून बसचे टायर ठोकून पाहू लागला. काही क्षण शांतता होती. आता मान्यवर आपसात माझ्या वागण्यावर चर्चा करू लागले. मी बाबांकडे पाहिलं. ते विचारात होते. त्यांचा डावा हात कपाळावर केसांत होता. त्यांनी माझ्याकडे पाहिलं. हळूहळू त्यांचे डोळे बोलू लागले. त्यात 'थांब, मी आहे,' असं आश्वासन ती नजर मला देत होती. निर्धास्त झालो. बाबांनी तिथंच बसलेल्या यदुनाथजींना हाक मारली,

"यदुनाथ, अरे, विलासची दाढदुखी तुम्हाला नाही समजणार. थांबा...''

आता सगळे गप्प झाले. बाबा काय सांगतात ते ऐकण्यासाठी सर्व बाबांकडे वळून पाहू लागले. पुढे पाचएक मिनिटं बाबा शांतपणे, मोठ्या आवाजात बोलत होते. वाक्य न् वाक्य आठवणं कठीण आहे. बाबांनी बायबलमधील गोष्ट त्यांच्या शैलीत सांगितली-

"येशू ख्रिस्ताला देहदंडाची शिक्षा ठोठावल्यावर, अवजड वधस्तंभ ख्रिस्त स्वत: खांद्यावर वाहून नेत असतो. काही लोक त्याला दगड-गोटे मारत असतात. येशू रक्तबंबाळ, घामानं ओथंबून तो वधस्तंभ जागेवर नेत असतो. काही भक्त शेवटी रडत रडत शेवटून चाललेले असतात. वाटेत त्यांना एक भक्त गालावर हात ठेवून दारात बसलेला दिसतो. भक्त त्याला म्हणतात, 'अरे भल्या गृहस्था, इथं काय बसलास? आपल्या देवाला हे लोक वधस्तंभावर ठोकणार आहेत. निदान शेवटच्या क्षणापर्यंत त्यांचे दर्शन घे. चल.' तो माणूस उठलाही नाही, गालावरचा हात न काढता तो म्हणाला, 'सगळं खरं, पण माझी दाढ दुखते त्याचं काय?'

बाबा थांबले. काही क्षणानंतर वर आढ्याकडे पाहात म्हणाले,

"सार्वजनिक पैसा हीच तर विलासची दाढदुखी आहे. खरं तर सर्वांनीच सार्वजनिक पैशासंबंधी हीच वृत्ती ठेवली पाहिजे.''

बाबांनी बाजूचा टॉवेल उचलून चेहऱ्यावरुन फिरवला व म्हणाले,

"चला, सगळं ठीक आहे ना?''

बाबा नेहमी येशूचे गुणगान गात असत. रामायण, महाभारत किंवा पुराणातील कथांसाठी त्यांच्याकडे वेळ नसे. त्यांच्या कवितेतून येशू व त्याची करुणा ह्याला अग्रक्रम आहे. बाबा मोठे होते. त्यांनी समाजासाठी, तरुणांसाठी खूप केलं आहे. अनेक जण त्यांना देव मानत आले. अनेक ख्रिश्चन पाहुणे, पाद्री, नन् व धर्मगुरु बाबांकडे येत, पण कुणी त्यांना येशू किंवा प्रतियेशू मानलं नाही. हे ख्रिश्चन बाबांना गांधी म्हणत. हिंदू भक्तमंडळी, बाबांनी येशूचं गुणगान करुनही त्यांना देव, देवासमान मानतात. खरं तर, करुणेच्या बाबतीत बाबा येशूपेक्षा कमी नव्हते. कधी कधी माझ्यासमोर पूर्वी बाबांशी, संस्थेशी वाईट वागलेल्या व्यक्तीबद्दल वाईट, दु:खद बातमी समजे, त्यावेळी बाबा हळहळ व्यक्त करत. मला समजत नसे. बाबांना वाईट का वाटलं? अर्थात, बाबांची कळकळ खरोखर मनापासून असे. खरं तर त्यावेळी मला मनातून आनंद होई, पण मलाही चेहरा पाडून वाईट झालं असं दाखवावं लागे. ही कसली करुणा? बाबा करुणेचे गुलाम तर झाले नव्हते?

> 'ख्रिश्चॅनिटी आणि चर्चानिटी यांच्या लढाईत
> मी ख्रिश्चॅनिटीच्या बाजूने उभा आहे.'
> - करुणेचा कलाम 22

असं बाबांचं म्हणणं. पण सामान्य माणूस, मग तो हिंदू असो अगर ख्रिश्चन, देव व धर्माचरण कधीच वेगळं करता येत नाही. बाबांकडे येणारे ख्रिश्चन धर्मगुरु जरी बाबांच्या कामामुळे बाबांना मान देत असले, तरी ते स्वत: चर्चानिटीवर पोसलेले असत. दरवर्षी आनंदवनमध्ये ख्रिश्चनांचं शिबिर भरवणारे फादर मोठ्या भक्तिभावानं, महारोग्यांच्या वस्तीत येऊन शिबिर घेत असतील. कौतुक आहे. शांतता, बंधुभाव, प्रेम व करुणा ह्यावर प्रवचनं देत असतील. जेव्हा बाबा होते त्यावेळी बाबांबरोबर अशा शिबिरात मी जात असे. बाबांना ते मोठा मानसन्मान देत असत, पण त्यावेळी शिबिरार्थींमध्ये, केवळ गरीब म्हणून ख्रिश्चन धर्म स्वीकारावा लागला असे आदिवासी चेहरे दिसत त्यांचं काय? लोकांवर प्रेम करण्यासाठी त्यांचा धर्म बदलावा लागतो का? करुणा कशाच्या बदल्यात दाखवली जाते का? त्याउलट बाबांचं होतं. त्यांनी कोणत्याही महारोगी रुग्णाला, अपंगाला व आदिवासीला कधी धर्म बदलण्यास लावला नाही. सर्व धर्माचे लोक आनंदवनात राहात आहेत. बाबांनी कधी भेदभाव केला नाही. बाबांच्या प्रेम व करुणेचा लाभ-अनुभव सगळ्यांना सारखा मिळाला आहे. बाबा सर्वांनाच क्षमा करत होते. त्यांनी प्रभूला क्षमा करण्यास सांगितलं नाही. बाबांनी ख्रिश्चन धर्मशास्त्राचा व बायबलचा सखोल अभ्यास केला असावा. अगदी आनंदवन सुरु करण्यापूर्वीच. एका

ठिकाणी ते म्हणतात,

महारोग्याच्या जखमा नजरेत भरण्याआधी
मला दिसले त्याच्या कपाळावर कोरलेले
वीस शतकांपूर्वीचे तुझे चुंबन
अन् त्या स्पर्शाने पूर्णत्व पावलेल्या देहांनी
मला घडवलं.

मायकेल अँजेलोच्या चित्रातील देखण्या देहांचा साक्षात्कार!

जर बाबांनी ख्रिश्चन धर्मशास्त्राचा अभ्यास केला नसता तर ते महारोग्यांच्या कामात पडले नसते का? का नंतर बाबांना हा विचार सुचला असावा व चिंतनातून पुढे कवितेत उतरला असावा? त्यापेक्षाही आपण थोडं मागे जाऊन परिस्थिती पाहिली तर... बाबांनी महारोगी रुग्णांसाठी काम सुरु केलं तेव्हा समाजाचा महारोग्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन फार वाईट, घृणास्पद होता. लोकांनी बाबांना वाळीत टाकल्यासारखं होतं. त्यावेळी भारतात ख्रिश्चन मिशनरी महारोग्यांसाठी संस्था काढून ख्रिश्चन धर्माचा प्रसार करत होते. अनेक ख्रिश्चन संस्थांतून रुग्ण आनंदवनमध्ये येत असत. आनंदवनात ते ख्रिश्चन म्हणून राहात. त्यांना जात बदलावी लागली नाही. काही विचारी ख्रिश्चन धर्मगुरुंना त्यामुळे बाबांबद्दल आत्मीयता वाटू लागली. साहजिक ख्रिश्चन धर्मगुरु व ख्रिश्चन परदेशी पाहुणे ह्यांनी बाबांना महारोग्यांसह स्वकीयांपेक्षा लवकर स्वीकारलं, मदत करण्यास सुरुवात केली, हेही कारण असावं. बाबांना देव मानावं अगर नाही हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. पण त्यांना बाबा आमटे राहू द्यावं. त्यांचा 'बाबा' करण्याचा अनेकांनी प्रयत्न केला. मला मात्र खरे 'माणूस बाबा' वाटतात. माणुसकी म्हणजे काय हे मी बाबांच्या सहवासात शिकलो.

'मी ख्रिश्चॅनिटीच्या बाजूनं आहे' असं बाबा म्हणतात. ते त्यांनी त्यांच्या बेधडक बोलण्यातून सिद्ध केलं आहे. केरळमधील एक प्रसंग मी कधीही विसरणार नाही. बाबा फार चांगलं इंग्रजी बोलत. त्यातील अनेक शब्दांचा अर्थ सोडाच, मला त्या शब्दांचा साधा स्पष्ट उच्चारतासुद्धा करता येणार नाही. त्या प्रसंगाचा निकट साक्षीदार म्हणून मी माझ्या बुद्धीला समजलं तेवढं सांगतो.

भारत जोडो यात्रेत आम्ही सर्व मिळून दीडशेच्या जवळपास होतो. ज्या गावात मुक्काम असेल तिथल्या सामाजिक संस्था, लायन्स, रोटरी क्लब सर्वांच्या राहण्याची व जेवणाची व्यवस्था करत. आम्ही तमीळनाडूतून केरळमध्ये प्रवेश केला. केरळमध्ये यात्रेचे चार मुक्काम होते. चार ठिकाणी चर्च अगर त्यांच्या शाळांमध्ये मुक्कामाची व्यवस्था होती. खरं तर केरळमधील आमचा व्यवस्थापक हिंदू होता. पण बाबांना सर्व मानत, त्यामुळे व ख्रिश्चन चर्च संस्थांकडे आर्थिक पाठबळ व मोठी मोठी चर्चेस, शाळा-कॉलेजेस होती त्यामुळे, व्यवस्थेत त्यांचंच वर्चस्व होतं. केरळमध्ये सुरुवातीचा प्रवेशच काही फादरनी बाबांचे स्वागत करून झाला. पहिल्या दिवशी एका चर्चमध्येच मुक्काम होता. आज बाबा जास्त आनंदी वाटत होते.

बाबा कवितेत वर्णन करतात-

'आकाशाचा वेध घेणारे चर्चचे उत्तुंग मनोरे
नेहमीच मोहवीत राहिले
त्यातला घनगंभीर घंटांचा गहिरा नाद
अन् प्रचंड ऑर्गन्सची खर्जातली सुरावट.'
- करुणेचा कलाम 22

भारत जोडो यात्रेत सकाळी पूर्वीच्या मुक्कामावरुन आम्ही निघून वाटेत काही गावांत छोट्या सभा घेत नवीन गावी पोहोचत असू. तिथं जेवणानंतर सायकल चालवणारे तरुण इतर मुक्कामाची व्यवस्था करुन विश्रांती घेत. शक्यतो तरुणांबरोबरच मुक्कामी राहायचं हे बाबांचं धोरण असे.

सर्वसाधारण शाळेतच मुक्काम असे. फार क्वचित बाबा गेस्ट हाऊसमध्ये राहिले. प्रत्येक गावात सभेआधी स्थानिक मान्यवर, व्यवस्थापक बाबांना मुक्कामाच्या ठिकाणी येऊन भेटत. चर्चा, ओळख झाल्यावर बाबा त्यांच्यासोबत सभेच्या ठिकाणी जात. त्या दिवशी बाबा चर्चच्या आत एका बाजूच्या खोलीत विश्रांती घेत होते. मी बाहेर व्हरांड्यात बसलो होतो. केरळमधील आमचा व्यवस्थापक, स्थानिक दोघं-तिघं गडबडीनं, काही तरी हळू आवाजात कुजबुजत येत होते. त्यांच्या चेहऱ्यावर काळजी स्पष्ट दिसत होती. व्यवस्थापक तर केव्हाही रडू येईल असा दिसत होता. तो जवळ आला, पायांनी लुंगी उडवून वर घेत मद्रासी हिंदीत बोलू लागला,

"बाबा झोपले आहेत का? त्यांना उठवावं लागेल."

"का? काय झालंय? थोडा वेळ थांबता येणार नाही का?" मी विचारलं. मला काही समजत नव्हतं.

"नाही नाही, लवकर उठव. आपल्याला नवीन जागा पाहावी लागेल. सभा तरी होईल की नाही..."

"काय? काहीतरी काय बोलताय...?"

"अरे विलास, चर्चची मंडळी रागात आहेत. ते सर्व फादर, रेव्हरंड तातडीनं बाबांना भेटणार आहेत."

"गावाबाहेर त्यांनी भव्य स्वागत केलं तेच ना? मग आता काय झालं?"

"बाबाका पोयेम का बुक आहे ना, उसका कुछ है."

"हो आहे, पण त्याचं काय?"

त्यांनी घाईघाईत सांगितलं, "बाबांच्या कवितेच्या पुस्तकामध्ये काहीतरी ख्रिश्चनांबद्दल अपमानास्पद आहे. सर्व फादर नाराज आहेत. खरं तर त्यांना बाबांना जाब विचारायचा आहे."

त्यावेळी बाबांच्या पुस्तकाबद्दल ऐकून होतो, प्रत्यक्ष बाबांच्या सहवासात कविता जगताना कधी कविता वाचण्याच्या फंदात मी पडलो नव्हतो. मी 'ठीक आहे' म्हणालो. व्यवस्थापक चालला गेला. बाबा काय आहेत हे मी चांगलं ओळखत होतो. बाबा, येशू व ख्रिश्चॅनिटीचा अपमान होईल असं कधी लिहितील असं वाटलं नव्हतं. कदाचित वाचणाऱ्यांनी गैरसमज करून घेतला असेल. व्यवस्थापक फार मोठे संकट समजत होता. त्याच वेळेला कठीण प्रसंगात संकटाशी लढताना बाबांची प्रकृती सुधारते हा माझा अनुभव होता. हेच बाबा एका ठिकाणी म्हणतात-

'संकटांची धास्ती नव्हती
मनगटात मस्ती होती
एकटा कधीच नव्हतो
माणूसच दैवत होते.'
- प्रवास : करुणेचा कलाम

मी खोलीत गेलो. बाबांना उठवण्याच्या आधीच त्यांनी विचारलं, "काय रे विलास?"

मी बाबांना कल्पना दिली. काही क्षण ते स्वस्थ होते. दुसऱ्या क्षणी ते हसत उठले. तोंड धुण्यासाठी जाऊ लागले. मी पटकन पट्टा पुढे केला, काठी हातात दिली. त्यांनी मला खोलीत खुर्च्या मांडण्यास सांगितलं. येणाऱ्यांना पाणी कोण देईल? चहा-कॉफीची व्यवस्था करता येईल का? ते फ्रेश होऊन आले. परत कॉटवर आडवे झाले. परत एकदा खुर्च्या कशा ठेवाव्या हे ठरले. यदुनाथजींना बोलावून घेण्यास सांगितलं. "तू इथंच राहा. बसमध्ये माझी पुस्तकं आहेत ती आण." बाबा भराभर सूचना करत होते.

"विलास, मला बसता येत नाही ह्याची कल्पना आहे ना? का मी उभं राहून बोलू?"

"नको बाबा, त्यांना कल्पना आहे."

कुणी तरी पाहुणे येणार असं त्यांचं वागणं होतं. कोणतीही काळजी, चिंता त्यांच्या चेहऱ्यावर

नव्हती.

बाहेर व्हरांड्यात लगबग झाली. पांढरे, ग्रे रंगाचे पायघोळ झगे घातलेले आठ-दहा फादर की त्यावरचे धर्मगुरु, मख्ख चेहऱ्यानं दारातून आत आले. बाबांनी हात जोडून सर्वांना नमस्कार केला. दोघा-तिघांनी नाराजीनं नमस्कार घेतला. बाबांनी हात केल्यावर ते खुर्च्यांवर बसले. त्यातल्या प्रमुखाने बाबांच्या प्रकृतीची चौकशी केली. काही जण मागे उभे राहिले. चार-पाच जणांनाच इंग्रजी येत असावं. सारे गंभीर होते. पुढे काहीच बोलणं होईना. व्यवस्थापक पुढे होऊन काही तरी बोलणार, तर बाबांनी हातानंच त्याला थांबवत प्रमुखाकडे वळून स्वत: विचारलं,

"काही अडचण आहे का?''

प्रमुख काहीच बोलला नाही. मागे उभ्या असलेल्या फादरकडे पाहात त्यांनी हात पुढे केला. त्या फादरनं झग्यात हात घालून एक पुस्तक बाहेर काढून प्रमुखाकडे दिलं. प्रमुखानं ते पुस्तक एखादा चावणारा किडा पकडावा तसं कोपऱ्यात चिमटीत पकडलं होतं. बाबांकडे देत तो काहीशा नाराजीनं म्हणाला,

"हे तुम्हीच लिहिलेलं आहे ना?''

"हो! का?''

ते बाबांचं 'करुणेचा कलाम' पुस्तक होतं. मूळ आवृत्तीचं होतं. बाबा पुस्तक उघडणार तोच प्रमुखानं पुस्तक हातात घेऊन मुखपृष्ठ समोर धरून प्रश्न केला,

"आमच्या होली क्रॉसवर तुम्ही चक्क एक माणूस आरामात बसवलेला दाखवला आहे. तो आमचा होली क्रॉस आहे, बगिच्यातला किंवा रेल्वे स्टेशनवरचा बाक नाही, की कुणीही येऊन बसावं.''

बाबांनी क्षणभर मुखपृष्ठाकडे पाहिलं. कुशीवर वळत प्रमुखाकडे पाहात त्यांनी प्रश्न केला,

"आजच्या अशांत काळात इतकी सुरक्षित, शांत जागा आणखी कोणती आहे हे आपण सांगू शकाल का फादर...'' पुढे आपल्या अस्खलित इंग्रजीत बायबलमधील काही दाखले देत, येशूवरील प्रेम-भक्ती त्यांनी फादरला ऐकवली. ह्या चित्रानं येशू धर्माचा अपमान तर होत नाहीच, उलट गौरवच आहे, हे पटवून दिलं. बाबा बोलत असताना त्यांचे मख्ख नाराज चेहरे हळूहळू फुलू लागले. शेवटी तर काही फादर, रेव्हरंड लोकांची नावं घेऊन किस्से सांगितले आणि त्यांच्या चेहऱ्यावर हास्य आणलं. शेवटी सर्व जण चहा-कॉफी पिऊन, नम्रपणे बाबांना नमस्कार करत चालले गेले. सर्वात आनंदी व्यवस्थापक होता. पुढे तीन-चार दिवस आम्ही चर्चचा पाहुणचार घेत होतो. त्यांनी कशातही उणीव ठेवली नाही. शेवटच्या दिवशी ओल्या डोळ्यांनी आम्हाला निरोप दिला. माझ्यासारख्याला बाबा कधीच समजणार नाहीत का? त्यांचं लेखन व काव्य वाचल्यावर कुणीही बाबांच्या प्रवाहात नुसता वाहणार नाही, तर भोवऱ्यात अडकून गोल गोल फिरत राहील. संत नामदेव, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर आदि संतांनी आपल्या काव्यात पांडुरंगला काही विचित्र उपमा दिल्या आहेत. त्याला हाक मारली आहे. अगदी तसंच बाबांचं आहे. ते म्हणतात-

> मी ख्रिश्चॅनिटीच्या बाजूने उभा आहे
> कारण समाजाला सेवाखोर हात देणारा जीझस
> त्याच बाजूने लढताना मी पाहिला आहे.

भांडखोर, हेकेखोर तसा जीझस सेवाखोर म्हटलं आहे. नुसती सेवा करण्याची वृत्ती नाही, तर त्याची परिसीमा - सेवा करण्याची आत्यंतिक ओढ - दाखवताना मराठी भाषेला एक नवीन शब्द दिला.

भारत जोडो यात्रेत केरळमधील तिसरा मुक्काम एका मोठ्या चर्चमध्ये होता. नेमका ख्रिसमस चालू झाला होता. एव्हाना बाबांची कीर्ती सगळीकडे झाली होती. त्यांना धर्मगुरुचा दर्जा मिळाल्यासारखा होता. सामान्य ख्रिश्चन व्यक्ती, बायका-मुलं बाबांच्या दर्शनासाठी येत होती.

मी कायम बाबांसाबेत होतो. ह्या सगळ्याचा इतका परिणाम झाला, की मला मी पायघोळ झगा घातला आहे असा भास होत राही. मीही मधूनमधून डोकं व छातीवर आडवा हात लावून क्रॉस करुन 'गॉड ब्लेस यू' म्हणू लागलो. त्यानंतर संध्याकाळच्या सभेतील एका वाक्यानं मी दचकलो, घाबरलो. त्या वातावरणातून बाहेर येऊन हात जोडून देवाची प्रार्थना करण्याची वेळ माझ्यावर आली. तो प्रसंग आठवला कीं आजही हसू येतं.

संध्याकाळी त्या भव्य चर्चच्या अंगणात सभा होती. चर्च इमारतीसमोरील चबुतऱ्यावर स्टेज सजवलं होतं. खच्चून गर्दी झाली होती. नाताळही होता. चर्चवर विद्युत रोषणाई केली होती. लोक नटूनथटून सभेला, बाबांना ऐकण्यासाठी आले होते. दहा-बारा खुर्च्यांवर पारंपरिक ड्रेसमध्ये फादर मंडळी बसली होती. बाबा स्टेजच्या डाव्या बाजूला कॉटवर पडले होते. जवळ मी खुर्चीवर बसलो होतो. सुरुवातीला नेहमीप्रमाणे भारत जोडो टीमनं भारत जोडो गीत गायलं. नंतर स्टेजवर शाळकरी मुलींनी येशूस्तवन म्हटलं. म्हणजे त्या केरळी भाषेत म्हणत होत्या, पण मधूनमधून आकाशाकडे हात करत होत्या. त्यानंतर एका फादरनं इंग्रजीत बाबांचा परिचय करून दिला. अत्यंत भक्तीनं तो बाबांबद्दल बोलत होता. त्या भाषणाचा एकानं मल्याळम भाषेत अनुवाद केला. बाबांची बोलण्याची वेळ आली. बाबा उठले. मी कमरेचा पट्टा दिला. तो बांधल्यावर हातात काठी घेतली. बाबा माईकपाशी उभे राहिले. सभेत शांतता होती. मी समोर खुर्ची ठेवली. डावा पाय उचलून बाबांनी खुर्चीवर ठेवला. ही भाषणाच्या वेळची नेहमीची पद्धत होती. बाबा बोलताना चांगले स्थिर राहात असत. सर्वप्रथम बाबांनी स्टेजवरील मान्यवरांची सर्वांची नावं घेऊन, बाबांना बोलण्यास परवानगी दिल्याबद्दल सर्व मान्यवरांचे आभार मानले. नम्र अभिवादन करून, आपल्या स्वागताबद्दल, आदरातिथ्याबद्दल मी येशू ख्रिस्ताच्या भक्तांचा आभारी आहे, असं म्हटलं. बाबा इंग्रजीत बोलत होते. एकानं त्याचा मल्याळम भाषेत अनुवाद केला. टाळ्यांचा गजर झाला. नंतर बाबांनी पुढचं वाक्य उच्चारलं-

“गॉड इज डेड, मेरी इज प्रेग्नंट अगेन.''

माझा कानांवर विश्वासच बसेना. काय होईल, दगड-चपला फेकल्या तर बाबांना कसं वाचवावं? आनंदवनमधील कुणी साथीदारही जवळपास दिसत नव्हते. पुढे बाबा काय बोलतात ते ऐकू येत नव्हतं इतका मी हादरलो होतो. स्टेजवर बसलेल्या धर्मगुरुंकडे मी चोरट्या नजरेनं पाहिलं. ते बाबांकडे पाहात होते. दुभाष्या आता मल्याळम भाषेत हातवारे करून वेगानं बोलत होता. त्याला काय समजलं व त्याने काय सांगितलं ते एकट्या जीझसलाच माहीत. पण परत टाळ्यांचा गडगडाट झाला. मी त्या वातावरणातून सावरून दोन्ही हात जोडून मनोमन देवाचे आभार मानले. ह्या वाक्याचा अर्थ नंतर सांगतो, असं बाबा त्या रात्री म्हणाले, पण ते राहूनच गेलं.

'गॉड इज डेड...'

जागेपणी बाबा एकटे कधीच नसत. एकटे असत तेव्हा सतत नवीन करण्याचा ध्यास त्यांच्याबरोबर असे. बाबा कधी थकले नाहीत असं मात्र नाही. दुसऱ्या भारत जोडो यात्रेत त्यांची प्रकृती साथ देत नव्हती. पण संकल्प केला कीं तो तडीस न्यायचा ही जिद्द होती. रोज रात्री त्यांचा चेहरा थकलेला असे. गादीवर पडल्या पडल्या हातपाय हलवताना होणारी वेदना चेहऱ्यावर दिसू न देण्याची धडपड मी पाहात होतो. पण पहाटे चार वाजता अंघोळ झाल्यावर भेटायला येणाऱ्या तरुणापेक्षा ते तरुण वाटत. एक-एक जण येत राही, पण बाबा सर्वप्रथम तयार असत. पुढचा एक-दीड तास ते तरुणांबरोबर बोलत, चर्चा करत. तरुण काय काय करु शकतात ह्याबद्दल ते सतत नवीन नवीन योजना आखत आणि तरुणांसोबत चर्चा करत. गांधींच्या/येशूच्या शिकवणीनंतर त्यांचा तरुणांच्या कर्तृत्वावर विश्वास होता. मी कोपऱ्यातून पाहात राही. रात्रीचे बाबा व हे आताचे बाबा! खरा कोण? काय शक्ती आहे! काय जादू आहे! चमत्कार म्हणतात तो हाच का? पूर्वापार संस्कारानं रात्री झोपताना मी रामनाम घेतो. बाबा काय करत असतील? इतर सर्वसाधारण व्यक्तींप्रमाणे मीही बाबांना नास्तिक मानत आलो. मग ही शक्ती नक्की कोणती? बाबा एका कवितेत म्हणतात की-

म्हणूनच धापा टाकू लागलो की
विश्रांतीला मला चालते
बोधिवृक्षाची गडद सावली
अन् क्रूसाची अपुरी छाया.

थकलेले बाबा निद्रेच्या अधीन होताना कोणत्या कलेने ह्या गडद सावलीत, की अपुऱ्या क्रूसाच्या छायेत जात होते? की ही परमेश्वरी कृपा होती? की आणखी काही? मग क्रूसाची अपुरी छाया का? त्यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला नव्हता म्हणून का?

भारत जोडो यात्रेत पहाटे व इतर वेळी बाबा जेव्हा तरुणांच्या ग्रुपबरोबर असत त्यावेळी कुणी मधे आलं अगर थांबा म्हटलं तर त्यांना राग येई. अशा वेळी कुणी बाबांना कसली आठवण करण्यास धजत नसे. सुरुवातीला काही वेळा ह्या गोष्टीसाठी मी त्यांची नाराजी, राग सहन केला आहे. पण सकाळी निघण्याची घाई असे. निघण्याच्या वेळेबाबत ते काटेकोर होते. ते तयार झाल्यानंतर इतर गोष्टी आवरुन आम्हा बरोबरच्यांना त्यांची वेळ पाळावी लागे. कधी आधी कुणाला तरी भेटीची वेळ दिलेली असे. मी नाही, त्यांनी स्वत:. मग पुढे पुढे बाबा तरुणांबरोबर असलेल्या खोलीत मी जाऊन सामान आवरु लागत होतो. काहीतरी शोधत आहे असं दाखवत असे. त्यावेळी मोठे केलेले डोळे, कपाळावरील आठ्या, हाताची केलेली मूठ, केसांतून फिरवलेला हात मला दिसतच नाही असं दाखवत मी माझ्या मनगटावरील घड्याळाकडे पाही. मग चार-पाच मिनिटांत बाबा तरुणांना निरोप देत असत. तरुणांशी बोलताना बाबा एवढे तल्लीन कसे होतात? एखाद्या गवयानं गाण्यात, भक्तानं ईश्वरपूजनात, कलाकारानं कलेत व्हावं तसं. की तरुणांत बाबाच तरुण होतात? त्या तरुणांत ते स्वत:ला शोधतात का? शरीर परत तरुण होणं नाही, पण मनाचं काय? आयुष्यभर बाबा कविता जगत आले होते का? त्यांचं अवघड काव्य, कविता, त्यांनी स्वत: लिहिलेलं चरित्र तरी नाही ना?

तरुणांशी बोलताना...
अनेक छोट्या आरशातून
मीच होतो प्रतिबिंबित
अन् चितारला जातो
माझ्या मनाचा चित्रलोक
म्हणूनच ओंजळीतल्या रक्तात जमवत असतो
असंख्य असंबद्ध प्रतिबिंबं
माझ्याच शतखंडित सूर्याची.
- संस्कार : करुणेचा कलाम

अनेक वेळा मी अशा ठिकाणी बाबांना काही लागलं तर, म्हणून कोपऱ्यात चूपचाप बसून असे. बाबा एकामागून एक कल्पना तरुणांसमोर मांडत. त्यांची सुरेख फोड करुन, समजावून सांगत. बाबांचे शब्द काही वेळा अलंकारिक, अवघड वाटले तरी बोलणं रटाळ कधीच नसे. मधूनमधून ते मोठ्यांच्या आठवणी सांगत. बाबांचं तरुणांवरील प्रेम किती असावं! देवाला वाहण्यासाठी फुलांची ओंजळ जमवणारा व त्यात धन्यता मानणारा मी सामान्य कार्यकर्ता कुठे आणि ओंजळीत तरुण रक्त जमवत देशाला, मातृभूमीला वाहण्याची कळकळ असलेले बाबा कुठे! मी बाबांबाबत काय सांगू शकेन? फक्त आठवणीच ना? बाबांनी तरुणांना छोट्या आरशाची उपमा दिली आहे. भारत जोडो यात्रेनंतर सोबत, संबंधात आलेले हजारो तरुण आज भारतभर समाजासाठी काही तरी काम करत आहेत. बाबांसारखे तेज नसेल, पण त्याच तेजाचं प्रतिबिंब पडत असलेले असंख्य कवडसे हे खरं त्यांचं जिवंत स्मारक किंवा स्मारकं आहेत असं मला वाटतं.

बाबांचं काम खरं तर फार भव्य-दिव्य, प्रचंड आहे ह्यात दुमत असण्याचं कारणच नाही.

बाबांना भारतभर समाजासाठी चालू असलेल्या छोट्या छोट्या कामाबद्दल नेहमी कौतुक होतं. अनेक जण सल्ल्यासाठी त्यांच्याकडे येत. बाबांना अनेकांची माहिती असे. पत्रव्यवहार असे. फक्त महारोग्यांसंबंधी असं नव्हतं. प्रत्येकानं आपल्या कुवतीप्रमाणे समाजासाठी काही तरी करत राहावं हा त्यांचा विचार होता. भारत जोडो यात्रेत सहभागी झालेल्या काही तरुणांनी नंतर पूर्णवेळ सामाजिक कामासाठी वाहून घेतलं आहे. काहीजण संसार करून, सामाजिक बांधिलकी ठेवून, जमेल तेव्हा बाबांच्या संस्थेला अगर इतर सामाजिक संस्थांना मदत करत असतात.

बाबांनी स्वत:ची उरलेली स्वप्नं पाहण्यासाठी तरुणांना छोट्या आरशाची उपमा दिली आहे. पाहा कसे आहे. बाबांच्या आठवणी मनात कोरलेल्या आहेत. एकातून दुसरी अशा मनात रेंगाळत राहातात. बाबा आपल्यातून शरीरानं गेले, पण आठवणीत आजही ते पूर्वीइतकेच जवळ असल्यासारखे वाटतात. आरशावरून आठवलं. आरशाची आठवण थोडी गमतीची आहे, पण त्यातून फार मोठा धडा सर्वांसमोर मांडला जाईल...

कसरावद इथं राहात असताना बाबा फार एकटे झाले होते. आनंदवनमध्ये ते कायम गर्दीत असत. कुणी ना कुणी मागे-पुढे असे. त्यांना विश्रांती अशी नव्हती. कुठे बाहेरगावी गेले तर तिथं माणसांचा गराडा असे. कसरावदला नर्मदा किनारी एका घरात बाबा होते. कसरावद गाव लहान आणि तेसुद्धा लांब होतं. बाबांना लोक फार मान देत. त्यांचं प्रेमही होतं. गावकरी बहुसंख्येनं शेतकरी असल्यानं बाबांकडे येणं कमी होतं. नर्मदा बचाव आंदोलनाचे कार्यकर्ते येत राहात. बाबा वाचन व फिरणं यात वेळ घालवत असत. पुढे हृदयाचं दुखणं वाढलं. मग दोन-तीनदा इंदूरला जाणं झालं. शेवटी पेसमेकर बसवला. हिंडण्या-फिरण्यावर मर्यादा आल्या. वाचन हा एकच उद्योग राहिला. मी तिथं असलो तर गप्पा होत, पण बौद्धिक, तात्त्विक चर्चा मी काय करणार? सकाळपासून रात्रीपर्यंत सोबत करत होतो. त्यांना काय हवं-नको ते पाहात होतो. स्वच्छता व टापटीपबाबत बाबांना तडजोड चालत नसे. ते साधे राहात, पण नीटनेटके. बाबांनी दाढी वाढवलेली साधनाताईंना कधीच मान्य नव्हतं म्हणून असेल किंवा नीटनेटके राहावं म्हणून ते नेमानं दाढी करत. दर दोन दिवसांनी ते आरशासमोर उभं राहून दाढी करत. स्वत: हातानं दाढी करणं त्यांना आवडत असावं. एकदा कसरावदला असताना दोन-तीन दिवस ताप होता. त्यात डायरियाचा त्रास झाला. बाबा गळून गेले होते. फिरणं तर बंद होतं. घरात फिरताना झोक जात होता. आमचं लक्ष होतंच. तिसऱ्या दिवशी 'स्पंजिंग नको, अंघोळ हवी' असा हट्ट धरला होता. मी 'अंघोळीचं पाणी गरम झालं आहे. चला,' म्हणून त्यांना म्हणालो.

उठता उठता दाढीवरून हात फिरवत बाबा म्हणाले,

"पाणी आण, दाढी करतो.''

दाढी करायची म्हणजे दहा मिनिटं तरी उभं राहावं लागणार. मला काळजी वाटू लागली. मी मागे उभा राहणार होतो. तरीसुद्धा मी भास्करला बोलावून घेतलं. एकदा बाबा म्हणाले दाढी करतो, म्हणजे ते करणारच. त्यात कोण काय बोलणार. मी पाणी आणलं, सामान आणलं. बाबा आरशासमोर उभे राहिले. मी कमरेचा पट्टा पुढे केला. बाबा हसले. कमरेचा पट्टा लावून घेतला आणि दोन पायांत अंतर ठेवून उभे राहिले. पुढे दहा-पंधरा मिनिटं दाढी चालली. बाबा राकट होते. वागणं रांगडं असे. दाढी करताना ब्रशनं फरफटक साबण लावणं. नेहमी तीन वेळा रेझर फिरवत. प्रथम सरळ, मग उलटं, नंतर आडवं. घाईत रेझर चालवणं, त्यामुळे दोन-तीन ठिकाणी रक्त येणार हे गृहीत धरलेलं. नंतर साबण लावून तुरटी फिरवणं. साबणाचा ब्रश आमच्याकडे न देता स्वत: बाहेर जाऊन बेसीनवर धुतला. रेझर, ब्लेड, साबणाची डब्बी व्यवस्थित बॉक्समध्ये ठेवून माझ्याकडे दिला. अंघोळीसाठी बाथरुमकडे जाताना झोक जात होता. अंघोळ झाली. गादीवर येऊन पडले. आता थकवा चेहऱ्यावर दिसत होता. ओलसर डोळे मी पंचानं कोरडे केले. उभं राहिल्यामुळं कमरेत होणाऱ्या वेदना चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होत्या. मग कण्हतच कडेवर वळले.

"विलास, जरा ते मॉलीश तेल लावून दे. चोळू नको.''

काय तर, चोळू नको. प्रत्येक गोष्टीत संकोच. आपल्यामुळे दुसऱ्याला त्रास होऊ नये ही भावना.

स्वत: मात्र आयुष्यभर दुसऱ्यासाठी कष्ट उपसत राहिले. मी मॉलीश करू लागलो. जसा माझा हात फिरे तसे ते कण्हत होते. मी म्हणालो,

"बाबा, कुठे जायचं नाही, कुणी येणार नाही दोन दिवसांत. मग कशाला दाढी केलीत? दोन दिवसांनी केली असती.''

बाबा काही बोलले नाहीत. त्यांना चिडवण्यासाठी म्हटलं,

"परत, ताईसुद्धा इथं नाहीत.''

बाबा वळून सरळ झोपले. हसत म्हणाले,

"माझी चेष्टा करतोस का रे? इंदूचा दुसरा कुठला हट्ट असतो रे?''

त्यांनी डोळे मिटले. साधनाताईंना ते 'इंदू' म्हणत. ताईंचं माहेरचं नाव. आठवण करून मी उगाच त्रास दिला. बाबांनी उजव्या हाताचा अंगठा व तर्जनीमध्ये नाक पकडून श्वास काही मिनिटं रोखून सोडला. सांगावं की नाही असा विचार बाबांचा असावा. आम्ही दोघंच होतो. बाबांनी डोळे मिटलेले होते. त्यांच्या ओठांची किंचित हालचाल झाली. मी कान टवकारून वाट पाहू लागलो. हलकेच कपाळावर हाताने चोळू लागलो.

"विलास, दाढी कशासाठी करतो असं ना? खरंय. ह्या वयात काय फारक पडणार आहे. हा देह तर नर्मदेला अर्पण करायचा आहे. मी काय नुसता चेहरा पाहातो का आरशात? एवढा देखणा नाही, हे खरंय...'' थोड्या वेगळ्या आवाजात ते पुढे म्हणाले,

"आरशात मी माझ्या प्रतिबिंबाला प्रश्न करतो - 'काय बाबा आमटे, काय ठरवलं होतंस? कुणाला शब्द दिला होतास? वागलास का तसा? खोटं किती वागलास? स्वत:ला फसवत तर नाहीस ना?'' बाबा थांबले.

मी थक्क झालो. माझा हात तेव्हाच थांबला होता जेव्हा बाबांनी त्यांचा हात कपाळावरील माझ्या हातावर ठेवला. मी सावध झालो. बाबांचं डोकं चेपू लागलो. बाप रे! काय आहे हे!!

'आणि ज्याची स्पर्धा स्वत:शी आहे
त्याला जिंकणारा कोण आहे?'
- ज्वाला आणि फुले 97

अनेकांनी हे वाक्य वहीत लिहून घेतलं असेल. काही ठिकाणी सुभाषित म्हणून लिहीत असतील. काही भक्तांनी तोंडपाठही केलं असेल. प्रत्यक्ष कृतीत कोण आणतो? दाढी करण्याचा अट्टहास, स्वत:स सतत प्रश्न करत राहिल्यास माणूस स्वत:ला किती दिवस फसवत राहू शकेल? बाबांच्या प्रत्येक कृतीत, सवयीत काही तरी लपलेलं म्हणण्यापेक्षा, माझ्यासारख्या सामान्य कुवतीच्या माणसाला अर्थ कसा समजावा? बाबांची कुठलीच गोष्ट कधी लपवलेली, झाकलेली नसे. आपण काय करतो, कशासाठी व कुणासाठी ह्याचं भान त्यांना असे. ते स्वत: एका कवितेत म्हणतात-

'भान असलं की वैफल्य येत नाही
वंचना येत नाही
मग सार्वजनिक चेहरा खाजगी चेहऱ्याहून
वेगळा ठेवावा लागत नाही
कारण लपवायचे वंचनेचे डाग वाट्याला येत नाहीत.'
- करुणेचा कलाम 54

एवढ्यासाठी आजारपणात दाढीचा हट्ट. दोन चेहरे वागवावे लागू नयेत म्हणून. मग त्रास झाला तरी, वेदना झाली तरी-

'वेदना जाणवली नाही
तीच साधना झाली
श्रमाने कधी शिणलो नाही

तोच श्रीराम झाला होता.'

बाबा आस्तिक तर नव्हते? जन्मभर वेदना व श्रम करत राहिले. अखंड रामनामाचं व्रत तर नव्हतं ना?

बाबांना प्रश्न विचारलेले आवडत नसे. ते नेहमी सांगत, तरुणाला प्रश्न का पडावेत? वाचन करावं, निरीक्षण करावं, निसर्गात राहावं, सगळ्या प्रश्नांची उत्तरं स्वत: शोधावीत.

बाबा वृत्तपत्रं व इतर माध्यमांशी बोलताना समोरच्याला फारसे प्रश्न विचारावे लागत नसत. काही वेळा लोक, पाहुणे साधे साधे प्रश्न विचारत. बाबा उत्तरं देत, पण मागाहून नाराजी व्यक्त करत. बाबा सतत वर्तमानाचा, भविष्याचा विचार करत. पूर्वी तुम्ही काय केलं, कशा अडचणी आल्या ह्यावर बोलण्यास ते फारसे उत्सुक नसत. बाबांना कोणतीही गोष्ट मनापासून केलेली आवडे. त्यांच्या निरीक्षणशक्तीबरोबर त्यांची स्मरणशक्ती जबरदस्त असल्यानं ते शक्य असे. 17 एप्रिल 1975 रोजी मी पहिल्या दिवशी संस्थेत त्यांच्यासोबत जेवलो. मला गवारीची भाजी आवडत नाही हे त्यांनी हेरलं. पुढे कधीही मी त्यांच्या सोबत असताना गवारीची भाजी असेल तेव्हा ते म्हणत,

"विलासला गवार आवडत नाही, त्याला दुसरं काही वाढा.''

हे माझ्या बाबतीतच नाही, तर नेहमी येणाऱ्या पाहुण्यांच्या बाबतीत होतं. प्रत्येकाच्या आवडी-निवडी ते लक्षात ठेवायचे. असा भला माणूस कुणाला आपला वाटणार नाही? ह्या बाबतीत त्यांचा अभ्यास होता. बाबांनी तरुण वयात व्यायाम करून शरीर कमावलं होतं. खडतर आयुष्यात अनेक धक्के, अनेक व्याधी पचवल्यानं मनही पक्कं झालं होतं. त्याच बळावर शरीर साथ देत नसताना शेवटी रक्ताच्या कर्करोगाचं निदान झाल्यावर ते त्यांचंच मोकळं, स्वच्छ हास्य हरवून बसले नव्हते. प्राण जाण्याच्या आदल्या दिवशी काही तास पूर्वी रेणुका भेटण्यास आली. नाकात नळी असल्यानं बोलता येत नव्हतं, तरी तिचा हात हातात धरून ठेवून, हसत हसत दुसऱ्या हातानं जातो म्हणून निरोप घेतला, त्याचा मी साक्षीदार होतो. जसा जसा बाबांचा निकट सहवास वाढला तसा तसा मी बदलत गेलो. त्यांच्यापाशी असताना मी कधी बाबांना फार प्रश्न विचारत नसे. त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं त्रोटक देत असे. पुढे आजारपणात फक्त डोळ्यांची, खुणांची भाषा आम्हा दोघांत होती. शेवटी काही वर्षं बाबांना कमी ऐकू येत असे. श्रवणयंत्र असून ते न वापरण्याकडेच त्यांचा ओढा होता. आम्ही जवळपास वावरत असणारे आपसात बोलत असू, तेव्हा बाबा आमचं बोलणं ओठांच्या हालचालीवरून ऐकत असावेत, ह्याचा अनुभव आम्हाला येत असे. आमच्यातील एखाद्या चावट विनोदाला ते तिथंच हसून दाद देत. कधी नंतर कुणाला आम्ही काय म्हणत होतो ते सांगत. ते 'लिप रीडिंग' चांगलं करत. त्यांची नजर मात्र शेवटपर्यंत चांगली होती. त्या नजरेचा धाक होता, पण आदर जास्त.

मी संस्थेत आलो तसाच हेमलकसा प्रकल्पावर कामासाठी स्थायिक झालो. त्यावेळी हेमलकसा इथं आम्ही सर्व तरुण होतो. उन्हाळ्याचे चार-पाच महिने बाबा बराच काळ हेमलकसा इथं असत. पहिल्या पावसानंतर रस्ते, पूल नसल्यानं बाबा येऊ शकत नसत. अगदी 1988-89 पर्यंत अशी परिस्थिती होती. सुरुवातीच्या काळात माडीया-गौंड आदिवासींचं शोषण खूप प्रकारे अनेकांकडून होत असे. बाबांनी सुरुवातीपासून दवाखाना, नंतर 1976 साली शाळा सुरु केली. आदिवासींचं शोषण कसं थांबवता येईल ह्याकडे बाबांनी लक्ष केंद्रित केलं होतं. रीतसर मार्गानं वर तक्रारी करून काही प्रमाणात, पण फार सावकाश थोडंफार यश येत गेलं. त्यावेळी आदिवासींना खरं तर मीठ, मिरची व मिळालं तर रॉकेल, एवढ्याच गोष्टी जरुरी होत्या. चार महिने कपडे विकण्यास येणारे सालेवार सोडले तर बाहेरून व्यापारासाठी फारसं कुणी येत नव्हतं. सबंध भामरागड भागात दोन मोठी व इतर चार दुकानं होती. रोख पैसा आदिवासींकडे नसे, त्यामुळे सर्व व्यवहार बदली पद्धतीनं होत. एक पायली मिठासाठी चार पायली भात आदिवासींना द्यावा लागे. त्यावेळी मीठ चार आणे किलो होतं, तर भात 2 ते 3 रु. किलो होता. आदिवासी लुटला जात होता. बाबांना ही गोष्ट कळाल्यावर,

आपण आदिवासींना मीठ आणून दिलं तर! असा विचार बाबांनी केला. दुसऱ्या वर्षी बाबांनी 100 पोती मीठ वरोरा इथून आणलं.

आदिवासींना हवं तेवढं मीठ फक्त 50 पैसे किलोप्रमाणे देऊ लागलो. गावच्या गावं हेमलकसा प्रकल्पावर गर्दी करु लागली. 100 पोती मीठ दहा दिवसांत संपलं. बाबा तोपर्यंत हेमलकसा प्रकल्पावर राहिले. आदिवासींशी बोलत असत. प्रत्येक किलोचा हिशेब, कुणी घेतलं, कोणतं गाव हे सर्व लिहून ठेवण्यास सांगत होते व पाहात होते. मीठ विक्रीच्या वेळी येणाऱ्या आदिवासींबरोबर माडीया-गौंडी भाषा समजणाऱ्यांबरोबर घेऊन ते बोलत असत. प्रत्येकाला किती किलो मीठ विकलं व किती पैसे घेतले हे कागदावर लिहून दिलं जात होतं. अनेक वेळा लांबवर बाबा त्या चिठ्ठ्या वाचत होते. एक-दोनदा तर दिलेलं मीठ परत वजन करुन बरोबर आहे हे पाहिलं. आमच्याकडून काही चूक होत नाही हे पाहातात, की आमच्यावर विश्वास नाही, असं मला वाटे. पण ते तसं नव्हतं. लोक-बिरादरी प्रकल्पावरील आदिवासींचा विश्वास ते वाढवत होते. प्रकल्प व्यापार करत नाही हे आदिवासींच्या मनावर बिंबवत होते. ह्या विश्वासाचा नंतरच्या काळात अनेक वेळा उपयोग झाला. आदिवासींनी कायम साथ दिली, देत आहेत. पावसाळ्यापूर्वी निरोप घेताना मीठ वाटप चांगलं झालं, हिशेब बरोबर, असं म्हणत बाबांनी सर्वांचं कौतुक केलं. पुढच्या वर्षी मोठं काम आहे. तुम्ही नक्की पार पाडाल असं म्हणत, प्रत्येकाची चौकशी करत, डोळे पुसत बाबांनी निरोप घेतला. बाबा कवितेत म्हणतात--

'कामाबाबत कठोर होणाऱ्या नजरा
कार्यकर्त्यांबाबत क्वचित होतात हळुवार'

पावसाळ्यानंतर डिसेंबरमध्ये बाबा हेमलकसाला आले. आम्ही सारे जमा झालो. सहा महिन्यांनी बाबांनी लोक-बिरादरी प्रकल्पाच्या नावानं रॉकेल विक्रीचं परमिट मिळवलं होतं. मुंबईवरुन वॅगनलोड मीठ, मीठफंडातर्फे मिळवलं होतं. संध्याकाळी शेकोटीजवळ आता गप्पा, म्हणजे योजना आखणं सुरु झालं. रॉकेल साठवण्यासाठी रिकामे मोठे ड्रम, मापे, बिलबुक ह्याचा विचार सुरु झाला. एक महिन्यात हे सारं हेमलकसा इथं पोहोचणार होतं. फेब्रुवारीपर्यंत धान कापणी, चुरणं संपून आदिवासी मोकळा होईल. त्यानंतर हे काम करायचं असं ठरलं. प्रकल्पावरील कोणतंही काम न थांबता, दवाखान्यातील, शाळेतील व शेतीवरील कुणी कोणतं व कोणत्या वेळी हे काम करायचं हे ठरलं. आम्ही सर्व तरुण होतो. बाबा मनानं आमच्यापेक्षा तरुण होते. काही नवीन सुचलं तर ते स्वत: कामाच्या जागेवर जाऊन चर्चा करत. प्रत्येकाला जबाबदारीची जाणीव देऊन प्रोत्साहित करत. आदिवासींचं जीवन जास्त सुखकारक व आनंदी व्हावं हा ध्यास बाबांनी घेतला होता. ते त्यांचं स्वप्न होतं.

'दुनियेच्या मयखान्यात आयुष्यांचे पेले
जीवनाच्या नशेनं भरणारे हे कोण साकी
त्यांची स्वप्नं मोठी असतील
पण ती वाटून नाही का घेता येणार?'

तेव्हा समजलं नव्हतं. बाबा यदुनाथजींना स्वप्नाचा सहोदर म्हणत. आम्ही कोण होतो? स्वप्नांचे वाटेदार. बाबा हेमलकसा इथं असले की आदिवासी जीवन जगत. खरं तर त्यांची राहणी कायम आदिवासींसारखीच होती. गरजा फार कमी होत्या. आदिवासी शिकारीला एकत्र जातात, हाका काढतात, शिकारीनंतर शिकार वाटे करुन वाटतात. एखादं नवीन काम बाबांनी हातात घेतलं, की त्यांचा एकंदर मूड शिकार करण्याचा असायचा. ते हाका काढायचे ते तरुणांना घेऊन. त्यावेळी त्यांच्या मनात शिस्तबद्ध पद्धतीनं आखलेली योजना तयार असे. कामावर, शिकार करावी असे तुटून पडून करत, करवून घेत.

'भान ठेवून योजना आखतील
आणि बेभान होऊन त्या अमलात आणतील.'

पुढे पाच-सहा वर्षं आम्ही प्रकल्पावरून मीठ/रॉकेल वाटप केले. पुढे आदिवासींना शेतीकामात मदत केल्यावर त्याच वेळी त्यांना कामाची योग्य मजुरी मिळेल, हेही आम्ही पाहू लागलो. बाबांच्या मार्गदर्शनाखाली ही कामे केल्यानं आदिवासींची आर्थिक परिस्थिती सुधारू लागली. दुकानदार, व्यापारी शहाणे झाले. आदिवासींना मीठ, मिरची, रॉकेल काहीशा योग्य भावात मिळू लागले. काही सरकारी योजनाही आदिवासींपर्यंत पोहोचू लागल्या. बाबा स्वत: कामामध्ये आमच्या बरोबर असत. त्यांच्या प्रेरणेमुळे कोणतंही कष्टाचं काम करण्यास लाज वाटत नव्हती. हेमलकसा इथल्या दवाखाना, शाळा व आदिवासींना शेतीत मदत करताना काही गावांतील आदिवासींशी संबंध वाढला. त्यात बाबांना समाधान नसे. आदिवासी कोणत्या परिस्थितीत राहातात ते त्यांच्यात जाऊन आम्ही पाहावं असं त्यांचं मत होतं. बाबा एक दिवस म्हणाले, "मिठासाठी जवळच्या गावातील आदिवासीही येत नाहीत. बाकीच्या गावांचं काय?''

रोज संध्याकाळी बाबा हिशेबापेक्षा कोणकोणत्या गावातील आदिवासींनी मीठ नेलं हे पाहात. दवाखान्यात येणाऱ्या आदिवासी रुग्णांशी बोलत. ते कोणत्या गावातून आले याची विचारपूस करत. त्यांची स्मरणशक्ती अचाट होती. मग आम्हाला गावांची नावं सांगून म्हणत, 'ह्या गावच्यांना मीठ मिळालं नाही.' मग बाबा हेमलकसा इथं असताना ट्रकमध्ये 20 पोती मीठ घेऊन आम्ही काही जण बाबांसोबत सकाळीच बाहेर पडत असू. गावात गेल्यावर आदिवासी गोळा होत. बाबा त्यांच्याशी बोलत. गावात फेरफटका मारला जाई. तोपर्यंत चार पोती मीठ जात असे. मग पुढचं गाव. असं करत करत वीस पोती मीठ संपल्यावर बारा-एक वाजेपर्यंत आम्ही परत येत असू. रोज वेगळ्या दिशेला जात होतो. आमचं ठीक होतं. बाबांचं वय, त्यांची प्रकृती चांगली नसताना, कच्च्या बैलगाडीच्या रस्त्यानं ट्रकमधून बाबा हिंडत होते. अशा फिरण्यात दोन गावांच्या मधल्या प्रवासात गप्पा होत. बाबा अनेक गमती सांगत, अनुभव सांगत. आदिवासींच्या गरजांबाबत चर्चा होत असे. त्यातून पुढे बाबांनी वेगवेगळ्या गावांत उपकेंद्र सुरु करण्याचं ठरवलं.

एकदा इंदूरहून राहुलजी बारपुते, चिंचाळकर गुरुजी, इतर चार-पाच जण बाबांना भेटण्यासाठी म्हणून हेमलकसा इथं आले. सकाळी बसमध्ये मीठ घेऊन आम्ही निघालो. ते सर्व सोबत होते. बसमध्ये गप्पांचा अड्डा जमला. चिंचाळकर गुरुजींमुळे हास्यविनोद चालू होता. अर्थात, आदिवासी गावांत थांबत होतो. मीठ वाटप चालू होतं. त्या दिवशी काय झालं माहीत नाही, चार-पाच गावं झाली तरी मीठ संपतच नव्हतं. मीठ आहे ना, मग चला पुढे, असं बाबा म्हणत. कुणी काही म्हणू शकत नव्हतं. शेवटी संध्याकाळी पाच वाजता वीस पोती मीठ संपल्यावर आम्ही परत आलो. सकाळचा नाश्ता करून गेलो होतो. सगळे भुकेने त्रस्त होते. नाइलाज होता. बेभान होऊन काम पूर्ण करा म्हणजे काय, ह्याचा धडा बाबांनी आम्हाला व पाहुण्यांना दिला होता. हे श्रमिक विद्यापीठाचं शिक्षण होतं.

'मस्तके उंचावलेली असण्यासाठी पोट भरेलेले असावे लागते.'
- ज्वाला आणि फुले

परतताना सर्व गप्प होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी निघण्यापूर्वी बाबांनी सर्वांसाठी शिदोरी करून घेण्यास सांगितली. काही इतर सामान घेतलं. मी पाहुण्यांस बोलावण्यास गेलो. त्यांना आज बरोबर शिदोरी आहे याची कल्पना नव्हती. राहुलजींनी मला विचारलं, "आज किती मीठ घेतलं ते सांग. त्या सगळ्याचे रुपये मी तुला आताच देऊन ठेवतो. बारा वाजता मीठ संपलं असं तू जाहीर कर बरं का?'' अर्थात ही सारी गंमत होती. त्या दिवशी बाबांनी नेलगुड्याकडं बस घेण्यास सांगितली. मग इंद्रावती नदीवर

अंघोळी झाल्या. नदीकाठी तीन दगडांची चूल मांडून, त्यावर गरम भजी करून आम्ही सर्व जेवलो. इंद्रावतीकाठी बाबा फार आनंदी होत. अशा वेळी त्यांच्यातील कलावंत जागा होत असे. त्यात सोबत राहुलजी, चिंचाळकर गुरुजी असल्यावर काय विचारावे! ऋषीमुनी, पुराणातील गप्पा, आदिवासी संस्कृती, निसर्ग, कविता अशा सगळ्या विषयांवर गप्पा झाल्या. बाबांचा अभ्यास व अनुभव त्यातून उलगडत गेला. आदिवासींमध्ये काम करण्यापूर्वी त्यांच्या संस्कृतीचा बाबांनी सखोल अभ्यास केला आहे हे लक्षात आलं. त्यांच्या संस्कृतीतील चांगल्या गोष्टी जतन करून त्यांना इतर समाजाबरोबर आणायचं हेही समजलं.

बाबांसोबत आम्ही आदिवासी गावांतून फिरत होतो. अनेक गोष्टी दिसत होत्या. प्रत्येक घटनेकडे बघण्याचा माझा दृष्टिकोन आणि बाबांचा दृष्टिकोन यामधली प्रचंड भिन्नता मला हादरून टाकत असे. असेच आम्ही नेलगुड्या गावाकडे चाललो होतो. आम्हाला ढोलकं वाजवल्याचा आवाज आला. बाबांनी गावाबाहेरच गाडी थांबवण्यास सांगितली. आमच्या सोबत शाळेतली मोठी मुलं होती. त्यांनी आवाज ऐकून म्हटलं, "चला, गावात कुणी तरी मेलं आहे.'' आम्ही गावात गेलो. गावचा पाटील आला. आम्ही चौकशी केली. गावात लोहारकाम करणारा माडीया खाती मरण पावला होता. त्याला बायको व दोन लहान मुलं होती. थोडी शेती होती. बायकोचे आई-वडील, भाऊ गावातच राहात होते. आम्ही पाटलांशी बोलत होतो. गावात जर आम्ही छोटा दवाखाना काढला तर गाव मदत करेल का? बाबा ट्रकमध्येच गादीवर पडून विचार करत होते. माझं लक्ष त्यांच्याकडे गेल्यावर त्यांनी मला बोलावलं.

"विलास, पाटलाला विचार, दुसरा खाती आहे का गावात?''

मी पाटलाला विचारलं. गावात दुसरा कुणी खाती नाही, असं पाटलानं उत्तर दिलं. मी बाबांना जाऊन सांगितलं. बाबांनी पाटलालाच बोलावून घेतलं. नंतर त्यांनी त्याच्याकडून माहिती विचारून घेतली. त्यावरून उलगडा झाला, की गावात आता कुणी खाती नाही. एवढंच नाही, तर आजूबाजूच्या सहा-सात गावांतही कुणी खाती नाही. सर्व गावं याच्याकडेच येत होती. 'आता पावसात-शेती दिवसांत कसं कराल?' असा प्रश्न बाबांनी पाटलाला केल्यावर त्यानं आकाशाकडं पाहून 'तकदीर पोलो' म्हणजे 'नशिबाचा खेळ' असं म्हटलं. बाबांच्या चेहऱ्यावर आता काळजी दिसू लागली. आम्ही परत निघालो. बाबा विचारात गढले होते. एकदम कुशीवर वळून म्हणाले, "अरे, पावसाला अजून चार-पाच महिने आहेत. मी सोमनाथहून आपले दोन खाती पाठवतो. ते सहा-सात गावांतील लोकांचं नांगराचं काम करून देतील. पाटलाला बोलून घ्या. त्याची राहण्याची सोय आम्ही करू, आम्ही रेशन-पाणी देऊ. चार महिन्यात त्याच्या हाताखाली कुणी आदिवासी शिकून तयार झाला तर चांगलं. बघा, बोला तुम्ही पाटलाशी, गावाशी.'' थोड्या वेळानं तेच म्हणाले, "पावसाळ्यात नांगर मोडला तर शेतकऱ्याचं वर्षच जातं रे!''

खाती मेला तर आदिवासी मरणानंतर काय काय विधि करतात, ते कसे करतात, श्राद्ध करतात का, हे जाणून घेण्याची माझी कळकळ होती. खाती मेला तर गावाला दुसरा खाती आहे का? गावाची नांगराची मोडतोड कोण करेल? असा साधा विचार माझ्या मनात का आला नाही? मी आदिवासींसाठी काम करतो असं सांगण्याचा किंवा फुशारकी मारण्याचा मला हक्क तरी आहे का? बाबा तर, पुढे जाऊन गावाला कायमचा खाती कसा मिळेल ह्याची व्यवस्था करण्याच्या तयारीत आहेत. लोकांसाठी नाही, तर लोकांबरोबर काम करा, असं बाबा म्हणत त्याचा अर्थ समजला. जोपर्यंत आदिवासींचं गाव तुम्हाला स्वत:चं समजू शकत नाही, तोपर्यंत आदिवासी संस्कृतीचं ज्ञान होऊन तरी काय उपयोग. हे असं चालू होतं श्रमिक विद्यापीठाचं शिक्षण. बाबा म्हणत, तुम्ही तुमच्या समाधानासाठी काम करत राहा. आदिवासींनी तुम्हाला बोलावलं नाही.

असं गावोगावी फिरताना गावात लहानसहान आजारी आदिवासी भेटत. जास्त आजारी असेल तर आम्ही त्यांना बस/ट्रकमधून हेमलकसा इथं आणत होतो. पुढे सोबत औषधांची पेटी ठेवू लागलो. सर्दी, खोकला, ताप अशासाठी गावातच उपचार करू लागलो. परत येताना बाबांना सांगत असू,

आज इतक्या जणांना औषध दिलं. बाबा हसून कौतुक करत. 'व्वा! परवापेक्षा जास्त आकडा आहे नाही?' असं म्हणत. काम केल्याचा आमचा आनंद ते पाहात होते, तरीही त्यांना काहीतरी जास्त सांगायचं होतं असं वाटत राही. इतक्या दिवसांनंतर बाबांना थोडा तरी ओळखू लागलो होतो. शेवटी एक दिवस परतताना बाबांनी, आज किती पेशंट झाले, असं विचारलं. आम्ही सांगण्याआधी आज बाबांनी काय विचारलं असेल? आम्ही आकडा सांगितल्यावर ते म्हणाले,

"आदिवासी आपण येत नाही त्या वेळी आणि पावसात नदी-नाले भरल्यावर काय करतील? कधी विचार केलास? लहानसहान आजारावर आदिवासींना गावातच औषध मिळालं तर?''

मग चर्चा सुरु झाली. पुढे हिंडताना गावकऱ्यांशी बोलणं सुरु झालं. गावकऱ्यांनी आनंदानं तयारी दाखवली. गावात झोपडी बांधून दिली. ह्या कामातही बाबांना आदिवासींचा सहभाग नुसता गावात झोपडी-जागेपुरता नको होता. शाळेत शिकलेला आदिवासी मुलगा हेमलकसा दवाखान्यात चार-सहा महिने राहून, शिकून नंतर गावात काम करेल असं ठरलं. त्याप्रमाणे झालं. दोन वर्षात हेमलकसापासून सात वेगवेगळ्या दिशांना आमची उपकेंद्रं काम करु लागली. औषधाशिवाय आदिवासींना चांगली बिजाई ह्या केंद्रावरुन देऊ लागल्याने अनेक गावातील आदिवासींना शेतीचं उत्पन्न काढण्यात मदत होऊ लागली. बाबांच्या म्हणजे आमच्या कामात मोठा फारक हा होता, की दवाखान्यात औषध व शाळेत शिक्षण आम्ही मोफत देत असलो, तरी इतर कोणतीही वस्तू आदिवासींना 100 टक्के अनुदानावर आम्ही देत नव्हतो. अशा प्रकारे आदिवासींना फक्त याचक व आळशी आम्हाला करायचं नव्हतं. दरवर्षी धानचं उत्तम बियाणं आम्ही आदिवासींना देत होतो, पण त्याबद्दल तितकंच त्याच्या शेतातील धान परत घेत होतो. पुढे सरकारी दवाखाने, उपकेंद्रं झाली. रस्ते आले. सरकारनं शंभर टक्के अनुदानावर बिजाई देणं सुरु केल्यावर आम्ही उपकेंद्रं बंद केली.

1980-81 साली भामरागड भागात दुष्काळ पडला. शेवटचा महिनाभर पाऊस पडला नाही. त्याच वेळी सरकारने सरसकट लेव्ही वसुली करण्याचे ठरवले. पाऊस कमीच होता. बाबा नेहमीपेक्षा लवकर हेमलकसा इथं दाखल झाले. पिकलेल्या धानातील काही धान सरकारला द्या असं फर्मान तोपर्यंत आदिवासी भागात पोहोचलं होतं. गावोगावचे आदिवासी भेटण्यास येऊ लागले. बाबांनी आमच्याशी चर्चा केली. लेव्ही माफीसाठी जिल्हाधिकाऱ्याला सर्वांतर्फे अर्ज करण्याचं ठरलं. गावोगावी निरोप गेले. आठवडाभर अनेक गावांतून आदिवासी शेतकरी प्रकल्पावर येऊ लागले. ज्याला ज्याला लिहिता येतं होतं तो प्रकल्पावर जिथं जागा मिळेल तिथं कागद घेऊन बसत होता. गावाप्रमाणे आदिवासीचं नाव, शेती ह्याच्या याद्या तयार होत होत्या. प्रत्येकाचा अंगठा/सही घेतली जात होती. बाबा स्वत: सतत ठिकठिकाणी हिंडून प्रत्येकाचं नाव, अंगठा/सही घेतली का, याची खात्री करून घेत होते. जवळपास सत्तर गावांची माहिती तयार झाली. जिल्हाधिकाऱ्याला लेव्ही माफ व्हावी म्हणून सत्तर गावांच्या आदिवासींचा अर्ज तयार झाला. त्यावेळी जिल्हाधिकारी चंद्रपूरला असे. गडचिरोली जिल्हा निर्माण झाला नव्हता. अर्ज तर झाला, पण मग बाबांनी शेती किती आहे, उत्पन्न किती होईल हे परत वेगळं का बरं लिहून घेण्यास सांगितलं असेल? बाबा म्हणाले, "शासन जी.आर. वाचून त्यावरुन शासनाला किती क्विंटल धान लेव्ही म्हणून मिळणार ते काढा.'' साधारणत: पाचशे ते साडेपाचशे क्विंटल धान आदिवासींना सरकारला द्यावं लागलं असतं. बाबांनी सांगितले, "आपण जिल्हाधिकाऱ्याला माफी अर्ज देऊ. त्याची कॉपी मुख्यमंत्र्यांना पाठवू.'' मग म्हणाले, "समजा, लेव्ही माफ झाली नाही तर...''

आम्ही गप्प होतो. बाबांच्या चेहऱ्यावर काळजी, चिंता दिसत नव्हती. मग काही वेळानं ते म्हणाले, "येताना मी सोमनाथला जाऊन आलो. यंदा पाऊस कमी झाला. सोमनाथला यंदा फार तर हजार क्विंटल धान होईल असं शंकर म्हणत होता. पण मागील वर्षाचं सातशे क्विंटल धान आहे गोडाउनमध्ये. लेव्ही माफ झाली नाही तर आदिवासींची लेव्ही आपण भरू. आपण सारे कण्या खाऊ नाही तर एक वेळ उपास करू. काय, चालेल ना? आणखी एक गोष्ट, सध्या लेव्हीला कोर्टाचा स्टे मिळतो का ते पाहू. मी नागपूरला जाऊन वकिलांशी बोलतो.'' आम्ही फक्त ऐकत होतो.

'अन् सामान्य माणसांचा ताप नाहीसा करण्याचं व्रत
घेतलेले महापुरुष आपलं माणूसपण कायम राखतात माणुसकीसाठी?'
- करुणेचा कलाम 84

ज्या आदिवासींना दुष्काळ नसतानाही दोन वेळा पोटभर अन्न मिळत नाही, त्यांनी लेव्ही कशी द्यावी. त्यांच्यासाठी कण्या खाण्याची, एक वेळ उपाशी राहण्याची तयारी ही माणुसकी. माणुसकी म्हणजे काय ते समजलं.

एका महिन्यानंतर बातमी आली. शासनाने आदिवासी भागातील सक्तीची वसुली रद्द केली. गावोगावी बातमी गेली. आदिवासींना आनंद झाला. अनेकजण प्रकल्पांवर येऊन आभार मानून गेले. आम्ही आनंदात होतो. आठवडाभरानं बाबा आले. त्यांना आनंद झाला होता; पण ते कसल्या तरी विचारात होते. गप्पांमध्ये पावसाचा विषय काढला. यंदा ऑगस्टनंतर पाऊस पडला नव्हता. सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये एकदा जरी पाऊस पडला असता तरी ह्या आदिवासी भागात चांगलं धान पीक आलं असतं, हे आमच्याकडून काढून घेतलं. चांगलं आलेलं धानाचं पीक शेवटचा पाऊस नाही म्हणून करपून गेलं. नंतर बाबा म्हणाले, "कुणापुढं हात पसरणं अगर माफी मागणं हा नेहमी शेवटचा पर्याय ठेवावा. पाऊस नाही तर आदिवासींच्या शेतीला पाणी कसं देता येईल. मग माहिती गोळा करा, नदीकाठी, तलावाकाठी किती एकर शेती आहे.''

सहा उपकेंद्रांवर चौकशी सुरु झाली. रोज संध्याकाळी मोकळ्या वेळी हेच चालू असे. सहा उपकेंद्रं व प्रकल्प एकूण सात. डिझेल इंजिन, पाईप, डिझेलसाठी ड्रम अशी शिस्तबद्धपणे योजना आकारात येत होती. बाबा शक्यतो, सर्व आम्ही आखावं असं वागत होते. प्रत्येक जण काही तरी सुचवत होता. शेतावर पंप कोण नेणार? आदिवासींनी बैलबंडी घेऊन यावी. त्यासोबत आपला माणूस जाईल. डिझेल पंप दुरुस्ती कोण करणार? त्यासाठी नेहमी कोणते पार्ट लागतात ते आणणं. बाबा बारीकसारीक गोष्टींची आठवण करून देत होते. सर्व योजनेचा एकूण किती खर्च येईल ह्याचा अंदाज आला. बाबा, कुणी फंडींग एजन्सी ही मदत करेल का हे पाहातो म्हणाले. 'आपल्या शाळेतील मुलांना बरोबर ठेवा. त्यांना डिझेल पंप दुरुस्ती शिकवा,' हेही सांगितलं.

"समजा, कुणी फंडींग एजन्सी तयार झाली नाही तर?'' बाबांनी आम्हापुढे पेच टाकला. मग म्हणाले, "ठीक आहे. आपल्या सोमनाथ, आनंदवन, अशोकवन प्रकल्पावरील एक-एक पंप तरी आपण आणू. आणखी काही नादुरुस्त असले तर दुरुस्त करून आणू.'' लेव्ही माफ झाली म्हणून आम्ही आनंदात होतो; पण पुढचा विचार आम्हाला सुचत नव्हता. बाबा आपल्या अलंकारिक भाषेत म्हणाले,

"अशा प्रशिक्षित तुकड्यांची भूमीसेना
जेव्हा बाहेर पडेल तेव्हा खेड्याखेड्यातून नुसती
कमाईसाठी ती काम करणार नाही.
तण माजलेले समाजजीवनही ती नांगरेल
आणि धुपून चाललेल्या मनोभूमीला बंधारे घालील.''

ह्या अशा शिक्षणामुळे पुढे व आजही आदिवासींच्या वेगवेगळ्या अडचणींच्या वेळी लोक-बिरादरी कधी मागे राहिली नाही. आदिवासींनी आमची साथ सोडली नाही.

बाबांना अनेक जण गांधीयन समजतात, मानतात. भारत सरकारनं गांधीयन आचार-विचारासाठी असलेला सर्वोच्च सन्मान 'गांधी पीस ॲवार्ड' बाबांना देऊन सरकारनं बाबांवर गांधीयन असं शिक्कामोर्तब केलं आहे. बाबांच्या कवितेत गांधी विचार, गांधी स्तुती ठिकठिकाणी येते. बाबा शेवटपर्यंत खादी वापरत. मला बाबा कधी गांधीयन वाटले नाहीत. मी पाहिलेल्या अनेक गांधीयन लोकांत व बाबांमध्ये जमीन-अस्मानाचा फरक होता. कदाचित माझ्यावर असलेल्या डाव्या

विचारसरणीचा परिणाम असेल! बाबा कवितेत म्हणतात-

> ‘गांधी महात्मा सांगून गांधी सांगता येणार नाही
> आणि उद्याच्या पिढ्यांना त्यांची ओळख पटण्यासाठी
> क्वचित कॉम्प्युटर लागेल!
> पण काळाच्या भालावर उमटलेली
> ही तप्त युगमुद्रा
> कोणत्याही इतिहासाला पुसून काढता येणार नाही.’
> - ज्वाला आणि फुले 142

तरुण वयात बाबा गांधींसोबत राहिले होते असं म्हणतात. फार क्वचित बाबा याचा उल्लेख करत. आपण पाहातो, एखाद्या मोठ्या व्यक्तीच्या सहवासात काही तास घालवले तर त्या व्यक्तीबद्दल आपण किती बोलतो, किती जणांना सांगतो; पण बाबांनी माझ्या समोर फक्त दोनदाच, ते गांधी आश्रमात होते, असा उल्लेख केला होता.

नर्मदेकाठी कसरावद मुक्कामी बाबांची दिनचर्या फारशी बदललेली नव्हती. सकाळी 4.30 वाजता उठणं, तोंड धुणं, दाढी, अंघोळ व दूध पिणं ह्यात एक तास जात असे. मग मी बाबांसोबत फिरावयास बाहेर पडत होतो. रोज ठरावीक पायवाटेनं नर्मदेकाठी फिरावयास जात होतो. दीड कि.मी. वर कसरावद गावातून येणारा नाला नर्मदेला मिळत असे. तिथं त्या वेळी हमखास एक मोठी बगळ्याची (स्टॉर्क) जोडी येत असे. काही वेळा नेमका सूर्योदय होत असला तर बाबा समोर काठी टेकवून एकटक सूर्यबिंबाकडं पाहात राहात. तिथून परतताना आम्ही घरापाशी थांबत होतो. कुणी तरी काल उरलेली पोळी बाबांना देत असे. ती पोळी घेऊन आम्ही दुसऱ्या बाजूला देवळाकडे जात असू. वाटेत एक चिंचेचं झाड होतं. त्यावरच्या दोन-तीन देवखारी बाबांची वाट पाहात असत. बाबा दिसल्याबरोबर खारी न बिचकता बाबांच्या पायापाशी येत. बाबा त्यांना पोळीचे तुकडे खाण्यास देत. तिथून आम्ही नर्मदेच्या अगदी काठावर असलल्या शंकराच्या देवळात जात असू. ताईंचा नेम म्हणून मी पूजा करत असे. मी नमस्कार केला की बाबा बाहेर देवळातील घंटा वाजवत. बाबांना कर्मकांड पसंत नव्हतं; पण साधनाताईंसाठी बाबा नेमानं देवळात येत. साधनाताई नसतानाही. एक दिवस हे सर्व करून मी आणि बाबा परत घरापाशी आलो. अंगणातून पाण्याची नाली वाहत होती. नालीतून लालसर पाणी वाहत होतं. आज पालेभाजी असावी. पोटॅशच्या पाण्यानं पालेभाजी धुतली असावी. बाबा नालीपाशी उभे राहिले. हातातल्या काठीनं नालीतील पाण्यात वाहत चाललेली पालेभाजीची पानं दाखवत मला म्हणाले, “पहा ह्यांचं पालेभाजी धुणं. एका माणसाला पुरेल इतकी भाजी वाहून जातेय. मला एका पानासाठी बापूजींनी समज दिली होती. आश्रमात मी काही दिवस भोजनगृहात काम करत होतो. बापू फार काटकसरी होते. काही वाया गेलेलं त्यांना खपत नसे.’’

बाबांकडून पहिल्यांदा मी बापूजींचा ओझरता उल्लेख ऐकला. बाबांना गांधीयन म्हणावं की नाही हा वाद नाहीये. खादी वापरणं, सुरुवातीला आनंदवनमध्ये प्रार्थना होत असे, सूतकताई होत असे. माझ्यासमोर नाही, पण जुने लोक सांगतात. अंबर चरखे मी पाहिले आहेत आनंदवनात. आनंदवनात पूर्वी राहणी साधी होती. तिथं जातीपाती पाळल्या जात नाहीत. खरोखरचं आश्रमाचं वातावरण होतं, पण आनंदवनात आनंद होता. उत्साहाचं वातावरण असे. सण साजरे होत. आनंदवन गांधीयन आश्रम का वाटत नाही? बरेच दिवस हा प्रश्न मला सतावत होता. बाबांसोबत मी काही गांधीयन आश्रमांत गेलो होतो. आनंदवन उत्सवप्रिय आहे, असं काही दिवसांनी माझ्या लक्षात आलं. आनंदवनात उगीच गंभीर वातावरण, बोचरी शांतता नसते. हसणं, बोलणं, ओरडणं व चेष्टा करण्यावर कसलं बंधन नव्हतं. खेळीमेळीनं सर्व व्यवहार चालत. शिस्त होती. बाबांचा प्रभाव सर्वत्र जाणवे, पण भीती नसायची. प्रेम, आदर जास्त. गांधीजींनंतर इतर गांधीयन संस्था मोडकळीस आल्या. ह्या संस्था गांधीजींची स्मारकं झाल्या. त्याच वेळी आनंदवन वाहतं राहिलं. साहजिक गांधीयन म्हणून

लोक बाबांकडे-आनंदवनाकडे पाहात राहिले. बाबांनी कुष्ठरोग्यांबरोबर अंध, अपंग, मुके, बहिरे ह्यांच्यासाठी काम वाढवत नेलं. श्रम-संस्कार शिबिरं, लोक-बिरादरी प्रकल्पातून आदिवासींचं काम केलं. बाबा अनेकांना आपले वाटू लागले. पुढे दोन भारत जोडो यात्रांमुळं व पंजाबातील शांती मार्च, सर्वात शेवटी नर्मदा बचाओ संघर्षानं बाबांचं नाव जगभर झालं. बाबा शेवटपर्यंत साधे राहिले. त्यांना कुणीच परकं वाटलं नाही. ते सर्वांवर प्रेम करत. त्यांच्याबद्दल वाईट बोलणाऱ्या व वाईट लिहिणाऱ्यांबद्दलही कधी वाईट बोललेलं मी ऐकलं नाही. इतर काही गांधीयन मंडळींना बाबांबद्दल असूया वाटत असे. गांधीयन म्हणून बाबांना जी जागतिक मान्यता व प्रसिद्धी मिळाली, ती त्यांना खटकत असे. बाबा मला खरंच गांधीवादी वाटले का? तर खरंच नाही. फक्त जर पुढे डावे-उजवे गांधीवादी असा विचार पुढे आला तर बाबा पहिले डावे गांधीवादी होते. गांधींचा, गांधी विचारांचा तिरस्कार करणारा नक्षलवादी कवी चेराबंडा राजू म्हणतो,

> ‘हा देश पुन्हा बनवला जाऊ नये
> बिर्ला भवनात प्रार्थना करणारे
> ‘हे राम’ भिकारी पुन्हा जन्माला येऊ नये.’

जगाने, लोकांनी बाबांना गांधीवादी मानलं. त्याच वेळी ह्याच माओवाद्यांनी बाबांच्या मृत्यूनंतर जाहीरपणे शोक व्यक्त केला. बाबांच्या आदिवासी कामासाठी बाबांना मिळालेला हा मी पुरस्कार मानतो.

बाबांनी माझ्यासमोर बापूंचा स्पष्ट उल्लेख दुसऱ्यांदा केला तेव्हा आम्ही कसरावदला होतो. दोन्ही उल्लेख कसरावदला नर्मदेकाठी का केले असावेत? कसरावद इथं बाबा खरोखरी वानप्रस्थ आश्रमात असल्यासारखे होते. त्या वेळी गतजीवनाबद्दल विचार करण्याची वेळ झाली होती की काय? बाकी आयुष्यात त्यांना मागे वळून पाहण्यास वेळ कधी होता?

> ‘तुम्ही जगाकडे पाठ करा
> जग तुमच्या मागे येईल.’

असं ते म्हणत. नर्मदेकाठी बाबांना मी अनेक क्षणी फार विरक्त पाहिलं. अर्थात, निराश कधीच नाही. त्यांना खरी मानसिक विश्रांती त्या काळात मिळाली. त्यावेळी जर कुणी मदतनीस तिथं राहिला असता व बाबांचं विचार-मनन शब्दबद्ध करता, तर कलियुगातील वेद साकार झाला असता.

कसरावद गावी एक दिवस बाबांसोबत सकाळी फिरावयास जात असताना नेहमीप्रमाणे बाबा समोर चालत होते. आम्ही एका पाऊलवाटेवरून जात होतो. बाबा समोर थांबले. उजवीकडे पाहात त्यांनी काठीनं एका दिशेकडे दाखवलं, विचारलं,

“विलास, ते झाड कसलं आहे?’’

मार्च-एप्रिल महिना असावा. दूरवर एका ताडीच्या झाडाला मडकी लटकलेली होती. एक माणूस कौशल्यानं झाडावर चढत होता.

“बाबा, ते ताडाचं झाड आहे. हेमलकसाला जाताना ताडगाव आहे. तिथं खूप झाडं आहेत ताडाची.’’

खरं तर माझ्या आधी बाबा हेमलकसा इथं पोहोचले होते. भरपूर पायी हिंडले होते. उगाच ताडगाव, तिथली ताडाची झाडं वगैरे उल्लेख मला करण्याची तशी जरुरी नव्हती. पण बाबांनी विचारलं, ह्यामागं त्याचा उद्देश काय? मी झाड ओळखल्यावर, तू ताडी पिलीस का? असा प्रश्न आला तर... पण बाबांनी वेगळंच विचारलं,

“कधी ताडगूळ खाल्ला आहेस का?’’

“नाही बाबा, ऐकलं आहे, पण खाल्लेला नाही.’’

बाबा क्षणभर काही बोलले नाहीत. मग म्हणाले,

"अरे, फार गोड नसतो, पण मधुर असतो.''

बाबा तिथं उभे राहून त्या झाडाकडे पाहात राहिले. काही वेळानं म्हणाले,

"विलास, बापूंनी मला ताडगुळाचे काम करण्यास सांगितलं होतं.''

पुढे ते काही वेळ शांत राहिले. बाबांचा चेहरा शांत होता. कसल्या आठवणीत ते होते? त्यावेळी त्यांच्या मनात आश्रम, गांधीजी... ती वेळ आठवत असावी का? बाबांना ताडगुळाचे काम करायचे नव्हते का? त्यांनी गांधीजींना नकार कसा दिला असेल? आश्रम सोडून कृतीतून दिला होता का? तसंच असेल! बाबांनी नेहमीच कृतीतून आपलं म्हणणं मांडलं आहे. प्रकृतीमुळे शरीर साथ देत नसताना, भारत जोडो यात्रा, पंजाब शांती यात्रा, नंतर नर्मदा संघर्षात ते स्वतः हजर राहिले.

बाबा परत चालू लागले, त्यांच्यामागे मी विचारात चालू लागलो. पुढे नेहमीच्या जागी थांबेपर्यंत ते काहीच बोलले नाहीत. असं नेहमी होत नसे. न बोलता चालत राहणं त्यांच्या स्वभावात नव्हतं. ताडगुळाच्या आठवणीनं त्यांचा मूड ठीक नसावा. मला ताडगुळाची चव कडवट-मधुर असावी असं वाटू लागलं. जिथून परत फिरत असू, तिथं ते उगवत्या सूर्यबिंबाकडे पाहात उभे राहिले. त्यावेळी मी नेमका त्या उगवत्या सूर्याची कोवळी उन्हं बाबांच्या चेहऱ्यावरून प्रखर तेजानं परावर्तित होताना पाहात राहिलो. त्या कोवळ्या उन्हात बाबांचा चेहरा बदलत गेला. मघाची काहीशी खिन्न, दुःखद छटा नाहीशी झाली. नेहमीचे करारी योद्धा बाबा मला परत मिळाले. आता हळूहळू त्यांच्या चेहऱ्यावर मंद मिश्कील भाव आला. वळून माझ्याकडे पाहात ते म्हणाले,

"विलास, बापूजींनी सांगितलं म्हणून मी ताडगुळाचं काम केलं असतं तर आज तू ताडगूळ विकत बसला असतास.''

बाबा परतीच्या वाटेवर चालू लागले. मी तसाच उभा. बाबा चालत आहेत, मी काही न समजता, विचारता उभाच. काहीशा वेगानं मी बाबांना गाठलं. काय अचाट माणूस आहे हा! परत न बोलता आम्ही नेहमीप्रमाणे घरी परतलो. मी अंघोळीसाठी नर्मदेवर गेलो. मनात विचार आला, बाबा म्हणाले, ते जर ताडगुळाच्या कामात पडते तर मी आज ताडगूळ विकत बसलो असतो... म्हणजे बाबांना ऋणानुबंध, देवानं ठरवलेल्या गाठी हे मान्य आहे की काय? पण हे कसं शक्य आहे. समजा, बाबा ताडगुळाचं काम करत असते तर मी बाबांकडे कशाला आलो असतो? पण बाबा तर म्हणतात... बाबा चेष्टेनं म्हणाले असतील का? बाबा पण सामान्य माणसासारखा विचार करू शकतात तर! का मी कसा विचार करेन हे त्यांनी सुचवलं असेल? मी पटकन नर्मदेत डुबकी मारली. ताडगुळावरील माश्या अंगावरून उडाव्यात, तो गोडसर वास जावा, हाताची ताडगुळाची मधुर चव धुतली जावी म्हणून हात धुवून पाण्याबाहेर आलो. सरळ तडक जाऊन बाबांना विचारावं का? पण नाही जमलं. आता बाबा शरीरानं सोबत नसताना त्यांची कविता समोर आहे-

'प्रश्नांसोबत जगू नकोस
उत्तरं शोधत जगता आलं पाहिजे
माझे प्रश्न राहू दे असेच अनुत्तरित
माझी उत्तरं मीच शोधून काढीन
तू असाच चालत रहा तुझ्या विवेकाच्या अगम्य वाटेवरून
त्याच प्रवासानं कदाचित रुंदावतील
माझ्या समजुतीच्या कक्षा, शंकांचे निवळतील ढग
अन् हवा तो तेजाळ सूर्य
दिपवून टाकेल माझेच निःशंक मन'
- करुणेचा कलाम

का नाही विचारलं मी बाबांना? 'तेजाळ सूर्या'च्या जवळपास वावरत होतो म्हणून? बाबा कुष्ठरोग्यांच्या कामात पडले ते त्यांनी स्वतः ठरवलं म्हणून. गांधीजींचा एक

कुष्ठरोग्याबरोबरचा फोटो आपण नेहमी पाहातो. कुष्ठरोग्यांची सेवा कुणी तरी करावी असं गांधीजींना वाटत असावं. त्यातून पुढे सेवाग्राम मेडिकल कॉलेज उभं राहिलं असावं. मदर टेरेसांनी कुष्ठरोग्यांची सेवा केली ती ईश्वराची लेकरं म्हणून, पण धर्म प्रसारासाठी. पण बाबांनी सेवेबाबत कुष्ठरोग्याला माणुसकी शिकवून, स्वत:च्या पायांवर उभं करून नवनिर्मितीचा वसा दिला. तरी त्या दोघांपेक्षा महत्त्व कमी मिळालं. अर्थात, बाबा नावासाठी, प्रसिद्धीसाठी कधी काम करत नव्हतेच.

बाबांनी ताडगुळाचं काम बापूजींची आज्ञा म्हणून स्वीकारलं असतं तर? बाबांचं कर्तृत्व व कामाचा झपाटा, जिद्द पाहिली तर असं वाटतं, की आजचा साखरेचा प्रश्नच निर्माण झाला नसता. भारताने जगाला ताडगुळाच्या प्रेमात पाडून ताडगुळावर परकीय चलन मिळवलं असतं. असो. पण मग मी बाबांकडे आलो असतो का? मला अनेक जण विचारतात, तू बाबांकडे कसा आलास? खरं कारण मलाही सांगता येत नाही. पण प्रथम आलो त्याला महारोगाची भीती कारणीभूत होती. 1973-74 साली पुण्यात मी आणि माझे सहकारी नेमानं दर एकादशीला पायी आळंदीला विठ्ठल दर्शनासाठी जात होतो. पहाटे उठून, अंघोळ करून पायी 13-14 कि.मी. दर्शन झाल्यावर हॉटेलात मिसळ-पाव खाऊन परतताना बसनं येत होतो. सामान्य, मध्यमवर्गीय धार्मिक कुटुंबातील स्वत:च्या व्यवसायात व्यवस्थित जम बसलेला मी, मनापासून आळंदीला जात होतो. देवसमोर फुलं, हार वाहत होतो व प्रसाद घेऊन घरी येत होतो. त्या दिवशी माझा सहकारी मला म्हणाला, “विलास, आठ आण्याचे साखरफुटाणे घेऊ नकोस. एक रुपया दे व एक रुपयाचे साखरफुटाणे घे.’’

“का रे?’’

“घे, मग सांगतो. दुकानदाराकडील चिल्लर घेऊ नकोस.’’ तो काहीसा मोठ्यानं म्हणाला.

प्रसाद घेतल्यावर आम्ही मंदिराकडे जाऊ लागल्यावर दोन्ही बाजूला महारोगी भिकारी हात पसरून भीक मागत होते. माझा सहकारी त्यांच्याकडे बोट करून म्हणाला,

“आपण ह्यांना भीक म्हणून चार आणे, आठ आणे देतो. ते भिकारी ती चिल्लर दुकानदारांना देतात. म्हणून आपण ती नाणी घेऊ नयेत.’’

आम्ही परत आलो. नंतरही जात होतो आळंदीला. पण मी विचार करत होतो, खरंच, नाणी घेतल्यानं महारोग होईल का? इतर ठिकाणची नाणी महारोग्यांनी हाताळलेली नसतील कशावरून? महारोगी नाणी देऊन नोटा घेत असतील तर त्या नोटा परत कधी तरी आपल्याकडे येऊ शकतात. काही उत्तर सापडत नव्हतं. माझा धाकटा भाऊ कॉ. अशोक मनोहर त्या वेळी शहादा चळवळीत होता. तो एकदा तुरुंगातून सुटल्यावर घरी आई-वडिलांना भेटण्यासाठी आला होता. त्याच्याशी बोललो. चळवळीमध्ये असताना बाबा आमटे ह्यांच्याशी संबंध आला होता. त्याने सांगितलं, ह्या बाबतीत बाबा आमटे तुला उत्तर देऊ शकतील. त्यांना जाऊन भेट. म्हणून प्रथम मार्च 1975 साली बाबांकडे आलो. बाबा हेमलकसा इथं निघाले होते म्हणून हेमलकसा इथं गेलो. पण पुढे बाबांना विचारायचं विसरलो, की हा प्रश्नच नाही असं वाटलं म्हणून विचारलं नाही? जाऊ दे.

अनेक न पटणाऱ्या गोष्टी मी बाबांसोबत असताना घडत. पण ‘का?’ म्हणून मी तिथंच स्पष्टीकरण मागत नसे. पुढे काही दिवसांनी मला त्याचं मनाला पटेल असं उत्तर मिळत असे. मला बाबांची भीती वाटत होती का? होय, की नाही? मला बाबांबद्दल आदर होता, की नाही? हे मला पडलेले प्रश्न नाहीत, तर आमच्या आजूबाजूला वावरणाऱ्यांना पडले असावेत. अनेक जण बाबांच्या जवळपास असताना मोकळे वावरताना दिसत नसत. काही तरी भारावलेले, घाबरलेले, बिचकलेले किंवा आपल्या हातून काही तरी चूक होईल असे धास्तावलेले असत. मी मोकळेपणी राहात असे. काहींच्या मते मी अडाणी, निर्लज्जही असेन. साहजिक आहे. माझ्यापाशी ना शिक्षण होतं ना कोणत्या गोष्टीचं कर्तृत्व. बाबांना कधी कधी विचारू नये असा प्रश्नही करत होतो.

कसरावदला त्या वेळी पावसाळा संपून दोन-तीन महिने झाले होते. साधनाताई दिवाळीसाठी आनंदवन इथं गेल्या होत्या. एका दुपारी काही पाहुणे बाबांना भेटण्यास आले होते. नेहमीप्रमाणे नर्मदा धरणाबद्दल बोलणं झालं. एकानं विचारलं, ‘बाबा, तुम्ही परत आनंदवनला कधी जाणार?’

बाबा काही क्षण शांत राहिले. तो प्रश्न त्यांना आवडला नाही हे त्यांच्या चेहऱ्यावरुन मला समजत होतं. त्यांनी डावा हात केसांतून फिरवला. हात फिरवताना डोक्यावरील एखादं बटन त्यांनी दाबून काही तरी चालू करावं तशी त्यांच्या चेहऱ्यावरील रेष न् रेष बदलली. ते गंभीर झाले व म्हणाले, 'आता परत कुठे जाणार? ह्या नर्मदामातेत हा देह शांत होईल.' कसरावदला, आजूबाजूच्या नेमाड प्रांतात मृत्यूनंतर शव नर्मदेत सोडून देण्याची प्रथा आहे. बाबांनी नंतर त्यांची आवडती कविताही त्यांना ऐकवली-

'पशू, पंछी भोजन करे, तन भंडारा होई ।'

पाहुणे निघून गेले. संध्याकाळी रोजच्यासारखे आम्ही फिरावयास बाहेर पडलो. गावातील दोन कार्यकर्ते रस्त्यात भेटले. नर्मदा बचाव संघर्षाबद्दल बोलणं झालं. अशा वेळी मी फक्त ऐकत राही, ऐकत नाही असं दाखवत असे, कारण नर्मदा बचाव संघर्षातील सर्वच, आम्हा इतरांना टाळून त्या संबंधात बाबांशी बोलत. एक प्रकारची गुप्तता पाळली जात होती. त्याला कारणही होतं. पोलीस सतत माहिती काढण्यासाठी आजूबाजूला असत. नाही तरी मी इथं बाबांचा वैयक्तिक सेवक म्हणून होतो. कधी कधी बाबांजवळ त्यातील नेत्यांची बंद खोलीत मीटिंगही होत असे. त्यावेळी आम्ही नंतरच्या त्यांच्या जेवणाच्या तयारीत राहात असू. ते कार्यकर्ते गेले. आम्ही नदीकाठी पोहोचलो. बाबा उभे राहिले. मी त्यांच्या शेजारी उभा होतो. बाबांनी काठीने समोरच्या तीराकडे माझी नजर खेचली गेली. समोर एक प्रेत वाहत आलं होतं. काही कुत्री ते पाण्यातून ओढून किनाऱ्याकडे नेण्यासाठी धडपडत होती. थोड्या दूरवर झाडावर कावळे टपलेले होते. बाबा काही बोलले नाहीत, पण एकटक त्यांच्याकडे पाहात होते.

'पशू पंछी भोजन करे, तन भंडारा होये ।' असं तर म्हणत नसतील ना? मी पटकन दुसरीकडे पाहू लागलो. अगदी तरुणपणापर्यंत रोज 'मनाचे श्लोक' म्हणणारा मी, कधी मरणाला रडलो नव्हतो, कारण-

'मरे एक त्याचा दुजा शोक वाहे
अकस्मात तोही पुढे जात आहे...

हे मनावर बिंबलं होतं. पण 'तन भंडारा' अशा प्रकारे... खरं तर मृत शरीराचा उपयोग तो काय! कुणाची भूक भागत असेल तर काय हरकत आहे! असा विचार खरोखर उदात्त आहे. पण बाबांनी... छे! मनात काही विचित्र वाटत होतं. त्याच वेळी डोक्यावरुन बगळ्यांची माळ उडत जात होती, त्याकडे पाहात आम्ही परतलो. रात्रीची जेवणं झाली. मी मनातून अस्वस्थ होतो. रोजच्याप्रमाणे बाबा नर्मदाकाठावर अंगणात पलंगावर आडवे झाले. नऊ वाजेपर्यंत ते बाहेर पडत. नऊ वाजता बातम्या बघण्यास खोलीत जात. मग औषध घेऊन झोपत असत. बाहेर पडल्यावर नेहमी गप्पा होत. जुन्या आठवणी सांगत. काही वेळ पंडित पाय चेपत राही. मीही कधी कधी डोकं दाबत गप्पा ऐकत असे. काही वेळानं सर्व निघून जात. मी आणि बाबा राहात असू. सगळे निघून गेले. मी अंगणात शतपावली करत होतो. कृष्ण पक्ष असावा. आकाशात चंद्र नव्हता. ढग नसल्यानं छान चांदणं होतं. वाहत्या नर्मदेचा नाजूक आवाज येत होता. बाबा आकाशाकडे एकटक पाहात होते. नेमका बाबांच्या पायाकडून वर सप्तर्षी दिसत होता. बाबांनी मला जवळ बोलावलं. तिकडं बोट करुन म्हणाले,

"अरे, व्याध बघ किती मोठा दिसत आहे.''

मी पाहात राहिलो. मला नक्की काय झालं होतं माहीत नाही. संध्याकाळचा परिणाम असावा. मी बाबांना विचारलं,

"बाबा, सप्तर्षीच्या शेपटातील दुसऱ्या ताऱ्याशेजारी बारीक चांदणी दिसते का? ती अरुंधती त्या ऋषीची पत्नी...''

बाबा नीट पाहात होते. त्यांनी विचारलं,

"अरे, म्हणजे चार ताऱ्यांचा चौकोन आहे त्यावर वर शेपूट आहे त्यातल्या दुसऱ्या ताऱ्याजवळ ना?''

"हो बाबा. पाहा, अगदी बारीक आहे...''

बाबा आता एकटक पाहात होते. नंतर हाताच्या मुठी डोळ्यांसमोर धरुन त्यातून बाबा पाहात राहिले.

"अरे, चष्मा नाही ना...!''

मी पळत आत गेलो आणि चष्मा घेऊन आलो. त्यांचा रुमाल घेऊन काच साफ करुन मी चष्मा त्यांच्या डोळ्यांना लावला. बाबा एकटक पाहात होते. काही वेळानं मान वळवून मला म्हणाले,

"नाही रे, नाही दिसत मला.''

मी त्यांच्याकडे न पाहाता म्हणालो,

"अरेरे!''

बाबांनी एकटक माझ्याकडे पाहात विचारलं,

"का रे! काय झालं?''

मी नजर वळवून आकाशाकडे पाहात म्हणालो,

"नाही, असं म्हणतात, अरुंधती दिसत नाहीशी झाली कीं तो माणूस वर्षभरात जातो. म्हणजे भाकडकथा! त्यावर कोण विश्वास ठेवतो म्हणा!''

मी तिथंच चालत राहिलो. अंगणाच्या टोकापर्यंत जात होतो, परतत होतो. बाबांना असं म्हणणं... बरं, दुसरं कुणी नव्हतं. मी फक्त मार खाल्ला असता, कीं मला नर्मदेत शांत केलं असतं. चौथ्या फेरीत मी त्यांच्या जवळ आलो असेन. त्याच वेळी त्यांनी हात वर करुन मला थांबवलं. ते एकटक दुसऱ्या ताऱ्याकडे पाहात होते.

"विलास, मला अरुंधती दिसते आहे. हे बघ, ताऱ्याच्या वर दहा वाजण्याच्या आकारात बरोबर...''

"हो बाबा, बरोबर. टेन ओ क्लॉक पोझिशनची...''

बाबा एकदम कॉटवरुन उठले. मी गडबडीनं सामोरा झालो. अर्जुनाला फक्त माश्याचा डोळाच दिसला होता नाही. बाबांना जगण्याची इच्छा आहे तर! मग हे 'तन भंडारा' काय आहे? तुम्ही आनंदवनला कधी जाणार, ह्या प्रश्नाचा राग तर नसावा ना? बाबांचं काम कधी संपणारं नव्हतं. प्रचंड थकलेल्या शरीरातही एखादी गोष्ट मला कशी दिसत नाही. हा ध्यास, ही जिद्द.

बाबा मरणास कधीच भीत नव्हते. तरुणपणात त्यांनी अचाट साहसे केलेली मी ऐकलं होतं. कमावलेलं शरीर होतं.

मृत्यूबाबत, मरण्यासंबंधी आणखी आठवण आहे. पहिल्या भारत जोडो यात्रेत आम्ही कन्याकुमारी ते जम्मू असा प्रवास केला होता. आम्ही यात्रा संपवत आणली असताना जम्मूच्या आधी हिरापूरला आमचा शेवटचा मुक्काम होता. साडेपाच महिन्यांच्या यात्रेने, जिथं सायकलवरील तरुण थकले होते, तिथं पंच्याहत्तरीच्या बाबांचे काय झालं असेल ह्याची कल्पना करवत नव्हती. मीही थकलो होतो. बस्स. आता फक्त दोन-चार दिवसांनी घरी परतणार होतो. हिरापूरला नेहमीप्रमाणे सभा, जेवण, गाठीभेटी होईपर्यंत 10 वाजून गेले होते. बस्स. आता उद्या जम्मूला पोहाचणं. तिथं दोन दिवसांचा मुक्काम होता. सोडलेला संकल्प पूर्ण केल्याचं समाधान होतं. बाबांना रात्रीच्या औषधाच्या गोळ्या देऊन मी मोठा लाईट बंद केला. आमचा मुक्काम एका शाळेत होता. मुख्याध्यापकाच्या ऑफिसचं सामान एका कोपऱ्यात सरकवून बाबांची कॉट टाकली होती. बाजूला जमिनीवर मी माझी पथारी टाकली होती. थोड्या वेळात बाबांचा श्वास मंद झाला. बाबा बहुतेक झोपले असावेत. मघाशी चेहऱ्यावर वेदना दिसत होत्या. खोलीला एक लाकडी साधा दरवाजा होता. समोर भिंतीवर दोन खिडक्या होत्या. पंधरा-वीस मिनिटांनी दाराबाहेर आवाज येऊ लागले. कुणी तरी पाच-सहा जण बोलत असावेत. बाबांची झोप फार सावध होती. बारीकसा आवाज झाला

तरी बाबांना जाग येत असे. बाबा सकाळी चार वाजता उठत, त्यामुळे सुरुवातीला मिळेल तीच झोप, म्हणून मी पाय न वाजवता उठलो. कोण गडबड करत आहे त्यांना सांगावं म्हणून सावकाश दारातून बाहेर आलो. पाहातो तर सुटाबुटातील आठ-दहा जण बाहेर उभे होते. त्यातल्या चार-पाच जणांना मी ओळखलं. दिवसभर खपून यात्रींच्या जेवणाची, राहाण्याची व सभेची व्यवस्था करणारी स्थानिक व्यवस्थापक मंडळी होती. सोबत एक फोटोग्राफर दिसत होता. सगळ्या व्यवस्थेतून ते आता मोकळे झाले होते. त्यांना बाबांचा निरोप घ्यायचा होता व बाबांबरोबर फोटोही काढायचा होता. मी विचारात पडलो. प्रत्येक ठिकाणी नवीन व्यवस्थापक असत. पण आपली व्यवस्था करतात हे आपल्यावर मोठे उपकार आहेत, ते 'अतिथी देवो भवो' म्हणून आपली एक प्रकारे सेवा करतात, तर आपण उत्तम अतिथी म्हणून त्यांना कधी दुखावू नये असं बाबांचे ठाम मत होतं. त्याबद्दल ते ठाम असत. पण आज बाबा जास्त थकले आहेत व झोपलेही आहेत. काय करावं? मी समजावू लागलो, उद्या जम्मूकडे जाण्याआधी आपण बाबांना भेटाल तर बरं होईल. पण त्यातील काही मागील दोन मुक्कामापासून सोबत होते. त्यांना आपापल्या गावी परतायचं होतं. नेमका त्याच वेळी आतून बाबांचा आवाज आला,

"विलास, काय आहे? कोण आलंय? येऊ देत...''

मी खोलीत जाऊन दिवा लावला. ते सर्व आत आले. बाबांच्या चेहऱ्यावर हास्य होतं. नंतर फोटोसाठी बाबा उभेही राहिले. सर्वांशी एक-दोन वाक्यंही बोलले. व्यवस्थेबद्दल बाबांनी त्यांचे आभार मानले. एवढंच नाही, तर आठवणीनं, "इतर सर्व व्यवस्थेतील कर्मचाऱ्यांना माझा नमस्कार सांगा. 'खाने में दही-रायता बढीया था.'' असं म्हणून त्यांना निरोप दिला. ते गेले. मी दरवाजा बंद केला. अकरा वाजत होते. बाबांच्या चेहऱ्याकडे बघण्याचं धाडस मी करु शकलो नाही. पाठीत व कमरेत होणाऱ्या असह्य वेदनांची झाक डोळ्यांच्या कोपऱ्यातूनच टिपली. मोठा दिवा बंद केला. गादीवरील हाताची बोटं फक्त वर करून त्यांनी मला 'झोप' अशी खूण केली. तोंडानं बोलले नाहीत. मी पथारीवर आडवा झालो. बाबा बारीक आवाजात कण्हत होते. मग ते म्हणाले, "आई, मरतो गं!''

मी दचकलो. पथारीवर उठून बसलो. थोड्या वेळानं ते परत पुटपुटले,

"आई, मरतो गं!''

कुशीवर वळताना असह्य वेदना होत होत्या. मी उठलो. जवळ गेलो. त्यांचे डोळे उघडे होते. मी विचारलं,

"बाबा, काय होतंय? पाणी देऊ का?''

"काही नाही, झोप तू...''

मी परत पथारीवर पडलो. नंतर तीन-चार वेळा बाबा परत तो जप केल्यासारखे करु लागल्यावर मी उठलो. दाराकडे जाऊन मी दाराची कडी काढली. बाबा एकदम खणखणीत आवाजात बोलले,

"कुठे चाललास? डॉक्टरला उठवू नकोस. थकून झोपले असतील...''

यात्रेत एक वयस्कर डॉक्टर होते.

"नाही बाबा, मी...मी...''

"बंद कर दार आणि झोप....''

मी चूपचाप परतू लागलो. बाबा म्हणाले,

"झोप. मी काही मरत नाही. जम्मूला पोहोचायचं आहे. चल झोप.''

नंतर पुन्हा बाबांनी मरण्याची भाषा केली नाही. सकाळी चार वाजता बाबा उठले. अंघोळ झाली. दूध घेताना बाबा माझ्याकडे हसून पाहात म्हणाले,

"रात्री घाबरला हेतास रे! कुठे चालला होतास?''

कमाल आहे बाबांची! परत मलाच विचारतायत आणि तेही हसत. काय, तर घाबरलास का? जवळपास कुणी नव्हतं. बाबा आनंदी मूडमध्ये होते. आज यात्रा पूर्ण होणार होती. "ठीक आहे.'' मी मुद्दाम म्हटलं, "बाबा, मी गाडीतून तुमची काळी बॅग आणत होतो.''

बाबा माझ्याकडे डोळे मोठे करून बघत म्हणाले,

"रात्री कशाला हवी होती काळी बॅग तुला?''

मी दुसरीकडे पाहात म्हणालो,

"तुम्ही सारखा मरणाचा जप करत होता. आता तुमच्या घरचं तर कुणी इथं नाही. काळ्या बॅगेत तुमचं मृत्युपत्र आहे असं तुम्ही मागे म्हणाला होता. म्हटलं, वाचून ठेवावं. डोळे कुणाला, किडनी कुणाला, देह कुणाला...''

बाबांना दूध पिता पिता ठसकाच लागणार होता. पण ते तरी कमी का?

"हो का! अरे, नंतर तू काय घोरत होतास! अरे, घोरतानाही 'भारत जोडो', 'भारत जोडो' असाच आवाज येत होता.''

आम्ही दोघंही हसत असताना यात्रेतील तरुण वह्या घेऊन खोलीच्या दारात थबकून आमच्याकडे पाहात होते.

मी विचार करत होतो, रात्रीच्या त्या वेदनेतून बाबा सकाळी परत नेहमीसारखे कसे? आता कवितेत समोर आहे -

'वेदना जाणवली नाही
तीच साधना झाली होती
श्रमाने कधी शिणलो नाही
तोच श्रीराम झाला होता.'
- करुणेचा कलाम 86

मृत्यूबद्दल बाबांनी बरंच चिंतन केलेलं असावं. वाचन तर जबरदस्त होतं. आयुष्यात अनेकांचे मृत्यू पाहिले होते. एका कवितेत स्वत:लाच प्रश्न करतात

मग मृत्यू नावाची बाब तरी कशी असेल?

साने गुरुजींनी आत्महत्या केली हे त्यांना कधी सहन झालं नव्हतं. साने गुरुजी त्यांना पूजनीय होते. तरी कवितेत ते म्हणतात,

करुणा होती, कणव होती, प्रेषितांची प्रज्ञा होती
मग का झालास पराभूत प्रेषित?
एकाकी होतास, मनस्वी होतास
अनासक्तही होतास
मग जीवनाच्या अनासक्तीत का धरलीस
मृत्यूची आसक्ती?
- करुणेचा कलाम 32

बाबांनी मरणाची वाट पाहिली का? शेवटच्या कर्करोगात मृत्युशय्येवर असताना कधी कधी तसं वाटलं, पण फार प्रकर्षानं नाही. बाबांचे खूप सहकारी होते. सोमनाथ प्रकल्पाच्या वाटचालीत ज्याचा महत्त्वाचा वाटा होता ते शंकरदादा जुमडे ह्याच्या मृत्यूनंतर सर्वांनाच वाईट वाटलं. बाबांना महत्त्वाचा सहकारी गमावल्यामुळे दु:ख झालं. त्यावेळी ते म्हणाले,

"विलास, अरे, रांगेत मी पुढे होतो. हा बारीकसा शंकर कुठून चटकन पुढे गेला की!''

शंकरदादा बुटके व चणीनं बारीक होते. बाबांपेक्षा वयानं लहान होते. बाबा असं बोलले ह्यात गंमत नक्कीच नव्हती. शंकरदादा गेल्याचं दु:ख ते बोलून दाखवू शकत नव्हते. त्यावेळी आपला साथीदार गेल्याचं त्यांना टोचत होतं हे नक्की.

बाबांना मृत्यूचं भय वाटत नव्हतं. कधी कधी त्यांच्यासोबत असताना मी घाबरलेला असे, पण बाबांच्या चेहऱ्यावर भीतीची पुसटशी रेषाही मला कधी बघावयास मिळाली नाही. दोन्ही 'भारत

जोडो' यात्रांमध्ये बाबांना अनेक कट्टरवादी भेटले. खलिस्तान, बोडो, नागा, मिझोराम फ्रंटचे नेते बाबांना भेटले. पहिल्या भारत जोडो यात्रेच्या वेळी पंजाब तर पेटलेला होता. सुवर्ण मंदिरावरील कारवाई, इंदिरा गांधींची हत्या, हत्येनंतर दिल्लीमध्ये झालेली दंगल, ह्यावेळी परिस्थिती स्फोटक होती. भारत जोडो यात्रा पंजाबात प्रवेश करण्यापूर्वी बाबांनी सोबतच्या सर्व लोकांना पूर्ण कल्पना दिली होती - 'ज्यांना जायचे असेल त्यांनी परत जा. इथून पुढं काळ व मार्ग, दोन्ही कठीण आहे.' पंजाबमध्ये चार मुक्कामांच्या ठिकाणी संचारबंदी होती. कित्येक ठिकाणी यात्रा पोहोचण्याच्या आधी गोळीबार झालेला असे. काही ठिकाणी स्मशानशांतता असे. अर्थात, सर्व ठिकाणी मोठ्या संख्येनं शीख बांधव बाबांच्या स्वागतासाठी असत. काही ज्येष्ठ शीख बोलत, 'मराठा नामदेव'नंतर हा दुसरा संत पंजाबमध्ये आला आहे. सर्वसाधारण शीख बाबांना संत मानतात. कन्याकुमारीला भारत जोडो यात्रा सुरु झाल्यापासून ठिकठिकाणच्या गुरुद्वारांमधून बाबांचं, यात्रेचं स्वागत होतच होतं. मध्य प्रदेशात इंदूरनंतर तर आम्ही प्रत्येक गुरुद्वारात जात होतो. प्रत्येक ठिकाणी तलवार देऊन बाबांचा सत्कार होत होता. पण आता पंजाबात गोळीनं तर सत्कार होणार नाही ना, असं वातावरण होतं.

पंजाबमध्ये जाण्याआधी दिल्लीत असताना बाबा अनेक शीख वस्त्यांतून हिंडले होते. दंगलीत त्यांच्यावर झालेले अत्याचार स्वत: पाहिले. अनेक शीख नेते व धर्मगुरुंबरोबर त्यांनी चर्चा केली होती. महत्त्वाचं म्हणजे, त्या वेळचे तरुण पंतप्रधान राजीव गांधींशी बाबांनी त्यांच्या घरी भेट घेतली होती. बाबा, साधनाताई, खासदार साठे व मी एवढेच जण त्यावेळी तिथं होतो. बाबांची बस बाहेरच उभी करावी लागली होती. आत बरंच चालत आम्ही एका छोट्या हॉलमध्ये गेलो. हॉल वातानुकूलित होता. मोठं टेबल होतं. चारी बाजूंनी खुर्च्या होत्या. आम्ही हॉलमध्ये आल्याबरोबर काही सेकंदात राजीवजी दुसऱ्या दारातून आत आले. बाबांना खुर्चीवर बसता येत नव्हतं. बाबा उभेच होते. राजीवजी बाबांना बसा म्हणत ते स्वत: बसले. पण बाबांना बसताच येत नाही म्हटल्यावर ते पटकन उभे राहिले. पुढे शेवटपर्यंत ते उभेच होते. बाबांच्या प्रकृतीबद्दल राजीवजींनी चौकशी केली. बाबांनी, इंदिराजी आनंदवनमध्ये येऊन गेल्या याची आठवण सांगून त्यांच्या मृत्यूबद्दल दु:ख व्यक्त केलं. राजीवजींनी, "भारत जोडो यात्रा कशी चालली आहे, काही अडचण तर नाही ना?'' असं विचारलं. "पंजाबमध्ये जात आहात. मी संरक्षणाची काही व्यवस्था करु का?'' असंही राजीवजींनी विचारलं. मी बाबांच्या डाव्या बाजूला उभा होतो. बाबांनी डाव्या हातानं टेबलाची कड घट्ट पकडली. मी सावध झालो. बाबा एकदम म्हणाले, "राजीवजी, संरक्षण हवं होतं दिल्लीतल्या गरीब सामान्य शीख बांधवांना. मला खेद वाटतो तो, आपण त्यांना आपल्याच लोकांपासून संरक्षण देऊ शकला नाहीत. आपण मला काय संरक्षण देणार. नको मला संरक्षण. आज दिल्लीत हजारो शीख कुटुंबं रस्त्यावर आली आहेत, त्यांच्यासाठी काय करता? शे-दीडशे विधवा आहेत, त्यांच्यासाठी काय करता? नाही तर एवढी यात्रा संपू दे, मी त्यांना आनंदवनला घेऊन जातो. शे-दोनशे आनंदवनला कठीण नाही. काही तरी तातडीनं झालं पाहिजे. तुमच्या-सारख्या तरुण पंतप्रधानाकडून माझी हीच अपेक्षा आहे.'' बाबांनी एकदम निरोपाचा नमस्कार केला.

राजीवजी काहीच बोलत नव्हते. पण चटकन पुढे येऊन त्यांनी बाबांची बस अगदी हॉलपर्यंत घेऊन येण्यास सांगितलं. स्वत: गार्डना बाजूला करत ते बाबांबरोबर बसमध्ये आले. बाबा कॉटवर पडल्यावर भक्तिभावानं नमस्कार करून खाली उतरले. अर्थात, दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रात राजीवजी-बाबांच्या भेटीबद्दल छापून आलं. पंतप्रधानांकडे शीख बांधवांची काळजी वाहणारा एक जण तरी आहे हा दिलासा शिखांच्या मनात आम्ही पंजाबमध्ये जाण्याआधी झाला. बाबांची गणना संतांमध्ये होऊ लागली.

बाबांची निरीक्षणशक्ती जबरदस्त होती. अत्यंत गंभीर प्रसंगातही ती कार्यरत असे, याचं उदाहरण ह्या भेटीत मला अनुभवाला आलं. पंतप्रधानांच्या घरापासून मुक्कामाच्या जागी येईपर्यंत इतर बोलणं झालं. आल्यावरही यात्रेतील मान्यवरां-बरोबरच्या भेटीसंबंधी बोलणं चाललं होतं. नंतर

पत्रकारांशी बोलणं झालं. शेवटी रात्री झोपण्याच्या वेळी मी औषधाच्या गोळ्या दिल्यावर बाबा माझ्याकडे पाहात म्हणाले,

"विलास, मी राजीवशी बोलत असताना..."

मी मधेच म्हणालो,

"राजीवजींना झापत असताना..."

पटकन माझ्या हातावर चापट मारुन हसत ते म्हणाले,

"तू पाहिलंस का, तिथंपण एक माशी उडत होती. दोनदा राजीवजीने हाताने हाकलली..."

"हो, आणि टेबलावर बसल्यावर टेबलाखालून मख्खीमार काढून पटकन मारलीसुद्धा."

बाबांनी माझ्या निरीक्षणाला दाद देत म्हटलं,

"अरे, तुझंही लक्ष होतं तर! कसं वेगळंच मख्खीमार होतं. आपल्या मख्खीमारचे दांडेच तुटतात नेहमी. तसं मख्खीमार पाहा कुठं मिळतं..."

"बाबा, ते इटालीयन असेल." मी म्हणालो.

बाबा मनापासून हसले. हसत म्हणाले,

"असेलही, पण बघ कुठे मिळतं का. लक्ष ठेव."

पंजाबमध्ये यात्रा पुढे निघाली. आता बहुतेक ठिकाणी यात्रेचा मुक्काम गुरुद्वारात किंवा जवळच असे. सकाळ-संध्याकाळचं जेवणही गुरुद्वाराच्या लंगरमध्ये होत असे. बहुतेक लंगरमध्ये वाढपी शीख खांद्याला रायफल लटकवून वाढत असत. गुरुदासपूरमध्ये बाबा नाश्ता घेत होते. मी बाजूला उभा होतो. बाबांसाठी टेबल मांडलं होतं. इतर भारतीय पद्धतीनं खाली चटईवर बसून नाश्ता करत होते. बाबांसाठी खास गुरुद्वार प्रमुख जथ्थेदार मानसिंग समोर उभा होता. एक तरुण पराठा वाढण्यास आला. त्याच्या खांद्याला एके-47 लटकत होती. बाबा जथ्थेदारला म्हणाले,

"आपण अन्नदानाचं इतकं मोठं पवित्र काम करत आहात, त्यात ही शस्त्रं कशासाठी?"

जथ्थेदाराचा चेहरा मख्ख होता. त्याने हातानं टेबलाखाली दाखवत म्हटलं,

"बाबासाहेब, जरा खाली पहा. अजून रक्त सुकलंसुद्धा नाही. काल रात्री आमचे दोन बंदे मेले. आपण आज आलात. साफसफाईला वेळ मिळाला नाही, माफ करना..."

तो पुढे बोलू शकला नाही. टेबलाखाली व तिथून पुढे रक्ताचा ओघळ सुकत आला होता...

काही असलं तरी अशा काळात शिखांनी बाबांची बडदास्त ठेवली. बाबांनी संरक्षण नाकारलं होतं, तरी पंजाब पोलीस यात्रेत सोबत राहात होते. फक्त बाबांसोबत ते सुवर्ण मंदिरात आले नाहीत.

आम्ही अमृतसरमध्ये पोहोचलो. आता पंजाबमधील स्वागताला आम्ही सरावलेले होतो. तिथं हिंदूंचं म्हणणं होतं, बाबांनी दुर्गीयान मंदिरात राहावं, कारण सुवर्ण मंदिर शीख अतिरेक्यांच्या ताब्यात आहे. शिखांचा आग्रह होता, बाबा संत आहेत, त्यांनी सुवर्ण मंदिरात राहावं. त्यांच्या जिवाची काळजी घेण्यास आम्ही समर्थ आहोत. अमृतसरमध्ये आमचा दोन दिवस मुक्काम होता. बाबांनी दोघांना एक-एक दिवस देण्याचं ठरवलं. आम्ही सकाळी 10 वाजता सुवर्ण मंदिरात पोहोचलो. बाबांनी आणि मी डोक्याला काळा रुमाल बांधला होता. आता त्याची सवय झाली होती. दारात मंदिराच्या पुजाऱ्यानं बाबांचं स्वागत केलं. अमृतकुंडात हात धुवून आम्ही ग्रंथसाहेबाचं दर्शन घेतलं. नंतर बाजूच्या लंगरमध्ये जेवण केलं. नंतर बाबा निघाले. बाबांसाठी मंदिराच्या मागील बाजूची खोली होती. मंदिराच्या चारही बाजूंनी छोट्या छोट्या खोल्या होत्या. त्यावेळी माझ्या लक्षात आलं की, मी आणि बाबा सोडून यात्रेतील कुणीही आमच्या बरोबर नव्हतं. इतरांची व्यवस्था बाजूच्या धर्मशाळेत होती. आमच्या सोबत मंदिर प्रमुख, दोन वयस्कर शीख व्यक्ती होत्या. मागे दोन तगडे रायफलधारी निळा फेटा आणि लांब कुडता घातलेले शीख होते. कुणाच्याही पायात बूट नव्हते. म्हणजे हा मंदिराचा भाग होता. पवित्र होता. आम्ही खोलीत गेलो. बाबांसाठी मोठा लाकडी पलंग होता. गादीवर स्वच्छ पांढरी चादर होती. धुतल्यावरही पूर्वीचे रक्ताचे डाग पूर्णपणे गेलेले

नव्हते. एका कोपऱ्यात बाबांची बॅग, त्यांचं इतर सामान, माझी पथारी होती. कोपऱ्यात पाण्याचा माठ होता. समोरच्या भिंतीवर काही ठिकाणचं प्लॅस्टर उडाल्यासारखं दिसत होतं. मी त्याकडे पाहात असताना मागून एकानं सांगितलं,

"बेटा, ते गोळीबाराचं निशान आहे. आपण काळजी करू नका. आराम करा बाबासाहेब.''

ते चालले गेले. मी सामानातून आनंदवनची चादर काढून पलंगावर टाकली. बाबा माझ्याकडे हसून बघत होते. कोणताही भाव चेहऱ्यावर न दाखवता बाबा कॉटवर आडवे झाले. आम्हाला सर्वांपासून वेगळं का काढलं असावं? आम्ही नजरकैदेत आहोत की कैदेत?... नाही नाही तो विचार करु लागलो. यांचा पूर्ण अभ्यास असावा का? आम्ही मंदिरात दर्शन घेत असताना किती योग्यपणे आमचं सामान त्यांनी ह्या खोलीत आणून ठेवलं होतं. आम्ही पंजाबमध्ये आल्यापासून त्यांचं बाबांवर लक्ष असावं. बाबांच्या सवयी, खाण्याची पथ्यं, स्वच्छता - सर्व काल-परवापासून कटाक्षानं पाळलं जात होतं. कधी काही सांगावं, मागावं लागलं नव्हतं. हे कट्टरपंथीयाकडून की गुरुद्वार प्रबंधक कमिटीकडून हा प्रश्नच होताही आणि नाहीही, कारण गुरुद्वार प्रबंधक कमिटी त्याच्या हातात असावी. बरोबर दुपारी दोन वाजता दारावर टकटक झाली. दाराला आतून कडी घातलेली नव्हतीच. एक गोरासा शीख तरुण ट्रेमध्ये बाबांसाठी दूध व माझ्यासाठी चहा घेऊन आला. जाताना, "बाबासाहेब, काही तरुण भेटण्यास येत आहेत,'' असं सांगून गेला.

चार तरुण शीख आत आले. फार आदरानं बाबांच्या गुडघ्यापाशी हात टेकवत त्यांनी बाबांना नमस्कार केला. बाबा उठू लागले, तर त्यांनी, 'आपण आरामात पडा, आम्ही आपल्याशी बोलतो.' असं सांगितलं.

बाबांनी सर्वांना त्यांची नावं विचारली. ते खालसा कॉलेजमध्ये शिकत होते. हळूहळू ते बाबांना नेहमीचे प्रश्न विचारताना, सध्याच्या परिस्थितीसाठी कोण जबाबदार आहे? ह्या प्रश्नावर आले. त्यातल्या एकानं झोळीतून एक फाईल काढली. त्यात भारत जोडो यात्रेसंबंधी आलेली वृत्तपत्रातील कात्रणं होती. ते बाबांना, इंदूरमध्ये तुम्ही म्हटलं, दिल्लीत असं म्हटलं, म्हणून कात्रणं दाखवू लागले. शेवटी, "आपण आज आमच्या खालसा कॉलेजमध्ये येत आहात, त्यावेळी आपण दिल्लीत शिखांवर झालेल्या अत्याचाराचा निषेध करावा अशी आमची इच्छा आहे,'' असं म्हणाले.

बाबांनी रोखून त्यांच्याकडे पाहिलं. शांतपणे बाबा म्हणाले,

"बेटा, मी नेहमीच कोणत्याही अत्याचार व हत्येचा निषेध करतो. मग ती कोणीही केली असली तरी.''

अत्याचार, हत्या कुणीही केलेली म्हटल्यावर ते तरुण गडबडले. अतिरेक्यांनी केलेल्या हत्येचा निषेध वेळोवेळी बाबांनी पंजाबात केला होता. ती वृत्तपत्रातील कात्रणं त्यांच्याकडे असणारच. बाबांनी त्यांना विचारलं,

"आपण माझ्यावर राग का धरला आहे?''

त्यातील तिघांनी घाईघाईनं बाबांना नमस्कार केला व निघताना म्हणाले,

"नाही बाबासाहेब, आपण संत आहात. शीख धर्मात संतांचा आदर केला जातो.''

चौथा शीख तरुण गंभीर होता. संध्याकाळी खालसा कॉलेजमध्ये होणाऱ्या सभेचं हे ट्रेलर होतं हे नंतर समजलं.

संध्याकाळी आम्ही खालसा कॉलेजमध्ये पोहोचलो. यात्रेतील तरुण आमच्या सोबत आले. सभा कॉलेजच्या ॲम्फी थिएटरमध्ये होती. तिथं यात्रेतील तरुण फार मागे व वरच्या मजल्यावर असावेत. सोबतचे मान्यवर, स्थानिक व्यवस्थापक जवळ नव्हते. बाबांसोबत मी काही शीख तरुणांच्या घोळक्यातून स्टेजवर गेलो. स्टेजच्या एका कोपऱ्यात बाबांची कॉट होती व एक खुर्ची. थोड्या बाजूला माईक होता. नंतर टेबल-खुर्च्या होत्या. समोरचा हॉल शीख तरुणांनी खचाखच भरला होता. बाबांनी स्टेजवरुन सर्वांना हात जोडून नमस्कार केला. सगळीकडे शांतता होती. टाळ्या वाजल्या नाहीत. हे विचित्र होतं. बाबा शांतपणे कॉटवर पडले. मी सगळीकडे नजर फिरवली.

लांबवर एक-दोघांनी हात दाखवून ओळख दिली. कॉलेजचे प्राचार्य सोबत होते. ते एका खुर्चीवर जाऊन बसले. कॉलेजच्या प्रवेशद्वाराजवळ त्यांनी बाबांचं स्वागत केलं होतं. बाकी ते कळसूत्री बाहुलीप्रमाणे होते. हे सर्व तरुणांच्या हातात असावं. सुरुवातीला स्टेजवर काही तरुणी आल्या. त्यांनी सुरेल आवाजात स्तवन की स्वागत गीत म्हटलं. अर्थात, पंजाबी असल्यानं अर्थ समजला नाही, तरी त्या गडद गंभीर वातावरणात गोड मंद झुळूक आल्यासारखं वाटलं. नंतर प्राचार्यसाहेब उठले. त्यांनी भाषण पंजाबीत केलं, पण बाबांची ओळख हिंदीत करुन दिली. बाबांचं आनंदवन व कुष्ठरोग्यांचं काम, एवढंच ते बोलले. भारत जोडो यात्रेचा उल्लेखही त्यांनी केला नाही. एकंदरीत त्यांनी काय बोलावं हे आधी कुणी तरी ठरवलेलं असावं. मधेच टाळ्या वाजू लागल्यानं त्यांनी भाषण आवरतं घेतलं. दुसरे एक प्राध्यापक उठून माईकपाशी आले. ते दोन-चार वाक्यं बोलले. आता हॉलमध्ये गडबड, शिट्या वाजू लागल्या म्हटल्यावर ते परत मागे जाऊन खुर्चीवर बसले. त्याच वेळी टाळ्या ठेका धरल्याप्रमाणे वाजू लागल्या. बाबांनी पडल्या पडल्या उशीवरुन डोकं उचलून पाहिलं. एक शीख तरुण हॉलमधल्या मोकळ्या जागेतून स्टेजकडे येत होता. टाळ्या वाजतच होत्या. हॉलमधील तरुण उभे राहून वळून त्याच्याकडे पाहात होते. तो शीख तरुण स्टेजवर आला. तो उंच होता, पण भारदस्त नव्हता. डोक्यावर केशरी रंगाचा फेटा होता. त्यानं स्टेजवर प्राचार्य व इतरांची दखलही घेतली नाही. त्यानं बाबांकडे पाहण्याचं टाळलं. त्याच्या कंबरेला तलवार लटकत होती. तो माईकपाशी गेला. त्यानं हात वर केल्याबरोबर टाळ्या बंद झाल्या. हॉलमधील सर्व लाईट बंद झाले. फक्त एक प्रखर झोत त्या तरुणावर पडला, एखादा नाटकातला सीन असावा असा. आता हॉलमध्ये काळीकुट्ट शांतता होती. त्या तरुणानं माईकवर टिचकी मारुन माईक ठीक आहे याची खात्री करुन-

"ओऽसोहनीयाल...'' धार्मिक घोषणा दिली. मोठ्या आवाजात हॉलमधल्या सर्वांनी त्याला साथ दिली. तो तरुण कॉलेजचा विद्यार्थीप्रमुख होता की कट्टरपंथीय नेता होता? दुसऱ्या क्षणी त्यानं उजवा हात कंबरेकडे नेला, खसकन तलवार उपसून समोर धरली, टाळ्यांचा कडकडाट झाला. मी खुर्चीतून उठून उभा होणार होतो, पण बाबा शांतपणे विचार करत पडले आहेत हे दिसल्यावर परत खुर्चीत स्थिरावलो. तो अस्खलित पंजाबीत मोठ्यानं बोलत होता. मधूनमधून टाळ्या वाजत होत्या. काही तरुण उभे राहून टाळ्या वाजवत होते. भारत सरकार - इंदिरा गांधी - शिखांवर अत्याचार करत आहेत - असं भाषण चालू आहे एवढं समजत होतं. शेवटी त्यानं दोन वेळा संत बाबा आमटे असा उल्लेख केला. तो बोलायचा थांबला. मिनिटभर तो न बोलता उभा होता. फार नकोशी शांतता होती. मला माझ्या श्वासाचा आवाज ऐकू येत होता.

त्या तरुणानं प्रथम वळून बाबांकडे पाहिलं. त्याच वेळी लक्षात आलं, हा तर दुपारचा तरुण, चौघांपैकी कमी बोलणारा. मी बाबांकडे पाहिलं. बाबा माझ्याकडे पाहून हसत होते. त्यांनीसुद्धा त्या तरुणाला ओळखलं होतं. तो शीख तरुण परत समोर पाहात आता हिंदीत बोलू लागला. तो म्हणाला,

"जेव्हा इंदिराजींनी सुवर्ण मंदिरावर हल्ला केला त्या वळी हे संत कुठं होते?'' ह्या प्रश्नाबरोबर वळून हातातील नग्न तलवार त्यानं बाबांकडे दाखवली. "जेव्हा सरकार शीख तरुणांवर गोळ्या झाडत होते तेव्हा हे संत कुठं होते? जेव्हा आमच्या नेत्यांना तुरुंगात टाकत होते तेव्हा हे संत कुठं होते? जेव्हा दिल्लीत शीख महिलांवर अत्याचार होत होते तेव्हा हे संत कुठं होते?'' प्रत्येक प्रश्नाला तो बाबांकडे हातातील तलवार दाखवत होता. शेवटी धार्मिक नारा देऊन त्यानं आपलं भाषण संपवलं. टाळ्यांच्या कडकडाटात तो स्टेजवरुन उतरला. स्टेजवरील कुणाचीही दखल न घेता, तलवार उंचावून तो पहिल्या रांगेतील एका खुर्चीत बसला. ती त्याच्यासाठी प्रथमपासूनच रिकामी ठेवली होती. बरोबर माईकसमोर.

कुणी काही म्हणण्याअगोदर बाबा उठले. कमरेचा पट्टा लावला. ते माईकपाशी गेले. डाव्या बाजूच्या खुर्चीवर डावा पाय उचलून ठेवला. नेहमीप्रमाणे माझ्या खांद्यावर डावा हात ठेवला, पण काठी माझ्याकडे न देता उजव्या हातात तशीच ठेवली. त्यांनी प्रथम स्टेजवरील मान्यवरांचा उल्लेख

केला. खालसा कॉलेजमधील तरुणांचा उल्लेख करुन ते म्हणाले,

"आपण मला इथं बोलावून जो सन्मान केला त्याबद्दल मी आपला आभारी आहे.'' हॉलमध्ये शांतता होती. सर्व हॉलवर शांतपणे नजर फिरवून बाबांनी भाषण सुरु केलं. बाबा चांगलं हिंदी बोलत होते. बाबा तासभर बोलले. त्यातील महत्त्वाचं, माझ्या लक्षात राहिलेलं, मला समजलेलं. सुरुवातीला ते म्हणाले, "मला पंजाबमध्ये येऊन दहा दिवस झाले. मी सतत विचार करत आहे, मी ऐकलेला गरम रक्ताचा, सळसळत्या तारुण्याचा रांगडा शीख तरुण कुठं गेला? तो आज मला इथं खालसा कॉलेजमध्ये दिसला.'' त्याच वेळी बाबांनी आपल्या हातातली काठी समोरच्या तरुणाकडे केली. एकदम टाळ्या वाजू लागल्या. समोरचा तरुण एकदम चमकून खुर्चीत ताठ बसला. नंतर बाबांनी पंजाबतल्या खेड्यांमधली गरिबी, अशांत पंजाबमधली भयभीत जनता ह्याबद्दल खेद, दुःख व्यक्त केलं. भारत जोडो यात्रेची कल्पना, साध्य ह्याबद्दल बोलले. काही वेळानं त्यांच्या आवाजात राग, चीड दिसू लागली. "इंदिरा गांधींच्या हत्येनंतर दिल्लीत शिखांवर अत्याचार झाले त्याचा जाब विचारणारा कोणत्या पक्षाचा, कोणत्या धर्माचा नेता नव्हता. भारतभरच्या तरुणांचा प्रतिनिधी म्हणून मी जाब विचारला,'' त्यावेळी समोरच्या तरुणाकडे हातातल्या काठीनं निर्देश करत बाबा म्हणाले, "त्यावेळी आपण कुठं होता? हिंदूंचं रक्षण करण्यासाठी शीख धर्माची स्थापना झाली. आज पंजाबमध्ये अनेक हिंदूंवर अत्याचार होत आहे तेव्हा हे धर्माच्या नावाखाली तलवार दाखवणारे तरुण काय करत आहेत? आज भारतभर धर्मापेक्षा अनेक महत्त्वाचे प्रश्न आहेत, त्याकडे लक्ष वेधण्यासाठी मी तरुणांसोबत भारतभर हिंडत आहे. पंजाबने माझा सन्मान केला, त्याबद्दल मी आभारी आहे. माझ्या सोबत इतर तरुणांप्रमाणे शीख तरुण आहेत. आतापर्यंत जगाला तलवार दाखवणारे अनेक जण होऊन गेले, पण आज ते कुठं आहेत? सारे नामशेष झाले. आज खालसा कॉलेजमधल्या तरुणांना मी एकच नारा देत आहे -

हात लगे निर्माण में

नही मांगने, नही मारने''

बाबांनी दोन्ही हात जोडून सर्वांना नमस्कार केला. हॉलमधले सर्वच उभे राहून टाळ्या वाजवत होते. समारचे तरुण बाबांना भेटण्यासाठी येऊ लागले. कुठून तरी येऊन भारत जोडो यात्रेतील तरुणांनी येऊन बाबांभोवती कडं केलं. तलवारी आता म्यान झाल्या. तरुण गटागटानं चर्चा करत होते. स्टेजवरुन उतरुन शीख तरुणांना बाबा भेटत होते. सगळीकडे आनंदी वातावरण होतं. तरुणांमध्ये बाबा अधिकच आनंदी, उत्साही दिसत होते. सुवर्ण मंदिरात येण्यास रात्र झाली. रात्रीचा मुक्काम सुवर्ण मंदिरात होता. त्यावेळी खलिस्तान चळवळीचे जे प्रमुख पाच 'पंचप्यारे' होते, त्यापैकी दोघे जण तरी मुक्कामासाठी सुवर्ण मंदिरात आहेत अशी माहिती मिळाली होती. त्यांना भेटून शांततेचं आव्हान करण्याची बाबांची इच्छा होती. रायफलधारी शीख मंदिराच्या उजव्या बाजूच्या खोलीतून आत-बाहेर करताना दिसत होते. सामान्य शीख तिकडे जाताना दिसत नव्हता. आमची खोली समोरच्या बाजूला होती. रात्री जेवणानंतर अनेक शीख, शीखकुटुंबं बाबांना भेटण्यासाठी भक्तिभावानं येत होते. त्यातील एकाकडून कळलं, की आम्ही आता आहोत ती खोली पूर्वी 'संत भिंद्रनवाले' यांची खास खोली होती. मला हसू आलं. मागे यात्रेदरम्यान गुजराथमध्ये एका मुक्कामात बाबांना आणीबाणीनंतर इंदिरा गांधी राहात असलेल्या खोलीत ठेवलं होतं. आजची रात्र संत बाबासाहेब, संत भिंद्रनवाले यांच्यासाठीच्या खास खोलीत राहणार होते. उद्या आम्ही इथून जाणार होतो. रात्री बाबांना शांत झोप लागली.

दुसऱ्या दिवशीची सुवर्ण मंदिरातली पहाट प्रसन्न होती. आज नेहमीप्रमाणे रोज सकाळी यात्रेतील तरुण बाबांकडे येऊ शकले नाहीत, कारण ते लांबवर मंदिराबाहेर मुक्कामाला होते व सुवर्ण मंदिरात त्यावेळेला फक्त शीख भक्तमंडळींनाच प्रवेश होता. बाबा आता संतबाबा होते. अर्थात, बाबांना भेटण्यासाठी बाबांच्या खोलीत शीख बांधवांची रीघ लागली होती. खास पंजाबी नाश्ता बाबांसाठी

होता. आलू पराठे, घट्ट सायीचं दही, फळं, नंतर दाट लस्सी. अर्थात, चंगळ माझी झाली. त्याच वेळी दोन रायफलधारी, अंगभर कुडता घातलेले पण अनवाणी शीख खोलीत आले. ते काही न बोलता फक्त बाबांना नमस्कार करून उभे राहिले. हळूहळू भेटण्यास आलेले सर्व जण एक-एक करून चूपचाप खोलीबाहेर गेले. खोलीत आम्ही चौघे जण होतो. मी दाराकडे पाहिलं. मंदिरातील व्यवस्थापकातील एक जण उभा होता. काल दिवसभर तोच बाबांना काय हवं-नको याची काळजी घेत होता. तो फक्त नजरेनंच 'ठीक आहे, काळजी नको' असं म्हणत होता.

"चलीये बाबाजी...'' त्यातला एक जण अदबीनं वाकून म्हणाला.

बाबा उभे राहिले. पट्टा लावला. रुमाल खोचला. माझ्याकडे पाहात राहिले. त्यांनी डोक्याकडे हात केल्यावर मी सावध झालो. मी उशीखालून काळा मंदील काढला. ते दोघे प्रथम हसले. त्यातल्या एकानं पुढे होऊन बाबांच्या डोक्यावर तो रुमाल बांधला. मी माझा रुमाल बांधून सज्ज झालो. मी तिथल्या सामानाकडे पाहिलं. व्यवस्थापक पुढे आला आणि म्हणाला, "तुम्ही काळजी करू नका. सर्व सामान व्यवस्थित बसमध्ये पोहोचेल.'' अच्छा, म्हणजे आम्ही आता परत ह्या खोलीत येणार नाही तर! मी एकदा गोळीबाराच्या खुणा डोळ्यांत भरून घेतल्या. बाबांनी खोलीतल्या गुरु गोविंदसिंहांच्या फोटोला हात जोडून नमस्कार केला. आम्ही बाहेर मंदिर प्रदक्षिणा मार्गावरून चाललो होतो. मी नेहमीप्रमाणे डाव्या बाजूला होतो. ते दोघं आमच्या पुढे, पण बाजूने चालत होते. तिथली इतर शीख भक्तमंडळी त्यांना पाहाताच बाजूला होत, बाबांना नमस्कार करून उभी राहात.

"बाबासाहब, आप पहिले मथ्था टेकेंगे!'' एकानं म्हटलं. हे विचारणं होतं की...

आम्ही मंदिरात गेलो. एक गुरुपाठ म्हणत होता. बाबा हात जोडून उभे राहिले. मी जमिनीवर ओणवत माझ्यासाठी व बाबांसाठी दोनदा माथा टेकला.

तिथून आम्ही त्या दोघांच्या मागे निघालो. आता मंदिर व्यवस्थापक मंदिरापाशीच उभे होते. आता आम्ही मंदिराच्या उजव्या भागात चाललो होतो. म्हणजे कुणी तरी बाबांना भेटणार होतं तर! आम्ही राहात होतो तशीच खोली होती. आत कुणी नव्हतं. पण ह्या खोलीला मागे एक दार होतं. दारावर पडदा होता. खोलीत पूर्ण सतरंजी घातलेली होती. भिंतीला टेकून एका मोठ्या गादीवर लोड होते. भारतीय बैठक होती. भिंतीवर दोन-तीन ठिकाणी पंजाबी भाषेत काही तरी लिहिलं होतं. वाचणं शक्य नव्हतं. खोलीत एक हाताची खुर्ची होती. त्या खुर्चीकडे बोट दाखवत ते रायफलधारी पडद्यात चालले गेले. बाबा बसू शकत नसत म्हणून भिंतीला टेकून उभे राहिले. आतमध्ये पंजाबी भाषेत काही तरी बोलणं चाललं होतं. एक जण बाहेर आला. त्याच्या सोबत गोरा, धिप्पाड कोवळा तरुण होता. तसाच अनवाणी, लांब कुडता घातलेला. पण ह्यानं खाली सलवार घातली होती. तो कोवळ तरुण खाली वाकून बाबांच्या गुडघ्याला स्पर्श करत बाजूला झाला. बाबांच्या उजव्या बाजूला सावधपणे हाताची घडी छातीवर बांधून उभा राहिला. हा बाबांचा रक्षक म्हणून असावा, कारण मघाचे दोन रायफलधारी खोलीतून बाहेर येत बाबांसमोर मान वाकवून बाहेर गेले होते. आम्ही उभे होतो. अशा वेळी काही मिनिटे तासासारखी वाटतात. बाबा शांत होते, पण नक्की कोण भेटणार ही उत्सुकता त्याच्या चेहऱ्यावर होती. बाबांनी त्या तरुणाला नाव विचारलं. त्यानं पंजाबी ढंगात काही तरी सांगितलं. शेवटी सिंग होतं. बाबांनी त्याला वय विचारलं. त्यानं बेफिकिरीत 'माहीत नाही' म्हटलं. ओठावर नुकतीच मिशी येत होती. असेल तेरा-चौदाचा. बाबांनी त्याला विचारलं,

"बेटा, आप रायफल नहीं रखते साथ? अगर मैं धोखा करु तो?''

तो एकदम वळून आमच्या समोर आला. लांबलचक कुडता त्यानं वर उचलला. सलवारीत एका बाजूला एक कृपाण होतं, दुसऱ्या बाजूला पिस्तुल होतं. कुडता खाली सोडून तो परत बाजूला उभा राहात म्हणाला,

"संत बाबासाहब, पिस्तुल दिखाते नहीं...''

तेवढ्यात पडदा बाजूला झाला. दोन-तीन भारी रायफल घेतलेले शीख जवान आले. तीन कोपऱ्यांत उभे राहिले. आता दोघं फेटाधारी शीख आले. त्यांनी बाबांना वाकून हात लांबवत उभ्या

उभ्या नमस्कार घातला. दोघांजवळ कमरेच्या कृपणाशिवाय कोणतंही शस्त्र नव्हतं.

"बाबासाहब, बडी मेहरबानी हुई, आपके चरण सुवर्ण मंदिर लगे.''

मागून एक जण सरबताचे पेले घेऊन आला. बाबांनी फक्त पेल्याला हात लावून 'नाही' म्हटलं. मी पटकन पेला उचलून सरबत घेतलं.

"बाबासाहब, आप संत है. फर्माईये, क्या सेवा करु?''

"आप का शुभनाम?'' बाबांनी विचारलं.

"बाबासाहब, मेरा नाम गुरुबच्चन सिंग है.'' दुसऱ्याकडे पाहात तो पुढे म्हणाला, "आप प्यारासिंग है.''

मी आणि बाबा काही क्षण नुसते पाहात राहिलो. हे साधे, नम्रतेनं बोलणारे कट्टर अतिरेकी, पंचप्याऱ्यातील दोघे जण. त्यावेळी गुरुबच्चन सिंग प्रमुख होता.

मग बाबांनी त्यांना शांततेसाठी आवाहन केलं. हिंसा थांबली पाहिजे. पंजाब पूर्वीसारखा शांत, प्रसन्न व्हावा अशी इच्छा प्रकट केली.

गुरुबच्चन सिंग पुढे झाला. त्यानं बाबांचे दोन्ही हात हातात घेतले. तो करारी शब्दांत म्हणाला,

"बाबासाहब, आपण संतपुरुष आहात. आपली इच्छा योग्य व धर्माला धरुनच आहे. आम्हीही तेच इच्छितो, पण सरकारला ते पसंत नाही. त्यांनी प्रथम गोळीबारी बंद करावी. आमचे नेते तुरुंगात आहेत. आमच्यावरील दिसताक्षणी गोळी घालण्याचे आदेश परत घेण्यास सांगा. मग आम्ही तुमच्या शब्दाबाहेर नाही.''

कोंडी फुटण्यासारखी नव्हती. बाबा काही बोलले नाहीत. तेवढ्यात दोघं-तिघं जण आत आले. मागून एक लठ्ठसा शीख आता आला. बाकीचे बाजूला झाले. त्यानं खाली वाकून गुडघ्याला हात लावून बाबांना प्रणाम केला. स्वत:हून ओळख करुन दिली,

"मी वासनसिंग... बाबासाहब, इतर दोघं पाकिस्तानात आहेत.''

हा पंचप्याऱ्यापैकी तिसरा धडपडत बाबांच्या दर्शनासाठी कुठून तरी मंदिरात दाखल झाला. दोन प्यारे बाबांना भेटू शकत नव्हते, कारण ते भारतात नव्हते. बाबा खरंच संतपदाला पोहोचले. केरळमध्ये आर्च बिशप, इथं संत बाबा. वा रे वा! मला जोरात 'वाहे गुरु वाहे गुरु, वाहे गुरु की फतेह' असं ओरडावंसं वाटत होतं. ह्यांनी बाबांवर एवढा विश्वास दाखवावा. ज्यांच्या डोक्यावर लाखोंची बक्षिसं आहेत ते बाबांपुढे हात जोडून उभे आहेत, त्याचा मी एकमेव साक्षीदार. नंतर नेहमीप्रमाणे भगव्या रंगाचे वस्त्र- सरोफा देऊन गुरुबच्चन सिंगनं बाबांचा सत्कार केला. वासनसिंगनं कृपाण देऊन नमस्कार करत म्हटले,

"बाबासाहब, आपकी यात्रा सफल हो.''

ते तिघं खोलीच्या दारापर्यंत बाबांना सोडण्यास आले. पाहातो तर आता नेहमीचे व्यवस्थापक बाहेर उभे. आम्ही शेकडो भाविकांसोबत सुवर्ण मंदिराच्या दारापाशी आलो. अनेक शाळांची मुलं दुतर्फा उभी होती. लांबवर बाबांची बस उभी होती. भारत जोडो यात्रेतील तरुणांनी बाबा दिसताच 'जोडो जोडो भारत जोडो'च्या नाऱ्यानं तो परिसर दणाणून सोडला. आम्ही अमृतसरमधील दुर्गीयाना मंदिराकडं निघालो.

आम्ही दुर्गीयाना मंदिरात पोहोचलो. सुवर्ण मंदिराची प्रतिकृती असल्यासारखी ह्याची बांधणी होती. सुवर्ण मंदिरात प्रथम गेलो तेव्हा खरं तर प्रथम भीतिदायक दडपण होतं. पण आता आजही मुक्काम सुवर्ण मंदिरात असता तर, असं वाटत होतं. अर्थात, इथंही चाहत्यांचा गराडा बाबांभोवती होताच. मंदिर व्यवस्थापकांनी बाबांची व इतर यात्रेतील सर्वांची उत्तम सोय केली होती. मंदिरामध्ये बाबांचा शाल देऊन रीतसर सत्कार केला. जेवणाची उत्तम व्यवस्था होती. यात्रेतील तरुणांची पंधरा दिवसांची घरच्यांची पत्रं आली होती. आनंदीआनंद होता. आनंदवनहून ख्यालीखुशालीची पत्रं होती. बाबा आनंदी होते. त्यांनी शांततेसाठी काही तोडगा काढण्यासाठी अमृतसरमधल्या वेगवेगळ्या पक्षाच्या स्थानिक नेत्यांना बोलावून बोलणं केलं. संध्याकाळी यात्री बाघा बॉर्डरवर हद्द

बंद करण्याची परेड बघण्यासाठी जाणार होतो. यात्रेबरोबरचे निवृत्त कर्नल रेगे पुढे व्यवस्थेसाठी गेले होते. यात्रेतील तरुणांना बॉर्डरपर्यंत सायकलवर जायचं नव्हतं, तर अमृतसरमधल्या व्यवस्थापकांनी चार बसची व्यवस्था केली होती. बाबांच्या बसमध्ये नेहमीचे मान्यवर होते. हद्द बंद होण्याच्या किती तरी आधी आम्ही बॉर्डरवर पोहोचलो. ह्या ठिकाणी नेहमी परेड पाहण्यास लोक येत असतात. आम्ही पोहोचलो तर तिथले प्रमुख कर्नल रेगेंबरोबर बाबांच्या स्वागताला उभे होते. नेमके हे कर्नल महाराष्ट्रीयन होते. पूर्वी कर्नल रेगे ह्यांच्या हाताखाली काम केलेले होते. सैन्यातर्फे यात्रेकरुंसाठी खास नाश्ता, चहा, कॉफी होतं. मेन चौकीशेजारी एका खोलीत बाबांची सोय होती. तिथल्या कर्नलमुळे बाबा, मी, रेगेकाका, यदुनाथजींना अगदी गेटपर्यंत जाता आलं. आम्ही तिथे उभे होतो त्याच वेळी एक खेडूत सरदार सरळ पाकिस्तानमधून सायकलवर दुधाची बरणी घेऊन भारतात आला. त्याच वेळी एक म्हैस आरामात भारतातून पाकिस्तानात जात होती. बाबांनी सोबतच्या कर्नलकडे पाहिलं. उंचेपुरे जवान तिथं होते. कर्नल हसले. त्यांनाही समजलं बाबांना काय विचारायचं आहे.

"बाबासाहेब, आता काही धुसफुस नाही. त्याचा बाप/आजापण तिकडे दूध विकत होता, कधी, तर जेव्हा बॉर्डरच नव्हती तेव्हापासून... ती पाकिस्तानातली गवळ्याची म्हैस मधूनमधून चरण्यास इकडे येते. तिला बॉर्डर काय समजणार!'' आम्ही सगळेच हसलो.

आम्ही गेटपाशी उभे होतो, तेव्हा पाकिस्तानमधल्या बाजूलासुद्धा इकडच्या- सारखी गर्दी दिसत होती. तिथले नागरिक त्या बाजूनं परेड पाहण्यास आले असावेत. कर्नल बाबांना माहिती सांगत होते. त्याच वेळी पाकिस्तानच्या बाजूला गोंगाट वाढला. कर्नलनी दोन वेळा त्या बाजूला पाहिलं. त्याच वेळी तिकडचा एक तेवढाच तगडा सैनिक मधल्या शंभर मीटर पट्ट्यावर येऊन उभा राहिला. दोन्ही देशाच्या गेटमध्ये शंभर मीटर अंतर आहे. मधे एक पांढरा पट्टा मारलेला आहे. इकडे भारत तिकडे पाकिस्तान. दोन गेटमध्ये फक्त है सैनिक आपल्या भागात मध्यरेषेपर्यंत ये-जा करू शकतात. तिकडचा सैनिक तिथं आल्यावर आपल्याकडील सैनिकानं कर्नलकडे पाहिलं. कर्नलनं नुसत्या डोळ्यांनी आज्ञा दिल्यावर आपला सैनिक रुबाबदार परेड करत तिथपर्यंत गेला. त्यांचं काही तरी बोलणं झालं. दोघं कडकपणे परत फिरले. आपला सैनिक काहीसा लांब उभा राहिला. कर्नल तिथपर्यंत गेले. त्यांच्यात काही तरी बोलणं झालं. कर्नल बाबांपाशी आले. बाबा गेटच्या मध्यभागी उभे होते, तिथून त्यांना गेटच्या कडेला उभं करून 'आलोच' म्हणत थोडे लांब जाऊन समोर उभे राहिले. आम्ही पाहात होतो. समोर इकडच्या कर्नलसारखा पाकिस्तानचा अधिकारी आमच्याकडे येत होता. समोरून दोन सैनिक मार्च करत येत होते. आपल्याकडील दोन सैनिक व मागे आपले कर्नल चालत समोर गेले. दोन्हीकडच्या मधल्या रेषेपाशी समांतर वळून उजव्या-डाव्या बाजूला जाऊन उभे राहिले. दोन्ही देशाचे अधिकारी काही तरी बोलत होते. नंतर हातांत हात घेऊन हसत हात सोडला. आपल्याकडचे सैनिक व कर्नल परत आले. कर्नलचा चेहरा आनंदानं फुलला होता, तो हसत बाबांचा हात हातात घेत म्हणाला,

"बाबा, तिकडचे लोक, शाळेचे विद्यार्थी आपणास जवळून भेटू इच्छितात.''

"ते शक्य आहे का? मी इथून हात दाखवतो.'' असं म्हणून बाबा हात वर करून हलवू लागले.

कर्नल म्हणाले, "माझ्याच रँकचा पाकिस्तानी अधिकारी तिथं उभा आहे. आम्ही दोघं दोन्ही बाजूचे कमांडिंग ऑफिसर आहोत. त्याच्याही मनात आहे. मला आनंदच आहे. आपली सेवा करण्याची संधी मिळत आहे. तुम्ही हो म्हणाल तर...''

बाबा निघत म्हणाले, "चला.''

बाबा कर्नल रेगेंबरोबर बोलले. कर्नल रेगे, यदुनाथजींना घेऊन बाजूला झाले. दोन सैनिक मागे, कर्नलसोबत मी आणि बाबा मधल्या रेषेकडे जाऊ लागलो. मी स्वप्नात तर नाही ना? बाबा हात वर करून पलीकडच्यांना दाखवत होते. आम्ही रेषेजवळ उभे राहणार, तर समोरच्या कर्नलने बाबांना नमस्कार केला. पाकिस्तानात मी आपले स्वागत करतो, असं म्हणत त्यांनी बाबांचा हात धरून बाबांना रेषेपलीकडे घेतलं. आपले सैनिक रेषेपाशीच उभे राहिले. आपले कर्नल, त्यांचा अधिकारी

व त्यांच्या सोबत बाबा चक्क पाकिस्तानच्या गेटपर्यंत गेले. तिथं मात्र कर्नल साहेबांनी बाबांना, इथं उभं रहा म्हटलं. अनेक जण एकटक बाबांकडे पाहात होते. एक छोटी मुलगी धावत समोर आली. तिच्या हातात गुलाबाचं फूल होतं. बाबांना देत ती बाबांना म्हणाली,

"सलाम आलेकुम..."

बाबा पटकन म्हणाले, "आलेकुम सलाम बेटा."

ती मुलगी धावत परत गेली. मी बाबांकडे पाहिलं नाही. बाबांनी डोळे टिपण्यासाठी पट्ट्यामधला रुमाल काढलेला पाहिला. आम्ही वळलो, पण बाबा समोरच्यांना हात दाखवत उलटे मागे मागे येत होते. आम्ही परत भारतात आलो. पाकिस्तानी कर्नल बाबांना शुभेच्छा देऊन परतला. नंतर आम्ही रीतसर क्लोजिंग परेड पाहिली. पण बाबा सगळ्यातून हरवल्यासारखे होते. ते काय विचार करत असतील? पुढे प्रयत्न करूनही ते पाकिस्तानात जाऊ शकले नाहीत ह्याचं त्यांना दुःख होतं. बाबा कवितेत म्हणतात-

'मागितलं ते मिळालं नाही
मिळायचं ते मिळाल्यावाचून राहिलं नाही
मुक्या प्रार्थनांना होकार आहे
अन् दुःखच माझ्या सुखाचं साक्षीदार आहे.'
- करुणेचा कलाम 42

स्वातंत्र्यापर्यंत भारत-पाकिस्तान असा भागच नव्हता. काही वर्षांपूर्वी असं जाण्याला काहीच महत्त्व नव्हतं. आज दोन्ही बाजूचे लोक बाबांवर सारखंच प्रेम करतात हे अनुभवलं. आपल्यापेक्षा ती म्हैस खरचं सुखी नाही का? माणसानंच माणसाचे दोन भाग केले. बाबा नेहमी भाषणात म्हणत असत-

'मतभेद मी समजू शकतो, पण मनभेद कशाला?' बाबांच्या आयुष्यात असे अनेक प्रसंग आले असतील. त्यातल्या एक-शतांश प्रसंगांत तरी मी आहे, तर माझी अवस्था कशी दोलायमान झालीय. बाबा कसे पचवत असतील? कवितेत बाबा म्हणतात-

'मी किरणांची अपेक्षा धरली होती
माझ्या अंगणात सूर्य उगवले
त्यांनीच दिली भूतकाळाची जाण
वर्तमानविषयीचे सावधपण अन्'
- करुणेचा कलाम 46

आता पंजाबमध्ये यात्रा सफल झाल्यासारखी होती. आम्ही दोन मुक्काम पुढे गेलो असू, अमृतसरमध्ये परत गोळीबार झाल्याचं कानावर आलं. वृत्तपत्र वाचत होतो. दिवसभराच्या धावपळीत विचार करण्यासही वेळ मिळत नसे. बाबा त्यावेळी स्वतःला 'नोमाडी ऑन व्हील्स' म्हणत. खरोखरी आमचं वागणंच का, विचारही भटक्या जमातीतल्या लोकांसारखे होते. अमृतसर सोडून तिसऱ्या मुक्कामावर सारं शांत झाल्यावर मी बाबांना रात्रीची गोळी दिली. शेवटचं 'गुड नाईट' म्हणताना मी बाबांकडे पाहिलं, बाबांचा चेहरा दुःखी होता. हे वेदना सहन करतानाचं दुःख नव्हतं. मी कायम बरोबर होतो. मी उभा राहिलो. गादीवरच्या त्यांच्या हातात मी माझा पंजा ठेवला. बाबांनी माझा पंजा घट्ट धरला.

"बाबा, काय झालंय?"

"विलास, त्या पोराची आठवण येतेय!"

"कोण बाबा?"

"तो, मला कुडता वर करून पिस्तुल कुठं ठेवतात ते दाखवणारा गोरा पोरगा..."

बाबांच्या डोळ्यांत पाणी होतं. बाबा म्हणाले,

"कालच्या पेपरमध्ये गोळीबारात सुवर्ण मंदिराबाहेर चार जण मेले, त्यात एक कोवळा तरुण होता असं छापलंय..."

पुढे बाबा काही बोलले नाहीत. त्यांनी डोळे मिटून घेतले. काही वेळानं माझा हात सोडला. मी तर विसरलो होतो, पण बाबा नाही विसरले. प्रत्येकाची इतकी आठवण, प्रत्येकाच्या जिवाची काळजी! खरंच, बाबा ते बाबाच...

बाबा तिखट अजिबात खात नसत, पण ते फार चवीनं खाणारे होते. त्यापेक्षा लोकांना खाण्यास देण्याचा त्यांना शौक होता. सणावारी ते पेशंट लोकांमध्ये जास्तीत जास्त लाडू कोण खातो, अशा पैजा लावत. त्यांना सर्वच भाज्या आवडत. भाजी कशी करावी हे समजावून देत. एकीकडं अमृतसरमधल्या मुलाच्या आठवणीनं दुःखी होणारे, तितक्याच आत्मीयतेनं पंजाबमधल्या दही व पराठ्याची आठवण काढत असत. आम्ही भारतभर हिंडलो. प्रत्येक ठिकाणच्या भाज्या, पदार्थ ह्याची ते चौकशी करत. आम्ही जेव्हा एका मुक्कामावरून सकाळी निघत असू, तेव्हा वाटेत नाश्त्यासाठी थोडा वेळ थांबत असू. नंतर रस्त्यात लहान गावे लागत. प्रत्येक ठिकाणी थांबणं शक्य नसे. गावातली मुलं रस्त्यावर बाबांसाठी उभी राहात. अशा वेळी बाबा बसच्या दारात येऊन उभे राहात. खालच्या पायरीवर मी आडवा हात धरून उभा राहात असे. बाबा हळूहळू चालणाऱ्या बसमधून हात दाखवून स्वागताचा स्वीकार करत. पंजाबमध्येच एका लहान गावातून आम्ही जात असताना नेमका त्या दिवशी त्या गावात बाजार होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूला फळांचे, भाज्यांचे ढीग होते. बाजारातील लोक बाबांना हात दाखवत होते. हे चालू असताना बाबांचा हात खाली आला. त्यांनी माझ्या खांद्यावर दाबल्यासारखं केलं, चटकन परत ते गर्दीला हात दाखवू लागले. मी समोर पाहिलं, काळसर-जांभळ्या मोठ्या वांग्यांचा ढीग नजरेआड होत होता. गाव गेलं. बाबा परत कॉटवर आडवे झाले. मी बाबांकडे पाहात विचारलं,

"बाबा, वांग्याचं भरीत करायला सांगू का?"

बाबा हसले. मला बरोबर समजलं याचं कौतुक त्यांच्या डोळ्यांत दिसत होतं. दोन मुक्कामानंतर एकाला सांगून बाबांना पंजाबी वांग्याचं भरीत खाण्यास घातलं. ज्या घरुन भरीत आलं त्यांना बोलावून बाबांनी धन्यवाद दिले. आपली पत्नी साक्षात अन्नपूर्णा आहे, असंही म्हणाले. मी खूश होतो. रात्री झोपण्याआधी बाबा मला म्हणाले,

"विलास, भरीत छान होतं; पण वांगं ओव्हनमध्ये भाजलेलं असावं. निखाऱ्यावर भाजलेल्या वांग्याची चव वेगळीच असते."

पाहा, खवय्या असावा तर असा. सुरुवातीला हेमलकसा इथं हिवाळ्यात अंगणातील शेकोटीवर बाबा वांगी भाजण्यास मदत करत. त्यावेळीही फक्त वांग्याचं सालच जळलं पाहिजे असा त्यांचा कटाक्ष असे. कोणतीही गोष्ट स्वत: खात्री करून घेतल्यावरच त्यांचं समाधान होत असे. सांगण्यावर, ऐकण्यावर ते एकदम विश्वास ठेवत नसत. त्यासाठी ते कष्ट घेत. त्यातून कधी विचित्र परिस्थिती निर्माण होत असे. आम्ही यात्रेदरम्यान मेघालय राज्यात होतो. तिथं मुक्कामाच्या जागा फार लहान गावात असत. मोठी शहरं, गावं त्या डोंगराळ प्रदेशात भौगोलीय परिस्थितीत शक्यही नव्हती. यात्रेतले तरुण चार-पाच ठिकाणी विभागून राहात. बाबांची वेगळ्या ठिकाणी सोय होत असे. एका ठिकाणी गेस्ट हाऊसवर बाबा होते. बससोबतचे चार-पाच जण बाबांसोबत गेस्ट हाऊसवर होते. दुपारी बाबा विश्रांती घेत असताना सतत चार-पाच कुत्री सारखी केकाटत होती. तिथल्या डोंगराळ भागात ते फार त्रासदायक होतं. संध्याकाळी सभेला जाताना बाबा म्हणाले,

"रात्री तरी हे कुत्रे शांत राहातील ना? आज झोपेचं काही खरं नाही."

आम्ही सभेवरुन परत आलो. अजूनही कुत्र्यांचं केकाटणं सुरु होतं. बाबा स्थानिक नेतेमंडळींसोबत बोलत होते. मी, भास्कर आणि आणखी दोघं कुत्र्याच्या आवाजाकडे गेलो. गेस्ट हाऊसपासून थोड्या दूरवर एका झोपडीतून आवाज येत होता. आम्ही आत गेलो. एका पोत्यामधून आवाज येत होता.

आम्ही ते पोतं बाहेर आणलं. पोतं बंद करण्यासाठीची दोरी सोडली, एकदम तीन-चार कुत्र्याची पिल्लं बाहेर पडून धूम पळाली. आम्ही नि:श्वास सोडला. बाबांना त्रास होऊ नये म्हणून कुत्री बंद केली असावीत, असा समज होता. आम्ही रात्री कुत्र्याच्या पिलांना मोकळं केल्याची बातमी बाबांना सांगितली. त्यांनाही बरं वाटलं. मेली असती बिचारी. बाबांना शांत झोप लागली.

सकाळी गेस्ट हाऊसपाशी गावातले दहाबारा आदिवासी स्त्री-पुरुष जमले होते. ते काय बोलत होते ते आम्हाला समजत नव्हतं. शेवटी एक स्थानिक व्यवस्थापक आला. त्याला तोडकी-मोडकी हिंदी येत होती. तो त्याच्या भाषेत बोलला. बांधून ठेवलेली कुत्र्याची पिल्लं त्यातल्या एकाची होती. मग स्थानिक लोकांनी त्या आदिवासींची कशी समजूत घातली हे समजलं नाही. बाबांना वाईट वाटलं. एक वेळ माझी झोप झाली नसती तरी चाललं असतं, पण आपण आदिवासींना नाराज केलं. कदाचित तो ती पिल्लं विकून पोट भरणारा असेल, असं बाबा म्हणू लागले. मग बाबांनी मला म्हटलं,

"विलास, माझ्या खाजगीमधून त्याला रक्कम देण्याची व्यवस्था कर.''

आम्ही स्थानिक कार्यकर्त्याला गाठलं. प्रथम तो बाबांकडून काही घेण्यास तयार नव्हता. "ह्याच्याशी बाबांचा संबंध नाही, मी रक्कम देतो,'' म्हटल्यावर, "द्या चाळीस रुपये,'' म्हणाला. "चार पिल्लांचे फक्त चाळीस कसे?'' त्यावर तो म्हणाला, "मटणाचा द्रोण पन्नास पैशाला तर मिळतो. दहा-बारा द्रोण मटण असेल त्याचं, हाडं कुणी घेत नाही.''

प्रथम माझा विश्वास बसेना. काही तरी काय? कुत्र्याचं मटण कोण खात असेल? भामरागडकडे साप, बेडूक, उंदीर आदिवासी खातात हे पाहिलं होतं, पण तिथंही कुणी कुत्रं खात नव्हतं. मला काही पटत नाही हे त्या आदिवासी कार्यकर्त्यानं माझ्या चेहऱ्यावरून ओळखलं. तो बारीक आवाजात म्हणाला,

"आता तुम्ही जात आहात. वाटेत बाजार आहे. तुम्ही स्वत: बघा, पानाच्या द्रोणात मटण असतं ते कुत्र्याचं. हॉटेलमध्ये मटणात हे मटण मिक्स असतं, म्हणून मटण खूप स्वस्त मिळतं.''

मी परत आलो. बाबांना काही सांगितलं नाही. फक्त त्या आदिवासीला रक्कम दिली. बाबांची व्हाउचरवर सही घेतली. निघण्याची गडबड होती म्हणून बाबांनी काही विचारलं नाही. आम्ही त्या मुक्कामावरून निघालो. रोजच्या पठाण मियाँऐवजी भास्कर बस चालवतो आहे हे पाहिल्यावर बाबांनी चौकशी केली. पठाण आजारी आहे म्हणून पठाणला सकाळी औषध दिलं आहे; मागील ट्रकमध्ये तो आराम करत आहे, हे सांगितलं.

तासभरानं बस एका गावात थांबली. शाळेत छोटीशी सभा झाली. सर्वांना नाश्ता होता. माझा नाश्ता झाला. बाबा सकाळी फक्त दूध घेत. बाबा म्हणाले,

"पठाण कुठं आहे? चल, त्याला बघू.''

आम्ही ट्रकपाशी आलो, तर पठाण उलटी करत होता. सोबतच्यानं सांगितलं, सकाळपासून उलट्या करत आहे. बाबांनी जीपमधून पुढच्या मोठ्या गावी त्याला हॉस्पिटलमध्ये घेऊन जाण्यास सांगितलं. पठाण नको नको म्हणत होता. पठाणला रवाना केल्यावर आम्ही बसमध्ये आलो. पठाणला काय झालंय? बाबांना आपल्या सोबतच्या सर्वांची काळजी होती, त्यात पठाण आनंदवनमधला रुग्ण होता. शेवटी बाबांपासून काही लपवण्यात अर्थ नाही हे माहीत होतं, म्हणून बाबांना सर्व सांगावं लागलं. "काल कुत्रं पकडून ठेवले होतं ते कापून मटण विकण्यासाठी...'' बाबा फक्त मान हलवत होते. "इथं बाजारात हॉटेलमध्ये कुत्र्याचं मटण मिळतं. आज सकाळी हे आम्हाला समजलं. पठाणनं काल रात्री हॉटेलात मटण खाल्लं होतं. सोबत भास्करही होता. भास्कर तर ठणठणीत आहे. पठाण, आपण कुत्र्याचं मटण खाल्लं ह्या विचारानं, सकाळी ऐकल्यापासून उलट्या करत आहे.''

"भास्कर, खरं काय रे?''

भास्कर नजर चुकवून उभा होता.

"हो बाबा! पण हे काही तरी सांगतात. सगळे आम्हाला चिडवत होते, म्हणून पठाण उलटी

करतोय.''

'छे! असं कसं असेल? थट्टेची मस्करी अशी होते. विलास, कोण असं बोललं बघ. काही अर्थ आहे का?''

बोलावं की नाही ह्या विचारात मी पडलो, कारण भास्करला मी 'तुम्ही काल कशाचं मटण खाल्लं माहीत आहे का?' असं सर्वात प्रथम विचारलं होतं. मी म्हणालो,

"बाबा, हे खरं आहे की इथं कुत्र्याचं मटण खातात. बाजारातून पानाच्या द्रोणात जे मटण वाटे करून असतं, ते कुत्र्याचं असतं. तो आदिवासीसुद्धा ती पिल्लं मारून त्याचं मटण विकणारा होता. आता हॉटेलवाले मटणात, कुत्र्याचं मटण मिसळतात, कारण ते खूप स्वस्त असतं.''

बाबा एकटक माझ्याकडं पाहात होते. मीही नजर बाजूला केली नाही, कारण मी खोटं बोलत नव्हतो. काही वेळ बाबा काही बोलले नाहीत. बसमध्ये नेहमीचे मान्यवर त्यांच्या जागांवर बसले होते. भास्कर चालकाच्या जागी तयार होता. आता काही वेळपर्यंत तो मागे वळून बाबांकडे पाहणं शक्य नव्हतं.

बाबा एकदम कॉटवरुन उठू लागले. मी पुढे गेलो. पट्टा बांधताना बाबा म्हणाले, "चला बाजारात.'' बाबा बसमधून खाली उतरले. आम्ही बाजारात निघालो. एका मटण विकणाऱ्यापाशी आलो. पिंजऱ्यात काही कोंबड्या होत्या. अंडीही ट्रेमध्ये होती. समोर हिरव्यागार पानांच्या द्रोणात मटणाचे वाटे होते. एव्हाना मटण विकणारा बावरला होता. उठून मटणावरील माश्या हाकलू लागला. बाबा उतरून बाजारात जात आहेत हे पाहिल्यावर अनेक स्थानिक लोक गर्दी करु लागले. बाबांनी काठी द्रोणाकडे दाखवत त्याला हातानं 'कशाचं आहे' विचारलं. भाषेचा मोठा प्रश्न होता. त्याला हिंदी, इंग्रजी येत नव्हतं. एवढा मोठा माणूस मटण घेण्यास आला, असा समज होऊन त्यानं पटकन एक द्रोण उचलला. त्यात दुसऱ्या वाट्यातले चार-पाच तुकडे टाकून बाबांपुढे केला. तेवढ्यात स्थानिक कार्यकर्ता धावून आला. त्याला हिंदी, इंग्रजी दोन्ही येत होतं. बाबांनी हे मटण कशाचं आहे असं विचारलं. त्याने त्या मटणवाल्याला विचारलं. त्यानं त्यांच्या भाषेत सांगितलं. आता स्थानिक बाबांना काहीच सांगण्यास तयार नव्हता. साहजिक होतं. आपली जमात कुत्र्याचं मटण खाते हे शिकलेला माणूस कसा सांगेल? तो उगाच पिंजऱ्यातल्या कोंबड्यांकडे बोट दाखवत होता. आमचं नशीब, की लांबवर एक कुत्रा उभा होता. मी पुढे होऊन त्या मटण विक्रेत्याला जवळ बोलावून कुत्र्याकडं बोट दाखवलं. त्या विक्रेत्याच्या चेहऱ्यावर समजल्याची झलक आली व मटणाचा द्रोण बाबांकडे देत तो 'हो हो' अशी मान हलवत राहिला. कुत्र्याचंच मटण आहे ह्याची तो खात्री देत होता. बाबा तिथून परत वळले. विक्रेता नाराज झाला. कार्यकर्ता गोंधळला होता. बाबा म्हणाले,

"अरे भास्करला, हवं तर घ्या द्रोण.''

आम्ही बसमध्ये परत आलो. बाबांनी त्या कार्यकर्त्याला बोलावलं. त्याला म्हणाले,

"मी अनेक वर्षं आदिवासींमध्ये काम करतो. आमच्याकडे तर आदिवासी किडे-मकोडे खातात, त्यात वाईट काहीच नाही. भूक सर्वांनाच असते. तुम्ही शिकलेले तरुण. ह्या तुमच्या समाजाला चांगलं उत्पन्न मिळवून देण्याचा प्रयत्न करा. हे आपोआप थांबेल. हे गरिबीमुळे आहे. तुमच्या शिक्षणाचा उपयोग ह्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्याकडे करा. हे बंद होईल. आपल्या ऋषिमुनींनीही भुकेसाठी कुत्री खाल्ली आहेत. आपण वाईट वाटून घेऊ नये. कोणताही राजकीय पक्ष त्यासाठी काही करेल ह्यापेक्षा तुम्ही तरुणच काही कराल हा माझा विश्वास आहे, म्हणूनच तर भारतभरचे तरुण घेऊन मी हिंडत आहे.''

तो तरुण पाया पडून बाबांचा निरोप घेऊन गेला. आम्ही पुढच्या प्रवासास निघालो. बाबा कायम विचारात होते- सुजलाम् सुफलाम् भारतभूमीत हे काय चाललं आहे?

जेव्हा महारोग्यांचं काम करतो, महारोग्यांसोबत राहातो म्हणून समाजानं एके काळी बाबांना जवळजवळ वाळीत टाकलं होतं. बाबा वरोरा गावापासून दूर जंगलात वस्ती करून राहिले. तेच सोबतचे त्यांचे आप्त झाले. दोघांनी एकमेकाला आपलं मानलं, एक नवीन कुटुंब निर्माण झालं.

आनंदवनात सर्व धर्मांचे लोक एकत्र राहू लागले, तरी ते खाजगी आयुष्य आपल्या धर्माप्रमाणे जगत होते. कुणावरही स्वत:च्या वागण्यानं ताण, वजन पडू नये म्हणून बाबांनी हिंदू धर्माचं कर्मकांड, रीतीरिवाज स्वत: पाळलेले नाहीत. त्याच वेळी साधनाताईंच्या पूजापाठालासुद्धा विरोध केला नाही. हिंदू धर्माचा त्यांचा अभ्यास होता. सर्व संतांच्या कार्याचा अभ्यास होता. ज्ञानेश्वरांनी गोरगरीब, खालच्या जातींसाठी ज्ञान पोहोचवलं ह्याचा उल्लेख मोठ्या अभिमानानं ते कवितेत करतात -

‘मी जेव्हा त्यांच्या दारात,
माझ्या बापाच्या पुराणोक्त पापाची खोळ पांघरून
उभा राहिलो
तेव्हा द्वारपालांनी मला शुद्धिपत्र मागितलं.’

ज्ञानेश्वरांचा असा उल्लेख करून पुढं ते म्हणतात-

‘तिजोरी फोडून त्यांचा सर्व माल मी लांबवला
सोवळ्यात बांधून ठेवलेले ताडपत्र्याचे गठ्ठे
गल्लीबोळांतून व अंत्यजांच्या वस्त्यांतूनही
वाहणाऱ्या उन्मुक्त वाऱ्याबरोबर मी उधळले.’

धर्म सर्वांसाठी आहे. मूठभर उच्च लोकांची मक्तेदारी त्यांना मान्य नव्हती. कदाचित ह्यामुळेच ते बरेच ठिकाणी ख्रिस्ती धर्माचा उल्लेख करत असावेत. अनेक वेळा त्यांच्या बोलण्याचा व वागण्याचा मला अचंबा वाटत असे. एक प्रसंग नेहमी आठवतो. बाबा सुरुवातीला ट्रकमधून प्रवास करत, कारण त्या वेळी संस्थेत एक जीप व एक ट्रक होता. एकदा का ट्रक सुरू झाला, की मधे कुठं थांबणं बाबांना पसंत नसे. त्या दिवशी मी बाबांबरोबर होतो. आष्टीपुढे एका ठिकाणी पठाण मियाँनी ट्रक थांबवला. पठाण खाली उतरून जंगलाकडे गेला. मी बाबांकडे पाहिलं. पठाण कशाला उतरला? बाबांना मधे थांबून वेळ वाया गेलेला आवडत नाही, माहीत नाही का? असा विचार करत होतो. बाबांचा चेहरा शांत होता. पाच मिनिटांनी पठाण परत आला. त्याच्या हातात पानामध्ये काही पानं बांधलेली होती. पठाण ट्रकमध्ये चढता चढता म्हणाला,

“बाबा, ताईंसाठी बेल घेतला, आज सोमवार आहे ना!”

बाबांच्या चेहऱ्यावर हास्य आलं. ताई हेमलकसा इथं होत्या आणि आम्ही हेमलकसाला जात होतो. ट्रक परत निघाला. इतर वेळी बाबांना मध्ये थांबलेलं आवडत नसे, पण आता?... मी विचार करू लागलो. माझ्यासारख्या धार्मिक कुटुंबात वाढलेल्याला एक प्रकारे आनंद होता. चला, कसे बाबा नमले बेलासाठी? पण त्याच वेळी रोज नेमानं नमाज पढणारा पठाण मियाँच्या हातचा बेल ताईंना पूजेला चालतो? हाही प्रश्न होताच. मग लक्षात आलं, अरे, महादेव कोंद ‘ख्रिश्चन’; पठाण ‘मुस्लीम’, रामदास ‘हरिजन’, तुकाराम ‘माळी’, देवराव ‘कुंभार’, भास्कर ‘कोळी’ हे सर्वच तर ताईंसाठी पानं आणणारे होते. सगळे महारोग झाला म्हणून आनंदवनाच्या कुटुंबात आले होते. ह्यांचा धर्म वेगवेगळा कसा मानावा. हेच तर बाबांचे आप्त, कुटुंबीय. तर मग बाबा-ताई ‘शंकर-पार्वती’ की ‘पांडुरंग-रुक्माई?’ जाऊ दे, उगाच कशाला विचार करायचा म्हणून मी सोडून देत होतो. तुकारामांबद्दल बाबांनी खूप छान लिहिलं-

‘शेकडो वर्षांनंतर ते गाठोडे
एका हळव्या मनाच्या वाण्याला सापडले
वंचकांच्या तत्कालीन पिढीला जेव्हा हे समजलं
तेव्हा त्यांनी चोरीचा आळ त्याच्यावर आणला
तेव्हा त्या गरीब बिचाऱ्या वाण्यानं
ते गाठोडं परत नदीच्या डोहात नेऊन टाकलं.
आणि तो स्वत: आपली बायका-पोरं सोडून

कोण्या अज्ञात स्थळी निघून गेला
ते गाठोडं तेव्हापासून तसंच तरंगत आहे.'
- ज्वाला आणि फुले 51

ही कविता चार-पाच वेळा वाचल्यावर मनात आलं, बाबांना नक्की काय सुचवायचं आहे. त्याच कवितेत पुढं ते गाठोडं गांधींनी परत उचललं असा उल्लेख आहे. पण त्यांनी ते स्वत: स्वीकारलेलं, असा स्पष्ट उल्लेख नाही. बाबांनी स्वत:चं पूर्ण आयुष्य महारोगी, अंध, अपंग, मुके, बहिरे व आदिवासी ह्यांच्यासाठी खर्च केलं. काय साधन होतं, तर प्रेम, करुणा, माणुसकी, श्रम हेच ना? संत तुकारामांवरील उल्लेखातील शेवटच्या ओळीप्रमाणे-

'आणि तो स्वत: (बाबा) आपली बायका-पोरं सोडून
कोण्या अज्ञात स्थळी निघून गेला
ते गाठोडं तेव्हापासून तसंच तरंगत आहे.'

तर माणुसकी, प्रेम, करुणा व श्रमसंस्कारांचं हे बाबांचं गाठोडं असंच तरंगत राहणार का? ते गाठोडं, ज्यातील ऐवजाला स्वत:चं वजन नसलेलं, तरी अवजड असणारं, कोण उचलणार? तरी मी स्वत: थोडी माणुसकी, निर्व्याज प्रेम, काही श्रमिकाप्रती करुणा दाखवण्यास काय हरकत आहे. मी बाबांएवढा मोठा, महान होऊ शकणार नाही, पण थोडाफार हातभार तर लावू शकतो ना? बाबा म्हणतात त्याप्रमाणे-

'वधस्तंभ पैलावयाचं बळ नाही या कायेत
चाललो मी त्यांच्या छायेत...'

आता जेव्हा जेव्हा मी बाबांच्या समाधीवर जातो, त्यावेळी हात जोडण्यास कापतात. ते गाठोडं डोळ्यांसमोर तरंगताना दिसतं. मी आठवतो, फार लांबचं नाही, फक्त कालचंच, निदान आज तरी मी काही तरी योग्य वागण्याचा प्रयत्न करीन असं मनाशी ठरवून परत फिरतो.

'वधस्तंभ पेलायाचे बळ नाही या कायेत
चाललो मी त्यांच्या छायेत'

ह्या कवितेच्या ओळी माझ्या कायम आठवणीत राहण्याचा फार गमतीशीर प्रसंग घडला आहे. कसरावदमध्ये असताना पुण्या-मुंबईकडील अनेक जण प्रेमानं, आपुलकीनं बाबांना भेटण्यास येत असत. जेव्हा इतर कुणी नसे तेव्हा बाबांसोबत आमचं रुटीन ठरलेलं असे. बाबांसाठी काहीही करावं लागलं तर आम्ही आनंदानं, भक्तीनं करत असू. जेव्हा जेव्हा हे मान्यवर येत त्यावेळी बाबांच्या नियमाप्रमाणे 'अतिथी देवो भव' ह्याचं पालन आम्हाला करावं लागे. म्हणजे त्यांची व्यवस्था करणे. बरं, प्रत्येकाची वेगळी सवय, वेगळ्या आवडी. बाबांची अचाट स्मरणशक्ती. मधूनमधून, अरे, ह्यांना हे लागतं, त्यांना ते लागतं, म्हणून सूचना. आलेले मान्यवर, आम्ही इतक्या लांबवरून भेटण्यास येतो, आमची कामं सोडून येतो, आम्ही आल्यानं बाबांना आनंद होतो ह्या भावनेनं सतत बाबांसोबत राहात. प्रत्येकाला त्या काही तासांत बाबांची सेवा करायची असे. कधी कधी त्याचा बाबांना त्रास होत आहे हे दिसत असे. पण काही बोलू शकत नव्हतो. खरं तर बाबा कसरावद इथं का होते, त्यांना कसं राहायचं होतं हे त्यांनी स्वत: कवितेत लिहिलं होतं-

'आपल्या प्रपंचाची कोंडी फोडून जो समाजाचा प्रपंच आपला करतो
तो वानप्रस्थ
वानप्रस्थवृत्ती निसर्गात आहे
शेवटच्या दिवसात पाखरु घरट्यात राहात नाही
आणि गुहेत मेलेला सिंह आढळणार नाही

मावळतीचे रंग जगावर उधळायला निघालेले
परितृप्त जीवन.'
- ज्वाला आणि फुले 105

बाबांनी आयुष्यभर सर्वांचं केलं. इथं ते वानप्रस्थासाठी आले होते. त्यांच्या पुढे आता फक्त नर्मदा व धरणामुळे विस्थापित होणाऱ्या लोकांचे प्रश्न होते, तर येणाऱ्या लोकांमुळे ते परत संसारात अडकत होते. कुणाला दुखावणं म्हणजे हिंसा, ही गांधींची शिकवण शेवटपर्यंत पाळणारा भला माणूस आनंदानं सहन करत होता. आलेले जुन्या आठवणींत रमत असत, तेच तेच जुने विषय बोलण्यात येत असत. बाबांनी पूर्वी लिहिलेल्या कवितेवर चर्चा होई. खरं तर त्या कविता जगून बाबा पुढे आले होते, त्यात त्यांना काय रस असणार? इथं बाबा खरोखर तृप्त जीवन जगत होते. होईल तेवढी मदत 'नर्मदा बचाव संघर्ष'ला करत होते. कधी आपणहून आनंदवनाची आठवण त्यांनी माझ्यासमोर काढली नाही. ते तर-

'पशू पंछी भोजन करे । तन भंडारा होये ।' म्हणत होते.

अशाच एका वेळी काही मान्यवरांसोबत नर्मदेवर स्नानावेळी माझी चर्चा झाली. खरं तर ह्या लोकांपासून मी दोन हात लांब राही. पण त्या दिवशी न राहून व त्यांनी मला डिवचल्यामुळे ह्या वरील ओळींचा आधार घेऊन मी माझ्या पद्धतीनं बोललो होतो. मला काय माहीत, ते दुखावले, कीं त्यांना पटलं? संध्याकाळी पाहुणे चालले गेले. रात्री बाबा अंगणात पलंगावर पडले होते. मी बाजूला अंगणात शतपावली करत होतो. बाबा मी त्यांच्या जवळून जाताना एकदम म्हणाले,

"विलास, पाहुणे तुझं कौतुक करत होते!''

"हो, काय...'' मी पुढचं ऐकण्यासाठी जागीच थबकलो.

"माझी कविता तुला चांगली समजली असं म्हणत होते. अरे, तू कविता करतोस, पण वाचतोसही का?''

मी बाबांकडे पाहात राहिलो. त्यांचा चेहरा शांत होता, पण डोळ्यांत हलकी मिश्कील झाक होती. ते सरळ माझ्याकडे पाहात होते. मी बाबांबरोबर फार क्वचित खोटं बोललो असेन म्हणण्यापेक्षा, त्यांच्या नजरेला नजर देऊन मी बोलू शकत नसे. मी शांतपणे त्यांना काय घडलं ते सांगू लागलो. पाहुण्यांनी मला प्रथम विचारलं की, 'मी किती वर्षं बाबांसोबत आहे?' मला त्यांची सेवा करायला मिळते, सतत सहवास मिळतो म्हणून त्यांना माझा हेवा वाटतो. इथपर्यंत ठीक होतं.

"बाबांच्या सहवासामुळे तुझ्या वागण्या-बोलण्यात काही फरक पडला का?'' असं त्यांनी विचारलं.

मी एवढं म्हटल्यावर बाबा एकदम हसले. त्यांनी विचारलं, "मग? कवितेचं काय?''

सांगावं की नाही ह्या विचारात मी जागचा थोडा हललो. परत स्थिर होण्याचा प्रयत्न केला. मी बाबांच्या कवितेचा भलताच अर्थ तर लावला नसेन ना? काही असो, मी बाबांना सांगू लागलो. "बाबा, सकाळी तुमचं त्यांच्याशी झालेलं बोलणं मी ऐकलं होतं. त्या वेळी-

'वधस्तंभ पेलायचे बळ नाही या कायेत
चाललो मी त्यांच्या छायेत'

ह्यावर तुम्ही त्यांना काही तरी सांगत होता.''

"हं'' बाबांच्या बोलण्यात उत्सुकता होती.

"मी त्यांना म्हणालो, 'येशूनंतर वधस्तंभ घेऊन फक्त बाबा चालले आहेत असं मला वाटतं. खरं ना?' ते सगळे पटकन हो म्हणाले. पुढं मी त्यांना म्हणालो, 'त्या वधस्तंभाच्या छायेत कोण कोण आहे? पत्रकार, संपादक, आय.ए.एस., आय.पी.एस., कलेक्टर, कमिशनर, प्राध्यापक, आमदार, खासदार, साहित्यिक, मंत्री, भक्तगण, तरुण आणि तुम्ही. आता मला सेवकाला त्या वधस्तंभाची

छाया कुठून मिळणार. पण बाबांचे रोजचं वापराचं सामान घेऊन मला तर बाबांच्या मागे यावं लागतं. ते माझं कर्तव्य आहे. त्यासाठी मी मानधन घेतो. आता मी तुमच्या छायेत कडेकडेने धावत राहातो. माझ्यावर काही परिणाम झाला असेल तर तो तुमच्या सावलीत चालण्याचा की नाही?''

मी पटकन बाबांच्या कंबरेचा पट्टा हातात घेतला. काही न बोलता बाबा उभे राहिले. त्यांनी पट्टा कमरेवर बसवला आणि हात पुढे केला. मी काठी हातात दिली. बाबांनी काही क्षण माझ्याकडे रोखून पाहिलं. नजर वळवत 'धन्य आहेस' एवढंच बोलले आणि झोपण्यासाठी खोलीकडे गेले. दुसऱ्या दिवशी फिरायला जाईपर्यंत ते काही बोलले नाही, पण नंतर वातावरण नेहमीसारखं होतं. असं वाटतं, मला बाबा काहीच समजले नाहीत, तर त्यांची कविता काय समजणार. त्यांच्या संस्थेत मी मोठा झालो. पण आता विचार केला, की त्यांची कविता हे त्यांचं आत्मचरित्र आहे असं वाटतं, तर मग काही ठिकाणी सामान्य कार्यकर्त्याच्या दृष्टीनं त्यांची कविता अपूर्ण, काही ठिकाणी चुकीची आहे असं वाटतं. बाबा काळाप्रमाणे बदलत राहिले, माझ्यासारखा कार्यकर्ता पूर्वीच्या बाबांच्या विचारात गुरफटून राहिला का? बाबांनी फार पुढचा विचार केला होता. 'सार्वजनिक संस्थांचं संचलन' ह्या पुस्तकात ते म्हणतात - 'यापुढे त्याग, मानवता इत्यादी गुळगुळीत कल्पनांचं खोटं वलय निर्माण करुन संस्था संचालनासाठी तरुण रक्त आकर्षित करता येणार नाही. त्याग, मानवता, सेवा, देशभक्ती ही जीर्ण झालेल्या शब्दांची वस्त्रं टाकून देऊन विधायक कार्यानं आता अर्थशास्त्राचा 'स्पेस सूट' परिधान केला पाहिजे.' पण त्याच वेळी बाबांनी वाहिलेल्या वधस्तंभाच्या छायेत चालूनही मान्यवरांत तरी कुठं फारसा फरक पडला? काही काळ रोजच्या धकाधकीचा ताण कमी झाला असेल. अनेक तरुण थोडा वेळ छायेत येऊन ठिकठिकाणी त्या छायेचा सुखद गारवा दीनांना, गरिबांना थोडासा का होईना, देत आहेत. तिथं बाबांच्या प्रेमाचा सुवास येत आहे. तीच खरी बाबांची चिरंतन स्मारकं आहेत. तिथं फुलं नसतील, पण सेवेचा सुगंध आहे. ते तरुण म्हणजे, बाबा म्हणतात, 'वधस्तंभधाऱ्यांची सेना' असावेत.

बाबांनी सर्वांत जास्त प्रेम कुणावर केलं? गांधींजी, साने गुरुजी, येशू ख्रिस्त की तरुण? मला वाटतं, ह्या सर्वांवर बाबांनी प्रेम केलं. त्यांच्याबद्दल त्यांना नितांत आदरही होता. पण खरे प्रेम केलं ते महारोगी रुग्णांवर. त्यांच्या सहवासात मला हे सतत जाणवत आलं आहे. शेवटी रक्ताच्या कर्करोगानं ते आजारी होते. खरं तर त्यासाठी आनंदवनमध्ये आय.सी.यू. सेवा निर्माण केली होती. शक्यतो त्यांना सर्वांपासून दूर ठेवण्याच्या डॉक्टरच्या सूचना होत्या, तरी पण, 'मला माझ्या माणसांपासून दूर करु नका,' ह्या हट्टापायी आम्ही त्यांना रोज गाडीवरुन आनंदवनमध्ये विशेष काळजी घेऊन फिरवत होतो ते, आनंदवनातले महारोगी रुग्ण बाबांना दिसत, भेटत राहावेत म्हणून. हजारो रुग्णांना ते नावानं ओळखत होते. हिंडते-फिरते होते तोपर्यंत स्वत: रोज सगळीकडे हिंडून रुग्णांना भेटत. वयस्कर रुग्णांकडून आशीर्वाद घेत. आनंदवनमध्ये रुग्णांना काही कमी पडू नये ह्याची जबाबदारी घेत. आनंदवनमध्ये सरकारी अनुदान मिळे त्यापेक्षा किती तरी जास्त रुग्ण असत व आहेत, पण सर्वांना सर्व सवलती सारख्या मिळाव्यात हा त्यांचा कटाक्ष असे. त्यांनी कधी कुणाकडे हात पसरुन मागितलेलं मी पाहिलं नाही. पण ते म्हणतात त्याप्रमाणे प्रभूचे हजारो हात मदत करत राहिले. त्यात अनेक सामान्य व्यक्तीही होत्या.

आनंदवनमधील महारोगी रुग्ण व बाहेरील रुग्ण असा भेदभावही बाबांनी कधी केला नाही. भारत जोडो यात्रेत महारोगी रुग्णांसाठी काम करणाऱ्या अनेक संस्थांना आम्ही भेटी दिल्या. विशेष म्हणजे, प्रत्येक संस्थेत बाबांना तेवढाच मान मिळत असे, जेवढा आनंदवनमध्ये मिळतो. प्रत्येक संस्थेत कुणी ना कुणी रुग्ण पूर्वी आनंदमध्ये राहून गेलेला असे. साहजिक आम्ही संस्थेत जाण्यापूर्वी तिथं सर्व बाबांना भेटण्यासाठी वाट पाहात असत. प्रत्येक ठिकाणी बाबा तिथल्या रुग्णांशी बोलत, त्यांच्या अडचणी समजून घेत, तिथल्या संस्था संचालकांशी बोलत, काय करता येईल हे त्यांना सुचवत, कुणाकडून मदत घेता येईल ते सांगत. भारत जोडो यात्रेत सर्व राज्यांनी बाबांना राज्याचा पाहुणा (स्टेट गेस्ट) जाहीर केल्यानं सोबत नेहमी तिथले वरिष्ठ शासकीय अधिकारी असत. त्यामुळे अनेक

घेणार नाही.''

सर्वच बाबांकडे विस्फारलेल्या नजरेनं पाहात होते. आम्ही निघालो. तो अधिकारी तिथंच थांबला. मी विचारात होतो, आता काय होईल? प्रेम, कळकळ खूप पाहिली, पण इतकं उत्कट प्रेम कुणाला मिळालं असेल? महारोग्यांच्या जखमा दिसण्याआधी त्यांच्या कपाळावरील वीस शतकांपूर्वीचं परमेश्वराचं चुंबन अशाच माणसाला दिसू शकतं.

त्या दिवशी संध्याकाळ गडबडीत गेली. बसमध्ये बाबांचे उकळलेलं पाणी उद्यापर्यंत पुरेल एवढं होतं. पण ते ह्या जिल्ह्यातलं नाही असं सांगितलं तर बाबांना पटेल का? ह्या जिल्ह्यात अजून दोन दिवस आम्ही राहणार होतो. बाबा बोलतात तसंच चालतात, हे त्या अधिकाऱ्याला काय माहीत. आनंदवन पैशातूनच बोअर केली तर प्रश्न सुटेल. काही सुचत नव्हतं. पुढे काय होईल ते पाहू. बाबांना न विचारता गुपचूप दोघांना मोटरसायकलवर वस्तीवर पाठवलं. सभेच्या ठिकाणी पट्टा देणं, खुर्ची ठेवणं अशा बारीकसारीक गोष्टींत माझ्याकडून चुका होत होत्या. बाबांच्या नजरेतली नाराजी सहन करत मी वेळ काढत होतो. रात्री झोपण्याआधी मागे वस्तीवर गेलेले परत आले. आनंदाची बातमी होती. वस्तीवर बोअर करणं चालू होतं. चाळीस फुटांवर पाणी लागलं होतं. सकाळी पुढच्या मुक्कामावर निघण्याआधी जिल्हाधिकारी एका बाटलीत बोअरचं पाणी घेऊन गाडीपाशी उभे होते. बाबांच्या डोळ्यांत पाणी आलं. बाबांनी त्या तरुण अधिकाऱ्याला त्याच्या खांद्यावर हात ठेवून जवळ घेतलं. पाठीवर कौतुकाची थाप देत म्हणाले,

"तुमच्यासारख्या धडाडीच्या तरुणांच्या भक्कम खांद्यावर देशाचा भार देताना मी धन्य झालो.''

आनंदवनच्या सुरुवातीच्या काळात बोअर करणं शक्य नव्हतं. आज आनंदवनमध्ये जितक्या विहिरी दिसतात त्या सर्व अपंग, महारोगी रुग्णांनीच खोदलेल्या आहेत. हेमलकसा इथली जुनी विहीर माझ्या समोर रुग्णांनी खोदलेली आहे. बाबा सकाळपासून संध्याकाळपर्यंत विहिरीच्या काठावर राहून रुग्णांना प्रोत्साहन देत असत. त्या वेळी अनेक वेळा मी विहिरीवर जात असे. तीन महिन्यांनंतर तीस फुटांवर पहिला झरा लागला त्या वेळी स्वर्ग प्राप्त झाल्याचा आनंद मी बाबांच्या चेहऱ्यावर पाहिला आहे. हे काम नेहमी उन्हाळ्यात चाले. भर उन्हात बाबा त्या रुग्णांबरोबर राहात. भर उन्हात तीस-पस्तीस फूट खोलीवर उघड्या अंगानं काम करणाऱ्या शरद, गोविंद, तुकाराम, नारायण, पुंजाजी, रामदास घामानं चिंब असत. एका-दुसऱ्याला वरून हाकारून बाबा त्यांना प्रोत्साहन देत राहात, खांद्यावरील पंच्यानं कपाळावरचा घाम टिपत राहात. अशाच माणसाला निर्मितीचे वेद स्फुरु शकतात.

'आणि पाहिले त्यांच्या काळ्याशार पाठीवर
घामाच्या उभ्या-आडव्या धारांनी कोरलेले क्रूस
तेव्हाही घडले मला ख्रिस्ताचे समूह दर्शन
आणि गवसलं उत्थानाचं समर्थ आश्वासन'
- करुणेचा कलाम 23

महारोग झाला, बोटं झडली, नाक बसलं, अशा स्थितीत महारोगी रुग्ण घरदार, बायका-मुलं सोडून बाबांच्या घरी आले. एका प्रकारे समाजानं त्यांना क्रूसावर चढचलं, गावातून बाहेर काढलं. नियतीनं हातापायाला खिळे ठोकून त्यांना विद्रूप केलं. बाबांना त्यांच्यात ख्रिस्ताचं दर्शन झालं. ह्याच बाबांना पावसाळ्यात, भर पावसात धानाच्या बांधावर उभं राहून चिखल करणाऱ्या फणकऱ्याला उत्साहित करताना आम्ही पाहात होतो. फणकर फण घेऊन आपल्या बाजूला येत असताना अंगावर चिखल उडेल म्हणून आम्ही बाजूला पळत असू, पण बाबा जागेवर उभे राहून त्याचं कौतुक करत. आता कवितेत समजतं, ते निश्चल उभे का असत! फणकऱ्याकडे पाहाताना-

'माथ्यावरचे घर्मबिंदू तसेच होते
जगाचा भार खांद्यावर वाहिल्याचा श्रांत चेहरा तोच होता

मी चटदिशी धूळमाखल्या धर्ममार्गावरून उतरलो
अन् नांगरधारी ख्रिस्ताच्या पायवाटेनं चालू लागलो
माझ्या पुढून चालणारा तो निर्माता भारवाहक
अजून चालतोच आहे.'
- करुणेचा कलाम 22

बाबा फार पुढचा विचार करत हे त्या कवितेत अनेक जागी जाणवतं. खरोखर, तो निर्माता भारवाहक आज चालून चालून थकला आहे. आत्महत्या करुन तो स्वत:ला क्रूसावर चढवत आहे, तेही बाबांच्या कर्मभूमीत, विदर्भात. शेतीमध्ये काम करणारा नांगरधारी ख्रिस्त, ज्या विज्ञानाची महती बाबा सांगतात त्याच्या प्रगतीच्या खुणा, ट्रॅक्टर्स, बुलडोझरमुळे अडगळीत फेकला गेला. बाबा शरीरानं गेले. ते पदोपदी मला का जाणवत राहातात? मी आजही ज्यांच्या घामात बाबांनी ख्रिस्ताचा क्रूस पाहिला त्या कष्टकरी लोकांबरोबर आहे. त्यांच्या परिस्थितीत फारसा फरक नाही, हेसुद्धा बाबांना आधीच माहीत होतं का? बाबांना दूरदृष्टी होती, की दिव्यदृष्टी? बाबा एका कवितेत म्हणतात-

'यंत्राच्या जगात नाती हरवली
अन् शब्दांनी अर्थ गमावले
द्वेष अन् तिरस्काराची विषारी पकड
हाडांवर घट्ट झाली
इथलं शहाणपण मोठं पण आकलन थिटं आहे
दुर्दैवाचे चेहरेच आता आकर्षक बनले आहेत.'
- करुणेचा कलाम 25

काय खोटं आहे? म्हातारे झाले, हातपाय चालत नाहीत, डोळ्यांना दिसत नाही म्हणून हे निर्माते भारवाहक आज करुणेपोटी, प्रेमापोटी बाबांनी त्यांचा पुढचा विचार करून स्वत: जाण्याआधी त्यांच्यासाठी 'स्नेहसावली' निर्माण केली. त्यात राहून येणाऱ्या-जाणाऱ्यांना प्रेमाने मनापासून आशीर्वाद देत आहेत. जेव्हा पाहुणे त्या सुरकुतलेल्या, पिचलेल्या, केविलवाणे हात जोडून तोंडभर आशीर्वाद देताना, त्यांचे फोटो काढतात, तेव्हा मी बाजूला उभा राहून आवंढा गिळत असतो. इच्छा असूनही डोळे मिटत नाहीत. मला नेहमी भीती वाटते, बाबांना दिसे तसा 'खिन्न ख्रिस्त' मला पाहायचा नाही. माझी ती लायकी नाही. बाबांनी आमच्यावर टाकलेली जबाबदारी आम्ही पेलू शकलो नाही.

बाबा संसारी होते का? होते. त्यांना बायको-मुलं होती. बाबा गेले तेव्हा तर पणतूसुद्धा होते. पण कुटुंबाच्या व्यापात, संसारात ते फारसे कधी नसत. ते काम त्यांनी साधनाताईंकडे सोपवलं होतं. बाबा संस्थेचा संसार करत होते. सर्वांना घेऊन चालण्यात त्यांचं आयुष्य खर्च झालं. त्यांच्या स्वत:च्या खाजगी काही इच्छा अपुऱ्या राहिल्या असतील का? कसरावद मुक्कामी वानप्रस्थात असताना माझ्याशी जो संवाद होई तो सामान्य माणसाबरोबरचा की नाही? खूप गमतीशीर आठवणी सांगत. त्या बोलण्यात खाण्याच्या गोष्टी असत, त्या वेळी ते रंगून जात. एका रात्री नर्मदा किनारी अंगणात कॉटवर पडल्यावर ते म्हणाले,

"विलास, आज दुपारी साधू आला होता. त्यानं आडवं गंध लावलं होतं नाही! इकडे तर सारे शिवभक्त नर्मदा परिक्रमा करतात. हा वैष्णव कसा काय आला?''

मी माझ्या पद्धतीनं उत्तर दिलं,

"बाबा, खोटा साधू असेल, भिक्षेसाठी वेष करणारा.''

बाबा हसले. "अरे, पण नर्मदा परिक्रमा करणं सोपं नाही रे! कुणाला माहीत, खरंच नर्मदा परिक्रमा करतात की नाही?''

थोडा वेळ बाबा बोलले नाहीत. मग त्यांनी मला विचारलं,

"विलास, तू पूर्वीच्या लग्नाच्या पंक्तीत जेवला आहेस का?''

"अनेक वेळा बाबा. मी पुण्यात जन्मलो, पुण्यात वाढलो. निदान तुमच्याकडे येईपर्यंत पुण्यात पेशवाई संपली नव्हती.''

बाबा मोठ्यानं हसले.

"अरे, तू पुण्याचा हे विसरलो मी. विलास, पंगत बसली की दोघं जण वाटीत गंध घेऊन येतात. जोडचांदीच्या साखळीनं थंड गंध लावतात, त्याची आज दुपारी आठवण झाली, त्या साधूचं आडवं गंध पाहून.''

पुढे बराच वेळ आमचं जेवणावळी व गंधावर बोलणं झालं. आता तशा चांदीच्या वाट्या व साखळ्या कुणाकडे असतील का? बाबा म्हणालेसुद्धा,

"अरे विलास, इंदू आली की आठवण कर. अरे, आमच्याकडे होती.''

मी बाबांना म्हणालो,

"मी पुन्हा पुण्याला गेलो की नक्की पाहातो. तुळशीबागेत मिळेलही.''

बाबा गंधात रमले होते. गंध लावणारे आले की मान सरळ पण किंचित झुकती ठेवावी लागते हे कसं तेसुद्धा दाखवलं. "गंध लावणारे घाईत असतात, साखळी वाटीच्या कडावर नीट घासून घेतली नाही की जास्तीचं गंध नाकावर पडतं. पण जर केशर घालून गंध उगाळलेलं असेल तर असा छान वास येतो, की मन प्रसन्न होतं. खरं तर प्रत्येकाला जेवणाची घाई असते, पण यजमान येईपर्यंत वाट पाहाताना तो वास सुखावतो.''

मी बाबांकडे पाहिलं. बाबांनी नाकपुड्या फुगवल्या होत्या. त्यांच्या चेहऱ्या-वरील आनंद, तो वास आता ते घेत असल्यासारखा होता. मला अनेक लग्न-मुंजीतल्या जेवणावळी आठवल्या. धन्य आहे. स्वत:बरोबर त्यांनी सुखद आठवणी दिल्या. मग त्यातून ते खाण्याकडे वळले. कोण पाहुणे, कोण नातेवाईक खादाड होता हे सांगू लागले. मी मनात धास्तावलो, माझं नाव तर समोर येणार नाही ना? मग उत्तर प्रदेशमध्ये चौबे आडनाव कसं आलं. चौबे म्हणजे खरे खवय्ये, एक शेर चौबे, दोन शेर चौबे म्हणजे एका वेळेला तितके शेर लाडू, मिठाई ते खात, ही माहिती दिली. मी समोरच्या, बाबांच्या, उभ्या-आडव्या देहाकडे पाहात होतो. आता जरी आजारपणामुळे बाबांची तब्येत खालावली होती, तरी भव्यता लपत नसे. तरुणपणी बाबा कुस्ती करत, पैलवान होते, असं ऐकलं होतं. त्यांच्या आईला यांना खायला देताना त्यांचं काय होत असावं, असा विचार मनात आला. रात्रीच्या गप्पांत अशा सामान्यपणे गमतीशीर गप्पा होत. कधी कधी दोन-चार दिवस अशा गप्पात खंड पडे तो, नर्मदा बचाव आंदोलनाचे कार्यकर्ते आले, की आमच्या वाट्याला आमचे बाबा येत नसत. आम्ही रात्रीच्या मंद चांदण्यातल्या अगर अंधारातल्या नर्मदा मैय्याच्या मंद आवाजाच्या पार्श्वसंगीतातल्या बाबांच्या आमच्या वाट्याच्या गप्पांना मुकत असू.

जेवणावळी, गंध लावणे मी विसरूनही गेलो. पंधरा दिवसांवर दिवाळी आली होती. इथं दिवाळी पाच-पाच दिवे लावूनच साजरी करायची होती. 'नर्मदा बचाव'साठी बाबा इथं होते. कसरावद मुक्कामी बाबा जरी 'नर्मदा बचाव'साठी राहात असले, तरी सर्व खर्च आनंवनमधून होत होता. अगदी आंदोलनातले कार्यकर्ते इथं येत, राहात त्यांचासुद्धा. वेडावाकडा खर्च बाबांना कधीच मान्य नव्हता. ते स्वत: काटकसरी होते. आनंदवनवर जास्तीचा आर्थिक भार पडू नये म्हणून ते फार दक्ष होते. त्या आठवड्यात आनंदवनहून रेशन घेऊन गाडी आली. सौ. ताईंनी एका पिंप्यात आठवणीनं दिवाळी फराळाचं सामान पाठवलं - लाडू, शेव, चिवडा, चकल्या व शंकरपाळी. इथं बाबा व आम्ही असे पाच जण संस्थेचे होतो. त्यांना पुरेसं होतं. त्या दिवशी जेवताना मी बाबांना, "चकली देऊ का,'' असं विचारलं.

"दे चवीपुरती.'' मी दिलेल्या अर्ध्या चकलीतला एक तुकडा घेत म्हणाले, "राहू दे. दिवाळीच्या दिवशी नर्मदा मैय्यात अंघोळ करून आपण सर्वजण एकत्र फराळ करु. मीसुद्धा नर्मदेत स्नान करीन.

सर्वांना सांग. नर्मदेत अंघोळ करणाऱ्यांना फराळ आहे म्हणून.''

अंगणात नर्मदा असून काही जण अंघोळीला नदीवर जात नाहीत हे त्यांना माहीत होतं. नंतर चार-पाच दिवसांनी बाबांनी दुपारी मला विचारलं,

“फराळाचं किती आहे? असं कर, इकडे घेऊन ये. आपण पाहू.''

सर्व फराळ बाबांसमोर मांडला. लाडू अकरा होते. बाकी चकल्या, शेव, चिवडा बरंच होतं. तो पिंपात परत ठेवून दिला. चार दिवसांनी सकाळी फिरायला जाताना बाबा म्हणाले,

“विलास, पहाटे स्वप्न पडलं. आपले काकाट्रस्टी जेवण्यास बसले आहेत. मी जिलेब्या वाढत आहे. अरे, त्यांच्या पानात जिलेब्यांचा ढीग होता तरी नको म्हणत नव्हते. आणि माझ्या पुढे तू साखळीनं गंध लावत होतास.''

बाबा म्हणत होते ते काका ट्रस्टी दोन वर्षांपूर्वीच वारले होते. बाबांचे जुने सहकारी. वरोरा गावातील व संस्थेचे सदस्यसुद्धा होते. संस्थेच्या वार्षिक सभेनंतर जेवणात बाबा स्वत: सर्वांना आग्रह करून वाढत. ते काका ट्रस्टीही खाण्याचे शौकीन होते. एकंदरीत बाबा अजूनही जेवणावळी व गंध लावण्यातून बाहेर आले नव्हते.

‘गिचमिडीत क्षितिज शोधणाऱ्या जीवनाच्या रेखेचे
नव्या जन्मार्थ चितेत उडी घेणाऱ्या फिनिक्स पक्ष्याच्या राखेचे
अथवा वैराण सीमान्तात अजून घुमणाऱ्या शिलायक्षांच्या
पुरातन हाकेचे.’
- ज्वाला आणि फुले 27

आता ही बाबांची कविता, चार जन्म घेतले तरी माझ्यासारख्या कार्यकर्त्या सेवकाला समजेल काय? त्याच वेळी सामान्य माणसासारखे जेवणावळीचं स्वप्न पडणारे बाबा मला जास्त माझे वाटतात. परत स्वप्नातही ते काही तरी देत होते. लोकांची सेवा करत होते. समोरच्याच्या आनंदात, समाधानात स्वत: धन्यता मानत होते. दुसऱ्यांचा आनंद, समाधान हीच त्यांची ऊर्जा असावी. मग अशा माणसाच्या शब्दावर आम्हा कार्यकर्त्यांच्या उड्या पडल्या नाही तर नवल! माझ्यासारख्याला वधस्तंभाची सावली नाही मिळाली तरी वधस्तंभ वाहणाऱ्याची स्नेहाळ नजर खूप काही देऊन जात असे. बाबांनी स्वप्नातही कुणाला कधी काही मागितलं नसेल का? बाबांच्या स्वप्नात देव कधी येत असेल का? की स्वप्नातही येशूच येत असेल? नाही. बाबांच्या स्वप्नात नक्की रुग्ण, दु:खी, कष्टी, अनाथ, अपंग येत असावेत. त्यामुळे त्यांना कामाची प्रेरणा मिळत असावी. कवितेत ते म्हणतात-

‘मागितलं ते मिळालं नाही
मिळवायचं ते मिळाल्यावाचून राहिलं नाही
मुक्या प्रार्थनांना होकार आले
अन् दु:खच माझ्या सुखाचं साक्षीदार झालं.’
- करुणेचा कलाम 42

दिवाळी आली. बाबांनी एका सकाळी आम्हाला बोलावलं. कसरावद गावातल्या पाच कार्यकर्त्यांना दिवाळीच्या फराळासाठी बोलवावं असा विचार मांडला. बाबा सर्वांना घेऊन चालत म्हणाले,

“फराळाचं आलेलं आहेच, त्यांच्याबरोबर आपण सर्व फराळ करू. आणखी काही करायचं नाही. वेळेवर पोहे नाही तर शिरा करण्याची तयारी ठेवा. फराळानंतर त्यांना चहा देऊ. केळीची पानं वेळेवर आणा. रांगोळी कोण काढेल?''

सगळे कामाला लागले. गावात निरोप गेला. बाबा मधूनमधून, फराळाचं पुरेल ना? अशी चौकशी करत होते. चार वेळा पत्र्याच्या शेडमध्ये येऊन सूचना करत होते. स्वच्छ आहे ना? टेबलं

कशी मांडली आहेत? कोण कुठे बसेल? फराळानंतर व आधी हात धुण्यास गरम पाणी कोण ठेवणार? हात पुसण्यास टॉवेल धुतलेला स्वच्छ आहे ना? खरं तर हे आम्हाला परिचयाचं, नेहमीचं होतं, तरी येणारा येऊन जाईपर्यंत हे असंच चालणार होतं. बाबांना मी विचारलं,

"बाबा, गंधाची वाटी-साखळी तर नाहीये.''

बाबा हसले. त्यांचा चेहरा आनंदी झाला. काही क्षणात गंभीर होत त्यांनी माझ्या खांद्यावर हाताचा पंजा दाबला व म्हणाले,

"केशराचा वास मला तुमच्या कामातून येत राहातो.''

बाबा लांब लांब पावलं टाकत खोलीकडे गेले. त्यांच्या डोळ्यांतील कौतुकाचे अश्रू मला त्यांच्या पाठीमागूनही दिसत होते.

एकदाचा तो दिवस उजाडला. आम्ही फिरुन येईपर्यंत हॉल सजला होता. फराळासाठी साडेआठची वेळ दिली होती. तरी बाबांनी दोनदा विचारलं, बरोबर निरोप दिला की नाही? निरोप कुणी दिला? शेवटी सव्वाआठ वाजता मोहनभाई आले, पण ते एकटे न येता एका लहान मुलाला सोबत घेऊन आले. कैलास आला तो मुलाला व पत्नी व दोन मुलांना घेऊन. आणखी एक जण नातवाला घेऊन आला. बाबांनी डोळ्यांनीच विचारलं, 'कसं काय?' ते खोलीकडे गेले. मी मागोमाग आत गेलो. बाबांनी विचारलं, "अरे, लाडू किती आहेत?''

मी शांतपणे म्हणालो, "बाबा, अकराचे बावीस करता येतील. मी पंडितला थोडा शिरा करायला सांगतो. रवा आणून ठेवला आहे.''

बाबा चटकन म्हणाले, "अरे, मला लाडू वाढू नकोस.''

येणारे सर्व गावातले कार्यकर्ते होते, पेशानं शेतकरी होते. बाबांनी बोलावलं ह्यात स्वत:ला धन्य मानणारे होते. खरं तर फराळाचं काय आहे, काय नाही ह्याचं त्यांना काही देणंघेणं नव्हतं. मोठ्या भक्तिभावानं, ते प्रसादाला यावे तसे, आले होते. इतर दोघं दोन-दोन मुलं घेऊन आले. मग वेळेवर मोठी माणसं टेबल-खुर्च्यांवर व लहान मुलं खाली सतरंजीवर, असा फराळाचा कार्यक्रम पार पडला. बाबांनी त्यांच्याबरोबर फराळ केला. सगळे निरोप घेऊन गेले. बावीसमधल्या एका लाडवाचा तुकडा शिल्लक होता. बाबा त्याकडे पाहात होते. त्यांनी काही म्हणण्याअगोदर मी म्हणालो,

"बाबा, हा अर्धा लाडू नर्मदा मैय्याला अर्पण करतो.''

बाबा काही न बोलता बघत राहिले. नंतर म्हणाले,

"कसं रे विलास, सगळं संपलं. तुम्ही तर फराळाचे राहिलात ना?''

"बाबा, वाजले किती पहा. साडेदहा. आता कुठला फराळ. आम्ही जेवतोच की! शिरा आहे ना.''

बाबा तिथून निघत म्हणाले,

"मी आज जेवणार नाही. फराळ खूप झाला. माझ्या जेवणानंतरच्या गोळ्या दे. मी पडतो आता.''

मी कोकणस्थ आहे याचा इतके दिवस मला अभिमान होता. पण आपल्यापेक्षा कुणीतरी सरस आहे तर! कोणत्याच गोष्टीत बाबा मागे नाहीतच का? गमतीचा भाग सोडा. केवळ आनंदवनावर मी इथं राहून करत असलेल्या कामाचा आर्थिक भार पडू नये म्हणून ही काटकसर, तरी त्यात लोकांना खाऊ घालण्याची ओढ. आणि शेवटी माझ्यासाठी आपले संसार सोडून इथं राहणाऱ्यांना फराळाचं नाही ही खंत. परत म्हणून स्वत: एक वेळचं जेवण न करण्याचा निर्णय. कठीण आहे. एक वेळ बाबाची कविता समजेल, पण बाबा कधी समजतील?

बाबांना सगळ्यांना खाऊ घालण्यात मोठा आनंद होत असे. समोरचा पोटभर जेवला की परमानंद. जन्मभर बाबांनी अन्नछत्र चालवलं. त्याच वेळी महारोगी रुग्ण, अंध, अपंग, मुके, बहिरे व आदिवासी ह्या सगळ्यांना संस्थेत व्यवस्थित आहार मिळतो ना, ह्याकडं बारीक लक्ष ते जातीनं देत. कधी कधी मागे आम्ही 'बाबांचं लंगर' किंवा 'बाबा दी धाबा' असं गमतीनं म्हणत असू. आनंदवनमध्ये सर्व सण साजरे होत. पोळ्याला व होळीला सगळीकडे पुरणपोळी व भजी असं जेवण

असे. बाबांना पुरणपोळी आवडत असे. बाकी इतर वेळी साधं पण अजिबात तिखट नसलेलं जेवण ते जेवत. शिवरात्री व एकादशीला सगळीकडे उपवासाचं फराळाचं जेवण असे. मी कधी कुठलाच उपवास करत नसे. पण फराळाची साबुदाणा खिचडी खात असे. बाबांचं सगळीकडे बारीक लक्ष असे किंवा सगळीकडे देत असत. संस्थेची व संस्थेतल्या कार्यकर्त्यांची बारीकसारीक माहिती त्यांना असे. 'सामाजिक संस्थांचं संचलन' ह्या पुस्तकात मात्र ही महत्त्वाची सूचना कुठंही नाही. एकदा गप्पांत बाबांनी मला विचारलं,

"विलास, तू उपास करत नाहीस का?''

मी माझ्या पद्धतीनं उत्तर दिलं होतं,

"बाबा, ज्या दिवशी खाण्यासच काही मिळणार नाही त्या दिवशी माझा उपवास!''

बाबा फक्त हसले. मी कधी आगाऊपणे बोललो की बाबा फक्त हसत. मी संस्थेत होतो. इथं कधी कुणी उपाशी राहात नाही. निदान बाबा होते तोपर्यंत. हे दोघांना माहीत होतं.

आम्ही भारत जोडो यात्रेदरम्यान बियास गावी राधास्वामी आश्रमात मुक्कामास होतो. बाबांच्या राहण्याची व्यवस्था एका खास गेस्ट हाऊसमध्ये होती. बाबांना यात्रेतील तरुणांपासून वेगळं राहाण्यास कधी आवडत नसे. पण इथं नाइलाज होता. इतरांची व्यवस्था नीट आहे हे स्वत: पाहून बाबा गेस्ट हाऊसवर राहाण्यास तयार झाले. आश्रम पाहून आम्ही गेस्ट हाऊसवर पोहोचलो. सोबतचे मान्यवर दुसरीकडे राहाण्यास गेले. सोबतचे बस घेऊन जेवणासाठी चालले गेले. विजू जुमडे आमच्या दोघांचं जेवण जीपने आणून देणार होता. आता मी व बाबा, दोघंच जण त्या सुरेख भव्य गेस्ट हाऊसवर होतो. बाबा फ्रेश होऊन कॉटवर पडले. कधी नव्हे ते आज कुणी भेटण्यासाठी आलं नव्हतं. मी जीपची वाट पाहात खिडकीपाशी उभा होतो. बारा वाजण्यास काही वेळ होता. नेमका वाटेत एका सभेमुळे नाश्ताही करता आला नव्हता. सकाळी चार वाजता घेतलेल्या कपभर चहावर मी होतो. जीप आली. विजूनं दोन डबे आणले. एक बाबांचा तिखट नसलेला, दुसरा माझा. बाबांना ऐकू येणार नाही अशा आवाजात तो म्हणाला, 'मस्त आलू पराठे, रस्सा भाजी व पुलाव आहे.' तो घाईत होता. विचारल्यावर समजलं, इतर भारत जोडो यात्री उतरले आहेत तिथं प्रसिद्ध नट खासदार सुनील दत्त आले आहेत. तो चालला गेला.

मी बाबांच्या जेवणाची तयारी केली. बाबांनी हात धुतले. टेबलापाशी उभे झाले. तेवढ्यात बाहेर गाडीचा आवाज झाला. मी पुढे होऊन दार उघडलं. प्रसिद्ध नट खासदार सुनील दत्त बाबांना भेटण्यासाठी आले होते. ते आत आले. मोठ्या भक्तिभावानं खाली वाकून बाबांना नमस्कार केला. बाबांना आनंद झालेला त्यांच्या प्रसन्न चेहऱ्यावरून दिसत होतं. भारत जोडो यात्रेबाबत गप्पा सुरू झाल्या. बाबांची भारत जोडो यात्रा सुनील दत्त ह्यांना भावली होती. बोलता बोलता सुनील दत्त यांचं लक्ष टेबलावरील जेवणाच्या तयारीवर गेलं. ते म्हणाले, 'बाबा, आपण जेवा. मी तर बोलत राहणार.' बाबांनी त्यांना जेवणाबद्दल विचारलं. त्यांनी पटकन 'जेवण झालं नाही' हे सांगितलं. बाबांनी फक्त माझ्याकडे पाहिलं. मी दुसरं ताट आणलं. नंतर अर्धा तास गप्पा मारत बाबा व ते जेवत होते. माझा डबा सुनील दत्त, बाबांचा डबा बाबा. मी जड अंत:करणानं एक-एक पराठा सुनील दत्त ह्यांना वाढत होतो. तो तगडा माणूस माझा डबा व उरलेला बाबांचा डबा फस्त करत होता. सर्व विषयांवर त्यांचं बोलणं रंगात आलं होतं. नंतर टेबलावरील ज्यूसकडे त्यांचे लक्ष गेलं. त्यांनी स्वत: एका ग्लासात ज्यूस बाबांना दिला. उरलेला तीन-चार घोटांत संपवला. एकंदरीत ते जेवणावर व गप्पांवर खूश होते, म्हणून बाबासुद्धा आनंदी दिसत होते. काही वेळानं 'बाबा, आराम करा, मी निघतो,' म्हणत त्यांनी पुन्हा भक्तिभावानं नमस्कार केला. ते चालले गेले. बाबांना दुपारच्या औषधाच्या गोळ्या दिल्या. ते कॉटवर पडल्यावर रिकामे डबे मी धुण्यासाठी उचलून नळावर गेलो. दुपारी चार वाजता बाबांची बस आली. आम्ही संध्याकाळच्या सभेसाठी निघालो. बसमधले सारे खूश होते. सुनील दत्त यांच्यासोबत फोटो काढून घेतले होते. बाबांचं लक्ष नाही असं पाहून मी चौकशी केली, बसमध्ये खाण्यासाठी काही नव्हतं. सभेआधी आम्ही स्टेजवर असताना बाबांनी खुणेनं

मला बोलावलं. तिथं मेहरसिंग नावाचे एक गृहस्थ उभे होते. मला बाबांनी त्यांच्याबरोबर जाण्यास सांगितलं. मी जागीच उभा होतो. सभा सुरु होणार होती. मी कसं जावं. तेवढ्यात तिथं अतुल आला. हा इथं स्टेजवर कसा? असा विचार करत असताना बाबा म्हणाले,

"विलास, ह्यांच्याबरोबर जा, माझ्याजवळ आज अतुल राहील.''

मी निघालो खरा, पण मला काही समजत नव्हतं. ह्यांच्याबरोबर मला कुठं जायचं आहे? पण बाबा जा म्हणतात म्हणजे काही तरी महत्त्वाचं असणार. मोठं जबाबदारीचं काम सोबतच्या मान्यवरांना न सांगता मला सांगितलं आहे तर! मी छाती फुगवून त्या गृहस्थाच्या मागे जाऊ लागलो. भुकेनं पोटात खड्डा पडल्यावर छाती फुगवता येत नाही हे प्रथमच समजलं. सभेच्या गर्दीतून वाट काढत आम्ही रस्त्यावर आलो. समोरचा गृहस्थ एकदम एका हॉटेलात शिरला. मला खुर्चीवर बसवून आत चालला गेला. तो परत बाहेर आला तेव्हा त्याच्या सोबत चार-पाच डिशेस घेऊन वेटर होता. माझ्याजवळ बसत स्वत: चहा पिता पिता म्हणाला,

"आप पेटभर खाना, ये होटल आपका समजो. बाबासाहब बोल रहे थे, आपने सुबहसे कुछ भी खाया नहीं.''

भरल्या डोळ्यांनी मी परोठा तोडू लागलो. मला माझ्या आईची आठवण झाली. घाईघाईनं जेवून त्या गृहस्थांना धन्यवाद देत मी सभास्थानी पोहोचलो. यदुनाथजींचं भाषण चालू होतं. मी बाबांकडे पाहात होतो. त्यांचं माझ्याकडे लक्ष गेल्यावर त्यांची नजर मिश्कील, आनंदी होती. ते फक्त हसले, परत समोर सभेकडे पाहू लागले. मला हसू आलं. पोट भरल्यावर हसू किती चांगलं येतं हा विचार मनात येताच मी दचकलो. मी सकाळपासून उपाशी आहे हे बाबांना माहीत होतं तर! बाबांच्या प्रत्येक हालचालीवर माझं बारीक लक्ष असतं. नुसत्या बाबांच्या चेहऱ्यावरील भावावरून मी त्यांच्या मनातील ओळखू शकतो हा माझा गर्व एकदम खाली आला. माझ्यापेक्षा बाबांचीच माझ्यावर जास्त करडी नजर असते हे समजलं.

त्या रात्री झोपण्याआधी हसत ते म्हणाले,

"विलास, तुला उपास घडला, पण अर्ध्या दिवसाचा!''

त्यांना कसली तरी आठवण झाली. ते कुशीवर वळताना म्हणाले,

"इंदू दिवस दिवस निर्जळी उपवास कसे करत असेल!''

बाबांना साधनाताईंचे उपवास आठवले. त्यातले कित्येक बाबांच्या प्रकृती स्वास्थ्यासाठी असत. पण त्याच वेळी काही वर्षांपूर्वीची ती माझी उपवासाची व्याख्यासुद्धा त्यांना आठवत होती तर! दिवसभर ते माझी सहनशक्ती मापत होते की काय? मग मी सकाळपासून एक एक गोष्ट आठवून, मी कुठं चुकलो का ह्याची उजळणी करु लागलो. सुनील दत्त जेवत असताना माझ्या चेहऱ्यावर दिसत होतं का? पण अनेक वर्षं आदिवासींत राहिल्यावर चेहऱ्यावर कोणतेच भाव दाखवू नये हे शिकलो होतो.

'आपण सर्वत्र हजर राहू शकत नाही म्हणून
परमेश्वरानं आई निर्माण केली.'
- करुणेचा कलाम 28

बाबांना स्वत: आईबद्दल प्रचंड प्रेम होतं. 'माझ्या आईचं  वेड' हा त्यांचा आईवरील लेख प्रसिद्ध आहे. बाबा शेवटी कर्करोगानं अंथरुणावर असताना प्रो. श्रीकांत पाटील यांनी बाबांसाठी त्यांचं वाचन केलं, त्यावेळी मी बाबांच्या डोळ्यांत अश्रू पाहिले होते. अनेक कवितांत आईच्या प्रेमाचा उल्लेख आहे. आईचं हृदय कसं असतं ह्यावर अनेक वेळा भाषणात ते बोलत. गरीब, आजारी, दीन-दुबळ्यांकडे तुम्ही नेहमी आईच्या नजरेनं पाहा, असं ते म्हणत. भारत जोडो यात्रेत अनेक भाषणांत वरील ओळींचा संदर्भ घेऊन बोलत. अपंग, मंदबुद्धी, मतिमंद मुलं ज्यांच्या पोटी असतात त्यांचे हाल त्यांनी जवळून पाहिले होते. आनंदवनात अंध, अपंग शाळाही सुरु केल्या होत्या. एकदा भाषणात

ते म्हणाले, 'गांधी म्हणत, तुमच्या विचारात सद्भाव, करुणा वाढावी म्हणून परमेश्वरानं अशी लेकरं निर्माण केली आहेत.' मी नेहमी जवळच असे. काही भाषणं मला पाठही झाली होती. बरंचसं मी विसरून जात असे. पण दोन-तीनदा हा उल्लेख ऐकल्यावर मी विचार करु लागलो. परमेश्वराचं ठीक आहे, आई-वडिलांना सुधारण्यासाठी त्या मुक्या, आंधळ्या, अपंग मुलांच्या आयुष्याची नासाडी का? एका रात्री मी बाबांना विचारलं, 'हे तुम्हाला पटतं का?' बाबा त्यावेळी काही बोलले नाही. नंतर तसा उल्लेखही त्यांनी केला नाही. नंतर अशा मुलांची व्यथा सांगून ते म्हणत, 'यांची काय चूक होती म्हणून त्यांना असं आयुष्य मिळालं? त्यांची काळजी घेण्यासाठी परमेश्वरानं आई निर्माण केली.'

बाबांना अनेक वेळा टीकेला सामोरं जावं लागलं. कधी जातीयवादी लोकांमुळे तर काही वेळेला बुद्धिजीवींकडून. पण बाबांनी त्याकडे दुर्लक्ष केलं. आपलं काम करत राहिले. बाबांनी पंजाबमध्ये शांतीमार्च काढला. चार वेळा ते प्रत्यक्ष मृत्यू समोर दिसत असून अशांत पंजाबात फिरले. कारण तिथला अत्याचार, हत्या त्यांना सहन होत नव्हत्या. एवढंच नाही, तर जर ते तसंच चालू राहिलं तर देशाचे तुकडे होतील, हे महत्त्वाचं कारण होतं. अनेकांचा समज होता, ते प्रसिद्धीसाठी करत आहेत. भारत जोडो यात्रेच्या वेळी अनेक वेळा हा धोका बोलून दाखवत. गांधींच्या सत्याग्रहामुळे देशाला स्वातंत्र्य मिळालं असं म्हटलं, तर मग भगतसिंग, राजगुरू, आझाद आणि इतर क्रांतिकारी फुकट मेले की काय? बाबांच्या पंजाबमधल्या शांतीयात्रेमुळे पंजाब शांत झाला असं नाही, तर तिथल्या लोकांची शांततेसाठी मानसिक तयारी होऊन पोलीस कारवाई करणं सोपं झालं. चार-पाच वर्षांपूर्वी काही वृत्तपत्र संपादक व मान्यवरांनी भामरागड भागात नक्षलवाद्यांच्या विरोधात एक शांतीयात्रा काढली. पोलीस संरक्षणात पार पडली. त्यावेळी मान्यवरांनी बाबांना शांतीयात्रेत सहभागी होण्यासाठी विचारलं. बाबांनी नकार दिला. नक्षलवाद ही एक चळवळ आहे असं ते म्हणाले असावेत. त्यावेळी वृत्तपत्रांतून गदारोळ झाला - बाबा नक्षलवाद समर्थक आहेत. बाबा नक्षलवाद्यांना घाबरलेले आहेत. - इतकी टोकाची निंदा झाली. बाबा शांत राहिले. बाबा ह्या भागात चाळीस वर्षांपूर्वी आले. लोक-बिरादरीच्या माध्यमातून आदिवासींमध्ये काम करत होते. आदिवासींचे शोषण स्वत: जाणून होते. शासकीय बंधनांवर त्यांनी अनेक प्रश्नांवर आवाज उठवला होता. एकट्याच्या हिमतीवर आदिवासींना एकत्र करून इंचमपल्ली धरणाविरोधात काम करून धरण होऊ दिलं नाही. बाबांनी अनेक वेळा लक्ष वेधूनही शासन ठप्प राहिल्यानं नक्षलवादी चळवळ ह्या भागात वाढली. बाबा कोणत्याही अत्याचाराच्या व हत्येच्या विरोधात होते, ह्यावर कुणाचं दुमत नसावं. खलिस्तानवाले भारतातून फुटून वेगळा देश मागत होते तेव्हा एकटे बाबाच पंजाबात शांतीयात्रा काढत होते. नक्षलवाद्यांनी कधीही भारतातून फुटून वेगळा देश मागितलेलं ऐकिवात नाही. सर्व राजकीय पक्षांनी दिल्लीवर आपला झेंडा लावलाच आहे, त्याप्रमाणे नक्षलवाद्यांना दिल्लीवर लाल झेंडा फडकवायचा आहे. हिंसा काय फक्त नक्षलवादी करत होते का? प्रश्न आदिवासींचा होता. पोलिसांनी मारलेल्या नक्षलवाद्यांत नव्वद टक्के आदिवासी होते. नक्षलवाद्यांनी मारलेल्या पोलिसांत नव्वद टक्के आदिवासी होते. आदिवासींच्या पाठीशी सरकार, शासन यंत्रणा, पोलीस होते. आणखी पाठीशी आहोत म्हणून शांतीयात्रा काढण्यात काय हशील? आदिवासींच्या पाठीशी नाही, तर त्यांच्या पुढे राहून दोन्हीकडच्या गोळ्या छातीवर घेणारा हवा आहे.

अनेक सामाजिक चळवळींशी, त्यांच्या कार्यकर्त्यांबरोबर बाबांचा जवळचा संबंध होता. अनेक चळवळी सोमनाथ श्रम शिबिरातून जन्म घेऊन मोठ्या झाल्या. सोमनाथचं श्रमसंस्कार शिबीर हे बाबांचं लाडकं अपत्य होतं. दर वर्षी दोन महिने आधीपासून ह्या शिबिराची बाबा तयारी करत असत. अनेक तरुण ह्या शिबिरातून बाहेर पडून आपापल्या कुवतीप्रमाणे ठिकठिकाणी समाजासाठी काम करत आहेत. मी दर वर्षी ह्या श्रमसंस्कार शिबिरात हजर राहात नव्हतो. दोन-तीन वेळा मी होतो. त्यात मला अनेक धडे मिळाले. त्याचबरोबर मी जो बाबांना समजून घेण्याचा प्रयत्न करत असे त्यात भर पडली, तर कधी माझा आणखी गोंधळ उडाला. भारत जोडो यात्रेच्या दुसऱ्या पर्वाआधीच्या शिबिराला मी हजर राहिलो, पहिल्या भारत जोडो यात्रेतील येणार होते व नवीन भारत जोडो

यात्रेसाठीसुद्धा नवीन तरुण येणार होते म्हणून. श्रमसंस्कार शिबिरात संस्थेतल्या कार्यकर्त्यांना एक एक काम नेमून देत असत. त्या वर्षी मला बाबांनी शिबिराच्या खर्चाची नोंद ठेवण्याचं काम सोपवलं.

बाबांकडे येऊन मला पंधरा वर्षं झाली होती. मी मुरलेला कार्यकर्ता होतो. म्हणजे तशी माझी भावना होती. सात दिवस प्रत्येक ठिकाणी हजर राहून मी व्यवस्थित नोंदी करत होतो. अगदी जेवणासाठी लागणाऱ्या जळणाऱ्या काड्यासकट मी मांडून ठेवलं. कोणतीही वस्तू, धान्य किती किलो एवढचं न लिहिता, समोर बाजारभावाप्रमाणे अंदाजे किंमतही मी काढून लिहिली. शिबिरार्थींना गाडीने बस स्टेशनवर सोडण्याचा डिझेल खर्चही हिशेबात घेतला. माझ्या कामावर मी खूश होतो. बाबा नेहमी काटकसर करण्यास सांगतात. आता मी बाबांना विचारु शकेन, एवढा खर्च झाला, त्याचा फायदा काय? अशा मूर्ख विचारात मी दंग होतो.

रात्री मी माझा हिशेबाचा कागद बाबांकडे दिला. बाबांनी शांतपणे व्यवस्थित वाचला. मी कौतुकाची अपेक्षा करुन उभा होतो. तोच खटकन प्रश्न आला,

"विलास, चौथ्या दिवशी बरंच अन्न वाया गेलं. उरलेलं खाऊन दोन बैलांची पोटं फुगली असं शंकर म्हणत होता.''

"हो बाबा, खरं आहे. मागच्या पानावर दिवसाप्रमाणे रेशन लिहिलं आहे. पाचव्या दिवसापासून रेशन कमी घेतलं आहे. त्या दिवशी भाजी आवडली नाही म्हणून...''

आता बाबांचा स्वभाव माहीत झाला होता. बैलांची पोटं फुगण्याएवढं अन्न उरलं नव्हतं. पण प्रत्येक गोष्ट मला माहीत आहे हे सांगताना बाबा नेहमी वाढवून सांगत.

नंतर मात्र सर्व हिशेब पाहून बाबांनी एक कौतुकाचा कटाक्ष माझ्याकडे टाकला. म्हणाले,

"अरे व्वा! तू किमतीही काढल्या का? सोळा हजार चारशे शहाहत्तर रुपये.''

मी दुसरीकडे पाहात विचारलं,

"बाबा, एवढा खर्च झाला आपला, त्याचा उपयोग काय?''

बाबांनी एकटक माझ्याकडे पाहिलं. हसत ते म्हणाले,

"विलास, खर्च झाला त्यातली एक पैही माझी नाही ना तुझीही नाही. रुपये कुणाचे खर्च झाले, समाजाचे. खर्च कुणासाठी झाला, समाजासाठी. हे जे तरुण गेले, ते उद्याच्या भारताचे नागरिक आहेत. अगदी मोजक्यांनी जरी त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या लोकांच्या श्रमाची किंमत ठेवली, काहींनी समाजासाठी आयुष्याचा एक दिवस जरी दिला, तरी ही किंमत वसूल झाली.''

माझा गोंधळ उडाला. एवढा मोठा विचार? खरं आहे, त्याची किंमत समाजाच्या दृष्टीनं ह्या रकमेच्या किती तरी पट आहे. त्याच वेळी एक दिवस अन्न वाया गेलं ह्याची जाणीव ह्या भल्या माणसाला आहे. तरुणावर बाबांचे प्रेम उच्च कोटीचं होतं. ह्या नवीन पिढीबद्दल त्यांना फार अपेक्षा होत्या. श्रमसंस्कार शिबिरात अनेक भागातील तरुण येत. बाबा नेहमी त्यांच्याशी बोलत राहात. भारत जोडो यात्रा ह्या तरुणांच्या भरवशावर काढल्या होत्या. भारतभरचे तरुण-तरुणी हजारो मैल सायकलवर बाबांसोबत होते. भारतातल्या निरनिराळ्या प्रदेशातल्या चालीरीती, प्रथा सर्व तरुणांनी पाहाव्यात, अनुभवाव्यात हा खरा उद्देश होता. कोणत्याही राजकीय पक्षाची मदत घेतली नव्हती, पण कोणत्याही राजकीय विचाराच्या तरुणाला येण्यास मज्जावही केला नव्हता. सर्व धर्म, सर्व पंथ व सर्व विचारांचे तरुण एकत्र बांधून, सहा महिने खडतर प्रवास करणं सोपं नाही. हा बाबांचा मोठेपणा नेहमीच झाकलेला राहिला. काही लोक म्हणतात, काय उपयोग झाला भारत जोडो यात्रेचा? माझ्यासारख्याची मित्रमंडळी म्हणत, 'काय, जोडला का भारत?' मी गप्प राहात असे. बाबा फार पुढचं पाहात. ह्यांना आज नाही, काही वर्षांनी कळेल.

बाबा पक्के विज्ञाननिष्ठ होते. संस्थेत सर्व प्रकारची यंत्रसामग्री असावी, मानवी कष्टाला विज्ञानाची जोड मिळाली तर क्रांती होईल, ही त्यांची धारणा होती. तरीसुद्धा यंत्रयुगात माणुसकी व करुणा राहिली पाहिजे असं त्यांना वाटत असे. बाबांच्या कवितेत विज्ञानाचं गुणगान केलं आहे.

'लक्ष लक्ष प्रकाशवर्षांच्या पलीकडल्या महाविस्तारापर्यंत

त्याच्या दुर्बिणीचा डोळा जाऊन भिडला आहे.'
- ज्वाला आणि फुले 84

कलियुगाची महती सांगताना कधी ते म्हणतात-

'आणि ते पहा लोहपंख्याचे साहसी थवे
आकाशाचे अग्निचुंबन घेण्यासाठी
त्रेत्यातल्या वायुपुत्राहून उंच झेपावले आहेत
अणूच्या घोड्यावर बसून
आकाशगंगेला पालाण घालत
माझं कलियुग अटकेपार जाऊन पोहोचलं आहे.
- ज्वाला आणि फुले 85

बाबा अनेक कवितांत विज्ञानाची महती सांगतात. तरीपण त्याच वेळी रोजच्या जीवनात माणुसकी व करुणा ह्यांची साथ सोडू शकत नव्हते. एका संतपुरुषाची कथा मी लहाणपणी ऐकली होती. तेव्हा ती मला खोटी वाटली होती. कथा अशी होती - ते महान संत शिष्यावर भयंकर संतापत असत. एकदा ते असेच संतापले. कुणाला म्हणजे कुणालाच आवरत नव्हते. सर्व जण घाबरले. ते त्या रागात दूर निघून गेले. काही वेळानं त्यांचे शिष्य त्यांना भेटण्यास गेले तेव्हा ते संत शांत होते. त्यांनी विचारलं, 'अरे, मी ज्यावर संतापलो तो कसा आहे? जेवला का?' सर्वांना आश्चर्य वाटलं. तेव्हा ते संत म्हणाले, 'अरे, माझा राग फक्त मानेवरचा आहे. खाली हृदयात नाही. तिथं तुम्हा सर्वांबद्दल प्रेम आहे.' आता असं वाटतं, ह्या संतात आणि बाबांमध्ये काय फरक आहे? त्यांचे विचार विज्ञाननिष्ठ होते. ते कर्मकांड मानत नसत. पण ते सगळं असलं तरी हृदयात फक्त प्रेम, माणुसकी व करुणाच भरली होती. ते नेहमी म्हणत, 'मी मतभेद समजू शकतो, पण मनभेद का?' आणि खरोखर अनेक वेळा मतभेद असलेल्या व्यक्तींबरोबर त्यांचे व्यवहार सौजन्यपूर्ण, चांगले होते ह्याला मी साक्षीदार होतोच की! प्रेम व करुणा हे त्यांच्या स्वभावाचे दोन मुख्य भाग होते. तरीसुद्धा करुणेचं वर्चस्व जास्त होतं. कधी कधी एखाद्या दु:खी-कष्टी व्यक्तीमुळे अपार करुणा त्यांना व्यापून टाकत असे. ते त्या आतून उफाळून येणाऱ्या करुणेपुढं अगदी अगतिक होऊन जात. असा एक प्रसंग मला आठवतो.

हेमलकसा इथं सुरुवातीची सात-आठ वर्षं मी प्रकाशसोबत दवाखान्यात काम करत होतो. रोज नवीन अनुभव घेत होतो. तरुण होतो. ना धड आदिवासी बोली येत होती. पावसाळ्याचे सहा महिने आदिवासींचं जीवन जगत होतो. सूर्य उगवला, सूर्य मावळला. आजूबाजूला जंगल, सोबतचे वन्य प्राणी, पक्ष्यांच्या आवाजाखेरीज दुसरा आवाज नाही. सकाळी दवाखाना सुरु होत असे. वडाच्या झाडाखाली. अशाच एके दिवशी एका आदिवासीनं वेदनेनं रडत असलेल्या, विंचू चावलेल्या आदिवासी रुग्णाला मंत्र टाकून बरं केलेलं आम्ही पाहिलं. डोळ्यांवर विश्वास ठेवावा लागतोच. मंत्रतंत्र अशा गोष्टींवर विश्वास तर नव्हताच. निदान मी रामनाम घेणारा, देवाला नमस्कार करणारा होतो. प्रकाशला तेही करताना कधी पाहिलं नव्हतं. मग गमतीनं त्या आदिवासीकडून तो विंचू उतरवण्याचा मंत्र खटपटी करुन मिळवला. आम्ही कधी वापरणार तर नव्हतो, पण केवळ गंमत म्हणून घेतला. खरं तर इथं आम्ही आदिवासींच्या अंधश्रद्धा दूर करण्यासाठी आलो होतो. आता असं वाटतं, बाबा कवितेत काय काय अबोध लिहीत ते वास्तवाला कधी धरुन होतं का? 'श्रम-सरितेच्या तीरावर' ह्या कवितेत म्हणतात त्याप्रमाणे हेमलकसाच्या सुरुवातीला आमची स्थिती होती की काय?

'खपणाऱ्यांच्या तपोभूमीवर
श्रमरसाचे सुगंधी गुत्ते
झिंगलेल्यांनी आता गजबजून जावेत
त्याची चटक लागली तर'
- ज्वाला आणि फुले 70

अशा झिंगलेल्या अवस्थेतच आम्ही कदाचित मंत्र, तंत्र ह्याकडे ओढले गेलो असू. पुढे आम्हाला अनेक जण येऊन मिळाले. हेमलकसाची सुरुवातीची दहा-बारा वर्षं आम्ही एकत्र अशाच झिंगलेल्या अवस्थेत घालवली म्हणण्यापेक्षा बाबांच्या स्वप्नात स्वप्नं रंगवली. नंतर तेच काम, तेच जीवन स्वीकारुन आम्ही इथंच रमलो. बाबा नेहमी पुढचा विचार करत. आमचा पुढचा विचार बाबांनी आधीच केला होता, आम्हाला पडणारे प्रश्न त्यांना आधीच पडले होते, त्याची उत्तरं तयार होती, त्यांचं मार्गदर्शनही होतं.

'जगणं हरवून बसलेली कलेवरंही तिथं गर्दी करतील
प्रज्ञेच्या पुत्रांनी तिथं स्वप्नांना शब्द द्यावेत
श्रमाचे पुत्र त्या स्वप्नांना अर्थ देतील.'
स्वेद-रसाच्या मद्यशालेत त्या स्वप्नांना आकार येईल.
- ज्वाला आणि फुले

अशी सुरुवातीची दहा-बारा वर्षं गेल्यावर नंतर काय?

'स्वेद-रसाची ही मद्यशाला अल्पावधीत आटून जाईल
अथवा खपणाऱ्यांच्या तपोभूमीवर
स्वप्नंच बंदिस्त होतील
म्हणून असे बिचकू नका.'
- ज्वाला आणि फुले 71

आणि खरं होतं. राहण्यास पक्की घरं झाली. वीज, पाणी, नंतर टी.व्ही., इंटरनेट आले. सर्व सुखसोयी झाल्या. अचानक वीज गेली, कूलर बंद झाला तर घाम येणार. आता स्वेदरस आटला होता. आता घामानं चिडचिड होत होती. बाबा म्हणतात-

'म्हणून असे बिचकू नका
कारण, जीवनाचे मेघ नेहमीच तुडुंब असतात
आणि प्रज्ञा-पुत्रांच्या स्वप्नांनी बंदिस्तपणा स्वीकारल्याचा
इतिहास नाही.'
- ज्वाला आणि फुले 73

आणि खरंच तसं झालं. आता नवीन पिढीने प्रज्ञा-पुत्राची जागा घेतली आहे. त्यांना नवीन आव्हानं आहेत. त्यांची स्वप्नं वेगळी, मोठी आहेत. काळ पुढे जात आहे. आमची स्वप्नं बंदिस्त झाली तरी त्यांची स्वप्नं मुक्त आहेत. बाबांची स्वप्नं आम्ही जगलो. बाबा एवढे द्रष्टे; आम्ही नाही. म्हणून आजच्या पिढीची स्वप्नं आम्हाला आधी पडली नसावीत. असं आहे. बाबांबद्दल विचारात असं वाहत जाणं होतं. तर मी एक आठवण सांगत होतो. आम्ही विंचूदंश उतरवण्याचा मंत्र मिळवला. पुढे एकदा मी मंत्राचा उपयोग करून एका आदिवासी रुग्णाला विंचूदंशातून मुक्त केलं. पुढे अनेक वेळा मंत्राचा उपयोग केला. आदिवासींना फायदाही झाला. साप चावला तर त्यावर योग्य औषध आम्ही देत होतो. कोकणात सापडणारा विंचू ह्या भागात नाही ह्याची खात्री करून घेतली होती. डॉ. बावीस्करांचं पुस्तक इथं आहे. त्यांचे पेपरही वाचले आहेत. असल्या गोष्टींवर म्हणजे मंत्रतंत्रावर आमचा विश्वास नाही. तरीसुद्धा आज इथं विंचूदंशावर मी मंत्रोपचार करत असतो. पुढे ही गोष्ट बाबांच्या कानावर गेली. बाबा मला नेहमी 'निम हकीम' म्हणत. आता 'खतरे जान' मनात असावं. तरी बऱ्याच आजारपणात मी त्यांच्या सेवेत उपचार करण्यात असे, तो मान त्यांनी मला दिला हा त्यांचा मोठेपणा असावा किंवा कायम मृत्यूशी लढण्याच्या त्यांच्या स्वभावाचा भाग असावा. असो.

सोमनाथमधल्या श्रमसंस्कार शिबिरांना मी नेहमी हजर राहात नसे. एकदा कुठून तरी येत असताना

मी बाबांना भेटण्यासाठी सोमनाथला गेलो होतो. नेमकं तेव्हा श्रमसंस्कार शिबिर सुरु होतं. बाबा सुचवेपर्यंत तिथून निघता येत नाही म्हणून मी तिथं राहिलो. सोमनाथची श्रमसंस्कार शिबीर नेहमीच नवीन नवीन विचारांना, वृत्तींना, चळवळींना प्रथम व्यासपीठ मिळवून देत आलं आहे. खरोखर ते एक विद्यापीठ आहे. महाराष्ट्रातील अनेक चळवळींची सुरुवात सोमनाथ शिबिरातून झाली आहे. ह्या चळवळी पुढे मोठ्या झाल्या. स्वतंत्र झाल्या. ह्यातून सोमनाथ-आनंदवनला काय मिळालं, असा माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला प्रश्न पडेल. पण प्रेम व करुणा ओसंडून वाहणाऱ्या हृदयाच्या बाबांना काय वाटतं? ते म्हणतात-

'मुलाला मातेचं ऋण फेडायचं नसतं,
तिची कूस धन्य करायची असते.'
- श्रमिक कार्यकर्ता विद्यापीठ 48

मी बाबांना सोमनाथमध्ये भेटलो. ह्या वर्षी अंधश्रद्धाविरोधी विचार घेऊन शिबिर चालू होतं. सकाळच्या श्रमदानानंतर दुपारचं वैचारिक सत्र सुरु झालं. व्यासपीठावर बाबा एका कॉटवर पडले होते. कुणी तरी अंधश्रद्धेविरोधात आपलं म्हणणं जोरजोरात मांडत होते. बाबा एकाग्रपणे ऐकत आहेत म्हणून मीसुद्धा ऐकू लागलो. बोलणारा कर्मकांड, पूजापाठ यावर सडकून टीका करत होता. धर्म माणसाला अंध बनवतो. आपण कर्मकांडात गुंतून जातो. कुणी देव तरी कधी पाहिला नाही, मग न दिसणाऱ्या देवावर श्रद्धा असणं बरोबर नाही. मला हे काही पटत नव्हतं, पण मी गप्प होतो. पुढे त्यांनी एका मुलीला व्यासपीठावर बोलावलं. तो वक्ता म्हणाला, ही माझी मुलगी. आठ-दहा वर्षांची चुणचुणीत मुलगी धीटपणे वडिलांबरोबर व्यासपीठावर उभी होती.

तो म्हणाला, "ह्या मुलीनं एक दिवस मला विचारलं, 'बाबा, देव कुठं असतो? मला दाखवाल का?' मी विचारलं, 'का गं? अगं देव वगैरे नाही.' 'पण बाबा, आम्हाला शाळेत कविता आहे - देवा तुझे किती सुंदर आकाश, सुंदर प्रकाश, सूर्य देतो.'' तो वक्ता मोठ्यानं हसून म्हणाला, "पहा, अगदी बालवयात आपण अंधश्रद्धा शिकवत आहोत. मग मोठेपणी काय होईल?'' नंतर त्या मुलीच्या खांद्यावर हात ठेऊन तो म्हणाला, "तू कविता कशी म्हणशील? म्हण बरं.''

'निसर्गा तुझे किती सुंदर आकाश
सुंदर प्रकाश सूर्य देतो...'

एवढं म्हणून त्या छोट्या मुलीनं स्वत: टाळ्या वाजवल्या. सर्वच टाळ्या वाजवू लागले. बाबांनीसुद्धा टाळ्या वाजवलेल्या मी पाहिलं. मी तिथून उठून चालला गेलो. रात्री बाबांच्या खोलीत त्याच विषयावर गप्पा चालल्या होत्या. बोलण्यात बाबांनी त्या मुलीचं कौतुक केलं. मी सहसा बाबांसमोर बोलत नसे. मला काय झालं माहीत नाही. मी एकदम म्हणालो,

"बाबा, त्या लहान मुलीला पढवलं होतं. तिला निसर्ग म्हणजे काय हे समजलं?''

बाबांच्या कपाळावर आठी पडू लागली होती. माझ्याकडे एकटक पाहात त्यांनी विचारलं,

"विलास, अंधश्रद्धा निर्मूलनाविरोधात तू आहेस तर नंतरच्या चर्चेत तसं मत तू का मांडलं नाहीस?''

"बाबा, अंधश्रद्धेच्या बाजूचा मी नक्की नाही, पण हे उदाहरण नक्की योग्य नाही. अंधश्रद्धा व देवावरचा विश्वास ह्याचा काही संबंध नाही.''

क्षणभर कुणीच काही बोललं नाही. मग मी म्हणालो,

"बाबा, जंगलात बिबट्या कधी केळं खाणार नाही. पण हेमलकसाला आपला नेगल बिबट्या, प्रकाशनं दिलं तर केळं नक्की खाईल. तसं आहे. लहान मुलांवर असे संस्कार करणं बरोबर आहे का?''

एवढं बोलून मी तिथून निघून गेलो. बाबांना नक्की राग आला असावा. तेसुद्धा टाळ्या वाजवणाऱ्यांत होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी बाबांना भेटण्यास गेलो नाही. सर्व जण श्रमदानासाठी गेले होते. मी सोमनाथच्या धबधब्यावर चालला गेलो. बाबांना आता हेमलकसासाठी निघतो म्हणून भेटायला जावं असं मनाशी ठरवलं होतं. आम्ही दोघं तिथं धबधब्यावर गप्पा मारत असताना, सोमनाथ इथला बल्ल्या धापा टाकत धबधब्यावर आला.

"अरे विलासभाऊ, तुला बाबा बोलावत आहेत. चल लवकर,'' असं म्हणाला.

माझा पडलेला चेहरा लपवत मी म्हटलं, "चल. अरे, मी बाबांकडेच येत होतो.'' पाय ओढत मी सावधपणे बाबांच्या खोलीपाशी पोहोचलो. बाबा खोलीत मध्यभागी उभे होते. इतर चार-पाच जण होते. कालची 'निसर्गा तुझे किती सुंदर आकाश...' कविता म्हणणारी स्मार्ट मुलगी डोळ्यांत पाणी आणून रडत होती. सगळे काळजीनं तिच्याकडे पाहात होते. बोलण्यासाठी सारी शक्ती एकवटून, देवाचं स्मरण करुन मी विचारलं,

"बाबा, काय झालं? मी सकाळी तुम्हाला भेटण्यास येणार...''

बाबांनी माझं वाक्य पूर्ण होण्याआधी म्हटलं,

"अरे, निम हकीम, ह्या मुलीला विंचू चावला रे...''

"अरेरे! बाबा, काशिनाथ कुठं आहे, जीपनं मूलला दवाखान्यात घेऊन जातो...'' मला तिथून सटकायचं होतं.

"अरे, मूलमध्ये फोन केला होता, डॉक्टर नाही आहे.''

बाबांच्या चेहऱ्यावर काळजी दिसत होती. मी तिथंच उभा राहिलो. बाबांनी माझ्याकडे पाहिलं. ते वळले. सर्वांपासून दूर जात बाथरुमकडे निघाले. मागे वळून माझ्याकडे पाहात खूण केली. मी सर्वांच्यामधून बाबांकडे निघालो. त्या पोरीनं डावा पाय उंचावून धरला होता. तिच्या चेहऱ्यावर वेदना दिसत होती. आम्ही बाथरुमच्या दारापाशी पोहोचताच बाबांनी माझ्या खांद्यावर हात ठेवला. त्यांच्या चेहऱ्यावर वेदना होती, त्या हाताच्या स्पर्शातून ती मला जाणवत होती.

"विलास, अरे, तुझा मंत्र टाक ना मुलीवर. बघ कशी रडते आहे. पाहवत नाही रे!''

आता मी अवाक् झालो. बाबांकडे पाहात राहिलो. हे कसं शक्य आहे. इथं अंधश्रद्धा निर्मूलन शिबिर चालू आहे. बाबा इथले प्रमुख आहेत. काल बाबांनी जोरदार भाषण केलं, आज सर्व तरुण शिबिरार्थी त्यावर बोलत आहेत. बाबा माझी चेष्टा तर करत नाही ना?

"अरे विलास, बघ ना, त्या मुलीचे हाल...'' बाबा नीट बोलूही शकत नव्हते.

"पण बाबा, हे लोक मला जोडे मारतील. कालची त्यांची भाषा कशी होती...''

"ठीक आहे, पण माझ्यासाठी... बघ, प्रयत्न कर. मी सर्वांना इथून घालवतो...''

मी काही बोलण्याचा प्रश्नच नव्हता.

बाबांनी सर्वांना जाण्यास सांगितलं. ते बाबांकडे पाहात होते. बाबा म्हणाले,

"ह्या मुलीला माझ्याजवळ राहू द्या. तुम्ही सर्व आपापल्या कामावर जा.''

बाबांनी सांगितल्यावर त्यांचा नाइलाज झाला. ते एक एक मागे वळून मुलीला धीर देत चालले होते. बाबांनी तिथं उभ्या असलेल्या बल्ल्याला सांगितलं, "दारावरचा पडदा टाक व बाहेर उभा रहा. मी बोलावल्याशिवाय कुणाला आत सोडू नको.'' बाबांच्या चेहऱ्यावर आता दुःखाबरोबर काळजी दिसत होती. बाबांनी त्या मुलीला खुर्चीवर बसण्यास सांगितलं. तिला त्यांनी समजावून सांगितलं, "हा विलास फक्त तुझ्या पायांवरुन हाताची बोटं फिरवून एक प्रकारचा हलका मसाज करेल. तू फक्त डोळे मिटून स्वस्थ बसून रहा. तुझं दुःख कमी होईल.'' खुणेनं मला, 'चल, सुरु कर तुझे मंत्रोपचार' म्हणून सांगितलं. मी दाराकडे गेलो. पाय पुसण्याच्या पोत्याचा बाहेर आलेला सुतळीचा तुकडा खसकन ओढून हातात घेतला. माझ्या आदिवासी गुरुने मंत्र टाकताना तोंडात येणारं वीष थुंकून टाकण्यास सांगितलं होतं. हेमलकसा इथं ठीक होतं. तिथं उघड्यावर मंत्र टाकत असे. बाजूला थुंकता येत असे. मी मुलीसमोर वाकलो. माझं लक्ष बाबांच्या कॉटखाली लघवीच्या भांडे व वाट्यावर गेली. मी पटकन ते वाटे तिथून माझ्याजवळ ठेवलं. ती मुलगी हे सर्व पाहात होती. तिनं

रडक्या आवाजात विचारलं,

"काका, तुम्ही नक्की काय करणार आहात?''

चला, तिने मला काका मानलं तर प्रयोग यशस्वी होणार. समोरच्याचा माझ्यावर विश्वास महत्त्वाचा होता. मी म्हणालो,

"बेटा, काही नाही. मी बोटानं फक्त मसाज करणार आहे. आता विंचू कुठवर आग करतो आहे तेवढं बोटानं दाखव.''

त्या मुलीनं गुडघ्यावर बोट ठेवलं. मी बाबांकडे पाहिलं. त्या चेहऱ्यावर आता फक्त करुणा होती. ते एकटक माझ्याकडे पाहात होते. मी डोळे मिटून तिला खूण केली. तिनं डोळे मिटले. मी गुडघ्यापाशी हाताची बोटं ठेवून मनात म्हणून लागलो,

'अरे अरे विंचवा आहेस कोठे
मोहाकाठी पठानकुटी
धान ना गुरु धन विकरु
सद्ज्ञान सद्गुरुची आन
उतरशील तर उतर
नाही तर तुझ्या माईची आन...'

आता मी एकाग्र झालो होतो. चार वेळ वरुन खाली बोटं फिरवत मी अर्ध्या पायावर थांबत होतो. पचकन बाजूच्या वाट्यात थुंकलो. त्या आवाजानं त्या मुलीनं डोळे उघडून माझ्याकडे पाहिलं. ती काही बोलण्याच्या आत मी अर्ध्या पायावर बोटं टेकवत विचारलं,

"आता इथून खालीच आग होत आहे?''

"हो काका!'' मुलगी न रडता म्हणाली.

मी परत तिथून खाली बोटं फिरवत मंत्र टाकू लागलो. शेवटी, सुतळीचा तुकडा अंगठ्यापाशी बांधून टाकला. मी थांबलो. मुलीनं डोळे उघडले. आता तिच्या चेहऱ्यावर स्मितहास्य होतं. मी वाटे घेऊन बाथरुमकडे गेलो. एकदम विचार केला, ही मुलगी आता बाहेर जाईल. अंगठ्यापाशी सुतळी बांधलेली दिसली तर हे अंधश्रद्धावाले काय समजतील... मी वाटे तिथंच टाकून घाईनं बाहेर आलो. बाबांचं दाढीचं सामान शोधू लागलो. आता बाबा त्या मुलीशी गप्पा मारत होते. त्या मुलीच्या चेहऱ्यावर वेदना दिसत नव्हती. बाबांच्या औषधाच्या बॉक्समध्ये मला बँडएडची पट्टी मिळाली. मी पटकन उघडून मुलीच्या अंगठ्यापाशी बांधलेली सुतळी काढून त्या जागी बँडएडची पट्टी लावली. मुलगी फक्त 'अंऽ' म्हणाली.

"आता तासभर इथं थोडं दुखेल हं. बाकी आता तुला काही होणार नाही.'' मी परत बाथरुममध्ये गेलो.

मी वाटे धुऊन परत बाबांच्या कॉटखाली ठेवलं. मुलगी गेली होती. बाबा उभे होते. त्यांच्या डोळ्यांत पाणी होतं. हात वर करुन डोळे पुसत त्याच वेळी वर पाहात ते म्हणाले,

"थँक यू मि. मनोहर...''

त्यांचा चेहरा प्रसन्न होता. आता त्यांनी माझ्याकडे पाहिलंही नाही. मी तिथून बाहेर पडलो. बाबा नेहमी म्हणत, 'माझ्या वेदना धन्य झाल्या.' आताही म्हणत असावेत. विंचवाच्या वेदना बाबांना होत होत्या, की त्या मुलीला? मी काय केलं. मंत्राचा उपयोग काय झाला? नाही तर मंत्र टाकणं म्हणजे काय, तर मानसिक समाधानच ना? बाबांनी माझं मानसिक समाधान तर केलं नाही ना? तिला बरं वाटलं, कारण तिची वेदना बाबांनी भोगली म्हणून तर नाही ना? ह्यातलं काहीही मी बाबांना विचारु शकत नव्हतो. बाबा कवितेत म्हणतात-

'अदृश्याशी संपर्क कसा साधायचा?
देवाशी बातचीत कशी करायची?

न दिसणाऱ्या मनाशी नातं जोडता येतं
अन् न बोलणाऱ्या भावनेशी बोलताही येतं
माणूस खरा, माणुसकी खरी.'
- करुणेचा कलाम ८१

समोरच्याची वेदना ज्याला आपली वाटते तिथं माणुसकी जन्म घेत असावी. ही खरी योगसाधना की काय? परकाया प्रवेशासारखा परमनात प्रवेश करून त्याची वेदना सहन करणं हा कोणता योग? बाबा करुणेचे भक्त होते, की करुणेचे गुलाम होते? मी मात्र कायम मनात प्रश्न घेऊन जगत राहिलो. कालचे बाबा खरे की आज मला दिसेलले बाबा? का असं तर नाही ना, सामाजिक संस्थेत कार्यकर्त्याला कायम प्रश्नात अडकवून संभ्रमात ठेवणं ही चाल तर नाही ना? पण मग स्वत:च्या पुस्तकात ते तसा उल्लेख का करत नाहीत? जाऊ दे!

'थँक यू मि. मनोहर...' हे वाक्य बाबांसोबत असताना तीन वेळा बाबांनी म्हटलं आहे. ते कौतुकाचं की उपरोधाचं हाही नेहमी पडणारा प्रश्न आहे. हेमलकसा इथले सुरुवातीचे दिवस काही वेगळेच होते. रस्ता सुरु झाला की बाबा-ताई जास्तीत जास्त वेळ हेमलकसा इथं घालवण्याचा प्रयत्न करत असत. त्यावेळी हेमलकसा इथं मोजून दहा-बारा जण होतो. बाबा-ताई हेमलकसा इथं आले की आमची खाण्यापिण्याची चंगळ असे. आम्हाला चांगलंचुंगलं खाण्यास मिळत नाही, रस्ते बंद असतात, इथं कोणतीही गोष्ट मिळत नाही, असं त्यांना सारखं वाटत राही. मग नदीवर गरम गरम भजी करुन जेवणं, सकाळी नाश्त्याला वेगवेगळे पदार्थ आम्हाला खाऊ घालणं, ह्या त्यांचा छंद झाला होता. त्यावेळी फारसे पाहुणे येत नसत. तरीही बाबांबरोबर दोघं-तिघं पाहुणे येत असत. अशाच एके दिवशी नाश्त्यासाठी दहीवडे केले होते. बाबा कमी खात, पण जे खात ते चवीनं खात. खाताना बोलणं नेहमी खाण्याचं असे. एखादा पदार्थ खात असताना पूर्वी तोच पदार्थ कुणाकडे कधी खाल्ला होता व त्यावेळी त्याची चव कशी होती, नेमका जो पदार्थ त्यावेळी इथं नसेल त्याचा आवर्जून उल्लेख करत. तो असता तर चव आणखी कशी चांगली झाली असती असं ते म्हणत. त्याच वेळी आम्ही सर्व भरपूर खात आहोत ह्यावरही ते लक्ष ठेवत असत. बाबा तिखट अजिबात खात नसत; पण हिंग, दालचिनी, जिरे, मिरे हे ते आवडीने खात. अशा वेळी कुणी वेगळ्या विषयावर बोलणं, विचारणं त्यांना आवडत नसे. खाण्याच्या वेळी खाणं. ज्याला मानवतं त्यानं बेभान होऊन, नाही तर चवीनं तृप्त होऊन, खावं हे त्यांचं तत्त्व असावं. पाहुण्यांना हे कळत नसे. नेमकं ते बाबांना कामाबद्दल, जुन्या कुठल्या घटनेबद्दल विचारत. केवळ 'अतिथी देवो भव' ह्या नियमानं बाबा त्रोटक उत्तरं देत असत. पण पदार्थाची चव बिघडल्याचं त्यांच्या चेहऱ्यावर दिसत असे. दहीवडे खाण्यात आम्ही सर्व गुंतलेले असताना, मान्यवर पाहुण्यांनी बाबांना विचारलं,

"बाबा, तुमचे आवडते लेखक कोण?''

मी बाबांकडे पाहिलं. दहीवड्याचा आस्वाद घेताना आनंदी चेहरा आक्रसल्यासारखा होणार, तेवढ्यात मी म्हणालो,

"बाबांचा आवडता लेखक जीवन किर्लोस्कर!''

एकदम सगळे हसले. मी बाबांकडे पाहिलं. घास संपवून तेसुद्धा हसू लागले. माझ्याकडे पाहात म्हणाले,

"थँक यू मि. मनोहर!''

त्यावेळी एक मासिक येत असे. त्यात सर्व काही जीवन किर्लोस्कर असे. त्या मासिकात लेख कधीच नसत. एक बरं झालं, नंतर सर्व नाश्ता होईपर्यंत पाहुण्यांनी कोणताही प्रश्न विचारला नाही. नंतर बाबांचा नाश्ता झाला तरी बाबा दहीवड्याबद्दल बोलत राहिले, आमचा सर्वांचा नाश्ता होईपर्यंत.

तिसरी आठवण आहे भारत जोडो यात्रेतली. आम्ही पंजाबात होतो. सकाळी पूर्वीच्या

मुक्कामावरून आम्ही लुधियाना शहरात पोहोचलो. सुवर्ण मंदिरातल्या आमच्या मुक्कामानंतर पंजाबात बाबांना फार सन्मान मिळाला. शहराबाहेर खरोखर प्रचंड मोठं स्वागत स्वीकारून आम्ही मुक्कामावर पोहोचलो. आमचा मुक्काम दोन दिवसांचा होता. तरी पंजाबमधल्या कारखानदारीमुळे श्रीमंत लुधियानात दोन दिवस भरगच्च कार्यक्रम होते. पहिल्या दिवशी शहरवासीयांकडून सत्कार व सभा होती. इतरांच्या कार्यक्रमासाठी दुसरा दिवस होता. बाबांची सोय एका मोठ्या गेस्ट हाऊसमध्ये होती. शेजारच्या कॉलेजमध्ये इतरांची व्यवस्था होती. बसमधले चार-पाच जण आनंदवनवासी, आम्ही बाबांसोबत राहणार होतो. दुपारच्या जेवणानंतर बाबांना फारशी विश्रांतीसुद्धा मिळाली नाही. चार-पाच पत्रकार, लायन्स, रोटरीयन, जेसीस, गांधीयन संस्था संचालक, ख्रिश्चन मिशनरी, अंधशाळा, दोन कॉलेजचे संचालक. बाबा हॉलमध्ये कॉटवर पडले होते. सर्व बाजूने इतरांनी घेराव घातला होता. चार-पाच राजकीय महारथी होते. सभेसाठी निदान साडेचार वाजता निघावं लागेल, हे स्थानिक व्यवस्थापकानं आधीच सूचित केलं होतं. एक एक जण आपल्या संस्थेची माहिती सांगत होता. बाबांनी आपल्या कार्यक्रमाला येणं महत्त्वाचं आहे हे पटवून देत होता. सकाळपासून रात्रीपर्यंत कोणता कार्यक्रम केव्हा बसवता येईल हे स्थानिक व यात्रेसोबतचे व्यवस्थापक ठरवत होते. हे प्रत्येक ठिकाणचं आहे म्हणून तिथं मी इतर उद्योग करत उभा होतो.

काही वेळानं मधेच एखाद-दुसऱ्याचा आवाज वाढे. अशा वेळी इतर चार-पाच जण एकदम बोलू लागत. परत सारं शांत होई. ज्यांना कार्यक्रमाची वेळ मिळे ते बाजूला उभे राहून आपसात चर्चा करत राहात. मी बाबांकडे पाहिलं. त्यांना कोणासही दुखवायचं नव्हतं; पण प्रत्येक ठिकाणी व्यवस्थापकांचंही ऐकावं लागत होतं. मनात आलं, बाबा सगळ्यांमध्ये असून किती एकटे आहेत. काही तरी इंग्रजीत म्हण आहे ना 'ग्रेट मॅन इज ऑलवेज अलोन इन द क्राऊड.'

मी विचार करत होतो. आता प्रत्येकाला बाबा हवे आहेत. चाळीस वर्षांपूर्वी बाबांनी आनंदवन उभे केलं तेव्हाही ते एकटे होते. सोबत कोण होतं? त्यांची सावली, सहचारिणी ताई. मी घड्याळाकडे पाहिलं. चार वाजून वीस मिनिटं झाली होती. मी बाबांच्या जवळ गेलो. त्यांनी माझ्याकडे पाहिलं. मी मनगटावरील घड्याळाकडे पाहिलं. त्यांनी इतरांना दोन हात जोडून नमस्कार करत म्हटलं,

"मुझे तैयार होना है." बाबांचा आवाज बदलला होता.

अजूनही चार-पाच जणांच्या कार्यक्रमाबाबत शंका होती. शेवटी बाबा उठत म्हणाले,

"देखो, आय एम ए बोगी, यू कनेक्ट टू एनी ट्रेन."

हे वाक्य सगळ्यांना उद्देशून होतं, जे त्यांनी व्यवस्थापकाकडे बघत म्हटलं. काही क्षण शांतता होती. पुढे कुणी काही म्हणण्याआधी मी मोठ्यानं म्हणालो,

"बट प्लीज सी दॅट नॉट टू बी लूज शन्टेड. इट इज व्हेरी एक्सप्लोजिव्ह."

बाबा प्रथम हसले. मग एकदम सगळे हसू लागले. बाबा उभे होऊन माझ्याकडे पाहात म्हणाले,

"थँक यू मि. मनोहर."

बाबांचा अंत मी पाहू इच्छित नव्हतो. शंकराच्या डोक्यावरची गंगा तीर्थ म्हणून सर्वांना मिळू दे. तांडव, क्रोध, संताप यासाठी आम्ही आहोतच.

मी जे काही लिहीत आहे ते फक्त मला, एका सामान्य कार्यकर्त्या सेवकाला बाबा कसे दिसले ते. मी उच्चशिक्षित नाही. हे माझं व्यक्तिगत मत आहे. कुणाच्या भावना दुखवण्यासाठी मी लिहीत नाहीये. जर आज बाबा असते आणि जर त्यांनी वाचलं असतं तर त्यांनी चौथ्यांदा 'थँक यू मि. मनोहर' असं म्हटलं असतं एवढी नक्की. बाबा एका कवितेत म्हणतात-

'अपयशानं फेसाळलेला माझा चेहरा पाहून
आता मी कधी हताश होत नाही
कारण जीवनाचा उबदार हात माझ्या पाठीवर फिरत असतो
वाहणाऱ्या प्रवाहात मी आपलं बिंदुत्व झोकून दिलं आहे
कड्यावरून कोसळताना

आता मला कापरं भरत नाही.'

- ज्वाला आणि फुले 55

आयुष्यातली शेवटी काही वर्ष आपणास अपयशी चेहरा पाहावा लागणार आहे हे त्यांनी आधी ओळखलं होतं का? बाबा नर्मदा बचाव संघर्षात का पडले? हा अनेकांना पडलेला प्रश्न आहे. अगदी आमच्यासारख्या संस्थेतल्या कार्यकर्त्यांनासुद्धा. नवीन पिढीला मुक्तपणे काम करु देण्यासाठी ते आनंदवनापासून दूर गेले म्हणावं, तर मग मात्र अपयशी नाहीत. कारण दहा वर्षांत डॉ. विकासनं आनंदवनचा चेहरामोहरा बदलून टाकला. एकविसाव्या शतकाच्या आगमनासाठी ते आवश्यक होतं. जागतिकीकरणाच्या रेट्यातही नवीन आनंदवन डगमगलं नाही. बाबांनी चालू केलेली कामं तर चालूच होती. अनेक नवीन उपक्रम सुरु झाले. आनंदवनच्या कक्षा ओलांडून काम बाहेरही पोहोचलं. पण कसरावद इथं बाबांच्या हातात नवीन कल्पना देणं फक्त राहिलं. पूर्वीच्या आयुष्यात बाबा स्वत:ला पडलेली स्वप्नं स्वत: लोकांबरोबर घेऊन पार पाडत. त्यासाठी त्यांना कुणावरही विसंबून राहावं लागत नव्हतं. कसरावद इथं नर्मदा बचाव समिती कार्यक्रम ठरवत होती. कुणी काय, कसं करावं हे बाबांच्या हातात नव्हतं. बाबांना सतत नवीन नवीन कल्पना सुचत. त्यांनाच ते आपली स्वप्नं म्हणत. नर्मदा बचाव संघर्षाच्या प्रवाहात त्यांनी आपलं बिंदुत्व झोकून दिलं, पण ते शेवटपर्यंत बिंदुत्वच राहिले. बाबांनी पूर्वी अनेक वेळा संघर्ष केले होते. त्यावेळी आपल्या बिंदुत्वाचा महासागर होऊन संघर्षात विजय मिळवला होता.

कधी कधी असं वाटतं, महापुरुषांचे पुतळे का उभारत असतील? गांधींच्या पुतळ्यासमोर बार असतो, आणि गांधींच्या पुतळ्याच्या चबुतऱ्यावर चरस-गांजा मिळतो. बाबा हे एकच महापुरुष असे, की त्यांचा जिवंतपणी पुतळा उभारला होता, नर्मदेकाठी. हे मी नर्मदा बचाव संघर्षाबाबत लिहीत आहे. पण ह्या जिवंत पुतळ्याचा सरकारला धोका होता. बाबा तिथं राहाण्यानं नर्मदा बचावला एक वजन प्राप्त झालं. जागतिक मान्यता मिळाली. फेरकुवा संघर्षाच्या वेळी शासनाशी बोलणी करताना बाबांना सामील करून घेतलं असतं तर आज वेगळं चित्र दिसलं असतं. जाऊ दे! त्याबद्दल मी बोलणं योग्य नाही. सेवकानं आपली पायरी साडू नये.

एक होतं, बाबा तिथं परत तरुणांत होते. नवीन तरुण कार्यकर्ते भेटत राहात, त्यात अनेक उच्चशिक्षित होते. बाबांच्या शब्दांत 'क्रीम ऑफ द सोसायटी.' पण सोबत नर्मदा घाटीतले तरुण शेतकरी कार्यकर्तेसुद्धा होते. बाबांना 'पेस मेकर' बसवण्याआधी नेहमीप्रमाणे बाबांनी नर्मदा घाटी पिंजून काढली होती. त्या भागाची, तिथल्या लोकांची नड, अपेक्षा ते जाणून होते. सगळीकडून सर्व प्रकारचे, पक्षाचे लोक बाबांना येऊन भेटत होते. पण बाबा स्वत:ची स्वप्नं कृतीत उतरवू शकत नव्हते. कवितेत ते म्हणतात-

'निर्णय घेणाऱ्या केंद्राची बेसुमार वाढ

हा लोकशाहीचा शाप आहे.'

- ज्वाला आणि फुले 144

आनंदवनमध्ये, संस्थेत त्यांचा शब्द शेवटचा राहात होता. मी कसरावद इथं असताना, फेरकुवा संघर्षानंतर एकदा बाबा कसरावदजवळील तरुण कार्यकर्त्यांना घेऊन नर्मदा धरणावरून मणीबेली गावात जाऊन आले. त्यावेळी मी सोबत होतो. तिथली गुप्तता त्या वेळी मला जाणवली. बसमध्ये बसेपर्यंत आपण कुठं जाणार आहोत हे मला माहीत नव्हतं. कदाचित बाबांना गुजराथमध्ये येण्यास मज्जाव होईल असं वाटत होतं. अर्थात, काहीच अडथळा आला नाही. उलट स्टेट गेस्ट असल्याप्रमाणे गुजराथभर पोलिसांची गाडी, पोलीस व एक अधिकारी सोबत होता. त्याने मदत केली. कुठंही आडकाठी केली नाही. त्या वेळी बाबा मनानं नर्मदा बचाव संघर्षात इतके गुंतले होते, की ते म्हणाले, माझ्यावर पाळत ठेवण्यासाठी हे सोबत असावेत. मणीबेली गावापर्यंत बस

जात नव्हती, तरी मोठ्या कष्टानं आमच्यासोबत बाबा डोंगर उतरुन, उभा चढ चढून आले. तिथल्या मंदिरात फार सुरेख, रेखीव, भव्य नंदीची मूर्ती होती. बाबांनी फार मनापासून ती पाहिली. नर्मदा धरणामुळे काठावरची अशी शेकडो मंदिरं बुडणार ह्याचं दु:ख बाबांनी व्यक्त केलं. मणीबेली गावात नर्मदा बचाव कार्यकर्त्यांनी आदिवासी मुलांसाठी चालवलेली धरणशाळा बाबांनी पाहिली. त्यांचं कौतुक केलं. बाबा नेहमी तरुण कार्यकर्त्यांचं जरा जास्तच कौतुक करत.

लांबवर नर्मदा धरणाचं पाणीच पाणी दिसत होतं. लांबवर धरणाची भिंत दिसत होती. त्या भिंतीपुढूनच आम्ही आलो होतो. धरणाचं काम अहोरात्र चालू होतं. बाबा नदीकाठावर उभे होते. थोडा डोंगरमाथा होता म्हणून मी शेजारी जाऊन उभा राहिलो. धरणाच्या दोन्ही टोकाला टॉवर बांधले होते. त्यांना जोडलेल्या तारांवरुन एकामागून एक ट्रॉली येऊन, धरणाच्या अपुऱ्या भागावर शेकडो टन कॉंक्रीट ओतलं जात होतं. बाबा त्या ट्रॉल्यांकडे एकटक पाहात होते. धरण पूर्ण झाल्यावर, आम्ही उभे होतो ते पाण्याखाली जाईल ह्याचा अंदाज येत होता. बाबांच्या चेहऱ्यावर काळजी, दु:ख असे मिश्र भाव होते. बाबा निश्चल उभे राहून एकटक पाहात होते. काठी समोर टेकवून त्यावर दोन्ही हातांचे पंजे दाबलेले होते. कसला विचार करत होते? नर्मदेचा, तिच्या काठावरील बुडणाऱ्या आदिवासी गावांचा, की संघर्षाचा. त्यांनी एकट्याच्या नेतृत्वाखाली इंद्रावतीवरील धरणाविरोधात संघर्ष करुन माडीया-गौंड आदिवासी व त्यांची गावं वाचवली होती. सोबत नर्मदा बचावाचे तरुण कार्यकर्ते होते. नर्मदा संघर्ष लांबत चालला होता. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत अनेक संघर्ष केले होते. ह्यातून मार्ग काढणं त्यांच्या एकट्याच्या हातात नव्हतं. काही शेतकरी कार्यकर्ते सरकारी आमिषाला बळी पडण्याच्या मार्गावर आहेत हे समजलं होतं. बाबा त्यावेळी नक्की कसे दिसत होते ते मला समजेना. पण बाबांनीच कवितेत वर्णन करुन ठेवलं आहे अगदी तसेच, असं आता वाटतं.

‘ज्याच्या नम्रतेला दुर्बलता समजून एके काळी त्यांनी
धिक्कारलं असतं
तो करुणेचा पुत्र त्यांच्या समोर उभा असतो
त्याने दु:खांना ह्रदयाशी कवटाळलेलं असतं
पण ओठांवर हसू असतं.
- ज्वाला आणि फुले 113

मी समोरच्या नदीपात्रावरुन नजर फिरवून बाबांकडे पाहिलं. आता त्यांचा चेहरा फुलला होता. त्यांनी वळून माझ्याकडे पाहिलं. मी गोंधळलो. ते चक्क स्मितहास्य करुन माझ्याकडे पाहात होते. बाबांना नक्की नवीन कल्पना सुचली होती. त्याचं योजनेत रुपांतर कसं करता येईल ह्याचा विचार मनात चालू होता. कित्येक वर्षांनी, पूर्वी हेमलकसा इथं पाहिलेला साहसी शिकारी चेहरा आता मला दिसू लागला. अशा वेळी बाबा प्रचंड घाईत असत. काय करु आणि काय नको असं त्यांना होत असे. अगदी तसंच, कोणतीही सूचना न देता ते डोंगर उतरु लागले. नर्मदा बचाव तरुण कार्यकर्त्यांची धावपळ उडाली. आम्ही बसमध्ये आलो. बस चालू झाली. बाबांनी तरुण कार्यकर्त्यांना जवळ बोलावलं. त्यांनी त्यांना प्रश्न केला,

“तुम्ही सर्वांनी शपथ घेतली आहे ना? मरेंगे, फिर भी लढेंगे?’’

सर्वच छाती काढून ‘हो! हो!’ म्हणू लागले. बाबांनी एका ठिकाणी बस उभी केली. बसच्या खिडकीतून धरणाची भिंत दिसत होती. तिकडं सर्वांचं लक्ष वेधलं. तारांवरुन एकामागून एक ट्रॉली येत होती. शेकडो टन क्रॉंक्रीट ओतून परत जात होती. बाबा म्हणाले,

“बघा, प्रत्येक ट्रॉलीसोबत एक-एक कार्यकर्ता क्रॉंक्रीटसोबत पडू लागला तर सरकारला काम बंद करावं लागेल. फक्त चार-पाच कार्यकर्त्यांचं बलिदान हवं.’’

बाप रे! सगळ्यांचे डोळे विस्फारले होते. डोळे चमकत होते. ते सारे अवाक् झाले. बसमध्ये

शांतता होती. बस परत सुरु झाली. काही वेळानं बाबा म्हणाले,

"बघा, कुणाची तयारी आहे? समिती काय म्हणते? ट्रॉलीपर्यंत कसं पोहोचायचं ते मी पाहातो.''

बाबा मनानं तरुण होते. भगतसिंग, राजगुरुच्या काळातले होते. समाधाना-साठी, नावासाठी शपथ घेणारे नव्हते. नर्मदा बचाव संघर्षाला मरगळ आली होती. कोर्टकचेऱ्या, घेराव, रास्ता रोको सरकारच्या अंगवळणी पडलं होतं. काही तरी वेगळं साहस दाखवल्याशिवाय मार्ग निघणार नव्हता. धरणाचं काम चालूच होतं. बाबांनी एका गोष्टीसाठी इतकी वर्षं कधी वाया घालवली नव्हती. स्वातंत्र्य लढ्यात अनेकांनी बलिदान दिलं होतं. फक्त अहिंसा लढ्यानं स्वातंत्र्य मिळालं नव्हतं. ह्यात हत्या, हिंसा नव्हती. ध्येयासाठी बलिदान होतं. तरीसुद्धा इथं बाबांच्या हातात वाट पाहणं होतं.

आम्ही परत आलो. नंतर बाबांनी दोन-तीन वेळा कार्यकर्त्यांबरोबर बलिदानाविषयी विचार मांडला, पण काहीच झालं नाही. निर्णय एकट्या बाबांच्या हाती नव्हता. त्यावेळी बाबा काहीसे नाराज असत, पण पराभूत नसत. माझ्याकडून जेवढं होईल तेवढं तर मी करीन, हा बाणा होता. ते वानप्रस्थात होते. त्यांच्या शब्दांत...

'कारण माझ्यातला सागर सतत गर्जना करत असतो
भरती आणि ओहोटी यांनी तो विचलित होत नाही
कारण भरती ही जर माझी कृती आहे
तर ओहोटी ही विकृती कशी म्हणता येईल?
भरतीच्या लाटांनी मी जीवनाला आलिंगन देतो
आणि ओहोटीच्या हातांनी त्याचा पदस्पर्श करतो
आणि निबिडातल्या एकान्त साधनेत पूर्ववत गढून जातो.'
- ज्वाला आणि फुले 55

मागे आरशात पाहण्याचासुद्धा बाबांचा वेगळ्या विचारांचा प्रसंग मी सांगितला आहे, तोही कसरावदमधला. काय, त्या वेळी बाबांना अपयशानं फेसाळलेला चेहरा पाहावासा वाटत असे की काय? का पूर्वीही त्यांनी पाहिलेला होता? माझ्या पाहण्यात तर बाबा कधी अपयशी झालेलं पाहिलं नव्हतं. त्यांनी अनेक अपयशं पचवली असावीत. मी येण्याअगोदरचा काळ असावा. बाबांना कधी परिस्थितीनं हतबल झालेलं मी पाहिलं नाही. ते जन्मभर स्वतःच्या प्रकृतीशी व इतर प्रतिकूल परिस्थितीशी लढतच राहिले. अशा वेळी ते समाजसेवेवर ठाम राहिले.

'समाजकार्याची ही आंबट कैरी
खाता खाता दात आंबून गेले आहेत
तरी ती सोडवत नाही.'
- ज्वाला आणि फुले 145

खरंच, बाबांना काय काय सहन करावं लागलं असेल? मी मात्र बाबांनी वाहिलेल्या वधस्तंभाच्या छायेत केलेल्या कथित समाजसेवेत फक्त गोड आंबेच खाल्ले आहेत. बाबांच्या कविता हे त्यांचं आत्मचरित्र आहे. रामायण आधी लिहिलं गेलं नंतर घडलं असं म्हणतात. बाबांनी आयुष्यात भोगलेलं सुख-दुःख, आपली सामाजिक-राजकीय निरीक्षणं कवितेत लिहिली आहेत. पण पुढे आपल्या आयुष्यात काय घडणार आहे हे त्यांनी कसं ओळखलं असेल? पण कधी कधी मान्यवरांनी नावाजलेली अबोध कविता माझ्यासारख्या सामान्य माणसालाही काही ठिकाणी चुकीची, अपुरी वाटते. आता पाहा, सामान्याचा अनुभव फार वेगळा असतो. सामान्याची भरभराट ही त्याची कृती असू शकते, पण ओहोटी ही त्याची विकृती नसली तरी बऱ्याच वेळा दुसऱ्या विकृत माणसाची ती संस्कृती असते. समाजकारणात, राजकारणात, नोकरीत हा अनुभव सामान्यांना अनेक वेळा येतो. त्यांच्या आजूबाजूला असे संस्कृतीवाले टपूनच असतात. बाबांनी 'माझं कलियुग'मध्ये कलियुगाचे गोडवे गायले असल्यानं, मी, ठीक आहे, कलियुग आहे असं म्हणून विसरूही शकत नाही. एका कवितेत

बाबा म्हणतात-

> 'सुळासाठी छाती पुढे केल्याशिवाय
> मुकुटासाठी मस्तक पुढे करता येत नाही.'
> - ज्वाला आणि फुलं 57

पण दिसतं काय, अनुभवाला येतं काय, तर सुळासाठी छाती पुढे करून लढणारा, दुसऱ्याच्या मर्जीतल्या माणसाच्या मस्तकावर मुकुट ठेवताना कोपऱ्यात मस्तक झुकवून टाळ्या वाजवत असतो. बाबांसोबत राहूनही मला मग चेराबंडा राजूची कविता आपली का वाटावी?

> 'पुन्हा एकदा येत आहेत आपल्या गावात
> गरुड पोपटासारखे बोलणारे
> रक्त पिणाऱ्या गिधाडाच्या टोळ्या.
> सांभाळा!
> तुमच्या स्वप्नांचे हिरवे वृक्ष सांभाळा
> तुमच्या डोळ्यांच्या ओसऱ्यात
> फुलणाऱ्या आशा
> तुमचे डोळे, तुमची मुले
> तुमची हृदये व तुमच्या कोवळ्या सकाळी.'

बाबांसारख्या असामान्य माणसाच्या आठवणींमध्ये मी हे काय सांगू लागलो. बाबा अशा परिस्थितीही नर्मदा बचाव संघर्षाबरोबर कसरावद इथं राहात असताना अनेक इतर काम करणाऱ्या सामाजिक संस्थांशी, कार्यकर्त्यांशी जोडलेले होते. देवास ग्रुप तर बाबांना आपला प्रमुख मानत असावेत. लोकांसाठी, आदिवासीं-साठी त्यांच्याबरोबर अनेक प्रकल्प करत होते, आहेत. त्यांच्या संस्थेच्या नावातच बाबा आमटे आहे. सेवाकार्याबरोबर आदिवासी व सामान्यांना स्वतःच्या पायावर उभं करण्याचं काम त्यांच्या प्रकल्पावर बाबांबरोबर जाऊन मी पाहिलं आहे. सर्व तरुण काम करतात ह्याचं बाबांना कौतुक होतं. अनेक वेळा नवीन कामासाठी सल्लामसलतीसाठी येत असत. आणखी दोन-तीन तरुण आदिवासी भागांत जमिनीसंबंधात लढा देत होते. तेही मधूनमधून येत असत. बाबा त्यांना आर्थिक मदत करत. त्यांचे विचार एकमेकांच्या विचारांच्या विरोधात असत, तरीसुद्धा प्रत्येकाला बाबांकडे यावंसं वाटे व बाबा सर्वांवर सारखं प्रेम करत, मदत करत हे मी स्वतः अनुभवलं आहे. त्या काळात प्रत्यक्ष कामात बाबांना आपलंच म्हणणं रेटता येत नसेल, तरी त्यांचा विचार घेतला जात होता. बाबांनी त्यावेळी वाचनात, लिखाणात बराच वेळ खर्च केला. प्रकृती साथ देत नव्हती, तरीसुद्धा ते आनंदी असत. काही नवीन करण्यास त्यांची तयारी असे. कसरावदला पाहुणे आले की बाबांचा वेळ चांगला जात असे. बाबा घरदार सोडून परक्या ठिकाणी हालअपेष्टा सहन करत राहात आहे हे विकासला सहन होत नसे. बाबा स्वतःहून काही मागणं शक्य नव्हतं. ते खऱ्या अर्थानं वानप्रस्थ स्वीकारून आले होते. ऐषआरामात राहण्याची त्यांना कधी सवय नव्हती, त्यात ते आता विरक्त झाले होते.

विकास दोन-तीन महिन्यांनी कसरावद मुक्कामी येऊन कधी बाबांच्या नाराजीत नवीन नवीन वस्तू आणून बाबांना इथं राहणं सुखकर, कमी कष्टाचं होईल हे मनापासून पाहात होता. बाबांनी वानप्रस्थ स्वीकारला, तरी पाहुणे त्यांना परत संसारात गुंतवत असतच. त्यांच्या सोयीसाठी मी करत आहे, असं विकास म्हणत असे. एकदा कधी तरी दोन आरामखुर्च्या आनंदवनहून आल्या होत्या. त्या बाबांसाठी नक्कीच नव्हत्या, कारण 1979-80 साली बाबांच्या पाठीच्या मणक्यावरील शस्त्रक्रियेनंतर बाबा खुर्चीवर कधी बसत नव्हते. बसणं ही क्रियाच त्यांच्या जीवनातून बाद झाली होती. त्याआधी ते जीप चालवत असत. भन्नाट वेगानं ते जीप चालवत. मीसुद्धा तो अनुभव चार-पाच वेळा घेतला आहे. त्यांच्या स्वभावाप्रमाणे, देहबोलीप्रमाणे ते जीप चालवत. त्यावेळेला पूर्वी त्यांच्याकडे दोन

कार्बोरेटरवाली स्पोर्ट कार होती असं सांगतात, ते नक्की खरं असावं असं वाटावं. आनंदवनमधल्या जीपला एकच कार्बोरेटर होता हे माझं नशीब! त्या आरामखुर्च्या पाहुण्यांच्या कामाच्या होत्या. पावसाळा संपला की अंगणात, अगदी नर्मदेकिनारी एका झाडाखाली सपाट जागेवर त्या असत. बाबांकडे नर्मदा कार्यकर्ते आले की बंददार चर्चा सुरु झाली, की आम्हाला चार-पाच तास निवांत वेळ मिळे. अशा वेळी मी त्या आरामखुर्चीवर समोरच्या छोट्या स्टुलावर पाय लांब करुन बसे. भास्कर, नमादेव, किसन असत. मस्त टवाळक्या चालत. एकाला व्हरांड्यात बसवत असू, चर्चा संपल्याची सूचना मिळण्यासाठी.

एके दिवशी अशाच निवांत क्षणी नर्मदाकिनारी आरामखुर्चीत बसलो असताना मागे बाबा कधी येऊन उभे राहिले ते समजलं नाही. ते एकदम म्हणाले,

"अरे व्वा! विलास, हातात गुलाबाचं फूल घेतलं तर अगदी शहेनशहा दिसशील!''

मी दचकून पटकन उठलो. बाबा तिथं उभे राहून बोलत राहिले-

"इथून आरामखुर्चीतून नर्मदा दर्शन! व्वा! किती छान आहे रे! भाग्यवान आहेस. मला तुझा हेवा वाटतो. मी बसू शकत नाही, फार वेळ उभाही राहू शकत नाही.''

आता बाबा भरभरुन बोलत राहिले. कॉटवर पडून नर्मदा पाहणं, तिच्या मैय्याचा अपमान केल्यासारखं वाटतं, असं म्हणाले. इथं मुक्कामी राहू लागल्यावर बाबांनी पुराणापासून नर्मदा नदीबद्दलची माहिती मिळवली होती. त्यात कुणी ना कुणी नर्मदा परिक्रमावाला दिवसाआड जेवणास किंवा कोरडा शिधा घेण्यास येत होता, त्याच्याकडून माहिती मिळत असे. बाबा नर्मदा नदीच्या प्रेमातच पडले होते. नर्मदा नदीच्या सर्व आरत्या, कविता, कथा त्यांना माहीत होत्या. इथल्या सर्वसामान्य शेतकरी लोकांसारखे ते नर्मदा नदीला माता मानत होते. बऱ्याच वेळा ते नर्मदामैय्या असं म्हणत. शेवटी ते परत मरणावर आले.

"अरे, तुम्ही जेव्हा मला नर्मदामैय्यात शांत कराल तेव्हा तर मी झोपून नदीतून जाईन ना!''

त्यांनी मला परत आरामखुर्चीत बसण्यास सांगितलं.

दुसऱ्या दिवशी मी आणि भास्करनं विचार केला, बाबांना एकदा तरी आरामखुर्चीत बसवायचं. नेमकं त्या वेळी सक्सेना कसरावद इथं आले. आम्ही त्यांना सर्व कल्पना दिली. ते तयार झाले. त्यांना उभं राहण्यास सांगितलं. आम्ही तिघांनी त्यांच्या मागे आरामखुर्ची उभी केली. त्यांना खुर्चीवर टेकण्यास सांगितलं व म्हटलं, "आता आम्ही खुर्ची मागे मागे घेत खाली ठेवतो, तुम्ही मागे तुमचा भार टाका.'' सक्सेनाकाका व्यवस्थित खुर्चीसकट मागे आले व आरामात नदीकडे पाहात बसले. आता प्रश्न होता वजनाचा. उंची दोघांची सारखी होती. पण बाबांच्या वेळेला स्वत: सक्सेना आम्हाला मदत करण्यास होते. मग आम्ही त्या प्रयोगासाठी तयारी करु लागलो. सक्सेनासुद्धा त्यात होते. बाबा 'नाही, नाही' म्हणत होते. बाबांचं नाही म्हणजे नाही हे माहीत होतं. मी बाबांना म्हणालो, "आम्ही तुम्हाला पाडणार नाही.'' तरी बाबांचा 'नाही' होतंच. काय करावं आता? मीही त्यांच्या तालमीतच वाढत होतो. मी भास्करला म्हणालो,

"जाऊ दे, बाबांचा आपल्यावर विश्वास नाही. नंतर कधी विकास आल्यावर बघू.''

ही मात्रा लागू पडली. बाबा कॉटवरुन उठत म्हणाले, "चला.'' बाबांनी पट्टा बांधला, काठी घेतली.

बाबांनी कार्यकर्त्यांवर मुलाप्रमाणे प्रेम केलं. आमच्यावर विश्वास नाही किंवा मुलाएवढा विश्वास, प्रेम नाही असं आम्हाला वाटणं ह्यात त्यांचा पराभव होता. ते कधी शक्यही नव्हतं, खरंही नव्हतं. आमच्या विश्वासावर खडतर भारत जोडो यात्रा, पंजाब यात्रा त्यांनी केल्या होत्या. खरं तर, असं बोलून मी त्यांचा अपमान केला होता. पण ते तयार झाले. मग नर्मदाकिनारी बाबांना उभं केलं. आम्ही चौघांनी पाठीमागून आरामखुर्ची उभी करुन धरली. त्यांना मागे झुकून पूर्ण भार टाकण्यास सांगितल्यावर त्यांनी तसं केलं. आम्ही सावकाशपणे आरामखुर्ची मागे मागे आणत जमिनीवर ठेवली. बाबांनी श्वास रोखून ठेवला असावा. त्यांनी श्वास सोडल्यावर आम्ही सर्व हसलो. आता बाबाही

मोकळे हसत होते. समोर छोटं स्टूल ठेवलं. त्यावर बाबांनी पाय लांब केले. डोक्यामागे उशी दिली. बाबा एकदम आराम बसले होते. चेहरा प्रसन्न होता. बराच वेळ ते काही न बोलता नर्मदेकडे पाहात राहिले. दुसऱ्या आरामखुर्चीत सक्सेनाकाका बसले. काही वेळानं बाबा नर्मदेबद्दल भरभरून बोलू लागले. चांगलं अर्धा तास बसल्यावर बाबा म्हणाले, “बस्स! नाही तर मागून त्रास होईल.’’

तेवढ्यात सक्सेना पटकन कॅमेरा घेऊन आले. मग बाबांशेजारच्या आराम-खुर्चीत मी बसलो. किसन-भास्कर मागे उभे राहिले. बाबांचा खुर्चीत बसलेला तो एकमेव फोटो आजही माझ्याजवळ आहे. नंतर चार-पाच वेळा बाबा नर्मदेकिनारी बसले. पुढे मी हेमलकसा इथं आलो.

कसरावदमध्ये पाहुणे असले की बाबा आनंदी असत. बाबा नेहमी गर्दीत राहिले होते. लोकांना भेटण्यात त्यांना आनंद असे. ते सर्वांनाच भेटत. त्यात भेदभाव नसे. बाबांचं वय झालं होतं. अनेक व्याधी होत्या. लोक त्यांना देव मानत. कधी कधी ह्या लोकांच्या प्रेमाचा त्रास होत असे. बाबांना ते सक्तीची विश्रांती मिळावी ह्या प्रयत्नात राहात. आनंदवनबाहेर कधी कधी असे प्रसंग येत. एकदा बाबा कोल्हापूरला गेले. मी सोबत होतो. आम्ही रेल्वेनं कोल्हापूरला गेलो. तिथं बेळगावचे एक जण आम्हाला घेण्यास आले. बाबांना त्यांचं मन मोडवेना. ते तयार झाले. बेळगाववाल्यांनी एक रुग्णवाहिनी आणली. बाबांनी त्या लहानशा बेडवर झोपून बेळगावपर्यंतचा प्रवास केला. बाबांच्या प्रकृतीला ते नक्कीच सुखकारक नव्हतं. बेळगावपर्यंत बाबा थकले होते. एका छान आलिशान बंगल्यात बाबांची व्यवस्था होती. आतमधल्या एका खोलीत एका आरामशीर पलंगावर बाबा पडले. काही वेळानं यजमान, बाबा काय घेणार म्हणून विचारू लागले. त्या खोलीत इतर कुणी नव्हतं. बाबांनी कॉफी घेतली. बाहेर बाबांना भेटण्यासाठी अनेक जण आले होते. बाबांना विश्रांती हवी म्हणून यजमान कुणाला आत येऊ देत नव्हते. एव्हाना बाबा एकटे कंटाळले होते. मी यजमानांना म्हणालो, “बाहेरच्या हॉलमधल्या दिवाणावर पडलं तर बरं होईल.’’ पण बाहेर खूप जण आले आहेत. बाबांना विश्रांती मिळणार नाही असं यजमानांचं म्हणणं होतं. मी त्यांना म्हणालो, “बाबा एकटे राहणे म्हणजे विश्रांती नाही. ते माणसांत असतील तर त्यांना खरी विश्रांती मिळेल.’’

हो-नाही करत ते तयार झाले. बाबा बाहेर आले. लोकांच्यात आले आणि आनंदी झाले. त्यांचा सर्व थकवा पळाला. केलेल्या प्रवासाची कोणती खूणही चेहऱ्यावर दिसत नव्हती. यजमानही खूश झाले. बाबांनी सुरुवातीच्या काळात कधी आनंदवन सोडलं नाही. नंतर वर्षात एक-दोनदा ते बाहेर जात. ज्या घरी बाबा उतरत त्यांच्या घरच्यांचा अक्षरश: पिट्टा पडत असे. कधी कधी वाटतं, बाबा किती आदिवासींसारखे आहेत. अनेक वर्षं आदिवासी भागात काम केल्यामुळे असेल का? सर्वसाधारण सर्व आदिवासी संस्कृती मातृसत्ताक असतात. आई ह्या विषयावर बाबा मनापासून भरभरून बोलत. अनेक कवितांत तसा उल्लेख सापडतो. सगळीकडे परमेश्वराला हजर राहाता येत नाही म्हणून परमेश्वरानं आई निर्माण केली, हे ते अनेक भाषणांत बोलत. माझं एक गमतीदार निरीक्षण आहे. कदाचित तो माझा खुळेपणाही असेल. बाबा बाहेरगावी, शहरात काही कुटुंबात दोन-तीन दिवस राहात. बहुतेक ठिकाणी त्या घरातली गृहिणी त्या घरात वर्चस्व असलेली असे. बाबांनी संस्थेचा संसार केला, पण त्यांच्या स्वत:च्या संसारात ताईंचा शब्द प्रमाण मानला जायचा. बाबांनी कधी त्यात लक्ष घातलं नाही.

बाबांना रागावलेलं, चिडलेलं काही लोकांनी पाहिलं आहे. प्रेमळ बाबा, हसरे बाबा अनेकांनी पाहिले असतील. आम्ही जवळपासच्या लोकांनी दोन्ही प्रकारचे बाबा पाहिले आहेत. बाबा लाजले तर कसे दिसत असतील, कुणी कल्पना केली असेल का? बाबा कधी लाजले असतील का? त्यांना पाहिलेल्यांना अशी शंकाही आली नसेल. हं! आता ताईंना विचारायचं राहून गेलं. पहिल्या भारत जोडो यात्रेत आम्ही तमीळनाडूमध्ये होतो. मदुराईपुढे एका गावात मुक्काम होता. यात्रेत गांधीयन संस्थांना भेट देणं नित्याचं होतं. अनेक ठिकाणी आमची व्यवस्थाच गांधीयन संस्था करत. इथंही एका गांधीयन आश्रमात आमचा मुक्काम होता. दुपारची सभा मुक्कामापासून दूर एका गावी हरिजन वस्तीत होती. बस जाण्याएवढाही रस्ता नव्हता. बाबा लहान गाडीत मागच्या सीटवर आडवे होऊन

आम्ही त्या जागी पोहोचलो. छोटासा मंडप घातला होता. स्टेज मात्र नेहमीचं बांधलेलं होतं. वरून पत्र्याची शेड होती. स्टेजच्या एका कोपऱ्यात बाबांसाठी कॉट टाकली होती. बाबांनी समोरच्या सर्वांना हात जोडून नमस्कार केला. टाळ्या वाजल्या. खेडूत मंडळी, बाया-मुलं एका बाजूला बसली होती. चांगल्या कपड्यातले काही मान्यवर दुसऱ्या बाजूच्या खुर्च्यांवर बसले होते. बाबा कॉटवर पडले. मी डोक्यापाशी खुर्चीवर बसलो. बाबांना भाषणाच्या वेळी पाय ठेवण्यास खुर्ची लागत असे, म्हणून अशी पकडून ठेवावी लागे. बाबा आडवे पडून निरीक्षण करत होते. त्यांच्या पायाकडे मान्यवर स्टेजवर बसले होते. माईकपाशी यदुनाथजी होते. दुसऱ्या बाजूला पाठीमागे पूर्ण भिंत होती. त्यावर एका बाजूला तमीळ भाषेत बराच मजकूर वरपासून खालपर्यंत लिहिला होता. त्या जिलब्या-जिलब्या काही वाचता येत नव्हत्या. भिंतीच्या उरलेल्या भागात मध्यभागी एका स्त्रीचं पूर्ण मोठं तैलचित्र होतं. खाली बहुतेक जन्म-मृत्यू लिहिलं असावं. ती वयस्कर स्त्री संस्था संस्थापक असावी. चित्र फार सुरेख रंगवलेलं होतं. चित्रात बाईनं खादीची साडी नेसली आहे हे समजण्याइतकं ते स्पष्ट होतं.

नेहमीप्रमाणे सभा सुरु झाली. दक्षिण भारतात सभांना वेळ लागे, कारण हिंदीही कुणाला समजत नसल्यानं दुभाष्या मधूनमधून तमीळ भाषेत परत सांगत असे. बाबांच्या भाषणाला बराच वेळ लागणार होता. मी बाबांकडे पाहिलं. बाबा मान वळवून भिंतीवरील स्त्रीच्या तैलचित्राकडे एकटक पाहात होते. बाबा कलेचे भोक्ते होते. चित्रकला, शिल्पकला, गाणं, वाजवणं ह्या सगळ्यांत त्यांना रस होता, ओढ होती. मी परत समोरच्या लोकांचं निरीक्षण करू लागलो. मी जेव्हा परत बाबांकडे पाहिलं, नेमकं त्याच वेळी बाबा मान वळवून भिंतीवरील चित्राकडे पाहात होते. काही क्षणांनी त्यांनी मान सरळ केली. मला बाबांचा चेहरा दिसत नव्हता. चित्रातली बाई गांधीयन होती, तरी पण बाबांच्या ओळखीची असणं सभंव वाटत नव्हतं. काही वेळानं बाबांनी परत मान वळवून त्या तैलचित्राकडे पाहिलं. त्यांचा डाव हात डोक्याकडे आला. ते केसांतून बोटं फिरवत होते. मी उजव्या हाताकडे पाहिलं, बाबा बोटं मोडून मूठ बांधून परत सोडत होते. अरेच्या! बाबा काही तरी आठवत आहेत तर! पण काय? नाव तर ते विचारू शकत होते. मग काय? मी फोटोकडे नीट निरखून पाहू लागलो. नेमकं त्या क्षणी बाबा मान वळवत होते. मी पुढे झालो, झुकून बाबांच्या कानापाशी म्हणालो,

“बाबा, अगदी ताईंसारखी साडी आहे, पण काठ वेगळे आहेत.”

“अं हं! काठ वेगळे वाटतात, नाही...” एवढं बाबा बोलले. नंतर त्यांचा चेहरा हसता हसता इतका वेगळा झाला, की जो मी प्रथमच पाहात होतो. बाबा चक्क लाजले होते.

“समोर बघ, भाषण चालू आहे...” एकदम सावध होत बाबा मला म्हणाले. प्रयत्नपूर्वक ते गंभीर भाव चेहऱ्यावर आणत होते. मी परत मागे होऊन खुर्चीवर बसलो. मी आठवू लागलो. आम्हाला निरोप देण्यासाठी ताई कन्याकुमारीला आल्या होत्या. त्यावेळी त्या अगदी अशीच साडी नेसल्या होत्या. काठ थोडे मोठे होते एवढंच. बाबांना ताईंची आठवण होत होती तर! मला रोजच पत्नी रेणुकाची आठवण होत असे. ही साडी ताईंनी बाबांना आवडते म्हणून निरोपाच्या वेळी नेसली असावी. काय असेल ते असेल, लाजलेले बाबा पुन्हा पाहाणं शक्य नाही. परत परत आठवून तो चेहरा मी हृदयात साठवण्याचा प्रयत्न करू लागलो. अशा काही आठवणींमुळे बाबा फार आपले, आपल्यातले एक वाटत. काही वेळा बाबा फार मजेशीर बोलत, काहीसं फाजीलपणे.

पूर्वी हेमलकसा सात-आठ महिने इतरांपासून तुटलेले असे. हिवाळ्यानंतर पावसाच्या तोंडापर्यंत प्रकल्पावर बांधकाम चालू असे. आनंदवन, सोमनाथहून रुग्ण कामासाठी हेमलकसा इथं येत. पाच महिने राहिल्यावर कधी एकदा परत आपापल्या घरी जातो अशी सर्वांची अवस्था असे. पूर्वी पाऊससुद्धा सात जूनला येत असे. खरं तर पहिल्या पावसाला रस्ते बंद होत नसत, पण पहिला पाऊस पडला की लगेच जाण्याची तयारी होत असे. ट्रक इथंच असे. काम करणाऱ्या लोकांबरोबर एक इंजिनिअर असत. ते आनंदवनला राहात असल्यामुळे त्यांनासुद्धा जाण्याची घाई असे. अशाच

एका वेळी ट्रक तयार होता. काही रुग्ण ट्रकवर आपलं सामान ठेवून बसलेही होते. मी, बाबा, इथंच राहणारे दोघं-तिघं बाजूला उभे राहून बोलत होते. ते इंजिनिअर आनंदवनला जाण्याच्या घाईत होते. छान धोतर नेसलं होतं. धोतराचा सोगा डाव्या हातावर घेऊन ते आमच्या समोरुन दोन-तीनदा ट्रककडे गेले. त्यांचं आमच्याकडे लक्ष नव्हतं. बाबांनी ते परत लांब जाताना काठीने त्यांच्याकडे दाखवत म्हटलं,

"अरे तो पहा, कोंबडी दिसल्यावर कोंबडा कसा एक पंख खाली करुन गोल गोल फिरतो तसा सोगा घेऊन हिंडतो आहे. आता ह्यांना जेवणही सुधरणार नाही.''

मी प्रथम बाबांकडे पाहिलं. ते हसत होते. बाबांचे निरीक्षण किती जबरदस्त आहे! बाबा अगदी आपल्यासारखे चावटही बोलतात तर! हे असं काही घडलं की बाबा आणखीच आपले वाटू लागायचे. अशा अनेक गमती, प्रसंग आहेत. आम्ही कठीण परिस्थितीत एकटेपणात राहातो ह्यासाठी ते नेहमी हसत राहावं असा प्रयत्न करत असावेत.

हेमलकसा इथली सुरुवातीची दहा वर्षं खडतर होती असं वाटतं. त्या वेळी तरुणपणामुळे काही वाटत नव्हतं. त्याच वेळी ताई-बाबांमुळे कष्टाची, हालअपेष्टांची जाणीव होत नसावी. जूनमध्ये पाऊस सुरु झाला की बाबांना इथं राहाता येत नसे. पाच-सहा महिन्यांत भेट नाही, त्यामुळे बाबा अस्वस्थ असत. मे महिन्यातच आठवणीनं बाबा सहा महिन्यांसाठी रेशनपाणी, औषधं, इतर वस्तूंचा साठा होत आहे ना ह्याची काळजी घेत. पहिली तीन-चार वर्षं एक ट्रॅक्टर इथं ठेवला होता. नंतर जीप, निदान बांदीया नदीपर्यंत तरी अडचणीच्या वेळी चालावं लागू नये म्हणून. जूनमध्ये शेवटचा निरोप घेताना बाबा काळजीनं फार अस्वस्थ होत असत. त्यांना गहिवरुन येत असे. त्यावेळी - हे आहे ना? ते पुरेसं होईल ना? - असं सारखं विचारत.

हेमलकसा सुरु झाल्यावर चार-पाच वर्षांत आमची लग्नं झाल्यामुळे हेमलकसा कुटुंब मोठं झालं, तशी बाबांची काळजीही वाढली. असाच एकदा निरोप घेताना बाबा ट्रकमध्ये चढले. गादीवर आडवे झाले. आम्ही कार्यकर्ते ट्रकजवळ होतो. "चलतो, सगळं सामान आहे ना? बघा, अजून वेळ गेली नाही.'' काहीसं थांबून आठवल्यासारखं करुन म्हणाले, "मुलांना दूध पुरेल असं वाटतं. लक्ष ठेवा. अरे हो, तुमची औषधं, निरोध आहे ना? नाही तर नेहमी दिवाळीनंतर आलो की गाई-म्हशी भाकड असतात, स्त्रिया गर्भार असतात.'' आम्हाला हसावं की नाही, असं झालं. मागच्या वर्षी खरंच तसं झालं होतं. नंतर गाई-म्हशी धना न गेल्यानं दुधाचा तुटवडा झाला होता. बाबांना सगळ्यांची काळजी होती.

बाबा कौतुकही भरभरुन करत. एखादी गोष्ट आवडली की तिचं वर्णन, कौतुक अनेकांजवळ करत. एखादी गोष्ट अनेकांना सांगण्यामुळे त्यांच्या स्मरणात कोरली जात असे. अनेक वेळा एखाद्या तारखेला कुणी पाहुणा येणार आहे, हे ते आचाऱ्यापासून चालकापर्यंत सर्वांना सांगत. त्याचा अर्थात फायदा होत असे. एखाद्या ठिकाणी जायचं ठरत असलं, की कुणाला तरी आठवण होत असे. बाबांच्या संबंधात एक मान्यवर म्हणत, की तुम्हाला एखादी गोष्ट सर्वांपर्यंत पोहोचवायची असेल तर ती गोष्ट बाबांना सांगा व म्हणा कुणाला सांगू नका. बाबांचं वागणं, बोलणं, चालणं सर्व पारदर्शी होतं. काही लपवून, झाकून नव्हतं. त्यांच्या रागाइतकंच त्यांचं प्रेमही ठळक असे. अनेक वेळा ते मिष्किल बोलत, पण त्यात कुणालाही दुखावणं नसे.

भारत जोडो यात्रेत सर्व राज्यांनी बाबांना 'राज्याचा पाहुणा' म्हणून जाहीर केलं होतं. स्टेट गेस्ट असल्यानं वरिष्ठ अधिकारी भेटत, मदत करण्यास तत्पर असत. प्रत्येक राज्यात मुख्यमंत्री, इतर मंत्री बाबांना कुठं ना कुठं भेटत असत. तसंच प्रत्येक राज्याच्या राजभवनावर राज्यपालांच्या भेटीला बाबा जात असत. भारत जोडो यात्रेत एक बॅज आम्ही सर्व लावत होतो. बाबा मान्यवरांना स्वत: तो बॅज छातीवर लावत असत. बाबा न चुकता पूर्ण यात्राभर तो बॅज स्वत: छातीवर लावूनच असत. कोणत्याही मुख्यमंत्री अगर राज्यपालांना भेटताना बाबा आठवणीनं तो बॅज लावत. मणीपूर राज्यपालांना भेटण्यास आम्ही गेलो हो. राज्यपाल वयस्कर, आजारी होते. इतरांप्रमाणे उठून त्यांनी

बाबांचे स्वागत केलं नाही; पण बाबांच्या भेटीसाठी नटूनथटून बसले होते. अंगावर पांढरा शेरवानी कोट होता. कोणतं कापड होतं माहीत नाही, बाबा त्यांच्या खिशाच्या वर बॅजची पिन टोचत होते, पीन वाकडी झाली. दुसरा बॅज घेतला तरीही पीन बाबांना टोचता येईना. मी पुढे झालो. जोर लावून मी बॅज लावण्याचं काम पूर्ण केलं. भेट संपवून परत बसमध्ये आलो. बाबा कॉटवर पडता पडता म्हणाले,

"विलास, मला तर वाटलं, मी त्यांच्या कातडीत तर पिन लावत नाही ना!''

ते त्यांच्या राजकीय कार्यात वादग्रस्त होते. मुख्यमंत्रीपदावरुन पायउतार व्हावं लागलेले होते.

बाबा शेवटच्या आजारपणात नागपूरच्या हॉस्पिटलमध्ये होते. बाबा आय.सी.यू.त होते. रोज रात्री डॉ. विजय पोळ बाबांसोबत खोलीत असत. सकाळी सहा वाजता मी हॉस्पिटलमध्ये गेलो की ते परत जात असत आणि नित्यकर्मे उरकून परत येत असत. सकाळी साडेसहा ते नऊ-साडेनऊपर्यंत मी आणि बाबा, दोघंच सोबत असू. सकाळी पेपर आले की बाबा मराठी-इंग्रजी पेपर वाचत. इतक्या सकाळी कुणी भेटण्यास येत नसे. पेपर मी घेऊन येत असे. बाबांना रक्ताचा कर्करोग झालाय हे निदान पक्कं झालं हे संध्याकाळी कळलं. सर्व डॉक्टरांच्या चमूपुढे प्रश्न होता, बाबांना कसं सागावं? माझं मत होतं की बाबांना सांगावं, ह्यात लपवण्यासारखं काय आहे. कधी तरी समजणार आहे. धक्का बसेल वगैरे इतरांसाठी, बाबांना जन्मभर धक्केच बसत आले आहेत. अर्थात, माझं मत कोण घेणार! त्या सकाळी पेपर मी आणले, पण डॉ. पोळ यांनी सकाळीच पेपर घेऊन पाहिला होता. पेपरमध्ये 'बाबांना रक्ताचा कर्करोग' ही ठळक बातमी होती. डॉ. पोळ यांनी, पेपर बाबांना देऊ नको म्हणून मला सूचना केली. सकाळच्या राऊंडच्या वेळी मोठे डॉक्टर बाबांना काय सांगायचं ते सांगतील असं म्हणाले. मी आणलेला पेपर ते घेऊन गेले. आय.सी.यू.मध्ये गेल्या गेल्या बाबांनी नेहमीप्रमाणे माझं हसून स्वागत केलं. गेले आठ-दहा दिवस बाबा बंद खोलीत होते. बाबांच्या स्वभावाला ती अंधारकोठडीच वाटत असणार! निसर्गात आयुष्य काढलेला माणूस, सूर्यप्रकाशाशिवाय कसा राहात असेल?

"बाहेर पाऊस आहे का रे?''

"नाही बाबा, स्वच्छ ऊन पडलं आहे.''

"हं!'' बाबांनी छताकडे पाहात म्हटलं. "अरे! पेपर नाही आणलास? माझा चष्मा दे.''

"नाही बाबा, आज पेपर नाही मिळाला कुठं. का ते समजत नाही.'' मी त्यांच्याकडे पाहात नव्हतो.

"विलास!'' बाबांनी हाक मारली. मी त्यांच्याकडे पाहिलं. त्यांच्या नजरेत अविश्वास होता. मी काही बोलण्याच्या आत त्यांनी म्हटलं.

"जा, इंग्रजी, मराठी पेपर घेऊन ये. जा...''

त्यांना एकटं टाकून मी बाहेर गेलो. पळतच कोपऱ्यावरुन पेपर घेऊन आलो. बाबांनी इंग्रजी पेपर उघडला. ते वाचू लागले. मी कोपऱ्यात थंडपणे उभा होतो. इंग्रजीपाठोपाठ मराठी पेपर त्यांनी वाचला. पेपर माझ्याकडे देत ते म्हणाले,

"अरे, एवढं लपवण्यासारखं काय आहे? मला कल्पना आली होती. चला, डॉक्टरांना सांगा, बाबांना आनंदवनला जायचं आहे. मला माझ्या माणसांत मरायचं आहे. मला माझ्या माणसांत घेऊन चला.''

नंतर ते रोजच्यासारखेच होते. फक्त, आता इथं नाही, आनंदवनमध्ये चला म्हणून त्यांनी ध्यास घेतला. आम्हाला संध्याकाळी बोलण्यात समजलं, आदल्या दिवशी चार-पाच डॉक्टर आपसात चर्चा करताना त्यांनी पाहिलं होतं. बाबांना स्वत: डॉक्टरांइतकंच मेडिकलमधलं ज्ञान होतं. बाबा अशा वेळी किती सहजपणे म्हणाले,

"अरे, काल चार-पाच डॉक्टरच माझ्यापेक्षा सिरीयस दिसत होते तेव्हाच मी समजलो, 'बाबा आमटे' चलो, आता वेळ झाली. समाप्त!'' त्यांच्या शब्दांत-

'आणि आज कर्करोगाच्या क्रूसाला
खिळलेला तो!
रुग्णशय्येला खिळलेलं प्रत्येक जीवन
खऱ्या अर्थी जिझसच्या जीवनाशी
एकरुप होण्याच्या जवळ असते.'
- ज्वाला आणि फुले 155

बाबांच्या अनेक कवितांमध्ये जिझस का असतो? खरं तर करुणा, प्रेम, बंधुभाव ह्याचा प्रत्येक धर्म पुरस्कार करतो. मग का?

एकदा रक्ताच्या कर्करोगाचं निदान झाल्यावर बाबा डॉक्टरांना, 'मला आनंदवनमध्ये जाऊ द्या' म्हणून मागे लागले. बाबांचं आनंदवनमध्ये कसं होईल, औषधं, रक्ताच्या कर्करोगात आवश्यक असलेलं वेगळ्या प्रकारचं रक्त कसं देता येईल, ह्या काळजीत डॉक्टर होते. विकासनं त्यांच्या टीमकडून आनंदवनमधली खोली दोन दिवस-रात्र काम करुन आय.सी.यू.सारखी बनवली. बाबांचा भाचा अविनाश पटवर्धननं आपलं कसब वापरुन रक्ताचा कर्करोग झालेल्या रुग्णाला लागणारं स्पेशल रक्त (प्लेटलेट) नेण्यासाठी खास यंत्रपेटीही बनवली. शेवटी चार दिवसांनी आम्ही बाबांना त्यांच्या माणसांत घेऊन आलो. अख्खं आनंदवन बाबांना भेटण्यासाठी आनंदवनमध्ये उभं होतं. नवीन आय.सी.यू.मध्ये कॉटवर पडल्यावर थकवा असला तरी बाबांचा चेहरा प्रसन्न होता. बाजूच्या भिंतीवर नेहमीप्रमाणे मोठ्या अक्षरांत तारखा असलेलं 'कालनिर्णय' कॅलेंडर होतं. बाबांनी आम्हाला मोजून एकविसाव्या दिवशीच्या तारखेवर फुली मारण्यास सांगितलं. 'का?' म्हणून विचारलं तर सांगत नसत, फक्त हसत. आम्ही विचार करत होतो. बाबा जाणार हे नक्की. ते कधीच जाऊ नयेत असं वाटणंसुद्धा तितकंच खरं, तरीसुद्धा हे एकविसाव्या दिवसाचं काय? मन विचार करत होतं. आम्ही आपसात बोलत होतो. कितीही विचारलं तरी ते फक्त हसत, काहीच बोलत नसत. पुढे एक एक दिवस ते मोजत आणि म्हणत आता चौदाच राहिले. बाबा योगी तर नाहीत? त्यांना आपला मृत्यू आधीच माहीत आहे की काय? त्यांची प्रकृती तर आता चांगली वाटते. मग ही खूण कसली? जसा जसा एकविसावा दिवस जवळ येत होता, तसे आम्ही जास्त काळजी, जास्त लक्ष ठेवत होतो. तो खूण केलेला एकविसावा दिवस उजाडला आणि मावळलाही. बाबा ठीक होते. दुसऱ्या दिवशी आम्ही सकाळी खोलीत गेलो. बाबा प्रसन्न होते. आम्ही बाबांना कॅलेंडरकडे बोट दाखवत विचारलं,

"बाबा, एकवीस दिवस तर झाले. मग काय?''

बाबा मोठ्यानं हसले. मग म्हणाले,

"अरे, सगळे डॉक्टर हरले, मी जिंकलो.''

आम्ही एकमेकांकडे पाहू लागलो. मग बाबांनी आम्हाला सांगितलं, की नागपूरहून आम्ही बाबांना घेऊन निघालो त्यावेळी तिथले तीन-चार डॉक्टर बोलत उभे होते. तेव्हा डॉक्टर म्हणाले, आनंदवनमध्ये बाबांना नेत आहेत, पण आनंदवनमध्ये बाबा तीन आठवड्यांवर जगणार नाहीत. नॉट मोर दॅन थ्री वीक्स.'' बाबा हसत होते आणि आम्हीही हसत होतो. कुणाला? नियतीला तर नाही ना? बाबांसोबत असताना अनेक वेळा मनमोकळं हसलो आहे. गमतीचे, आनंदाचे अनेक प्रसंग आले. बाबा एका कवितेत म्हणतात-

'ज्यांच्यासोबत हसलो त्यांना विसरता आलं
ज्यांच्यासोबत अश्रू गाळले
त्यांच्यासोबतच चालत आलो आहे.'
- करुणेचा कलाम 91

बाबांच्या डोळ्यांत अश्रू मी चार-पाच वेळा पाहिले, शारीरिक व्यथा-वेदनेनं. पण मन दुखावल्यामुळे अश्रू कधी पाहिले का? हो, तशी आठवण आहे. दुसऱ्या भारत जोडो यात्रेत आम्ही

यात्रेच्या शेवटच्या चार दिवस आधी एका मुक्कामाच्या जागी होतो. बाबांशिवाय यात्रेत चार-पाच वयस्कर मान्यवर होते. बाबा यात्रेतील तरुणांशी नेहमीच बोलत असत; पण ते नेहमी शक्य नसे. दहा-बारा दिवसांनी एखाद्या मोठ्या शहरात दोन दिवसांचा मुक्काम असे. अशा ठिकाणी यात्रेतल्या सर्वांची डाक येत असे. त्याच मुक्कामात मागील आठ दिवसांतल्या अडीअडचणी, भांडणं, वाद ह्यासाठी फक्त यात्रेतल्या तरुण-तरुणींची मान्यवरांसोबत बैठक आयोजित केली जाई. बाबा शक्यतो बेठकीत असत, पण काही गाठीभेटी अगर कार्यक्रमांमुळे बाबांना शक्य होत नसे. त्या दिवशी एका कार्यक्रमामुळे बाबा मीटिंगमध्ये नव्हते. नक्की काय झालंय हे समजण्यास मार्ग नव्हता, कारण मी व इतर चार-पाच जण आनंदवनवासी बाबांसोबत होतो. परत आल्यावर रात्रीच्या जेवणाच्या वेळी यात्रेतले तरुण व तरुणी वेगवेगळे ग्रुप करून चर्चा करताना दिसत होते. चौकशी केली, पण काही नाही, विशेष नाही, असं ऐकण्यात आलं. चार दिवसांनी यात्रा संपणार होती. जेवणाच्या वेळी यात्रेतल्या चार-पाच तरुणी जेवणास नव्हत्या असं कानावर आल्यामुळे बाबांनी चौकशी केली. पोट ठीक नाही, भूक नाही, उपवास आहे अशी नेहमीची उत्तरं आली. त्यामुळे कुणी फारसं लक्ष घातलं नाही. दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे बाबा पावणेसहा वाजता बसमध्ये आले. आम्ही सर्व होतो. रोज चार-पाच मान्यवर बसमध्ये येत असत. आज फक्त दोघंच होते. सहाला काही मिनिटं असताना बाबा अस्वस्थ झाले. मी समोर पाहिलं, बससमोर नेहमीप्रमाणे तिघं सायकलस्वार उभे होते. पण कुणी निघण्याच्या तयारीत दिसत नव्हतं. नक्की काय झालंय? मी खाली उतरलो. तेवढ्यात व्यवस्थापक पडेल चेहऱ्यानं आला. मुली अजून रांगेत येऊन उभ्या नाहीत, कसं करावं? नेहमी मुली पुढे राहातात. आज काय झालं? तो नक्की काही सांगत नव्हता. मी बसमध्ये गेलो. बाबांना परिस्थितीची कल्पना दिली. बाबांनी तरुणींमधल्या वयानं सर्वात मोठ्या असलेल्या दोघींना बोलावण्यास सांगितलं. काही क्षणात, ह्याचीच वाट बघत असल्याप्रमाणे त्या पळतच बसमध्ये आल्या. बाबांनी फक्त डोळ्यांनीच त्यांना विचारलं, 'काय झालंय?'

त्यातली एक म्हणाली, "आम्ही बाबांना भेटल्याशिवाय आज निघणार नाही असं सांगितलं तरी कुणी आम्हाला तुम्हास भेटू देत नाही."

बाबांचे डोळे रागानं मोठे झाले. चेहऱ्यावर संताप दिसत होता. "कुणी?" माझ्याकडे पाहात बाबांनी मोठ्या आवाजात विचारलं. पण माझा काही संबंध नव्हता. त्या मुलीनं दोन हजर मान्यवरांकडे पाहात म्हटलं, "नाही, ते इथं नाहीत. कारनं ते पुढं गेलेत."

"काय झालंय नक्की? आता फक्त चार दिवस राहिले आहेत. चला, पटकन बोला, उशीर होतोय!"

त्या दोघी बाबांकडे बघत राहिल्या. नंतर त्यांनी मान खाली घालून सांगितलं,

"काल संध्याकाळी एका मान्यवरानं भर मीटिंगमध्ये सर्वांसमोर आरोप केला, की यात्रेतल्या तरुणी वैश्या जैसा व्यवहार करते है." परत श्वास घेत ती रडक्या आवाजात म्हणाली, "बाबा, त्यांनी नाव घेऊन बोलावं. सर्वांना असं म्हणणं मूर्खपणाचं आहे. त्यांनी आमची माफी मागावी असं सर्वांचं म्हणणं आहे. नाही तर दोघी जणी यात्रा सोडून जाण्याची तयारी करत आहेत."

बाबांच्या चेहऱ्यावरचा राग मावळला. त्यांचा चेहरा भयानक दुःखी दिसत होता. त्यांचे डोळे विस्फारलेले होते. बाबांना काही होणार तर नाही ना, असं मला वाटलं. बाबांनी काही क्षण डोळे मिटून घेतले. परत उघडले तेव्हा दोन्ही डोळ्यांतून अश्रू येत होते. बाबांनी रुमालानं डोळे पुसले व वळत मान्यवरांकडे पाहात विचारलं,

"खरं आहे हे?"

मान्यवर गडबडले. एक जण म्हणाले,

'बाबा, काल मीटिंगमध्ये मी नव्हतो.'

दुसरे खिडकीबाहेर पाहात म्हणाले,

"सर्व म्हणतात, पण मी स्वत: काही ऐकलं नाही."

बाबांनी रागानं शून्यात पाहात नजर वळवली. त्यांचे दोन्ही हात समोर आले. बाबा पंजे जोडत नमस्कार करत सद्गदित आवाजात म्हणाले,

"मी तुमची..."

ती तरुणी बाबांनी नमस्कारासाठी जोडलेला हात आपल्या दोन्ही हातात पकडत एकदम म्हणाली,

"नाही, नाही बाबा, तुम्ही काही बोलू नका. त्या हलक्या माणसांसाठी तुम्ही कशाला माफी मागता? ह्यात तुमची काय चूक? आम्ही त्यांना माफ करतो."

त्या एकदम तिथून निघाल्या. बाबांनी मला खूण केली, मी त्यांच्या मागे गेलो. पुढे धावत जाऊन त्या इतर मुलींपाशी गेल्या. मी जाईपर्यंत त्या सायकली घेऊन निघाल्याही. नेहमीप्रमाणे आम्ही निघालो. मी मान वळवून बाबांकडे पाहिलं. बाबा शांतपणे कसला तरी विचार करत होते. चेहऱ्यावर दुःखाची छाया होती. बाबा सुधारक विचारांचे होते. सोमनाथमधल्या अनेक शिबिरांचा अनुभव गाठीशी होता. तरुण-तरुणींचं मोकळं वागणं त्यांना उगाच खटकत नसे. विसाव्या शतकाच्या शेवटी ते एकविसाव्या शतकातील परिस्थितीचा विचार करणारे होते. ज्या वेळी भारतात कॉम्प्युटर आलाही नव्हता, तेव्हा बाबा कवितेत लिहितात-

> 'आणि उद्याच्या पिढ्यांना त्याची ओळख पटवण्यासाठी
> क्वचित कॉम्प्युटर लागेल!'
> - ज्वाला आणि फुले 142

आपल्या सोबत रोज वावरणाऱ्या एका वयस्कर मान्यवरांनी असं विधान करावं ह्याचं दुःख ते पचवू शकत नव्हते. तासाभरानं नाश्ता घेण्यासाठी यात्रा एका ठिकाणी थांबली. बाबांनी खुणेनंच 'मला काही नको' म्हटलं. सर्व जण नाश्ता घेण्यासाठी गेले. मी बसपाशी उभा राहिलो. मघाशी मी जेव्हा यात्रा प्रारंभापाशी गेलो होतो त्या वेळी यात्रेतल्या एका सायकलस्वार तरुणीनं मला प्रश्न विचारला होता, त्या विचारात मी होतो. भारत जोडो यात्रा चार दिवसांनी संपणार होती. गेल्या सहा महिन्यांमधला सर्व आनंद, उत्साह संपल्यासारखा वाटत होता. बाबा बसमध्ये कॉटवर विचारमग्न पडले होते. बाबांनी मला हाक मारली. मी बसच्या दारात गेलो. मी बाबांच्या नजरेला नजर न देता उभा राहिलो.

"नाश्ता करत नाहीस का?" बाबांनी विचारलं.

"नाही बाबा, भूक नाही." माझ्या आवाजातला फरक बाबांनी हेरला असावा. ते म्हणाले,

"विलास, काय झालंय? तुझ्या डोळ्यांत पाणी..."

मी बाबांकडे पाहिलं. त्यांचे डोळे ओले होते. त्या नजरेत पराभव, निराशा, चीड... नक्की काय होतं? मला राहावेना. मी बाबांकडे पाहात म्हटलं,

"द्वद्वने मला विचारलं, आज जर बाबांची मुलगी आमच्या बरोबर सायकल चालवत असती तर बाबांनी काय केलं असतं?"

काही क्षण त्रास होणारी शांतता होती. कसला तरी आवाज व्हावा, नाही तर... नाही तर... अशी माझी अवस्था असताना बाबांचा आवाज आला,

"वेडी आहे ती. तुम्ही सगळ्या माझ्या मुली-नातीच आहात असं सांगा तिला..." बाबा रुमालानं डोळे टिपताना मी पाहिलं. मी चटकन सावरलो. खरं होतं. बाबांनी कधीच कुणाला परकं मानलं नव्हतं. तरुणांकडून अशा प्रकारच्या वागण्याचीच त्यांची अपेक्षा होती. ह्या क्षणाला बाबांना काय वाटत असेल हा विचार त्या दिवशी कायम छळत राहिला. आणि आता समोर बाबांची कविता आहे-

> 'अखेर तक्रार मी कुणाविरुद्ध करणार?
> 'जगावे की जगू नये?' या प्रश्नाला
> आतून कितीदा नकारार्थी उत्तर मिळालं

आणि कितीदा माझं आत्मदहन मी कल्पिलं
संकल्पिलं
कुठल्याही जाहिराती वाचून
आणि कोणत्याही कमलकुंडात नव्हे
तर चौपाटीवर भेळ खाऊन फेकलेल्या
कागदांच्या ढिगाऱ्यात
कुठं तरी जळत असलेलं माझं शरीर
मला दिसलं
नॉट टु बी - नॉट टु बी!'
- ज्वाला आणि फुले 144

असे मानहानीचे, टीकेचे, स्वत:च्या कुवतीवर प्रश्नचिन्ह उभे करणारे कित्येक बाण शरीरावर झेलत बाबा समाजकार्याची आंबट कैरी खात, आंबलेल्या दातांनी-

'तरी माझं हे जहाज सोडणार नाही
कारण त्यावर माझी सगळ्यात जास्त प्रीती आहे.'
- ज्वाला आणि फुले 145

का? का? काय जरूर होती, की कसली प्रेरणा होती? त्यांचा सर्वात जास्त विश्वास होता भारतातल्या तरुणाईवर. शेवटपर्यंत दुसऱ्याच्या हिताचा विचार करत त्यांनी देह सोडला, कारण त्यांना विश्वास होता-

'जहाजाबरोबर स्वत:ला बुडवून घेणारे कर्णधार जिथं
तिथंच बुडता देश वाचवणाऱ्या
नाविकांच्या पिढ्या असतात, जन्म घेतात
वाट पाहणाऱ्या किनाऱ्यांना
आणि लाटांच्या उग्र कल्लोळाला कळू द्या
मी अजून जहाज सोडलेलं नाही!'
- ज्वाला आणि फुले 145

काय खोटं आहे? आज बाबांच्या प्रेरणेनं, त्यांना मानणारे अनेक तरुण-तरुणी देशभर आपापल्या परीनं समाजासाठी काम करत आहेत, त्याच नाविकांच्या पिढ्या - असं बाबांना अभिप्रेम असेल का? बाबांची जिद्द डोळ्यांसमोर ठेवून त्या नाविकांनी आपापल्या होड्या सोडू नयेत हीच बाबांना खरी श्रद्धांजली ठरेल.

भारत जोडो यात्रेचे शेवटचे चार दिवस मला मधूनमधून ही सकाळ आठवत राही. सोबतच्या मान्यवरांसाठी बाबा अपमान सहन करतात. सोबतच्या तरुण-तरुणींवर त्यांचा विश्वास होता. बाबा काळाप्रमाणे बदलत राहिले म्हणून ते 94 वर्षांपर्यंत तरुण राहिले. बदलत्या काळाप्रमाणे ते विचार करु शकत होते. विसाव्या शतकात एकविसाव्या शतकातल्या शक्यता ते पाहू शकत होते. 'पंखांना क्षितिज नसते' ह्या कवितेत बाबा म्हणतात-

'शून्याकार कक्षेत भ्रमणारे हे पंख
काळाचे बंदिवान असतात
आणि या अभागी बंदिवानांच्या पायांत
व्रतबद्धतेच्या शृंखला खणखणत असतात.'
- ज्वाला आणि फुले 33

बाबांनी आयुष्यात खूप भोगलं होतं. अनेकांशी त्यांचा संबंध येत असे. असे प्रसंग पूर्वीही आले

असावेत. माझा पहिलाच प्रसंग होता. मी अस्वस्थ होतो. त्या मान्यवरांचा रागच नाही, तर चीड, घृणा आली होती. वरील ओळी अशा प्रकारच्या लोकांचं वर्णन तर आहे. त्याच कवितेत बाबा पुढे लिहितात-

'करंजीच्या तेलाचे दिवे पाजळून
प्रकाशाचे प्रखर मुख ते बघू पाहातात!
तिथं त्यांना जीवन जाळणाऱ्या रक्त-भडक ज्वाला दिसतात
अश्लील मांसलतेचे उबगवाणे पुंज तिथे त्यांना दिसतात
आणि मांगल्याच्या ओकाऱ्या देत सर्वभर
आपल्या फलशून्य प्रामणिकतेचे ओझे डोक्यावर लादून...'
- ज्वाला आणि फुले 33

त्यावेळी मी बाबांची कविता वाचली नव्हती. बाबांसोबत कविता जगत होतो असं म्हणणं खरं वाटतं. बाबांनी किती प्रकारचे स्वभाव, वागणे अभ्यासले असावेत? बाबा शरीरानं आता जवळ नसताना मला बाबा जास्त समजू लागले का? बाबा अशांबद्दल पुढे म्हणतात-

'वणवणत असतात हे दिवाभीत विफलात्मे
वैफल्य फक्त वणवणू शकतं, वाट शोधू शकत नाही'
- ज्वाला आणि फुले 33

त्यावेळी मी काहीसा भडकलो होतो. कुठं चर्चाही करता येत नव्हती. पुढे मी त्या मान्यवरांबाबत माहिती मिळवू लागलो. मग समजलं, की हे वयस्कर मान्यवर अविवाहित होते. अरेच्या! असं आहे तर! बाबा कवितेत म्हणतात-

'जो खेळ कधी तुम्ही जीवनात खेळलाच नाही
त्याचे नियम कसे करता तुम्ही?
आणि ज्याचे नोटेशन तुम्हाला ठाऊक नाही
ते संगीत आम्हाला का ऐकवता बरे'
- ज्वाला आणि फुले 100

आता वाटतं, मी उगाच त्रास करून घेतला.

बाबा रागीट होते का? होय की नाही? असे अनेक प्रसंग बाबांच्या सहवासात मी अनुभवले आहेत, की अजूनही माझ्यासमोर प्रश्नचिन्हं आहेत? बाबा त्यांची स्वप्नं म्हणतात, म्हणजे त्यांच्या नवीन नवीन कल्पना. त्या साकारताना त्यांचं नियोजन ते फार काटेकोरपणे करत. त्यांच्यापाशी प्रचंड अनुभव होता. तरीसुद्धा कधी कधी त्यात अडथळा येत असे. मग त्यांची चिडचिड होई. अर्थात, ती क्षणिक असे. कधी कधी कार्यकर्त्यांमुळे, नातेवाइकांमुळे संस्थेची शिस्त बिघडण्याचा प्रसंग येई त्या वेळी त्यांचा राग अनावर होई. अशा वेळी ते एकांतात जात अगर तिथून निघून जात. काही वेळा एखाद्याला त्यांना दुखावणं जमत नसे, कारण त्या वेळच्या कामात त्यामुळे अडथळा येण्याचा धोका असे. अशा वेळी तो राग जवळच्या व्यक्तीच्या वाट्याला येत असे. अर्थात, ज्याच्यावर त्यांचं खरं प्रेम होतं त्यांच्यावर ते रागावू शकत. बाबा नेहमी त्यांच्यासोबत असणाऱ्या सर्वांची फार काळजी घेत. प्रत्येकाची बारीकसारीक सवय त्यांच्या परिचयाची असे. पण काही प्रसंगांत हेच रागाचं लक्ष्य होत असत.

आम्ही कसरावद मुक्कामी असताना, एकदा मेधा पाटकर तिथं आल्या असताना, माझ्या 'एका नक्षलवाद्याचा जन्म' ह्या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाला त्या प्रमुख पाहुण्या म्हणून हजर राहाणार आहेत असं त्यांनी बाबांना सांगितलं. त्या वेळी मी तिथंच होतो. बाबांच्या चेहऱ्यावर नाराजी स्पष्ट दिसत होती. बाबा गांधीवादी होते व 'नर्मदा बचाव संघर्ष' अहिंसेनं चालवायचा असं जगजाहीर

होतं. त्या दिवशी मेधाताई निघताना बाबा म्हणाले, “बघ, तू खरंच प्रकाशनाला जाणार का? अगं, विलासनं खरं तर ‘मी नक्षलवादी कसा झालो’ असं पुस्तक लिहिलं आहे. विचार कर.''

मेधाताईंनी बाबांकडे पाहिलं व निघता निघता त्या म्हणाल्या,

“बाबा, तसा संदेशही शासनाला जाऊ दे!''

बाबा काही बोलले नाहीत, पण त्यांना ते पटलं नसावं. ‘नर्मदा बचाव’मध्ये ते गुंतले होते, पण काही करता येत नसे. त्या दिवसभरात ते कुणाशी फारसं बोलले नाहीत. संध्याकाळी फिरण्याच्या वेळी त्यांनी मला एकच प्रश्न विचारला की, प्रकाशन समारंभ कधी आहे?

नेहमीप्रमाणे दिनचर्या पार पडली, पण त्यानंतर सारं शांत शांत होतं. रात्री जेवताना ‘मला भूक नाही’ म्हणून त्यांनी जेवणही बरोबर घेतलं नाही. मी नक्षलवादी विचारसरणीचा आहे, असा ग्रह बाबांनी का करून घेतला होता. मी विचार करत होतो. मी हेमलकसा इथं काम करत होतो. नक्षलवादी चळवळीनं तिथं जोर धरला होता. खरं तर त्यात मी कधी सक्रिय भाग घेत नव्हतो. पाण्यात राहून एक वेळ माशाशी वैर करता येईल, पण मगरीशी नाही, हे माझ्याइतकं बाबाही जाणून होते. खरं तर, आदिवासी नक्षलवादी का होतात, याचं सत्य मी त्या पुस्तकात मांडलं होतं.

दुसरा दिवसही तसाच उजाडला. आता जवळच्या कुणावर राग बाहेर पडत नाही तोपर्यंत बाबा ठीक होणार नाहीत हे समजून होतो. मी मुद्दामहून चुका करत होतो, की जेणेकरून बाबा रागवावेत. दुपारी मी आतल्या खोलीत हिशेब लिहीत बसलो होतो. बाबांचा काहीसा चढलेला आवाज कानांवर आला. मी सावध झालो. मला फार वेळ वाट पाहावी लागली नाही. किसन काहीसा घाबऱ्या घाबऱ्या आला, मला बाबांनी बोलावलं आहे असा निरोप घेऊन. मी नजरेनंच विचारलं, काय झालंय? तो रडक्या आवाजात म्हणाला, “माहीत नाही, भास्कर आहे बाबांपाशी.''

मी निघालो. बाबा व्हरांड्यात कॉटवर पडले होते. मी क्षणभरच बाबांकडे पाहिलं. मला नजर वळवावी लागली. बाबांनी खणखणीत आवाजात विचारलं,

“विलास, तुम्ही किती जण आहात इथं?'' मग भास्करकडे बोट करुन म्हणाले, “ह्याला सोडून.''

“बाबा, लोटू गावाला गेला. आम्ही फक्त तिघंच आहोत. किसन, मी, पंडित. ह्याला सोडून.'' मी भास्करकडे बोट केलं.

“मी मेलो तर माझ्या पायाला दोरी बांधून ओढत नर्मदेत टाका, पण ह्याला माझ्या प्रेतालासुद्धा हात लावू देऊ नकोस.''

मी सुन्न झालो. शांत उभा होतो. सर्व चेहरे पाडून उभे होते. काही वेळ शांततेत गेला. नंतर पेपर उचलत बाबा म्हणाले,

“जा.''

संध्याकाळी फिरताना एक शब्दही बोलले नाहीत. रात्री जेवताना कमी जेवले. रात्री अंगणात बाबा कॉटवर पडले होते. मी काही न बोलता चकरा मारत होतो. बाबांनी खुणेनं मला जवळ बोलावलं.

“विलास, भास्कर जेवला का?''

“हो बाबा, माझ्याबरोबर जेवला.''

“कुठं आहे तो?''

“बसमध्ये असेल बाबा!''

“जा, बोलव त्याला. जरा पाय दाबून दे म्हणावं. बघ, पण झोपला असेल तर उठवू नकोस.''

मी निघालो. बसपर्यंत जाताना नकळत माझ्या डोळ्यांत पाणी आलं. भास्कर आला. पाय दाबू लागला. त्याच्या डोळ्यांत आनंदाश्रू होते. बाबा रुमालानं डोळे पुसत आहेत हे पाहून मी आकाशातल्या चांदण्यांकडे पाहू लागलो. आकाशभर मला आकाशगंगाच आहे असं वाटत होतं. त्यावेळी मागे बाबा बोलताना एकदा म्हणाले होते, ‘विलास, कविकल्पना अशी आहे, की संध्याकाळी गोकुळातल्या गाई कन्हैया परत घेऊन येताना त्याच्या पायांनी उडालेली ही धूळ आहे,

म्हणजे आकाशगंगा.' बाबांच्या आयुष्यातल्या संध्याकाळी अशा प्रसंगात उडालेल्या धुळीच्या आकाशगंगेत न्हाऊन तृप्त झालेले आम्ही किती जण असू. दुसऱ्या दिवशी आम्हाला पूर्वीचे बाबा मिळाले हे सांगायला नको. आता विचार केल्यावर वाटतं-

'आणि मला माहीत आहे की
व्यथेच्या पेल्यातून सत्याचे घोट घेताना धीट ओठही कापतात!'
- ज्वाला आणि फुले 58

असं बाबा कवितेत का म्हणतात? आयुष्यात इतरांसाठी तत्त्वांशी, विचारांशी तडजोड करताना अनेक वेळा सत्य पचवणं किती अवघड गेलं असेल बाबांना. पण समाजासाठी काम करताना रक्त आटवणं म्हणजे काय हे बाबांनीच जाणलं असावं. तरी बाबांनी आपल्या मर्यादा कायम राखल्या. तत्त्वांशी, विचारांशी काही तडजोडी जरी कराव्या लागल्या, तरी शेवटपर्यंत ते आपल्या तत्त्वांशी, विचारांशी एकनिष्ठ राहिले. काही वेळा जवळच्यांचा राग, तिरस्कार सहन केला. हे ते विचारपूर्वक, ठरवून, करत असावेत, कारण कवितेत ते म्हणतात-

'आता त्यागाचा परित्याग मी केला आहे
खालच्यांना फलाटावरुन हात देऊन वर घेण्यासाठी
मी क्षणभर थोडा झुकेन
पण इतका नव्हे, की फलाटाच्या खालच्याच्या मजबूत मिठीने
मलाच खाली ओढावं
त्यात माझं पतन आहे, पण त्यांचं उत्थान नाही!
- ज्वाला आणि फुले 57

शासनाचा विरोध वाढल्यावर 'नर्मदा बचाव'साठी बाबांनी आपल्या मानाच्या पद्मश्री, पद्मविभूषण ह्या पदव्याही राष्ट्रपतींना परत केल्या. पण बाबांचं मोठेपण पदव्या परत केल्यानं कधी कमी होणार नव्हतं. म्हणूनच नंतर शासनानं गांधींच्या नावानं देण्यात येणारा प्रथम पुरस्कार बाबांनाच दिला आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाचाही पुरस्कार बाबांना दिला.

तरुणपणी महारोग्यांचं काम सुरु केल्यावर जवळजवळ चाळीस वर्षं बाबा संस्थेच्या बाहेर गेले नाहीत. अर्थात, त्यांच्या कामाची व आनंदवनची ख्याती देशभर नाही, तर जगभर पोहोचली होती. त्यात आधी सोमनाथ, नंतर हेमलकसा असे जंगलातले आव्हान असलेले प्रकल्प सुरू करण्यासाठी ते बराच काळ आनंदवनबाहेर असत. मी संस्थेत आलो तेव्हा हेमलकसा प्रकल्प सुरु होऊन दीडएक वर्ष झालं होतं. म्हणजे खरे ऐन उमेदीतले, साहसी बाबा मला बघण्याचं भाग्य मिळालं नाही. मी बाबांच्या सहवासात आलो तेव्हा बाबा 62 वर्षांचे होते, म्हणजे सर्वसाधारण भारतीय माणसाच्या दृष्टीनं पेन्शनर वयाचे. त्या वयात ते सर्वच बाबतीत आमच्याएवढे तरुण वाटत. मी मात्र बाबा-ताईंच्या छायेत, प्रकाशसारख्या समजून घेणाऱ्या सहकाऱ्यासोबत, सो कॉल्ड समाजसेवेतून वयाच्या 63-64 ला दैनंदिन कामातून निवृत्ती जाहीर केली. ह्यावरुन बाबा काय होते हे समजलं. तरुण पिढीला मोकळेपणा मिळावा म्हणून निवृत्त झालो अशी फुशारकी मारता येईल म्हणा; पण मग त्यावेळी मी तरुण होतो की, का आजच्या नवीन पिढीइतका मी हुशार नव्हतो म्हणून बाबा काम करत राहिले. का बाबांइतके नवीन काळाबरोबर आमचे विचार, तत्त्वं आम्ही बदलू शकलो नाही. का, मी केलं तेवढ्या कामावर समाधानी होतो आणि बाबांचे समाधान शेवटपर्यंत झालंच नाही. बाबांच्या कल्पनेतलं हेमलकसा लोक-बिरादरीचं स्वप्न खरंच पूर्ण झालं का? माझं स्वत:चं मत 'नाही' असंच आहे. कधी कधी शांत वेळी बाबांची आठवण येते. अनेक प्रसंग आठवतात. पण मग का स्वत:बद्दल विचार करु लागतो. मग आता बाबा नाहीत, तर त्यांच्या कविता. त्या वाचताना काही न उलगडलेलं कोडं सुटल्यासारखं वाटतं. बाबा म्हणतात-

'व्यथेवर प्रीत जडली आहे

वासनेचा नंदादीप झाला आहे
अहंकार कापरासारखा विरला आहे
न् माझ्या मस्तीत मी झुलत बसलो आहे.'
- करुणेचा कलाम 41

हेमलकसा इथं सर्वांबरोबर काम करताना मी व्यथा, आदिवासींचं दुःख, त्यांचे इतरांकडून होणारं शोषण पाहात आलो. त्यात माझ्याकडून, सहकाऱ्यांकडून होईल तेवढी मदत करत आलो. बाबांबरोबर दोन्ही भारत जोडो यात्रेत भारतभर फिरलो. भारतभरचं दुःख, दैन्य व व्यथा पाहिल्या; पण बाबांसारखी व्यथेवर प्रीती जडली नाही. का? वासनेचा नंदादीप वगैरे म्हणत नाही, पण आज शक्य असून इंटरनेट, ई-मेल, फेसबुक काय, मोबाईलही नकोसा वाटतो इतपत वासनामुक्त नक्की आहे. आज बऱ्याच गोष्टी शक्य आहेत, पण नको वाटतं. चार लोकांच्या गर्दीत गुदमरल्यासारखं होतं. मी नक्की काय करतोय? बाबांशी माझी तुलना! कधी शक्य नाही. माझ्या विचारांत खुळेपणा असेल, पण मी मूर्ख नाही. मी माझं सामान्यपण कधीच मान्य केलं आहे. सामान्यांचं एक चांगलं असतं, त्यांच्या अपेक्षा, हाव, मान-सन्मान व अपमान सामान्य असतात, पण त्यांना दुःखंही कमी असतात. सामान्य माझ्यासारखा व्यथेनं दुःखी होतो, व्यथित होतो. बाबांच्या व्यथेला उभारी येत असते. बाबा पुढे म्हणतात-

अहंकार कापरासारखा विरला आहे
अन् माझ्या मस्तीत मी झुलत बसलो आहे.

अरेच्या! हे तर सर्वांत महत्त्वाचं. तिथं तर मी मार खाल्ला की! किती खरं आहे पाहा. बाबा दोन भारत जोडो यात्रांनंतर, पंजाबच्या शांतीयात्रा पार पाडल्यावर लगोलग नर्मदा बचावसाठी कसरावद मुक्कामी गेले. त्यांचं आनंदवन प्रेम कधीच कमी झालं नाही, पण त्यातून त्यांनी निवृत्ती नक्की घेतली होती. ह्या सर्व काळात माझा बाबांशी निकट सहवास होता. ते नेहमी प्रकाशचं हेमलकसा व विकासचं आनंदवन, असा उल्लेख करत. माझं आनंदवन असं कधीही चुकून त्यांच्या तोंडून मी ऐकलं नाही. अहंकार कापरासारखा विरला म्हणण्यापेक्षा त्यांना अहंकारानं काही बोलताना मी तरी पाहिलं नाही. आयुष्यभर इतरांचा अहंकार जपण्यातच त्यांचं आयुष्य खर्च झालं. जे मला आजही वाटतं, हेमलकसा उभं करण्यात माझा मोठा वाटा आहे. बाबांची कविता नीट समजली तर असे अनेक उलगडे होतील. खरंच, बाबांच्या निकट राहूनही मी बाबांकडून काही शिकलो की नाही? बाबांच्या कवितेत गीतेचा उल्लेख नाही. श्रीकृष्णाचा उल्लेख ओझरता आहे. पण कर्मासाठी, कर्मफळाची कोणती अपेक्षा न ठेवता बाबांनी केलं, तिथं अहंकाराला कुठून जागा असणार! मस्तीत झुलत बसलेले बाबा तर अनेक वेळा मी पाहिले. प्रखर जाहीर टीकेनं ते कधी नाराज, हैराण, वैतागलेले मी पाहिलं नाही, ना कधी पुरस्कार, मान-सन्मानांनी हुरळून गेलेले पाहिले. दोन्ही वेळेस सर्व प्रकल्पांवरील नवीन कामात ते गुंतलेले असत. मस्तीत तर मीही आहे. माझी धर्मपत्नी मधूनमधून मला टोकतही असते. आपल्याला वाटेल तेच करावं, कुणाचं ऐकावं हे बंधन नको वाटतं. नात्यातल्या कुणाशी फार प्रेमाचे संबंध नाहीत. दोन-चार मित्रांशिवाय मित्र नाहीत. जे आहेत त्यांच्याशी मला वाटलं तरच संबंध ठेवणं. खरंच, मी मस्तीत आहे, पण बाबांसारखा झुलत आहे का, काय खटकतं? काय खुपतं? का मी माझ्या मस्तीत झुरत आहे?

येशू ख्रिस्त प्रेषित होता. देवदूत होता. बाबासुद्धा प्रेषित होते का? म्हणून त्यांना येशू जवळचा वाटत होता. हिंदू धर्मात प्रेषित ही कल्पना नाही. सर्व देवच आहेत. पण हिंदू धर्म किती लोकशाहीवादी आहे. प्रत्येक गोष्टीसाठी वेगळा देव, मंत्र्यांना जशी खाती असतात तसे. ख्रिस्ती धर्मात कसं, सर्व काही येशू. पण बाबा तर लोकशाहीचे कट्टर समर्थक होते. तरीसुद्धा निर्णय घेणाऱ्या केंद्रांची बेसुमार वाढ लोकशाहीत होते, त्यांना हे खटकत होतं. मला वाटतं, येशूची व गौतम बुद्धाची करुणा एकत्र बाबांमध्ये आली असावी. बाबा करुणेचे प्रेषित होते. बाबा करुणेचे गुलाम तर नव्हते

ना? बाबांनी खरोखर अगदी शेवटपर्यंत मला सोबत सहन केलं ते केवळ करुणेमुळेच की काय, असं वाटत राहातं. असो.

बाबांसारख्या माणसासोबत राहून माझ्यात फरक झाला नाही असं अनेकांना वाटतं, पण मला माझ्यात खूप फरक जाणवतो. एक तर मी कोणतंही काम करु शकेन असा आत्मविश्वास मला बाबांसोबत राहाण्यानंच मिळाला. दुसरी गोष्ट महत्त्वाची. एखाद्याला मदत करताना कधी त्यापासून पुढे मला काय फायदा होईल ह्याचा अगर पुण्य मिळेल असा विचार माझ्या मनात येत नाही. आता इतकी वर्षं संस्थेत काढल्यावर आजूबाजूचे, संस्थेतले आदिवासी कोणत्याही प्रकारच्या मदतीच्या अपेक्षेनं येतात. त्यांना शक्यतो जास्तीत जास्त मदत करण्याचा प्रयत्न करतो. बाबांच्या सहवासात राहिल्यानं, माणसाला फार कमी गरजा असतात, बाकीचे उगाच शरीराचे लाड असतात हे समजलं. त्याप्रमाणे रोजचे वापरायचे कपडे, इतर वस्तू साध्या वापरण्याची सवय लागली. अशा अनेक जमेच्या बाजूच्या आहेत. इथं येऊन मी काही गमावलं असं तर काहीच नाही. ‘बाबांचा माणूस’ ही माझी ओळख समाजाच्या दृष्टीनं फार मोठी असल्यानं, एक प्रकारची जबाबदारी आल्यानं, काही वेळा फटकळ बोलण्यावर बंधन येतं. बाबा गेल्यापासून मग मी बाहेरच्या पाहुण्यांपासून काहीसा दूर राहातो. बाबांना माझा स्वभाव, माझं बोलणं माहीत होतं. त्यांना कधी कधी नक्की त्रास होत असावा. पण ते सांभाळून घेत.

अरे हो, एक फार गमतीशीर प्रसंग घडला. म्हणावं तर गंमत, पण त्यातही बाबा शेवटपर्यंत असे वागले, की इतरांना वाटावं, बाबा मला किती जपतात. तसं ते खरंही होतं. वेळ असावी 1990-91 सालची. मी आनंदवनमध्ये काही कामानिमित्त आलो होतो. पूर्वीच्या घरासमोरच्या कट्ट्यावर चहा पीत बसलो होतो. त्यावेळी बाबा बाजूच्या विकासच्या घरात राहात असत. सकाळपासून कुणी ना कुणी बाबांना भेटण्यास येत असे. असाच एक बाबांना भेटून बाहेर आला. माझ्याकडे येऊन म्हणाला, “विलास, बाबा तुला बोलावत आहेत.’’ मी त्याच्याकडे पाहिलं. मला गंमत करण्याची हुक्की आली. मी अगदी सहज बोलावं असं म्हणालो, “अरे, बाबांना माहीत नाही का मी चहा पीत आहे?’’ त्या माणसाला काय बोलावं हे समजेना. विचित्र नजरेनं माझ्याकडे पाहात राहिला. तो परत बाबांकडे गेला हे माझ्या लक्षात आलं नाही. काही वेळानं मी बाबांकडे गेलो. बाबांनी शांतपणे मला विचारलं,

“विलास, चहा झाला?’’

मी नजर दुसरीकडे वळवली. पण नंतर बाबा कामाबद्दल बोलू लागले. मी मनात म्हटलं, चला, सुटलो. पण नंतर अनेक वेळा मी कुठं असलो आणि कुणी बाबांचा निरोप सांगण्यास आला की मला, ‘चहा झाला का? बाबा बोलावतात,’ असा निरोप देत. काही का असेना, ह्याचा फायदा मला कसरावद मुक्कामी आला. बाबा नर्मदा बचाव कार्यक्रमासाठी नर्मदेकाठी कसरावद इथं राहू लागले. बाबांच्या सेवेसाठी, सोयीसाठी आनंदवनमधले चार-पाच सोबती कसरावद इथं राहात. मीसुद्धा काही वेळा तिथं असे. नर्मदा बचाव कार्यकर्त्यांचा राबता होता. त्यांचं वागणं संघर्षातल्या कार्यकर्त्यांसारखं होतं. ठीक आहे, पण आमच्याबरोबरचं वागणं खूप अलिप्त, कोरडं, परकं व आम्हाला कमी मानणारं असे. त्यांची गुप्तता मी समजू शकतो, पण आम्ही कुणी तरी उगाच इथं आहोत असं होतं. काही महाभाग हसण्यासही महाग असत. बरं, दिवसाढवळ्या नाही तर रात्री-बेरात्री ते बाबांकडे येत. त्यांच्या मदतीला आम्हाला राहावं लागे. बाबांसाठी आम्ही कोणतीही नाराजी न दाखवता मदत करत होतो. एकदा मी बाहेर व्हरांड्यात बसलो असताना एक कार्यकर्ता आला. बाबांकडे जाऊन परत बाहेर आला. कधी नाही ते मला नावानं हाक मारून हात मिळवत शेजारी बसला. मला समजेना, माझी काय चूक झाली? हा मला दुसरा कुणी समजला तर नाही ना? काही वेळानं तो म्हणाला, “विलासजी, तुमचा चहा झाला असेल तर तुम्हाला बाबा बोलावत आहेत.’’ मी काय ते समजलो. मी हसत उठलो. बाबांकडे जाऊ लागलो. तो माझ्याकडे, ‘आहे बुवा!’ अशा नजरेनं पाहात होता. नंतर अनेक वेळा हा अनुभव मी घेतला. पुढे बाबा रक्ताच्या कर्करोगानं खरोखरी अंथरुणाला खिळले होते शेवटचे सहा महिने. मी जवळजवळ 18 तास त्यांच्या सोबत होतो. त्यावेळीही मी चहा घेतला की

नाही ह्याची ते इतरांकडे चौकशी करत. जवळच्या प्रत्येकाची ते काळजी घेत, पण आडून आडून. कौतुक करत ते, पण तोंडावर नाही, दुसऱ्या एखाद्याजवळ. मग तो साहजिकच बाबांनी केलेलं कौतुक त्याच्यापर्यंत पोहोचवत होता. शेवटच्या आजारात डॉ. विकासनं बाबांची खोली 'आय.सी.यू.'त रूपांतरित केली होती. डॉ. विजय पोळ स्वच्छतेबाबतीत कडक शिस्तीनं वागत होते. रक्ताच्या कर्करोगात त्या व्यक्तीला कसलाही संसर्ग होण्याची भीती असते. त्या वेळी आम्ही सर्वांना बाबांजवळ जाऊन भेटूनही देत नव्हतो. त्या सहा महिन्यांत अनेकांचे शिव्याशाप मी घेतले असतील. ज्यांचं बाबांवर खरं प्रेम होते ते समजून घेत, पण दिखाऊ प्रेमवाले बाबांना जवळून भेटण्यासाठी धडपडत. मी भेटू देत नाही म्हणून माझ्यावर नाराज असत. त्या वेळीही मी मस्तीत होतो. मला त्याचं काही वाटत नसे ते सोडा. बाबा शेवटपर्यंत आनंदी होते. ते स्वत: स्वच्छतेचे भोक्ते होते. आमची टीम चोख स्वच्छता ठेवत होती व पाळतही होती. त्यावरही बाबा खूश होते. बाबा कायम प्रसन्न दिसावेत ह्यासाठी आमची टीम झटत असे. आजारपणातही दर तीन दिवसांनी बाबांची दाढी झालीच पाहिजे हा कटाक्ष होता. बाबाही त्यासाठी तयार असत. आनंदवनमधला माली सकाळीच येत असे. विदर्भात न्हाव्याला माली म्हणतात. कधी कधी एखादी महत्त्वाची व्यक्ती बाबांना भेटण्यास येण्याआधी बाबा दाढीवर हात फिरवत. आम्ही समजून जात असू. असंच एकदा मुख्यमंत्री की गृहमंत्री येणार म्हणून निरोप आला. नेमका माली सुट्टीला बाहेरगावी गेला होता. दोन दिवसांनी येणार होता. मी पटकन म्हणालो, "मी करतो दाढी!'' स्वत:ची दाढी करणं ठीक होतं. मी आयुष्यभर कधी दुसऱ्याची दाढी केली नव्हती. मी पटकन तयार झालो हाच तर फरक बाबांच्या सहवासाचा होता. कोणतंही काम एखाद्यामुळे अडलं नाही पाहिजे, हेच तर बाबांचं तत्त्व होतं. बाबांच्या मार्गदर्शनात आम्ही योजना पार पाडल्या होत्या. शिस्तबद्ध नियोजन असे. त्यात एखाद्यामुळे काम अडणार नाही ना, हे बाबा बघत. नेहमी प्रत्येकाला अगदी तितका उत्तम नाही, पण निदान काम निभावून नेईल असा पर्याय बाबांकडे शिलकीत असे. म्हटलं, चला, करू. नाही तरी बाबा 'निम हकीम' म्हणतातच. खरोखर माझे जरासुद्धा हात कापले नाहीत, ना बाबांना कुठं थेंबभर रक्त आलं. दाढीनंतर गरम पाण्याच्या टॉवेलनं चेहरा पुसून मी आफ्टर शेव लोशन लावलं. कंगव्यानं केस नीट केले. आरसा बाबांसमोर धरला. बाबा हसले. मी थोडा वेळ आरसा तसाच समोर धरून ठेवला. बाबांनी माझ्याकडे पाहिलं व खुणेनं विचारलं, "काय रे?'' मी सहज म्हणालो, "बाबा आमटेंनी स्वत: प्रश्न विचारला का?''

बाबांचा चेहरा क्षणभर गंभीर झाला. मग ते मनापासून हसले. काय ते माझ्या आणि बाबांच्यात होतं. टीममधले इतरही हसले, पण काय ते न समजता. मी हे विसरूनही गेलो. दुसऱ्या दिवशी टीममधला एक जण म्हणाला, "बाबा, तुम्ही दाढी केल्याचं कौतुक करत म्हणाले, तुमचा दाजी तर सराईत माल्यासारखा दाढी करतो.''

संस्थेत अनेक रुग्ण मला दाजी म्हणतात म्हणून बाबाही माझा उल्लेख त्यांच्याजवळ तसाच करत. झालेल्या कौतुकानं मी आनंदात होतो; पण आरसा दाखवून गंमत केली त्यामुळे पुढचं संकट माहीत नव्हतं.

जानेवारी महिन्याची सुरुवात होती. बाबांची प्रकृती कधीही ढासळण्याची शक्यता होती. बाबांचा प्लेटलेट काऊंट परवा 9 वर आला होता. म्हणजे नऊ हजार. सामान्यपणे तो कमीत कमी दीड लाख असावा लागतो. आम्ही काळजीत होतो. सकाळीच नागपूरहून प्लेटलेटची पिशवी आली होती. ते देऊन आम्ही नेमीप्रमाणे बी.पी., टेंपरेचर पाहिलं. बाबा एकटक पाहात होते. खुणेनं विचारलं, 'ठीक आहे?'

डॉ. विजय पोळनं हसून ओ.के. म्हटलं. खरं तर 100 ताप होता. बाबांना काही तरी विचारायचं आहे असं वाटतं म्हणून डॉ. पोळ म्हणाले, "काय बाबा?''

बाबा म्हणाले, "अरे, मला झरीला जाता येईल का? मागे मी विकासला म्हणालो होतो, नागपूरहून आल्यावर नक्की येईन. काल त्यानं फोटो दाखवले. बहुतेक बांधकाम पुरं झालं आहे. मी मागे एकदाच गेलो आहे.''

बाबा काय म्हणत आहेत हे समजणं आमच्या आवाक्याबाहेरचं होतं. काही क्षण कुणीच बोलेना? डॉ. पोळ तर बाबांच्या हातावर हात ठेवून शून्यात बघत होते. हे शक्य नव्हतं. प्रवास, बाहेर उघड्यावर बाबांना नेणं म्हणजे संपलंच. परमनप्रवेश बाबा करु शकतात हे परत एकदा लक्षात आलं.

"अरे, कसला विचार करता, बरोबर माणसं तर राहातील. टिकाव, फावडं घ्या. बरं-वाईट झालं तर तिथं माझी क्रिया करा, नाही तरी कधी तरी होणारच आहे.''

आम्ही काहीच बोलत नव्हतो. आमचे चेहरे पडले होते. "बरं, आज-उद्या मी विकासशी बोलतो,'' एवढं म्हणून आम्ही वेळ मारुन नेली. मी मात्र मनात हादरलो होतो. डॉ. पोळला त्यावेळी काही बोलू शकत नव्हतो. चूक माझी होती. माझा स्वभाव मला नडला होता. मी बाबांची दाढी केली. बाबांनी माझं कौतुक केलं. बाबांना आरसा समोर करुन 'बाबा आमटेंनी स्वत: प्रश्न विचारला का?' असं विचारण्याचा मूर्ख आगाऊपणा मी का केला? एक तर डॉ. विकास त्यांचा लाडका. त्यात त्यानं एकट्यानं 'झरी' प्रकल्प दोन वर्षं तिथंच ठिय्या देऊन उभं केल्याचं कौतुक. त्याला बाबा आमटेंनी शब्द दिला होता, मी नागपूरहून आल्यावर झरीला येईन. खरंच, इतका स्वच्छ, पारदर्शक माणूस कोण असेल! काल त्यांना त्याची आठवण झाली असावी. आयुष्यात एकच शब्द ते पाळू शकले नाहीत ह्याचं दु:ख ते भोगत होते. त्याला मी निमित्त होतो. त्यांची स्पर्धा स्वत:शी होती. काय फक्त हीच इच्छा राहिली असावी का? मी कुणाचं काही सांगू शकत नव्हतो.

बाबांच्या सहवासात मी इतकं प्रचंड जग पाहिलं आहे, की त्याला मर्यादा नाही. त्यात सोबत बाबा असल्यानं ते पाहाणं सहज शक्य झालंय. नाही तर काही ठिकाणी मी पोहोचूसुद्धा शकलो नसतो. प्रत्येक गोष्टीकडे कोणत्या दृष्टीनं पाहावं हे फार महत्त्वाचं असतं. बाबांना सर्वसाधारण नास्तिक समजलं जात असे. ते पूजापाठ, कर्मकांड ह्याच्या विरोधात होते असं नाही, तर ते स्वत: त्यात गुंतत नसत. भारत जोडो यात्रेत मी बाबांमुळे कन्याकुमारी ते काश्मीर व अरुणाचल म्हणजेच इटानगर ते ओखा असा भारत पाहिला. एकूण भारतातल्या सर्व प्रांतातल्या 300 शहरांत मुक्काम केला. वाटेतली हजारो गावं, शहरं पाहिली. अनुभवली. अनेक चर्च, गुरुद्वारा, मशिदी, मदरसा आणि मंदिरं पाहिली. दक्षिणेतल्या मंदिरांतून बाबा मुख्यत: मनापासून त्यांचं भव्य बांधकाम व इतिहास जाणून घेत. चर्चेचा प्रश्नच नव्हता. त्यांच्या कवितेत वर्णन केल्याप्रमाणे ते मोहून जात असत. गुरुद्वारांमधूनची स्वच्छता व शिस्त त्यांना फार भावे. बोलताना ते त्याचा उल्लेख करत. शिखांमधला कट्टरपणा त्यांना आवडला. बाबांची कविता भारत जोडोआधीची आहे. नाही तर पुढची असती तर त्या येशूबरोबर शीख धर्माबद्दल बरंच काही आलं असतं. भारत जोडो व नंतर पंजाब शांतीयात्रामधून बाबांनी शीख धर्माबद्दल खूप समजून घेतलं होतं. पंजाबमध्ये शांतीयात्रा काढण्याआधी त्यांनी शीख धर्माचा सखोल अभ्यास केला होता. पंजाब शांतीयात्रे-दरम्यान त्यांना जीवे मारुन टाकण्याच्या धमक्याही मिळाल्या, तरीसुद्धा ते नेटानं पंजाबमध्ये जात राहिले. असेच एकदा दोन यात्रांदरम्यान ते आमच्या भेटीसाठी हेमलकसा इथं आले होते. त्या वेळी त्यांना शासनानं पोलीस संरक्षण जाहीर केल्यामुळे प्रकल्पाच्या दारातच पोलीस तंबू ठोकून राहिले होते. एका दिवसातच बाबांनी संरक्षण नाकारलं. नंतर बाबा म्हणाले होते, 'मला कुणी शीख कशाला मारेल?' त्यावेळी ते एवढं खात्रीनं कसं बोलले असतील? इतरांचं ठीक आहे, पण मी...! सुवर्ण मंदिरात ज्यावेळी कुणी सरकारी माणूस जाऊ शकत नव्हता. पोलीस तर सोडाच, अशा वेळी खलिस्तान चळवळीच्या सर्वोच्च नेत्याला त्याच्या गढीत शांततेचं आव्हान करणारे बाबा मी पाहिले होते. पूर्वी पंजाबमध्ये प्रत्येक हिंदू कुटुंबातला एक मुलगा शीख धर्म अंगीकारत असे. जर बाबा पंजाबात जन्माला आले असते तर एक सच्चा शीख इतिहासात नाव नोंदवून गेला असता हे नक्की. भारत जोडो यात्रेत बाबांसोबत सर्व प्रदेशांची राजभवनं पाहिली, अनेक राजकीय महाभागांना जवळून पाहिलं. इटानगरच्या राजभवनावर दुर्मिळ 'मिथुन' जवळून पाहावयास मिळाला. इनर लाइन परमीट असतानाही सर्वसाधारण पर्यटकांना जाण्यास मिळत नाही अशा ठिकाणी जाऊन चिनी सैनिकांना पाहिलं. ब्रह्मदेशातून मा. सुभाषचंद्र बोस आले ती खिंड पाहिली. सीमेवरील सैनिक व अधिकाऱ्यांनी बाबांचं केलेलं हृदयस्पर्शी स्वागतही

अनुभवलं.

बाबांची अभ्यासू तीक्ष्ण नजर काय पाहायचं ते सुचवे त्या वेळी मी चमकून जात असे. 'अरे, मला हे कसं दिसलं नाही.' असाच प्रसंग. आम्ही खजुराहो मंदिराला भेट दिली होती. बाबा सर्वत्र फिरले नाहीत, पण त्यांनी शिल्पांचं निरीक्षण केलं, इतिहास समजून घेतला आणि आराम करण्यास पसंती दिली. आग्रा मुक्कामीही, गेस्ट हाऊसच्या खिडकीतून ताज दिसतो म्हणून त्यांनी ताजमहाल बघितला नव्हता. गेस्ट हाऊस ताजमहालपूसन चार-पाच मैल दूर होतं. असे का? आता कविता समोर आहे-

'चौदा प्रेमाचा चोथा करणाऱ्या सम्राटाचे तकलुपी अश्रू
ज्यांनी पत्थरांतून चिरंतन केले
त्यांच्या आटलेल्या रक्ताची दखल
दरबारी भाटांनी घेतल्याचे ऐकिवात नाही!
बिगारीत बांधलेले मनोरे छातीवर घेऊन जे कोसळले
त्यांचे मृत्युलेख अजून इतिहासानं वाचलेले नाहीत!
- ज्वाला आणि फुले 66

श्रमिक, श्रमप्रतिष्ठा, श्रमसंस्कार ह्यावर बाबांचे प्रचंड प्रेम. नाक बसलेलं, हातापायांची बोटं नसलेल्या रुग्णांत ज्यांनी अजंठा-वेरूळ लेण्यातील भग्न सौंदर्य दिसलं, आणि त्यांनाच सोबत घेऊन ज्यांनी आनंदवनचा स्वर्ग उभारला, त्यानं काय पाहावं?

नंतर आठ-दहा मुक्कामांनंतर आम्ही मध्यप्रदेश पार करून राजस्थानच्या वाटेवर असताना एका गावी वाटेत एका प्राचीन शिवमंदिराला भेट दिली. तसं खरं तर कालौघात आजूबाजूला सगळं भग्न झालं होतं. मंदिराचा कळसही वीज पडल्यानं एका बाजूनं कोसळला होता. पण मंदिरावर खूप छान कोरीव काम होतं. मंदिराचा गाभारा खूप उंच होता. पंधरा-वीस पायऱ्या चढाव्या लागतील म्हणून बाबांनी नाकारलं. मी बाबांसोबत तिथल्या दोन मंदिरांच्या भोवती प्रदक्षिणा करू लागलो. मंदिरावरील शिल्पं पाहात चालत होतो. तिथला मार्गदर्शक बाबांना कोणती मूर्ती कुणाची ते सांगून पटवून देण्याचा प्रयत्न करत होता. बाबा दोन-तीन ठिकाणी थांबून काहीसे खाली पाहात होते. मार्गदर्शक वरच्या बाजूच्या शिल्पाची माहिती देत होता, बाबा खालच्या बाजूला काय पाहात होते की? मंदिर प्रदक्षिणा पूर्ण झाली. बाबांनी त्या मार्गदर्शकाला धन्यवाद दिले. तो निघाला, कारण त्यावर त्याचं पोट होतं. बाबा तिथंच थांबले. मला सांगितलं, की सोबत कॅमेरा असलेल्या दोघा-तिघांना बोलाव. दोघं जण कॅमेरा सज्ज करून आले. बाबांनी मंदिराच्या जोत्यावरील एका शिल्पाकडे काठीने दाखवत परत उलटी प्रदक्षिणा घालण्यास सुरुवात केली. साधारणत: बारा इंच उंच व साधारण तेवढ्याच जाडीची एक शिल्पपट्टी प्रदक्षिणेभर होती. प्रथम मला बोध होत नव्हता. नीट जवळून पाहिल्यावर प्रत्येक चित्रात स्त्री-प्रसूतीच्या वेगवेगळ्या तऱ्हा (पोझिशन) शिल्पातून कोरल्या होत्या. आता आम्ही चौघं थक्क झालो. सुरुवातीला सर्वसाधारण गुडघ्यात पाय मोडलेल्या स्थितीत झोपलेली स्त्री प्रसूती पूर्ण झालेले शिल्प होतं. एकूण चाळीसच्या वर शिल्पं होती. बसून, उभं राहून, काठीला लटकून अनेक तऱ्हा, तशात पायाळू, हात बाहेर अशा स्थितीतली बालकं असलेल्या. प्रसूतिशास्त्रात पूर्वापार भारतीयांना असलेला अभ्यासच शिल्परुपात होता.

"मला प्रत्येक वेगळा स्वच्छ, नीट फोटो हवा.' एवढंच बाबा म्हणाले. नंतर बाबांनी मिष्कील शेरा मारला. "विलास, खजुराहोची मैथुनशिल्प कोरलेल्यांना नंतर ही शिल्पं कोरावी लागली असावीत. तो गाईड सांगत होता, पण हे मंदिर पुढच्या शतकातलं असेल.'' नंतर हसून म्हणाले, "अरे, हा ठेवा एखाद्या भारतीय प्रसूतितज्ज्ञाला जागतिक कीर्ती मिळवून देईल...''

बाबांचे विचार विज्ञाननिष्ठ होते. ते नेहमी नव्याचं कौतुक करत. नवीन नवीन प्रथा, त्यातलं चांगलं घेऊन स्वीकारण्याकडे त्यांचा कल असे. कलियुगात सगळंच वाईट आहे असं त्यांना वाटत नसे. 'माझं कलियुग'मध्ये ते सरळ प्रश्नच करतात-

‘अरे, अशी कोणती पापं आहेत
जी कलियुगानं केली
आणि त्या युगात झाली नाहीत?’
- ज्वाला आणि फुले 84

आमच्या पुराणात विमानं होती, आम्ही अग्निबाण पूर्वीच तयार केला होता, अशा भाकडकथा मिरवणाऱ्यांवर त्यांचा राग होता. पण जुनं ते सर्व टाकाऊ असं मात्र त्यांना कधीच वाटत नसे. आज जिकडं तिकडं नवीन हायब्रीड बियाणं आलं. बाबांनी संस्थेत सुधारित शेतीवर भर दिला, जास्त उत्पन्न निघालं तर तीन-चार हजार रुग्णांसाठी ते आवश्यक होतं. बाबांनी लोक-बिरादरी प्रकल्पातून आदिवासींना आधुनिक शेतीचं शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. आम्ही अनेक वर्षं सुधारित वाणाची बिजाई आदिवासींना देत होतो, ती त्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी. त्या वेळीही ते नेहमी सांगत, काही प्रमाणात त्यांनी आपलं पारंपरिक धान (भात) लावलंच, कारण कमी पाऊस, हलकी जमीन व दुष्काळात ते त्यांच्या उपयोगाचं आहे. पूर्वीची खेडेगावातली काही बारीक चणीची जनावरं कायम राहिली पाहिजेत असं त्यांचं मत होतं. आज त्यांची नड तज्ज्ञांना वाटू लागली आहे.

भारत जोडो यात्रा हिमाचल प्रदेशातून चालली होती. रस्त्यावर खूप मोठी ढोरं आडवी आल्यानं बस थांबली. बाबा पडल्या पडल्या समोर व खिडकीतून बघत होते. त्यांनी मला खूण केली. बाबांना खाली उतरायचं होतं. पट्टा लावून, काठी घेऊन बाबा समोर आले. एक वयस्कर हरियानवी ढोरं हाकलत होता. बाबा शांतपणे हरियाना गाई-बैलांचं निरीक्षण करत होते. बस अडली, आपण काही तरी मोठा गुन्हा केला की काय? असं वाटून तो खेडूत एकदम काठी घेऊन ढोरांना मारु लागला. किती सांगितलं तरी प्रत्येक राज्यात बाबांच्या बसमागे स्थानिक पोलिसांची गाडी असेच. बाबांनी खुणेनं त्याला ‘ठीक आहे’ म्हटलं. आता बाबाच त्याच्याकडे जाऊ लागले. जेव्हा जवळ जाऊन बाबांनी त्या वयस्कर खेडूताच्या पाठीवर हात ठेवला तेव्हा त्याचा कावराबावरा चेहरा शांत झाला. त्याच्या चेहऱ्यावर हास्य उमटलं. बाबांनी त्याला हरियाना गाईंबद्दल माहिती विचारली. त्यानं आनंदानं सारं सांगितलं. तुला पोटाला पुरतं का? विचारल्यावर वर आकाशाकडे बोट दाखवत तो आपली गुरं घेऊन बाजूला झाला. बाबा परत फिरले. बाबांचं शेतीप्रमाणे गोपालनावर प्रेम होतं. मागे आनंदवनात दोन हरियाना गाई होत्या ह्याची त्यांनी आठवण काढली. बाबा दारापाशी उभे राहिले. त्यांना काही तरी आठवलं. वळून माझ्या खांद्यावर हात ठेवून ते बोलले,

“विलास, हेमलकसाच्या आसपास माडियांकडे शेकडो गाई-बैलं आहेत. मी खूप वेळा पाहिली आहेत. त्यात कमी उंचीची, लांब शेपूट व आखूड शिंगं असलेली, अंगभर विचित्र आकाराचे लालसर चट्टे असलेली एक जात आहे बघ. लक्ष ठेव. अं, मला वाटतं बेजूर गावाच्या कळपात नक्की मिळतील. ती जात टिकली पाहिजे. अरे, होस्टन, जर्सी ठीक आहे, पण जंगलात, त्या हवामानात तग धरून ठेवणारी जनावरं टिकली पाहिजेत. त्यांना चारा-पाण्याचे लाड नाहीत मालकासारखे. बघ, मी राहीन न राहीन, संस्थेत दोन नग तरी पाहिजेत.’’

बाबा हेमलकसा मुक्कामी असले की सकाळी एकटे पायी खूप हिंडत. जवळपासची गावं, जंगलं त्यांना पाठ होती. मी तिथंच राहात होतो. अनेक गावांशी संबंध होता, तरीसुद्धा त्या वेळी पटकन लालसर चट्टे असणारी गाय/बैल डोळ्यांसमोर येत नव्हते. पुढे मी विसरुनही गेलो. आता नुकतंच कधी तरी टी.व्ही.वर एका गावातल्या शेतकऱ्याची मुलाखत पाहिली. पूर्वापार चालत आलेल्या एका देशी गाईचं संगोपन त्यानं कसं केलं, त्याबद्दल शास्त्रज्ञांनी त्याचा सत्कार केला. गाववाल्यांनी त्याच्याकडून प्रेरणा घेऊन ही जात वाढवण्याचं ठरवलं आहे. तिथल्या हवामानात ही जात चांगलं उत्पन्न देते हे त्यानं सिद्ध केलं होतं. नंतर पुढे टीव्ही किती वेळ चालू होता. मला खांद्यावरील बाबांच्या पंज्याचा भास झाला. अरे, अशा किती तरी गोष्टी असतील. बाबांबरोबर वेगवेगळ्या प्रकल्पांवर अनेक कार्यकर्ते होते. बाबा अशा किती तरी गोष्टी सर्वांनाच सांगत असतील. कुणी काय

केलं, काय विसरलं. आम्ही बाबांची समाधी बांधली, पण त्यांनी सांगितलेली त्यांची आवड, त्यांच्या करायच्या राहिलेल्या गोष्टीसुद्धा आम्ही समाधीत टाकल्या की काय? आजही मला कुणी आग्रह केला तरच मी बाबांच्या समाधीवर जातो. पण 'स्नेह-सावली'त मात्र न चुकता जातो.

बघा कसं असतं! पण आजही पदोपदी बाबा आनंदवनमध्ये भेटतातच. मे 2011 मध्ये आनंदवन इथं असताना डेअरीची कीर्ती ऐकली म्हणून मी गोशाळेत गेलो. फार पूर्वी गोठ्यावरचा दर्याजी सकाळी बाबांना भेटण्यासाठी घरापाशी घुटमळत असे. बाबांना तो दिसला की बाबा विचारत, आज किती दूध आलं. पुढे पाचएक मिनिटं त्यांचा संवाद ऐकण्यासारखा असे. गाईंना नावं असत. नावं घेऊन तो किती दूध दिलं ते सांगत असे. बाबाही नावानं गायीची चौकशी करत. मी गोशाळेत गेलो. स्वच्छता दृष्ट लागेल अशी होती. बाबांनी पाहिलं असतं तर कौतुक केलं असतं. गाई-म्हशींची संख्या पूर्वीपेक्षा चौपट-पाचपट असावी. आता नावं नसणारच असा विचार करत असताना कानांवर टोचलेल्या नंबरच्या बिल्ल्यानं लक्ष वेधून घेतलं. मी अजून बाबांसोबतच्या काळात वावरत होतो. डेअरी प्रमुख गजानन वसुनं माहिती देण्यास सुरुवात केली. प्रत्येक गायीसमोर उभं राहून तो दोन आकडे सांगे, काही हजारांत किंमत आणि किती लीटर दूध देते ते. किमतीपेक्षाही दुधाचे आकडे ऐकून थक्क झालो. तिथं दहा-बारा कोंबड्या मधून हिंडत होत्या. त्याकडे बोट दाखवून तो म्हणाला, ह्या कोंबड्या मोकळ्याच असतात. किडे, गोचिड्याचं प्रमाण त्यामुळे नाहीच. मला परत बाबा आठवले. बाबांना ही कल्पना पसंत पडली असती. परत अंडीही विकली जातात. ही भव्यता, आकडे ऐकून धन्य वाटलं. "भाऊ, चला, तुम्हाला काही खास दाखवतो," असं म्हणाला म्हणून गजाननमागोमाग आतमध्ये गेलो. आतमध्ये काही गावठी गाई दिसत होत्या. तो म्हणाला, "ह्या भाकड गायी. बाबांनी पुढचा विचार करुन आमच्यासाठी 'स्नेह-सावली' उघडून आमची म्हातारपणाची सोय केली, तसं हे गाईंचं. इथं राहून खाऊन-पिऊन परत सुधारल्या तर तीन गाईंच्या बदल्यात एक गावठी गाया परत घेतो." मी हसलो. पण तो पुढे सरकला. मी पाहातच राहिलो. अगदी तशीच, पण उंचीनं थोडी उंच, लालसर चट्टे असलेली गावठी गाय आरामात बसून रवंथ करत होती. मला हरियानाच्या रस्त्यावर बाबांनी सांगितलेली गाय. आता गजानन काय बोलतोय ह्याकडे माझं लक्ष नव्हतं. थोड्या वेळानं भानावर येत मी गजाननला म्हणालो, "काही झालं तरी ही गाय कुणाला देऊ नकोस. बघ, व्यायली तर वाढव ही जात. ही बाबांची आठवण आहे असं समज."

कोणताच विषय बाबांना वर्ज्य नव्हता. वनौषधी झाडांची माहिती होती. चालता-बोलता बरोबरच्याला ते आपल्याकडंच ज्ञान देत राहात. अक्षरश: ज्ञानाची उधळण करत. पण माझ्यासारखे करंटे कार्यकर्ते असल्यावर काय होणार! बाबांना गाण्याची प्रचंड आवड होती. अनेक गायक त्यांचे चांगले मित्र होते. त्यातले अनेक भक्तही होते. भारत जोडो यात्रेत होशियारपूर की कर्नाल, आता नक्की आठवत नाही, अशांत पंजाबमुळे नेमका त्या दिवशी संचारबंदीचा आदेश लागू होता. साहजिक आम्ही सर्व एका गुरुद्वारात दिवसभर बंद होतो. तिथं प्रसिद्ध गायक अनुप जलोटा पोलिसांच्या गाडीतून बाबांच्या भेटीला आले. बाबांची सेवा म्हणून तिथं कोणत्याही साथीशिवाय दोन-तीन भजनं त्यांनी म्हटली होती. त्यावेळी मी बसमध्ये यात्राहिशोब करत होतो. नंतर उज्जैनला गेस्ट हाऊसवर कुमार गंधर्व फक्त बाबांसाठी अर्धा तास गायले. त्यावेळी मी गेस्ट हाऊसच्या बाहेर, वेळ आहे म्हणून बसमध्ये ताणून दिली होती. मागून योग नव्हता ऐकण्याचा असं म्हणालो खरं. पण बाबा नेहमी म्हणत, 'योग येत नसतो, साधावा लागतो.' की बाबा सोबत असताना मी फक्त बाबांचे कमी-जास्त बघीन, इतरांशी माझा काय संबंध असा विचार त्यावेळी असेल. बाबांचा फायदा मी घेतला का? नक्की नाही. सहज सोबत आहे म्हणून ज्या गोष्टी, सुखसोयी मिळत गेल्या त्या नाकारल्या मात्र नाहीत. पण बाबांचं नाव सांगून काही मिळवलं नाही वा तसा प्रयत्नही केला नाही. बाबांचा माणूस म्हणून समाजातल्या अनेकांनी बाबांच्या सोबत आहे म्हणून जे आदरातिथ्य केलं त्यांचा मी ऋणी नक्की आहे. पण शक्यतो कुणाचा मिंधा नक्की नाही. बाबांच्या सहवासात माझ्याकडून त्यांच्या प्रतिष्ठेला धक्का लागेल असं काम केलं नाही. हं, माझ्या बोलण्यामुळे नकळत बाबाभक्त दुखावले गेले

असण्याची शक्यता आहे. पण कित्येकदा भक्तीनं शंकरदर्शनाला जावं, तर नादात मध्ये नंदीपाशी ठेच लागतेच. बाबांकडे येणारे अनेक मान्यवर सहवासानं मला नावानं ओळखतात. ते मला काय म्हणत असतील बरं! नेहमी मी विचार करतो. कारण बाबाही कधी कधी अशा गमतीत, चेष्टेत आमच्याबरोबर सामील होत. पण चेष्टेची मस्करी होऊ देऊ नका, हे ते सतत बजावत. पु. ल. देशपांडे मला औरंगजेब म्हणत, हे मला बाबांकडून कळलं. आनंदवनमधलं प्रसिद्ध गीत 'आज ये अंगणा, साजीरा गोजीरा' हे लिहिलं मुंबईत. संगीत पु.लं.चं होतं की? स्वरबद्ध झालं पुण्यात. तीस वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. त्यावेळी मोबाईल/फोन सुविधा आतासारख्या नव्हत्या. नेमका त्याच वेळी मी सुट्टीला पुण्यात गेलो होतो. पु.लं.ना पुण्यात मला भेटण्यास सांगितलं होतं. भेटीत मला पु.लं.नी एक पुडकं दिलं व सांगितलं, ह्यात बाबांसाठी पत्र आहे तेव्हा ते फक्त बाबांना देणे. मी आनंदवनमध्ये आल्यावर प्रथम बाबांना ते पत्र दिलं. मी विसरून गेलो. त्यात ती टेप होती. नंतर आनंदवनभर मी ते गाणंच ऐकत होतो. बाबांकडे काहीच लपलेलं, खाजगी नसे. दुसऱ्या दिवशीच ते गप्पांत पाहुण्यांना सांगताना बोलून गेले. पु.लं.नी लिहिलंय, 'गाण्याची टेप औरंगजेबासोबत देत आहे, म्हणजे ती छेडछाड न होता आपल्यापर्यंत पोहोचेल.' आणि ते खरं होतं. आनंदवनात पु.ल. पेटी वाजवत तेव्हा अख्खं आनंदवन तिथं असे. मी नक्की नव्हतो. त्या वेळी बाबांच्या शब्दात 'माझ्या मौनाला लेखणीचा अंकुर फुटत नव्हता.' पण पुढे मी 'नेगल' लिहिलं. त्याचं पु.लं.नी मनापासून कौतुक तर केलंच, शिवाय हेमलकसामधल्या प्राणी अनाथलयासाठी दहा लाखावर मदतही केली. हा एक महत्त्वाचा फरक बाबांच्या सहवासाचा असावा का? लहानपणी माझी एक आत्या मला कपाळकरंटा म्हणत असे. अर्थात, ती कोणत्याच लहान मुलाला नावानं हाक मारत नसे. माझा स्वभाव, माझं भवितव्य ह्या आत्यानं खरं जाणलं असावं.

1989-90 साल असावं. प्रथमपासून मी हेमलकसा इथंच असल्यानं बाबांचा निकटचा सहवास, त्यांची खरी ओळख झालेली नव्हती. मी नेहमीप्रमाणे वर्षातून एकदा घरी यायचो तसा पुण्यात होतो. त्या वेळी बाबा काही कामानिमित्त पुण्यात दोन दिवस आले होते. त्या वेळी बाबा बहुतकरून बा. भ. बोरकरांकडे उतरत. मी त्यांच्याकडे बाबांना भेटण्यासाठी गेलो होतो. नेमके बाबा बाहेर निघाले होते. बाबा चल म्हणाले म्हणून त्यांच्यासोबत गाडीत बसलो. सोबत आणखी कुणी नव्हतं. गाडी स्वत: गाडीचा मालक चालवत होता. ते बाबांचे स्नेही होते की भक्त हेही मला माहीत नव्हतं. आम्ही अलका टॉकीजजवळ दगडी घरापाशी पोहोचलो. आम्ही घरात गेलो तेव्हा घरमालकानं फार आदरानं बाबांचं स्वागत केलं. घरात त्या वेळी आणखी कुणी नसावं. बाबा तिथल्या दिवाणावर पडले. स्नेही दिवाणापाशी खाली बसले. घरात भिंतीवर अनेक पेले, फोटो होते. घरमालक बाबांच्या पाया पडून समोर गाण्यास बसले. त्यांनी तंबोरा, सतार, एकतारी, नक्की काय घेतलं हे न समजण्याइतकंच माझं ज्ञान होतं. त्यांनी गाणं सुरु केलं. बाबा एकाग्रपणे ऐकत आहेत म्हटल्यावर मी बाहेर छोट्याशा व्हरांड्यात आलो. बाबांच्या चपलापाशी खुर्चीवर बसलो. बाजूला पडलेला केसरी पेपर घेऊन चाळू लागलो. त्याचा कंटाळा आल्यावर उघड्या दारावरील पाटीवर माझं लक्ष गेलं. पंडित भीमसेन जोशी असं नाव होतं. हे शास्त्रीय गायक आहेत एवढी माहिती मला होती. तासाभरानं आम्ही तिथून निघालो. बाबा व स्नेही त्यांच्या फक्त गाण्याबद्दलच बोलत होते. तर हे असं आहे. भारतातले तीन नावाजलेले गायक, बाबांची सेवा म्हणून फक्त बाबांसाठी गातात आणि मी त्यांचा सवेक तिथं हजर असूनही ते ऐकत नाही. का? फक्त कपाळकरंटा! बाबा नेहमी सांगतात, तरुणानं आपल्या कामात झोकून द्यावं. माझं काम फक्त बाबांची सेवा किंवा त्यांना सोबत. मी तेव्हा त्यामध्ये कायम तत्पर होतो. काटेकोरपणे वेळ पाळत होतो. कधी बाबांनीही माझी चूक काढली नव्हती.

बाबा स्वत: कुटुंबात फारसे गुंतले नाहीत, कारण त्यांनी स्वत: फार मोठं कुटुंब निर्माण केलं होतं. बाबा कुठंही गेले तरी सोबत कुटुंबातलं कुणी असेलच असं नव्हतं. पण चार-पाच रुग्ण, माझ्यासारखा एखादा सोबत असे. बाबांचे सेवक, खरं तर म्हणण्यापुरते होते. जसं वय वाढत गेले, अशा वेळी घरचं कुणी तरी म्हणजे हे आनंदवनवासी, संस्थेतले सोबत असतच. ह्या सोबत

राहाण्याऱ्यांमध्ये मतभेद, कुरबुरी असत. तरीसुद्धा बाबांसाठी टीम वर्क म्हणून ते बांधलेले राहात. काही वेळा ह्यांच्या वागण्याचा बाबांना त्रास होत असे. ते सहन करत. त्या वेळी विचार मनात येई, का बाबा सहन करतात? त्यात मीसुद्धा आलो. 'माती जागवील त्याला मत' ह्या पुस्तकात त्याचं उत्तर मला सापडलं. ते म्हणतात-

'मी अभ्यास केला
जीवनाची छोटीशी प्रयोगशाळा उभारुन
या यक्ष प्रश्नाचं उत्तर शोधून काढण्याचा प्रयत्न केला
प्राप्त परिस्थितीत
प्राप्त साधनं
चिंतन व कृती याच्यासह टक्कर दिली
मानवी समूहांच्या निरनिराळ्या थरात
समरस झालो
त्या मनाची भूक व त्या शरीरांची भूक
त्यांच्यात राहून अनुभवली.'
- माती जागवील त्याला मत 20/21

असं आहे तर, म्हणून बाबांएवढा मोठा माणूस आम्हा सामान्य लोकांत समरस होत होता, जितके ते मान्यवरांसोबत समरस होत असत. आमची सुख-दु:खं त्यांची होत. ते आमच्यातले एक होऊन जात. परक्या ठिकाणी, परक्या अडचणीच्या परिस्थितीत आम्हाला घराची ऊब मिळत राहिली. आम्ही त्यांच्या प्रयोगशाळेतली प्राप्त साधनं होतो. ते मान्यवरांचा योग्य मान राखत होते, आम्हाला तसं करायला लावत होते, पण त्याच वेळी आम्ही काही कमी आहोत असं आमच्या मनात येऊन देत नसत. अरेरे! जन्मभर ह्या कसरतीत त्यांनी किती सहन केलं असेल.

जसा जसा बाबांच्या निकट सहवासात मी रुळलो, तसतसे माझे बाबांशी संबंधही मोकळे झाले. बाबांना सर्वांची सुखदु:खं जाणून घेण्यात सारखाच रस आहे हे समजल्यावर आपोआप मोकळेपणा आला. कोणतीही गोष्ट कशी घडली हे ऐकण्यास बाबांना आवडे. समोरचा जास्तीचं काय सांगतोय हेही ते ओळखून असत. एखाद्या खोचक प्रश्नानं त्याचं पितळ उघडं पडे. माझ्या बाबतीत एक बरं होतं, की सांगण्यात सोन्याचा अंशही नसल्यानं उघडं पडण्याचा प्रश्नच नव्हता. बाबा प्रत्येकाच्या प्रमाणे प्रश्नाकडे पाहू शकतात हे कळल्यावर लपवण्यासारखं किंवा माझी स्वत:ची प्रतिक्रिया स्वच्छपणे मांडण्यात मी मागे राहिलो नाही, की कसली भीड ठेवली नाही. काही जणांना आमच्यातला हा मोकळेपणा खटकत असे. त्यांना एवढंही समजत नसे, कुणाच्या सांगण्यानं बाबा आपली मतं बदलत नाहीत, बनवत नाहीत. मी तर कोण होतो! बाबांना अनेक जणांनी विकलेलं मी पाहिलं आहे, पण त्यांना विकत घेणं शेवटपर्यंत कुणालाच जमलं नाही. एकविसाच्या शतकाच्या सुरुवातीपासून समाजसेवा हा काहीसा पेशा, उद्योग होऊ लागला आहे. पुण्यासारख्या शहरात दर दहा वर्षांत तरुणाच्या तोंडी नवीन शब्द असतो - वडील, शाळा, चाबूक, सही, अल्टीमेट. सध्या काय माहीत नाही. हेमलकसा इथं आल्यांनतर काही दिवस 'बेअर फूट डॉक्टर', नंतर 'व्हिलेज वर्कर', नंतर 'कोऑर्डिनेटर'. आता जो तो 'ग्रास रूट' लेव्हलला आमचं काम आहे म्हणतात. बाबांचे काम प्रथमपासून ग्रास रूट लेव्हलखाली जिथं गांडुळं असतात तिथून सुरु झालं. ह्याचा विचार किती जणांनी केला आहे? ज्या 'तुकाराम'ला पाहून बाबा ह्या कामात पडले, त्यांच्या अंगभर अळ्या होत्या. आनंदवनमध्ये आजही भरतीसाठी येणारे रुग्ण मी पाहातो, फारसा फरक नाही. समाजानं अक्षरश: फेकून दिलेल्या लोकांना घेऊन बाबांनी आनंदवन उभं केलं. बाबा शेवटपर्यंत मातीत पाय रोवून उभे राहिले, त्यामुळे ते शेवटपर्यंत माणूस होते. त्यांनी ह्या समाजानं फेकलेल्या लोकांच्या पोटाची भूक जाणली, त्याचप्रमाणे शरीराची भूक जाणली. रुग्णांची लग्नं करून अनेक कुटुंबांचं एक मोठं कुटुंब

निर्माण केलं - 'आनंदवन.'

बाबा स्वत: म्हणतात 'जीवनाची प्रयोगशाळा', पण मला आज वाटतं ती जीवनाच्या आत्म्याची प्रयोगशाळा होती. त्यात प्रयोगशाळेतली साधनं काय होती- करुणा, प्रेम, श्रम, आपुलकी. बाबा रुग्णांना ताठ उभं करुन राहिले नाहीत, तर पशूपेक्षा माणूस वेगळा आहे, त्यालासुद्धा मन असतं हे जाणलं. त्यांनी सोबतच्या प्रत्येकाच्या मनाचा विचार केला. आपल्याला सोबत करणारा काय विचार करतो हे ते कायम जाणून घेण्याचा प्रयत्न करत राहिले. अगदी शेवटच्या दिवसापर्यंत. म्हणूनच बाबा संस्थेचे शेवटपर्यंत फक्त विश्वस्तच राहिले, मालक कधी झाले नाहीत. आम्हा कार्यकर्त्यांना ते कधी मालक वाटलेच नाहीत.

भारत जोडो यात्रेत मधूनमधून एखाद्या ठिकाणी दोन दिवस मुक्काम असे. मध्यप्रदेशात आम्ही इंदूर मुक्कामी होतो. रात्री नेहमीप्रमाणे हिशेब पाहिल्यावर बाबा व्हाउचर्स, बिलावर सह्या करत होते. नेमके त्यावेळी खोलीत आम्ही कधी नव्हे ते दोघंच होतो. बाबांनी मला विचारलं, “अरे विलास, पेपरवेट, हँगर, काठी, पट्टा ही कुणाची नावं आहेत?''

मी बाबांच्या जवळ उभा होतो. मला माझ्या पायाची थरथर जाणवली. हाताचा कंप दिसू नये म्हणून मी हाताची मूठ मिटली. बाबा सह्या करता करता हसत होते. फाईल माझ्याकडे देत म्हणाले, “अरे, मला कळलं तर मीसुद्धा तुम्हाला मदत करीन.''

काही क्षण शांततेत गेले. बाबांना सांगणं योग्य आहे म्हणून त्यांना सारं सविस्तर सांगितलं. बाबांबरोबरच्या मान्यवरांची उठबस आम्हा सोबत्यांनाच करावी लागत होती. बाबांसमोर मान्यवरांचा नावानं उल्लेख करणं योग्य नसे. आम्ही टोपणनावांनी आपसात बोलत होतो. बाबांचे लक्ष असे. एक मान्यवर आमचे लाडके होते, कारण ते बाबांसारखेच साधे होते. ते फारसं कुणाला कामं सांगत नसत. त्यांना पेपरवेट का म्हणता असं बाबांनी विचारलं. आता काहीच फरक पडत नव्हता. बाबांना सांगितलं, “तुम्ही त्यांना कामं सांगता, पण प्रथम काही दिवस ते काहीच करत नाहीत, काही काळानंतर त्या प्रश्नात लक्ष घालतात. काही वेळा तशी वेळच येत नाही.'' बाबा मनापासून हसले.

“अरे विलास, चार दिवसांपूर्वी त्यांना मी एक काम सांगितलं ते झालं पाहिजे. बघ, आठवण कर.'' परत हसत म्हणाले, “नको, तू आठवण करु नकोस. मीच आठवण करीन.''

केवढं जपत बाबा आपल्या बरोबरच्यांना. असे अनेक प्रसंग आहेत. त्यावेळी बाबा सोबतच्यांना समजून घेत असावेत. मी तिथून निघताना बाबांनी गंभीरपणे विचारलं, “काय रे, मला कोणतं टोपण नाव आहे तुमच्यात ते नाही सांगितलंस!''

मी बाबांकडे सरळ पाहात म्हटलं, “बाबा. तुम्हाला आणखी वेगळं टोपण नाव कशाला हवं. तुम्ही सर्वांचे बाबा आहात.'' माझ्या पाठीमागे बाबांच्या चेहऱ्यावरील भाव नक्की काय असतील?

बाबांसोबत असताना अनेक राजकीय नेत्यांना जवळून पाहाण्याचा, समजण्याचा मला लाभ झाला. सर्व पक्षांचे राजकारणी बाबांना मानत हे मात्र नक्की. बाबांनी कधी कुणाच्या राजकारणात ढवळाढवळ केली नाही म्हणूनही असेल, कित्येक जण बाबांकडे सल्ला घेण्यास येत. काही सदिच्छा भेटीला असं दाखवत, पण बाबांच्या मार्मिक राजकीय भाष्यावर त्यांचं खरं लक्ष असे. बाबांचा, लोकशाहीचा एक सच्चा नागरिक म्हणून, फार वेगळा नि:पक्षपाती विचार होता. त्यासाठी हुशार राजकीय नेते बाबांच्या संपर्कात राहात. राजकारण्यांवर व सत्तेतील राजकीय नेत्यांवर बाबा भाषणातून टीका करत. कोणत्या पक्षासमोर ते कधी मिंधेपणानं वागत नसत. सर्व पक्षांत त्यांचे स्नेही होते. 'माती जागवील त्याला मत' ह्या पुस्तकात सर्व पक्षांवर टीका दिसली तरी प्रत्येक पक्षाची बलस्थानं ते दाखवून देतात. साम्यवाद त्यांचा नावडता पक्ष असावा. त्याच्या जागतिक नेत्यांना ते तारेवर उलटं लटकणाऱ्या वटवाघळांची उपमा देतात. बाबा 'श्रम-सरितेच्या तीरावर' ह्या कवितेत म्हणतात-

> 'पण श्रम-सरितेच्या तीरावर आपल्या गीताचे कलश भरण्यासाठी
> कोणीच कसे आले नाहीत?'

पण दुर्दैव असं की, बाबा ज्या लोकशाहीचे, गांधीवादाचे पुरस्कर्ते होते, त्याच लोकशाहीत जेव्हा आंध्रप्रदेशातले ज्वालामुखी, निखिलेश्वर, महास्वप्न, भैरवय्या, नागमुनी व चेराबंडा राजू अशा कवींनी श्रम-सरितेच्या किनाऱ्यावर आपले गीतकलश भरण्यास सुरुवात केली त्या वेळी लाखोंनी शेतकरी, शेतमजूर, कामगार त्यांच्या मागे होते. सामान्य नागरिक त्यांच्या मागे असताना बाबांनी कधी त्यांचं कौतुक माझ्यासमोर अगर कवितेतून केलं नाही, कारण त्या गीताला लाल रंग होता. त्यांच्या कवितेतून अंगार होता-

‘उत्तरं आम्हाला मिळाली आहेत
शस्त्रं आम्ही उचलली आहेत
अंतहीन असं हे युद्ध
आम्ही क्रांती चालू ठेवू
मृत्यू तुमचा आहे
विजय आमचा आहे.’
- पहाड फोडताना 35

गांधीवादी अहिंसेचा स्वीकार करणाऱ्या बाबांना हे कठीण होतं. पण आज 150 जिल्ह्यांत माओवाद्यांचा धुडगूस चालू असताना सर्व शासक ह्या समस्येवर काय करावं हे न समजण्याच्या स्थितीत असताना, बाबा 1967 साली आपल्या कवितेत हा धोका स्पष्टपणे मांडतात-

त्यांना वाळीत टाकणं हा या रोगावरील
उपचार नव्हे
आणि आता ते एखाद्या कुत्र्यासारखे
लाचार व कमजोरही राहिलेले नाहीत
की ज्याला ’पिसाळलेला व बेईमान’
अशी नावं ठेऊन
गोळी घालता येईल!
कुटल्याही शक्तीची उपेक्षा
घातक असते
आणि ती नुसती कोंडून ठेवणं
स्फोटक असतं
पशुत्व माणसाळणं
व त्याची शक्ती कामाला लावणं
हे माणसाचं मोठेपण
आणि त्याच्या संस्कृतीची कमाई आहे.
- माती जागवील त्याला मत 38/39

चाक हा विज्ञानातला पहिला शोध, असं सर्वसाधरण मत; पण शस्त्र चाकाआधी निर्माण झालं म्हणून पुढे विज्ञानाची प्रगती झाली. विज्ञानानं लावलेल्या प्रत्येक शोधाचा पुढे ह्या ना त्या प्रकारे शस्त्र म्हणून उपयोग होऊ लागला. बाबांना मी डावे गांधीवादी समजतो. हे माझं मत आहे. बाबा डाव्यांचं कौतुक करताना म्हणतात-

‘लहान गोष्टींसाठीही सर्वस्व पणाला लावणं
हे कम्युनिस्टांचं वैशिष्ट्य आहे
तळहातावर शिर घेऊन निघण्याचं साहस
हे त्यांचं सामर्थ्य आहे

एकदम बाजी लावून
आणि ठाण मांडून बसण्याची
जिद्द त्यांच्याजवळ आहे
पण ते आपल्या अघोरी तंत्रमंत्रांचे
गुलाम झालेले आहेत.'
- माती जागवील त्याला मत 39

बाबासुद्धा असेच होते की! फक्त त्यांच्याकडे अघोरी तंत्रमंत्र नव्हते. मग काय होतं? श्रम, प्रेम, करुणा, माणुसकी; आणि ते मानवतेचे गुलाम होते. मग माओवादी असेच वागले तर तेसुद्धा बाबांसारखे? छे! बाबांच्या मागे गांधी होते. बघा, कसं आहे, उगाच मी गांधीवादी होऊन जाईन.

बाबा नेहमी सर्व राजकीय पक्षांपासून दूर, अलिप्त राहिले. आपल्या वागण्यातून, बोलण्यातून त्यांनी हे सांभाळलं. तरीसुद्धा काँग्रेस पक्षाला ते झुकतं माप देत असत. कोणत्याही राजकीय पक्षाला आपल्या वागण्याचा उपयोग होणार नाही ह्याची ते काळजी घेत. राजकीय पक्षांबद्दल तरुणांसमोर भाषणात ते नेहमी म्हणत, हे पूज्य आणि बाकीचे परमपूज्य. हे बोलताना हवेत लहान शून्य व नंतर मोठं शून्य काढत. सर्वत्र हशा होत असे. ह्या संबंधात एक आठवण आहे.

भारत जोडो यात्रेत आम्ही हैद्राबाद इथं होतो. बाबा त्यावेळी भाषणाच्या शेवटी हात वर करून मोठ्यानं भारत जोडोचा नारा देत. समोरच्यांना म्हणत, हात उंचावून नारा द्या. हाताची मूठ दाखवू नका. हाताची मूठ जगाला दाखवणारे नष्ट झाले. हाताचा पंजा दाखवून नारा द्या.

रात्री फक्त मी आणि बाबा होतो. आज भाषणाला चांगली गर्दी लोटली होती म्हणून बाबा खुशीत होते. हैद्राबादमध्ये खालील राज्यातला कोरडेपणा कमी झाला होता, कारण सर्वसाधारण व्यक्ती हिंदी समजू लागली होती. त्यावेळी नेमक्या निवडणुका येऊ घातल्या होत्या. राजकीय धामधुमीत बाबांच्या सभेला गर्दी झाली होती हे विशेष. मी बोलावं की नाही असा विचारात एकदम म्हटलं, "पण बाबा, नारा देताना पंजा दाखवणं म्हणजे काँग्रेसचा, इंदिरा गांधींचा प्रचार वाटतो.''

बाबा माझ्याकडे रोखून पाहात राहिले. नंतर हसत त्यांनी त्यांना तसं वाटत नाही म्हणाले. पण दुसऱ्या दिवशी भाषणानंतर ते म्हणाले, हाताची बोटं अशी उघडून हात हलवून नारा द्या. पुढे काश्मिरपर्यंत बाबांनी कधी पंजा दाखवला नाही. बाबा फार मोकळ्या, खुल्या मनाचे होते. मी कोण होतो? एक सेवक. असं पुढेही कधी बारीकसारीक घडलं असं आठवत नाही. आम्ही उत्तर प्रदेशातून समोर चाललो होतो. बहुतेक दुसऱ्या भारत जोडो यात्रेत. तिथले एक व्यवस्थापक एका कार्यक्रमाची वेळ बदलण्याबद्दल माझ्याशी चर्चा करत होते. खरं तर अशा गोष्टी मी ठरवत नव्हतो. बाबा व सोबतचे मान्यवर ठरवत. मी अनेक वेळा सांगूनही ते गळ घालत होते. मी त्यांना म्हटलं, "बाबाच काय ते ठरवतात.''

तो गृहस्थ हसून माझ्याकडे पाहात, माझ्या खांद्यावर हात ठेवत म्हणाला, "अरे भाई, मैं आपके साथ दस दिन है. बाबासाहब का रिमोट आप है ऐसा सुना.''

मी फक्त हसलो. रात्री ही गोष्ट बाबांच्या कानावर घातली. नंतर ते सद्गृहस्थ मला कधी भेटले नाहीत.

गेल्या चार-पाच वर्षांत सर्वत्र 'स्त्रीभ्रूण हत्या'संबंधी बोललं जात आहे, त्या विरोधात जनमत निर्माण करण्याचा प्रयत्न चालू आहे, कठोर कायदे सुरु होत आहेत. पण बाबांना किती पुढचा विचार होता हे किती जणांना माहीत आहे? आनंदवनमध्ये 20 वर्षांपूर्वी ह्या खुडल्या गेलेल्या कळ्यांसाठी एक स्मरणशिला व एक उद्यान आहे ते 'मूक कळ्यांच्या स्मरणासाठी उद्यान.' केवढा कल्पनाविलास बाबांमध्ये होता. बरं, केवळ समाजानं दूर लोटलं म्हणून बाबांना वनाचा आश्रय घ्यावा लागला. वनात प्रकल्प उभारणं म्हणजे वृक्षतोड क्रमप्राप्त होती. आपण काही कारणानं, ते अगदी चांगलं

असलं तरी निसर्गाचा, पर्यावरणाचा नाश करतो ही टोचणी बाबांना नेहमी होती. पुढे काही प्रमाणात स्थिर झाल्यावर त्यांनी, म्हणजे विकासनं आनंदवनमध्ये प्रचंड प्रमाणावर वृक्ष लागवड केली. तरीसुद्धा बाबा शेवटपर्यंत जिथं राहात होतं त्या घरामागे एक 'अनाम वृक्षाची स्मरणशिला' बाबांनी उभारली. पुढे कसरावद इथं असताना नर्मदा किनारी घरासमोर सुरेख बाग करवली. वृक्ष लागवडीची आवड डॉ. विकासनं संस्थेत रुजवल्यानं बाबा काही अंशी तरी मनानं आयुष्यात नाइलाजानं कराव्या लागलेल्या पर्यावरणाच्या नाशाच्या टोचणीतून मुक्त झाले असावेत. बाबांचं मृत्यूनंतर दहन करण्याऐवजी दफन का केलं? हा अनेकांपुढे प्रश्न आहे. मनातून मला स्वत:लाही ते रुचलं नव्हतं. पण खरं कारण वेगळंच आहे. त्याला साक्षीदार मी होतो. बाबा नर्मदाकाठी असताना त्या नेमाड भागात नर्मदा किनारी झालेल्या वृक्षतोडीमुळे व पूर्वापार प्रथेमुळे त्या भागात मृत्यूनंतर प्रेत नर्मदा नदीत सोडून देत. तिकडे त्याला नर्मदेत शांत केला म्हणत. अनेक वेळा नदीतून अशी प्रेतं वाहत जाताना दिसत. नदीकाठीची कुत्री ते किनाऱ्यावर आणून खातानाही दिसत. गावकरी ते मुख्य प्रवाहातून पुढे वाहत जाई हे पाहात. त्यावरुनच पुढे बाबांनी मनानं ध्यास घेतला असावा.

'पशु पंछी भोजन करे
तन भंडारा होये.'

त्याच वेळी काही लोकांनी एक चळवळ सुरू केली, की प्रेताचं दफन करावं. ते बाबांकडे आले. बाबांनी ती कल्पना उचलून घेतली. त्याच वेळी एका छापील फॉर्मवर ताई-बाबांनी, स्वत: आम्ही असं करू, असं सही करून ठरवलं होतं. पण बाबांना आपली समाधी बांधावी असं कधी वाटलं नव्हतं हे नक्की. त्यांचे विचार स्पष्ट होते. ते कवितेत म्हणतात-

'इथं ज्ञानदेवाची समाधी त्यांच्या
ज्ञानेश्वरीहून पूज्य होते
अन् गांधींचा पुतळा त्यांच्या विचारांहून
आकर्षक होतो
सगळ्याच उदात्तांची या माणसांनी बनवली अशी
अर्थहीन प्रतीके.'
- करुणेचा कलाम 35

बाबांनी अनेक प्रकल्प उभे केले, त्यात अनेक नवीन नवीन प्रयोग केले, छोटे छोटे प्रकल्प सुरु केले. सोमनाथमध्ये दरवर्षी श्रमसंस्कार शिबिर सुरु केलं ते आजपर्यंत चालू आहे. ज्याप्रमाणे बाबांनी खुडल्या गेलेल्या बाल-बालिकांची आठवण ठेऊन 'मूक कळ्यांची स्मरणशिला' उभारली. त्याचप्रमाणे अनाथ, टाकून दिलेल्या मुलांसाठी 'गोकुळ' प्रकल्प सुरु केला. श्रीकृष्णाला गोकुळात ठेवलं म्हणून प्रकल्पाचं नाव 'गोकुळ' ठेवलं. बाबा-ताई मोठ्या प्रेमानं, आपुलकीनं लक्ष ठेवत होते. पुढे कसरावद मुक्कामी त्यातल्या काही मुलांची पत्रं येत. मी तिथं असताना आनंदवनहून कुणी आलं की बाबा आठवणीनं त्या गोकुळातल्या मुलांची चौकशी करत. एकदा अशा गप्पांत गोकुळचा विषय निघाला. त्या मुलांचं शिक्षण, त्यांची लग्नं, त्यांची जात कोणती वगैरे अनेक काळज्या बाबांना सतावत आहेत हे बोलण्यातून जाणवत असे. 'गोकुळ' प्रकल्पासाठी बाबांनी भरपूर आर्थिक तरतूद केली होती. पण मी बाबांना म्हणालो, "बाबा, तुम्ही नंद आणि ताई यशोदा झालात. पण पुढे काय? श्रीकृष्ण गोकुळात मोठा झाला, पण नियतीनं त्याला राज्य दिलं. ताई-बाबांच्या मागे त्यांना कोण राज्य देणार आहे, ते फक्त गुराखीच राहणार का?''

बाबा काहीच बोलले नाहीत. खरोखर बाबा-ताईंचं प्रेम, आपुलकी, माणुसकी, करुणा ह्या कोणत्याही बँकेत जमा करून ठेवता येणाऱ्या गोष्टी नाहीत ना? बाबांनी जाताना प्रकल्पासाठी भक्कम आर्थिक ठेव ठेवली; पण आयुष्यभर प्रेम, आपुलकी, माणुसकी, करुणा नुसती उधळत

राहिले. आम्ही यथेच्छ त्यात डुंबत राहिलो, पण त्याचा साठा आमच्या हृदयात करुन ठेवला नाही. पण ह्याचाही विचार बाबांनी केला होता की काय? बाबा आनंदवनमध्ये असतानाच एकदा मुंबईच्या वेश्यांची मुलं आनंदवनमध्ये 'गोकुळ' प्रकल्पात काही दिवस फार आनंदात होती. कारण नंद बाबा, ताई यशोदा हजर होत्या. काही दिवसांनी त्या वेश्या मुलं परत नेण्यास आल्या. मुलं परत जाणार ह्या कल्पनेनं बाबांना दु:ख झालं. अर्थात, त्या वेश्याही रडत रडत मुलं परत घेऊन गेल्या. त्यातल्या एकीनं बाबांच्या पायांवर डोकं टेकवताना पायाच्या अंगठ्याचं भक्तिभावानं चुंबन घेतलं. बाबा कवितेत म्हणतात -

'असाच एक थवा आला होता
दुसऱ्यांच्या अपराधाचं ओझं चेहऱ्यावर मिरवणारा
मी म्हटलं, तुम्ही जीवन जन्माला घातलं आहे
तुमचंही मातृत्व आहे वंदनीय
देवकी अन् यशोदेसारखं
त्यातल्या एकीनं निरोपाचे ओठ उमटवले
पायाच्या अंगठ्यावर
तेव्हा तिच्या अमर्त्य नमस्काराचं
मी मर्त्य निमित्त होतो.'
- करुणेचा कलाम 48

आपण जाणार, आपल्या मागे काय, हा विचार बाबांनी केला नसेल का? पण म्हणून काही न करता राहावं का? मी तरी किती मूर्खासारखं त्यांना विचारलं. ते तर त्यापुढचा विचार करत होते. त्यांच्या कवितेच्या पुढच्याच ओळीत म्हणतात-

'बेथल्हेम सम्राटासारखे
माझे सारे स्रोत तिथंच उगम पावतात.'
- करुणेचा कलाम 48

बाबांनी अनेक धक्के पचवले. निराश होणं त्यांच्या रक्तात नव्हतं की काय? प्रत्येक वेळी धक्क्यातून त्यांच्या नवीन विचारांचा स्रोत उगम पावत होता, त्यांच्या भाषेत नवीन स्वप्न पडत होतं.

मी बाबांच्या सोबत असताना सहजतेनं वावरत, वागत असे. अनेक वेळा न विचारता गप्प राहात असे. ज्या वेळी बाबा आपल्यासारखे आहेत असं वाटे त्यावेळी बोलत असे, विचारत असे. आता अनेक गोष्टींचा उलगडा होत आहे की गुंता? आता असं वाटतं, की बाबा सहसा कुणावर पूर्ण विश्वास ठेवत नसत. हा त्यांचा मूळ स्वभाव होता, की काम तडीस नेण्यासाठी संचालकाला तसं राहावं लागतं म्हणून बाबा तसं वागत? त्यांच्या पुस्तकात तसा उल्लेख नाही.

दरवर्षी इंदिरा गांधींच्या नावानं 'प्रियदर्शनी पुरस्कार' दिला जातो. एक वर्ष हा पुरस्कार बाबांच्या हस्ते देण्यासाठी बाबांना दिल्लीला बोलावलं होतं. बाबा व सोबत एक सेवक असा सर्व खर्च सरकार देणार होतं. अर्थात मी सोबत होतो. जाताना मला बाबांनी रेल्वेनं पाठवलं. स्वत: एकटे विमानानं आले. कार्यक्रम झाला. बाबांची व्यवस्था उत्तम होती. कायम बरोबर एक सनदी अधिकारी, गाडी, इतर दोघं-तिघं होते. दोन दिवसांच्या मुक्कामात चोवीस तास गाडी असतानाही बाबांनी फक्त कार्यक्रमापुरती गाडी वापरली, ते त्यांच्या स्वभावाप्रमाणे होतं. निघण्याआधी व्यवस्थापकांनी इतर सर्व खर्च व विमानाची दोन तिकिटं हातात दिली. अधिकारी विमानतळावर सोडण्यासही आले. त्यावेळी बाबांची तीन-चार वेळा, आमची तिकिटं पक्की आहेत ना, हे विचारलं. विमानतळावर विमानतळ अधिकारी बाबांच्या स्वागतासाठी उभे होते. उशीर होईल ह्या कल्पनेनं आम्ही दीड तास आधी पोहोचलो होतो. एक प्रसन्न एअर होस्टेस बाबांसाठी तिथं होती. तिनं आपलं नाव सांगून

ओळख करुन देऊन आदरानं खाली वाकून नमस्कार केला. 'मी सर्वात सिनियर एअर होस्टेस आहे, तुमची काळजी घेऊन तुम्हाला नागपूरला पोहोचवणं एवढीच एक जबाबदारी माझ्यावर आहे, आपण कसलीही काळजी करु नका,' असं सांगितलं. आमचं सामान एकानं घेतलं. आमची तिकिटं एअर होस्टेसनं घेतली व तिनं आम्हाला एका वातानुकूलीत खोलीत नेलं. तिथं कॉटवर गादी व स्वच्छ चादर होती. बाबांच्या उशा माझ्या हातात होत्या. 'तुम्ही आराम करा, अगदी समोरच्या तीन सीट तुमच्यासाठी राखीव आहेत. तिथं आपणास पाय लांब करून बसता येईल. आराम करा. अगदी वेळेवर मी तुम्हाला घेऊन जाईन.' असं सांगून ती गेली. माझ्या पोटात खड्डा पडला. बाबा असे एकटे. मनात म्हटलं, कठीण आहे. पाच मिनिटांनी बाबांनी शंका काढली, "अरे विलास, आपलं सामान नीट आपल्या विमानातच टाकतील ना?''

"हो बाबा, आपली नावं आहेत. माझ्यासमोरच त्यांनी चिठ्ठ्या लावल्या ना!''

"हो, पण तरी चौकशी करुन ये.''

मी बाहेर गेलो. कुठं चौकशी करणार? पण बाबा व्हीआयपी आहेत हे आम्हाला कधीच वाटलं नाही ना! मी खोलीबाहेर विचार करत उभा आहे म्हटल्यावर एक अधिकारी घाईत आला. काय अडचण आहे हे विचारण्यास. मी त्याला विचारलं. त्याला हसू आलं. मी त्याला विनंती केली, त्यांनी स्वत: बाबांना सांगावं. तो आनंदानं बाबांकडे आला. बाबांना भेटण्यास कोण तयार होणार नाही! त्यांनी तीन-चार वेळा सांगितलं, तुम्ही आराम करा. तुमचं सामान व्यवस्थित जाईल ह्याची काळजी मी घेतो. बाबा हसले खरं, पण त्यांचा किती विश्वास बसला येशू जाणे. खरं तर मला वाटतं, पत्र्याची निळी पेटी, त्याला मोठं कुलूप व अर्धा पेटीभर बाबांचं नाव, आनंदवनचा पूर्ण पत्ता लिहिलेला, दिल्ली विमानतळावर एकच असावी. थोड्या वेळानं एका वेटरनं बाबांना, चहा/कॉफी घेणार का? अशी चौकशी केली. बाबा पटकन 'काही नको' म्हणाले. बाबा वर आढ्याकडे पाहात पडले होते. विमानतळावर दिल्या जाणाऱ्या सर्व सूचना खोलीत नीट ऐकू येत होत्या. त्याच वेळी येणाऱ्या व जाणाऱ्या विमानांचे आवाजही येत होते. एका जाणाऱ्या विमानाचा कर्कश आवाज आला. बाबांनी मला खुणेनं जवळ बोलावलं.

"विलास, चौकशी कर, नाही तर मी असा इथं पडलेला राहीन, नंतर कळेल, नागपूरचं विमान गेलं म्हणून...''

मी खोलीबाहेर आलो. बराच वेळ बाहेरच थांबलो. तेवढ्यात मघाची एअर होस्टेस आली. मला हायसं वाटलं. ती माझ्याबरोबर खोलीत आल्याबरोबर बाबा उठू लागले. तिनं हातानंच बाबांना 'स्वस्थ पडा' असं खुणावून सांगितलं.

"विमान लागलं आहे, इतर प्रवासी बसल्यावर अगदी शेवटी मी आपणास घेऊन जाईन.''

बाबा फक्त हसले.

शेवटी एकदाचा आम्ही विमानाचा जिना चढलो. पुढे एअर होस्टेस होती, नंतर बाबा, शेवटी मी! दारात विमानाचा कॅप्टन उभा होता. अदबशीर नमस्कार करुन तो बाजूला झाला. विमानात सर्व प्रवासी बसलेले होते. अगदी समोरच्या तीन सीट रिकाम्या होत्या. बाबा मधल्या सीटवर बसले. मी बाजूला. खिडकीकडची सीट रिकामीच होती. आम्हाला आत घेतल्याबरोबर दार लागलं. कॅप्टननं, 'आम्ही बाबासाहेब आमटे ह्यांचं स्वागत करतो. आज ते माझ्या विमानातून प्रवास करत आहेत हा माझा मोठा सन्मान आहे. बाबासाहेबांचा प्रवास सुखकर होईल.' असं स्वागत केलं. त्या क्षणी विमान धावपट्टीकडे निघालंही. आता बाबा शांत होते. विमान भोपाळला काही मिनिटं थांबून नागपूरला जाणार होतं. संध्याकाळची सात वाजताची वेळ होती. निदान आज तरी चोख वेळेवर विमान निघालं होतं. थोड्या वेळानं चॉकलेट, सरबत आलं. ती खास सिनिअर एअर होस्टेस फक्त बाबांसाठी विमानातही होती. बाबा नाही म्हणत होते. भोपाळला विमान उतरलं व परत उडालं. प्रत्येक वेळी बाबांना बसल्यामुळे होणारा त्रास, कमरेतल्या वेदना चेहऱ्यावर दिसत होत्या. नंतर जेवण आलं. बाबांनी, माझं जेवण झालं आहे, ह्याला द्या, असं माझ्याकडे बोट दाखवलं. खरं तर आमचं जेवण

नागपूरमध्ये तयार होतं. माझा ट्रे आला. मी जेवू लागलो. त्यात काही तरी पुडींगसारखं होतं. त्यावर लालचुटूक चेरी होती. बाबा हळू आवाजात म्हणाले,

"विलास, चेरी किती छान आहे बघ!''

मी पटकन म्हणालो, "तुम्हाला फक्त पुडींग मागवू का?''

समोर पाहात ते घाईनं म्हणाले, "नको, नको...''

विमान नगापूरजवळ आलं. पट्टे बांधा अशी सूचना झाली. एअर होस्टेस स्वत: उठून आली. पण बाबांनी दिल्लीला बांधलेला पट्टा सोडलाच नव्हता. नागपूर येणार म्हटल्यावर बाबांनी हळू आवाजात विचारलं,

"विलास, आपली बस विमानतळावर आली असेल ना?''

बघा, कुणावर म्हणजे कुणावर विश्वास नाही. ताईंनी आयुष्य ह्या माणसा-सोबत कसं काढलं असेल ते त्याच जाणोत.

बाबांच्या स्वभावाचा आणखी एक पैलू म्हणजे, त्यांनी एखादी गोष्ट ठरवली की पुढे कधीही ती मोडली नाही. त्यांच्या काही गोष्टी आमच्या पुढे उदाहरण म्हणूनही असत. बाबा आनंदवनमध्ये असत तेव्हा जेवणाआधी ते प्रथम कोणता तरी एक पदार्थ स्वत: पंगतीत सर्वांना वाढत. त्यावेळी एक तर त्यांचा सर्वांशी परिचय होत असे, प्रत्येकाची आवड-निवड लक्षात येई, इतर वाढणाऱ्यांत शिस्त राहात असे. एक पदार्थ वाढून ते सर्वांबरोबर जेवणास बसत, म्हणजे पुढे उभं राहून जेवत. उभ्यानं जेवत असताना त्यांचं सर्वांवर लक्ष असे. वाढणाऱ्यांना खुणेनं ते कुणाला काय हवं ते दाखवत. स्वत:ची ताट-वाटी स्वत: घासत. त्यामुळे इतरांनासुद्धा घासावी लागे. पुढे आजारपणामुळे शेवटची काही वर्षं सोडली, तर हे त्यांनी कटाक्षानं जपलं. मधली काही वर्षं ताट-वाटी घासणं शक्य नाही असं जाणवल्यावर ते केळीच्या पानावर जेवत. जेवणानंतर केळीचं पान गाईसाठी जात असे. कुणाचं मन मोडणं त्यांना फार कठीण वाटे. असं एकदा कुणी तरी त्यांना गळ घालून सांगितलं, 'आपणास बी.पी.चा त्रास होतो, तुम्ही आयुर्वेदिक औषधं का घेत नाही.' सांगणारी व्यक्ती मान्यवर, प्रेमळ होती. बराच वेळ त्यावर गप्पा झाल्या. शेवटी बाबांनी बी.पी.साठी नेहमीची ॲलोपथीची औषधं घ्यावी, पण रोज जेवताना पाच पाकळ्या लसणाच्या कच्च्या खाव्या, असा तोडगा निघाला. बाबा रोज जेवणात पाच पाकळ्या लसूण खाऊ लागले. जवळजवळ तीस वर्षं नेमानं. त्यातून पुढे काही गमतीशीर प्रसंग घडले.

भारत जोडो यात्रेत आमचा रोज शहरात किंवा गावात दौरा असे. आपल्या गावात बाबांच्या व्यवस्थेत काही त्रुटी येऊ नये अशी सर्वांची इच्छा असे. ठिकठिकाणचे व्यवस्थापक दोन-तीन मुक्काम अलीकडे येऊन, भारत जोडो यात्रेत राहात. व्यवस्था कशी करावी हे ठरवत. त्याच वेळी स्वत: बाबांच्या जेवणाची चौकशी करत. गावातल्या कुणाकडून तरी बाबासांठी जेवण तयार होऊन येत असे. खरं तर, फक्त अजिबात तिखट नाही एवढंच पथ्य होतं. स्वत:साठी वगळा स्वयंपाक करावा हे खरं तर बाबांना मान्य नसे. त्यातही अनेक वेळा तिखट नाही म्हणून सांगावं तर बाबा भाजी-वरण तिखट आहे म्हणत. मग चौकशी केली की समजे, 'मिरची पावडर बिल्कुल नहीं डाला जी, हाँ! हरी मिर्च डाली स्वाद के लिए.' मग पुढे, हरी, लाल मिर्च नाही असं सांगावं लागे. तसंच कच्चा लसूण. रोज पाच पाकळ्या लसूण असं सांगूनही वाटीभर, वाडगाभर लसणाच्या पाकळ्या तयार असत. बाबांना आपल्या गावात काही कमी पडू नये असं सर्वांचं धोरण होतं. बाबांवरच्या प्रेमापोटी. ह्या सर्वाचा कहर झाला उज्जैन शहरात. बाबांचं ठीक होतं. त्या दिवशी प्रत्येकाच्या पानात पाच-पाच कच्च्या लसूण पाकळ्या वाढल्या. बाबांच्या कानांवर ही गोष्ट गेली. बाबा मनापासून हसले. ते स्वत: पंगतीत गेले. कुणी लसूण टाकू नका, खा, असं सांगितलं. सर्वांनी ते ऐकलंही. बाबा शब्द दिला म्हणून आठवणीनं, नेमानं कच्चा लसूण खात असत. त्यांना पुढे पुढे आपल्या घामाला लसणीचा वास तर येत नाही ना अशी शंका मनात येत असावी. अगदी दोन-तीनदा त्यांनी हे बोलूनही दाखवलं. आम्ही दिवसातून दोन-तीन रुमाल बदलत होतो. काही वेळा लोकांनी सांगूनही ते लसूण

खाणं बंद करत नव्हते. त्यांचे असे हट्ट आम्हा जवळच्यांना सांभाळावे लागत. त्यात त्यांच्याबद्दल आदर व प्रेम जास्त असे, पण कधी कधी चिडचिड होत असे. पण राग/तिरस्कार करता येत नाही, तर विनोदातूनही प्रकट करता येतो हेही मी बाबांकडून शिकलो.

एकीकडं हे तीस-पस्तीस वर्षं लसूण खाण्याचं व्रत तर दुसरीकडे शेवटची चाळीस वर्षं साबुदाणा न खाण्याचं दुसरं व्रत. साबुदाणा न खाण्याचं व्रत मात्र कुणाच्या रागावर नाही, तर स्वच्छतेपोटी.

भारत जोडो यात्रेत आम्ही तमीळनाडूमध्ये होतो. बाबा सगळीकडे त्या त्या भागातल्या शेती व इतर व्यवसायाची माहिती घेत असत. ते एका भागात आम्हाला मोठी मोठी रताळी दिसली. चौकशी केल्यावर ती कंदं रताळी नसून 'टोपीकाना' नावाची कंदमुळं आहेत. इथं अनेक जण त्याची शेती करतात व ह्या कंदापासून कारखान्यात साबुदाणा तयार होतो ही माहिती मिळाली. बस्स! मग साबुदाण्याच्या कारखान्याला भेट ठरली. स्थानिक व्यवस्थापकानं सोय केली. साबुदाणा झाडाला लागत नाही तर कारखान्यात तयार होतो हे अनेकांना माहीत नव्हतं. मला तरी कुठं माहीत होतं? आम्ही वाटेत एका कारखान्याला भेट दिली. बाबांनी मनापासून कारखान्याचा प्रत्येक भाग पाहिला. प्रत्येक ठिकाणी तिथं काम करणाऱ्या मजुरांशी स्थानिकांचा उपयोग दुभाषी म्हणून केला. ती मोठी मोठी कंदं एका जागी उकळवून त्यांची पेस्ट करतात. एक गरम पत्रा गोल फिरत असतो. आपण बुंदी पाडतो तशी पेस्ट त्या गरम पत्र्यावर बुंदीसारखी पडते. वाळून त्याचा साबुदाणा तयार होत होता. अर्थात, तो पूर्ण वाळलेला नव्हता. तिथून तो साबुदाणा काही मजूर स्त्रिया टोपल्यांनी बाहेर नेत होत्या. आम्ही त्यांच्या मागे बाहेर आलो. बाहेर सिमेंट-फरश्यांचं पक्कं अंगण होतं. तिथं त्या मजूर स्त्रिया टोपल्यांनी तो साबुदाणा टाकून परत जात होत्या. बाहेर अंगणात दुसऱ्या मजूर स्त्रिया तो साबुदाणा पायानं पसरवत होत्या. बाबांना पायानं पसरवणं खटकलं. त्या स्त्रियांच्या कपड्यांवरून त्यांची गरिबी उघडी पडत होती. इतका वेळचा बाबांचा काही तरी नवीन पाहिल्याचा आनंदी चेहरा काळवंडला. ते खिन्न, दु:खी दिसू लागले. बाबा तिथून निघाले. बाबांनी माझ्या खांद्यावर हातानं दाबलं. मी नजर वळवून बाबांकडे पाहू लागलो. बाबांनी हातातल्या काठीनं माझं लक्ष एका बाजूकडे केलं. मी तिकडे पाहू लागलो. पायानं साबुदाणा पसरवणाऱ्या मजूर स्त्रियांची लहान मुलं तिथल्या साबुदाण्यातच खेळत होती. एका लहान मुलानं तिथंच सर्व विधी केले होते.

बसमध्ये येऊन, बस सुरु झाल्यावर बाबांनी मला खुणेनं जवळ बोलावलं. हळू आवाजात म्हणाले,

"विलास, परत माझ्या डोळ्यांसमोर साबुदाणा येणार नाही ह्याची काळजी घे. हो, आणि परत गेल्यावर आनंदवनमध्ये कल्पना दे.'' काही वेळानं ते स्वत:शी बोलल्याप्रमाणे म्हणाले, 'कसे हे उपवास करतात साबुदाण्यानं!'

मी बाबांच्या सहवासात अनेक वर्षं राहिलो, काम केलं, तरी मला बाबा समजले असं वाटत नाही. संस्थेत बाबा होते तोपर्यंत सर्व काम नियोजनबद्ध व शिस्तीत चाले. कुणी एक नसला तरी कोणतंही काम अडत नसे. कधी कधी मनात विचार येतो, खरंच मी काही काम केलं का? सुरुवातीच्या कठीण काळात शहरातील सुखसोयींपासून दूर एका ठिकाणी राहिलो हेच महत्त्वाचं की काय? आज बाबा शरीरानं सोबत नसताना त्यांच्या कवितेतून त्यांना समजण्याचा प्रयत्न केला, तरी बाबा समजण्यापेक्षा मी मला समजून घेऊ लागलो.

2000 सालानंतर सगळं जगच गतिमान झालं. सत्य, असत्य, नीती, अनीती ह्या शब्दांच्या व्याख्याच बदलल्या. जागतिकीकरणाच्या, मुक्त अर्थव्यवस्थेच्या रेट्यात ते क्रमप्राप्त होतं. 'हे विश्वची माझे घर' असं प्रथम म्हणणारे विनोबा भावे बाबांच्या गुरुंपैकी एक. खरं तर बाबांनी अनेकांना गुरु मानलं तरी, त्यांच्या स्वभावामुळे कुणा एकाला गुरु मानून त्याचा गंडा बांधून राहिले नाहीत. प्रत्येकाकडून निवडक व स्वत:ला भावलेला गुण ते उचलत राहिले, अगदी शेवटपर्यंत. त्यात फक्त महान व्यक्तीच नाही, तर सामान्यसुद्धा होते. विनोबा भावेंबद्दल एका कवितेत ते म्हणतात-

‘कारण ज्यांच्या खांद्यावर पाय रोवून मी उच्चतर उड्डाणं घेतली
त्यापैकी तू एक आहेस
तू माझ्या गीतांची आई आहेस
तुझ्या प्रवचनातून पावनता प्यालो आहे मी
मात्र वंचनेचा चोथा टाकून
जो या तुझ्या अभागी अनुयायांच्या नशिबी आला.’
- ज्वाला आणि फुलं 36

माझ्यासारखा सामान्य माणूस बाजारात जातो, चार-पाच गाड्यांवर निवडून निवडून भाजी घेतो, तसे बाबा जन्मभर महान व्यक्तींनी मांडलेल्या बाजारात फिरत राहिले. अनेकांकडून घेतलेल्या निवडक मालातून आम्हा कार्यकर्त्यांना पौष्टिक आणि रुचकर खाद्य पुरवत राहिले. आम्ही आपापल्या कुवतीप्रमाणे ग्रहण करत राहिलो. आम्हाला सगळं आयतं मिळत राहिल्यानं त्याची किंमत नसावी, की माझी पचनशक्ती कमी पडली? की ते पचण्यासाठी आवश्यक मेहनत मी केली नाही? असो. त्याच कवितेत बाबा पुढे म्हणतात-

‘जिथून निघाला होतास एका तपापूर्वी
तिथंच येत आहेस परत.’
- ज्वाला आणि फुले 36

हे बाबांनी विनोबा भावे यांच्याबद्दल लिहिलं, की आपल्या पुढील आयुष्याबद्दल बाबांनी पूर्वीच लिहिलं होतं? बाबा एका तपानंतर नर्मदाकाठ सोडून जिथून निघाले होते तिथं ‘आनंदवन’मध्ये परत आले. खरंच असं असेल का? पुढील ओळी किती समर्पक आहेत पहा-

‘अभावाची साधना संपली आहे तुझी
आणि एक परिक्रमण पूर्ण होत आहे तुझं
तू सुरु केलंस ते आंदोलन नव्हतं; आरोहण नव्हतं
आता सुरु होऊ दे तुझं आरोहण.’
- ज्वाला आणि फुले 37

माझ्या सामान्य आकलनाप्रमाणे हा एक संघर्ष होता, जो बाबा तडीस न नेता परत फिरले. बाबा परत आले. त्यांची प्रकृती साथ देत नव्हती. मधल्या एका तपाच्या काळात डॉ. विकासने आनंदवनचा पूर्ण कायापालट केला होता. जागतिकीकरण, मुक्त अर्थव्यवस्थेला ते योग्यच होतं. कामाच्या कक्षा आनंदवनाबाहेर विस्तारल्या होत्या. तिसरी पिढी कामात उडी घेण्याच्या तयारीत होती. त्यांना पंख फुटले होते.

‘पंखांना क्षितिज नसतं
त्यांना फक्त झेपेच्या कवेत मावणारे आकाश असते
मातीची ओढ भेदीत उठतात पंख.’
- ज्वाला आणि फुले 39

हे बाबांनी पूर्वीच ओळखलं होतं, लिहिलेलं होतं. कष्टमय जीवनात अनेक आंदोलनं व आरोहणं करणोर बाबा, नंतर आनंदवनमध्ये ‘वानप्रस्थ’ स्वीकारुन राहिले, पण ते कधी ‘पेन्शनर’ झाले नाहीत. कधीही आम्हाला, नवीन पिढीला अध्यात्माचे डोस पाजले नाहीत. सर्वांना प्रेम देत जगले.

‘प्रेम देणाऱ्या या ‘वानप्रस्था’वर नव्या पिढ्याही प्रेम करतील.
आणि त्याच्या पदचिन्हावरुन वाटचाल करण्यास
सहज तयार होतील
तेव्हा बाजीप्रभूसारखा तो तरुण पिढीला संदेश देईल

नवे किल्ले सर करण्यासाठी तुम्ही पुढं व्हा!
तुमच्यासाठी ही एक खिंड मी लढवीन!
किमान एक खिंड मी लढवीन!
- ज्वाला आणि फुले 106

नवीन पिढीत हा भरवसा, ही जिद्द बाबांनी शेवटच्या श्वासापर्यंत दिल्यामुळे बाबा शरीरानं गेल्यानंतरही आनंवदन, इतर प्रकल्प आपली वाटचाल, आपली भरभराट करत राहिले. गांधींजींनंतर गांधीयन संस्था, गांधींची स्मारकं झाली, तसं झालं नाही. बाबांचे कार्य प्रवाहित राहिलं, जसं बाबांचं आयुष्य होतं.

ह्या तरुण पिढीला फक्त आनंदवन अगर आमटेच नाहीत, इतर अनेक राज्यांतले तरुण - जे वेगवेगळ्या ठिकाणी काम करत होते, आहेत - असे कार्यकर्ते आनंदवनमध्ये बाबांना भेटण्यास येत. आपल्या कामाबद्दल, अडी-अडचणींबद्दल बाबांशी बोलत. त्यातून मार्ग काढण्याचं मार्गदर्शन व जिद्द घेऊन जात. बाबा ह्या सर्वांना प्रेमासोबत लढण्याची स्फूर्ती देत आपली बाजीप्रभूची भूमिका पार पाडत होते. त्याच वेळी त्यांच्या अलंकारिक भाषेत 'प्रभूचे हजार हात' म्हणजे अनेक हितचिंतक बाबांना केवळ प्रेमापोटी भेटण्यास येऊन, सढळ हातांनी आनंदवनला मदत करून, रिकाम्या झालेल्या हातांत उचलणार नाही, पेलणार नाही एवढं प्रेम, आपुलकी घेऊन जात. बाबा म्हणत, फकिरासारखं असावं. 'जो देगा उसका भला, जो न देगा उसका भी भला.' साऱ्या आयुष्यभर बाबांनी ते कटाक्षानं पाळलंही. बाबांच्या प्रेरणेनं अनेक तरुण समाजसेवेसाठी आनंदवनमध्ये येत. अनेक जण काही काळानं परत जात. बाबांनी कधी कुणाला मज्जाव केला नाही. काही तरुण आपल्या खोट्या पदव्या मिरवत काही काळ संस्थेत मिरवत राहिले. काहींनी उच्चशिक्षित म्हणून खास सवलतीही उपभोगल्या. बाबांनी हे सर्व होऊ दिलं. कालांतरानं त्यांचा खोटेपणा उघडा झाला. काही बाहेर जाऊन बाबांवर टीका करु लागले. बाबा शांत होते. त्यांनी त्यांच्याकडे लक्षही दिलं नाही. त्यातले काही काळानंतर परत बाबांकडे आले. पूर्वीच्याच प्रेमानं बाबांनी त्यांचं स्वागत केलं. त्याच वेळी नवीन येणाऱ्या सर्वांचं, कोणतीही चौकशी अगर माहिती पडताळणी न करता, बाबा स्वागत करत राहिले. मी व माझ्यासारख्यांना आश्चर्य वाटे, अरे! बाबांसारखा मोठा माणूस असा कसा फसतो? बाबांना ह्यांना आधी का ओळखता आलं नाही? पण आम्हीच बाबांना ओळखू शकलो नाही. बाबा समाजसेवकच होते की, समाजसखा...

'आणि मिळतील त्याच माणसांतून तो
त्यांच्या काफिल्याचा कप्तान आणि खलाशीही तयार करतो
तो समाजसखा होऊन येतो
मित्रभावाशिवाय दुसरी कोणतीही जादू
त्याच्याजवळ नसते
म्हणून त्याची इतकी लगट
अज्ञान समाजाशी दुसरा कोणी करु शकत नाही.'
- ज्वाला आणि फुले 140

खोट्या पदव्या, खोटी पदे मिरवणारे हे स्वत: अज्ञानी समाजाचे घटक होते. ते समाजाला फसवत नव्हते, तर स्वत: फसत होते! बाबांना माहीत होतं.

'निसर्गाच्या न्यायाची चक्की धीरे धीरे फिरत असते
पण तिच्या खाली येत नाही
असं काहीच नसतं.'
- ज्वाला आणि फुले 75

बाबा शेवटपर्यंत एक विश्वस्त म्हणून आनंदवनात राहिले. आनंदवन समाजाचं होतं. बाबांनी कुणालाच आडकाठी केली नाही. आता उलगडा होत आहे. त्या वेळी विचार करत असे, बाबा असे कसे फसले. बाबांचं उच्चशिक्षितांबाबतचं जास्तीचं प्रेमच बाबांना धोका देतं. त्याच वेळी मी अनुभवत होतो आनंदवनचा शेतीपासून अगदी हिशेबापर्यंतचा सर्व कारभार आठवी-नववी पास रुग्ण सचोटीनं सांभाळत होते. अक्षरओळख नसलेले आनंदवन उभारत होते. पुढे एकदा कसरावद मुक्कामी मी बाबांना म्हटलं, "बाबा, तुम्ही ह्या उच्चशिक्षित तरुणांना नेहमी 'क्रीम ऑफ सोसायटी' म्हणतात. पण समाजात गरिबांच्या वाट्याला क्रीम तर सोडा, साधं दूधही येत नाही.''

बाबांनी काही सेकंद माझ्याकडे रोखून पाहिलं. नंतर स्मितहास्य करत ते म्हणाले, "विलास, खरं आहे. कदाचित संस्थेला ह्यांचा फारसा फायदा नसेलही, पण आपण फक्त संस्थेचा विचार करावा का? आपण ज्या समाजात, देशात राहातो त्याचं काय? देशाला, देशातील राजकीय पक्षांना त्या उच्चशिक्षित तरुणांची गरज आहे. नाही तर काही खरं नाही.''

मी बाबांकडे आलो, राहिलो, बाबांची संस्था आपली मानली. बाबांना सर्व जण आनंवदवन निर्माता म्हणून ओळखतात. बाबांनी कधी फक्त संस्थेचाच विचार केला नाही. आयुष्यातला एक महत्त्वाचा भाग किंवा एक प्रयोगशाळा म्हणून आनंदवन त्यांच्यासाठी प्राणप्रिय होतंही, पण देश व समाजाला विसरले नाहीत. आनंदवन व इतर प्रकल्प स्थिरस्थावर झाल्यावर दोन भारत जोडो यात्रा, पाच पंजाब शांतीयात्रा व नर्मदा संघर्षासाठी भारतभर तरुणांना घेऊन ते बाहेर पडले असावेत.

बाबा कधीही रिकामे राहिले नाहीत. कधी कुठं विश्रांतीसाठी गेले नाहीत. चार-पाच आजारपणात दवाखान्यात जी काही सक्तीची विश्रांती मिळाली असेल तेवढीच. एक काम, एक ध्येय साध्य करेपर्यंत पुढे काय करायचं ह्याचं मनन मनात चालू असे की काय? त्यांनी ठरवलेलं सर्व पूर्णही केलं. काय प्रेरणा होती? कुणाची शक्ती ह्यामागे होती? की काही सिद्धी प्राप्त होती बाबांना?

> 'पण खांद्यावर जेव्हा क्रूस असतो
> आणि डोक्याला कफन गुंडाळून जेव्हा जीवन निघालेलं असतं
> तेव्हा त्याच्या श्वासाश्वासात संकल्प असतात
> त्यांच्या आचाराच्या पायाशी सिद्धी लोळण घेत असतात.'
> - ज्वाला आणि फुले 141

असंच असावं. एक सिद्धी नाही, अनेक सिद्धी ह्या बाबांच्या पायाशी लोटांगण घालून होत्या. इतक्या उच्च कोटीला पोहोचलेले बाबा रोजच्या वागण्यात किती साधे होते. सौंदर्याचे, कलेचे भोक्ते होते. कर्करोगानं अक्षरश: मृत्युशय्येवर असताना मी अगर बाजूबाजूच्या कुणी नवीन शर्ट घातला तर जवळ बोलावून, कापडाला हात लावून कौतुक करत व हसत हसत, मला बंडी कशी दिसेल, असंही म्हणत. नवीन गोष्टीचं कौतुक करण्यात ते कधी मागे नसत. त्यांच्या अशा वागण्यानं कधी कधी त्यांची गंमत करण्यासही मी कचरत नसे. काही वेळा नकळतही होत असे. अशीच एक आठवण आहे. त्यावेळी गंमत वाटली, पण आपल्या विचारांशी ते किती ठाम होते हेही दिसून येतं.

भारत जोडो यात्रेत आम्ही बाबांसोबत अनेक संस्थांना भेटी देत असू. उत्तर प्रदेशात होतो. ख्रिश्चन धर्मीयांनी चालवलेल्या एका अनाथाश्रमास आम्ही भेट दिली. बरीच लहान मुलं-मुली होती. ख्रिश्चन नन्स सर्व पाहात होत्या. आमच्यासोबत संस्थेतली वयस्कर हेड नन, बाबांसोबत हिंडत माहिती देत होती. हेड नन प्रत्येकी, हे ईश्वर लेकरू कसं, कुठून आलं हे बाबांना सांगत होती. पण त्या गोड, निरागस प्रत्येक मुलाच्या गळ्यात 'होली क्रॉस' होता. मला नेमकं ते खटकलं. आम्ही बाहेर आलो. बाबा बसमध्ये कॉटवर पडले. ख्रिश्चन संस्थेत येऊनही आज बाबा आनंदी का नाहीत? त्यांची प्रकृती तर ठीक आहे ना? असा विचार मनात आला. तेवढ्यात एक नन रजिस्टर घेऊन बसमध्ये आली.

तिला बाबांचा अभिप्राय हवा होता. हे नेहमीचं होतं. आजकाल बाबा स्वत:च्या हातांनी लिहीत नसत. पडल्या पडल्या फक्त सही करत. भारत जोडो यात्रेत सर्व ठिकाणी बाबांच्या स्वप्नांचे सहोदर यदुनाथजी बाबांबरोबर बोलून अभिप्राय लिहीत. बाबा सही करत. त्या दिवशी नेमके यदुनाथजी दुसऱ्या गाडीनं पुढे गेले होते. त्यावेळी तिथं कर्नल रेगेसाहेब होते. मी त्यांच्याकडे रजिस्टर दिलं. बाबा बसमधल्या कॉटवर आडवे झाले होते. कर्नलसाहेब समोरच्या बाजूला सीटवर बसले होते. कर्नल रेगेसाहेबांनी हे काम कधी केलं नव्हतं. त्यात बाबांसाठी अभिप्राय लिहिणं, ह्यामुळे काहीसे गडबडले होते. बाबांचं सहीचं पेन हाती घेऊन मी त्यांच्यापाशी उभा होतो. ती नन उभी होती म्हणून बाबा अस्वस्थ होते. कर्नल रेगेसाहेबांनी माझ्याकडे पाहिलं. काय लिहू आता, असे भाव डोळ्यांत होते. गोड, निरागस लहान मुलांच्या गळ्यातील क्रॉस माझ्या नजरेसमोरुन जात नव्हते. मला नक्की काय झालं कळत नव्हतं. मी खाली वाकत कर्नल साहेबांना म्हणालो, “लिहा, ‘ही प्रोड्यूस, वुई केअर.’ नाही तरी सगळी ईश्वराची लेकरं आहेत असं म्हणतात.'' कर्नल साहेबांनी माझ्याकडे पाहिलं. माझं बोलणं त्यांना झेपलं नसावं. “बाबा ऐकत आहेत,'' एवढंच ते म्हणाले. घाईघाईनं ते लिहू लागले. त्यांनी काय लिहिलं माहीत नाही, मी पटकन बाबांची सही घेऊन रजिस्टर ननला दिलं. ती निघून गेली.

मी तिथून निघत होतो. बाबांनी खुणेनं जवळ बोलावलं व विचारलं,

“अरे, आकाशाकडे हात करुन तू कर्नल रेगेंना काय सांगत होतास? दोघंही हसत होता.''

“बाबा, त्यांना काही सुचत नव्हतं. मी म्हणालो, ‘लिहा, ही प्रोड्यूस, वुई केअर.’ वर हात करत म्हटलं, “नाही तरी ते म्हणतात, सगळी ईश्वराची लेकरं आहेत.''

बाबा माझ्याकडे एकटक पाहात मनापासून मोठ्यानं हसले. मी मनात हादरलो. बाबांच्या वाक्याची चेष्टा मी केली होती. त्यांना पटलं, की राग आला? पण रागात माणूस हसेल का? बसच्या दारातून कर्नल रेगे बाहेर पडताना हे ऐकताना थबकले होते. मग हसणं थांबवून बाबा म्हणाले, “अरे खरं की! सोपं होतं, योग्य होतं.''

बाबांची एक गोष्ट मी सुरुवातीपासून पाहात आलो आहे. कोणतीही गोष्ट मी केली असं ते कधी म्हणत नसत. सुरुवातीच्या दिवसांत रुग्णांवर उपचार ते स्वत: करत. कुणी डॉक्टर आनंदवनात नव्हता. त्यावेळीही हीच भावना होती. आनंदवनच्या जुन्या दवाखान्यात एक फलक होता. त्यावर लिहिलं आहे - ‘आय ट्रीट, ही क्युअर.’ मी उपचार करतो, पण बरं तो करतो... ईश्वर, अल्ला, येशू, कुणी तरी.

थोड्या वेळापूर्वी ती नन सारखी सारखी ईश्वराची लेकरं म्हणत होती म्हणून माझ्या मनात आलं, वाक्य उलटं केलं तर, ‘ही प्रोड्यूस, वुई केअर.’ तो जन्माला घालतो, आम्ही काळजी घेतो. गोड, निरागस मुलांच्या गळ्यात अडकवलेल्या क्रॉसचा राग असावा. आनंदवनमध्ये अनाथ मुलांचं संगोपन होत होतं. तिथं कुणी त्यांच्या धर्माचा विचार केला नव्हता, ना कुणाला प्रश्न पडला होता. बाबांनासुद्धा ते खटकलं होतं का? असावंच, कारण कवितेत ते म्हणतात-

‘ख्रिश्चॅनिटी आणि चर्चानिटी यांच्या लढाईत
मी ख्रिश्चॅनिटीच्या बाजूने उभा आहे.’
- करुणेचा कलाम 22

बाबा, ‘मी ख्रिश्चॅनिटीच्या बाजूने आहे’ असं का म्हणतात ह्याचा उलगडा आता होत आहे. बाबांनी ख्रिस्त स्वीकारला होता, पण चर्च, चर्चानिटीच्या ते विरोधात होते तर! येशूची करुणा, प्रेम व बंधुभाव त्यांनी स्वीकारला म्हणून ते समाजसेवकापासून समाजसखापर्यंत प्रवास करु शकले. कवितेत ख्रिस्ती धर्माबद्दल स्पष्ट शब्दांत मत मांडतात-

‘मी चटकन धूळमाखल्या धर्ममार्गावरुन उतरलो
अन् नांगरधारी ख्रिस्ताच्या पायवाटेनं चालू लागलो’
- करुणेचा कलाम 22

बाबांच्या आठवणी आहेत. काही फार खाजगी आहेत. काही लिहिताना लिहिताच येत नाही अशा आहेत. बाबांच्या सहवासात मी आनंद भोगला. एखाद्या दु:खी प्रसंगात मनानं खंबीर राहाण्याचा प्रयत्न केला. सोबत करताना भय, भीतीही वाटली, पण कधी, नको ही सोबत, असं वाटलं नाही. मी नेहमी तयार असे, पण सोबत कोण हवं हे ठरवणं बाबांच्या हातात होतं. बाबा असे होते, की तिथं कुणाचा वशिला चालत नसे. काम चालत असे. मी फार कामाचा होतो अशी फुशारकी मी मारत नाही, कारण बाबा धोरणी होते. कुणाची आपल्यासोबत बरेच दिवसांसाठी निवड करताना हे नक्की ते पाहात, की ज्या प्रकल्पावर, ज्या कामावर ही व्यक्ती काम करत आहे, तिथल्या कामावर ह्यांचा माझ्यासोबत राहाण्याने परिणाम होणार नाही. थोडक्यात, ते सरप्लस व्यक्ती निवडत असावेत.

बाबांनी ही पाऊलवाट शेवटपर्यंत कधीच सोडली नाही. आम्ही त्याच पाऊलवाटेवरून बाबांसोबत चालत आलो. बाबांनी शेवटपर्यंत समाजसेवेचा वधस्तंभ वाहिला. जरी त्या वधस्तंभाची अपुरी छाया आम्हाला मिळाली असेलही तरीसुद्धा बाबांच्या प्रेमाच्या गडद दाट छायेत आम्हाला कामाचे कष्ट कधी जाणवले नाहीत हे खरं. बाबांबद्दल मी आणखी काय सांगणार. काही वेळा लिहिताना धास्ती वाटत असते. बघा, गावाकडे शेतकरी बैलगाडी जुंपून घराकडून शेताकडे, बाजाराकडे जात असतो. बैल कष्टानं गाडी ओढत असतात. शेतकऱ्याचा कुत्रा बैलगाडीखालून सावलीत चालत असतो. त्याचे भाव असे असतात, की बैलगाडी त्याच्यामुळे चालत आहे. वधस्तंभ बाबांनी वाहिला. त्याच्या सावलीत चालताना माझ्याकडून असा भाव तर लिखाणात येणार नाही ना?

बाबा गेल्यावर इतर वेळी म्हणतात तशी पोकळी वगैरे मला तरी वाटली नाही. कारण बाबा फक्त विचार देत नव्हते, तर त्याला कृतीची जोड होती. काम एवढं प्रचंड आहे, की आजही ठिकठिकाणी बाबा जाणवतात. बाबा फक्त शरीरानं गेले; विचारांनी, कामानं ते आजही आहेत. मानसिक थकव्यातून मी सुरुवातीला आठवणी लिहिण्यास घेतल्या खऱ्या, पण आता लेखनासाठी वेळ काढावा लागतो असं वाटतं. बाबांच्या आठवणीत केवढी ऊर्जा आहे पाहा. आता मी काम शोधत असतो. प्रकल्पावरील कार्यकर्ते सुट्टीवर गेले तर त्यांचे काम मी माझ्या कुवतीप्रमाणे सांभाळत असतो. मग पिठाची चक्की चालवणं असो, नाही तर हिशोब असो, नाही तर गुरंढोरं हाकलणं असो. रात्री प्रकल्पावरील सर्व व्यवस्थित आहे ना, जागच्या जागी आहे ना, हे पाहात असतो. पाण्याची टाकी भरली का? सकाळी सगळीकडचे लाईट बंद केले का? कोणत्याही कामात कमीपणा वाटत नाही, कारण त्या प्रत्येक वेळी माझ्या सोबत बाबा असतात. नवीन पिढीच्या वेगानं मला उडता येणार नाही, तरीसुद्धा मी त्यांना काही तरी मदत करू शकेन ना? आता कंटाळा नाही. बाबांच्या सहवासातल्या आठवणी लिहिल्यावर मला बाबा समजले की नाही? हा मला पडलेला प्रश्न तसाच आहे. बाबांकडून खूप काही शिकलो, पण काठावर तरी पास झालो की नाही हे कधी कळलं नाही. अधिकार मिळत गेले. त्यात माझं कर्तृत्व होतं, की बाबा नेहमी वर पास करत गेले की काय? असो. नाही तरी माझ्याबद्दलही बाबांनी कवितेत दोन ओळी लिहून ठेवल्या आहेत हा केवढा सन्मान माझ्यासारख्याला मिळतो. बाबा कवितेत म्हणतात-

> 'शिवाय काही आहेत स्वत:च्याच कथेतील नायक
> काही मिनिटांत वाचून संपवता येणारे.' (क. क. ८८)

'बाबा महारोग्याचे नाही तर ताडगुळाचे काम करो,' विलास सोबत करणार किंवा काम करताना विलासला सहन करणं, सांभाळून घेणं बाबांच्या नशिबात होतं हेच खरं. आयुष्याच्या शेवटपर्यंत कष्टाची, हालअपेष्टांची सोबत होती हे अगदी खरं. पहाटे 4.45 मिनिटांनी शेवटचा श्वास घेईपर्यंत मी सोबत होतो.